# भगवान् बुद्ध.

[ चरित्र व धर्मसारसंग्रह ]

२३१

श्री सयाजी-साहित्यमाला

THE UNIVERSITY LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda
Call No. BL
1470
.B4
BK-3547

श्रीसयाजीसाहित्यमाला पुष्प २२३ व.

# भगवान् बुद्ध.

## [ चरित्र व धर्मसारसंग्रह ]

UNIVERSITY LIBRARY
M. S. UNIVERSITY OF BARODA

लेखक

**रामराव मार्तंड भांबुरकर**

१ दीर्घायू कसें व्हावें, २ लिंकन चरित्र, ३ श्री सयाजी प्रशस्ति, श्री सयाजी वृत्तरत्नमंजूषा, ५ गायकवाडी पोवाडे, ६ सरदारांचे इतिहास ७ पंडित जगनाथराय चरित्र ( गंगालहरी संगीत ), ८ कर्ण, ९ रामदास, इ. ग्रंथांचे कर्ते.

आवृत्ति १ ली सन १९३४
प्रति १०००  किं. १ रुपाया.

Gift
BK-3547
BL
1470
.B4

प्रकाशक
दामोदर सांवळाराम आणि मंडळी

मुद्रक
नरहरी माधवराव यंदे,
३८० इंदुप्रकाश प्रेस, ठाकुरद्वार मुंबई २

सकलगुणैश्वर्यमंडित, साहित्यप्रेमी, विद्याभिलाषी,

गुर्जराधिपति



श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल, समशेर बहादूर–राज्य बडोदें.

श्री.

# विज्ञापना

[illegible] देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि [illegible] विद्याभिलाषी श्रीमंत सरकार महाराजसाहेब [illegible] गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, [illegible] एस. आय., जी. सी. आय. ई., एलएल. डी. यांनीं [illegible] रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली [illegible] “ श्री सयाजी–साहित्यमाले”तून [illegible] पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

[illegible] “ भगवान् बुद्ध ” या नांवाचा ग्रंथ [illegible] मोबुरकर यांजकडून तयार करविला [illegible] २२३ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत [illegible].

[illegible]

मं. र. मजमुदार
भा. मदतनीस.

भा. का. भाटे
विद्याधिकारी,
राज्य बडोदें.

सकलगुणैश्वर्यमंडित, [illegible], [illegible],
गुर्जराधिपति



श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल, समशेर बहादुर–राज्य बडोदें.

श्री.

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. ई., एलएल. डी. यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून " श्री सयाजी–साहित्यमालें"तून विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार "**भगवान् बुद्ध**" या नांवाचा ग्रंथ रा. रा. रामराव मार्तंड भांबुरकर यांजकडून तयार करविला तो उक्त मालेंतील २३३ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा,
प्राच्यविद्यामंदिर
बडोदें.
२०-११-३४

मं. र. मजमुदार
भा. मदतनीस.

भा. का. भाटे
विद्याधिकारी,
राज्य बडोदें.

# प्रस्तावना.

धार्मिक औदासिन्याकरितां प्रसिद्ध असलेल्या हल्लीं सारख्या काळांत अन्य धर्मसंस्थापक व त्यांचीं धर्ममतें यांचा विचार करण्याचें प्रयोजन काय, असा प्रश्न साहजीक उत्पन्न होतो. हिंदूधर्माच्या उन्नतीकरितां जितके लोक शक्य तितक्यां दिशांनीं प्रयत्न करतील तितके हवे आहेत. हें जर खरें आहे, तर अशा प्रयत्नांत प्रस्तुत सारख्या पुस्काचें स्थान कोणतें, हें थोडेसें सांगण्यांत औचित्य-भंग होईल असें वाटत नाहीं.

या दृष्टीनें इतर धर्माच्या इतिहासाचें निरीक्षण केल्यास एक गोष्ट प्रामुख्यानें दृष्टोत्पत्तीस येते, ती अशी:-

धार्मिक प्रगतींत दोन गोष्टींचा अंतर्भाव होतो. (१) उच्च सनातन धर्मतत्वांचें निष्ठावंत आचरण आणि (२) अशा धर्मतत्वांचा सार्वत्रिक प्रसार. या पैकीं पहिल्या बाबतींत हिंदू-धर्मीयांची स्थिति आज समाधानकारक आहे असें जरी नसलें, तरी, त्याची जाणीव त्यांस आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं; आणि जोंपर्यंत जाणीव आहे तोंपर्यंत ती सुधारण्याची आशा सोडण्याचें कारण नाहीं. परंतु दुसऱ्या बाबतींत मात्र धर्मप्रसार हें पवित्र कर्तव्य नसून तें महत्पाप होय असें मानण्या-पर्यंत बहुजनसमाजाची तयारी !! आपल्याच परिस्थितींत इतरांनीं

काय केलें, या इतिहासाच्या धड्याकडेस दुर्लक्ष केल्यास पुढें पश्चात्तापाची पाळी येते; असा जगाचा अनुभव आहे; आणि म्हणूनच जगाच्या इतिहासांत प्रभावशाली व आक्रमणशील ठरलेल्या धोरणाचें अञ्जन सांप्रत हिंदु सामाजाच्या डोळ्यांत घालणें अत्यंत आवश्यक आहे.

"धर्मप्रसार" असें म्हणतांच ब्रह्महत्या घडली असें जर महंमद पैगंबर, जीझस् क्राइस्ट, अगर भगवान् बुद्ध यांनीं मानलें असतें, तर त्यांच्या धर्माची स्थिति काय झाली असती याची कल्पनाच केलेली बरी ! ! आतां हें खरें कीं, हातांत तरवार घेऊन विधर्मीयांच्या रक्तांच्या तांबड्या शाईनें स्वधर्मोन्नतीचा इतिहास लिहिणें, हें अत्यंत तामसी वृत्तीचें द्योतक अतएव गर्हणीय होय; पण त्याबरोबर हेंहि तितकेंच खरें कीं, आपण पवित्र व सनातन मानलेल्या धर्मतत्वांचा कोणी अत्यंत छळच करूं लागला तर मात्र योग्य दिसतील ते उपाय योजून आपल्या धर्मतत्वांचें अमरत्व प्रस्थापित करणें हें धर्मोन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक होय. अशा गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यामुळें आणि धर्मसहिष्णुतेचा विपरीत अर्थ केला गेल्यामुळें, हिंदुधर्माची स्थिति आज किती केविलवाणी झाली आहे, तें कोणास नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. अस्तु.

तात्पर्य इतकेंच कीं—धार्मिक प्रगतीच्या दृष्टीनें धर्मप्रसार हें अत्यंत महत्वाचें कार्य आहे. त्यासाठीं संघट्टनाची फार आवश्यकता आहे. आपला सनातन धर्म अनादिसिद्ध असल्यानें त्याचा शक्य तेवढ्या लोकांकडून स्वीकार होणें आवश्यक आहे. असें न झाल्यास आपल्या धर्मानुयायी लोकांची संख्या उत्तरोत्तर कमी होत जाऊन अखेर आपला सनातन धर्म नामशेष होण्याचा संभव आहे. अशा परिस्थितींत बौद्धधर्माचें सूक्ष्म निरीक्षण करणें अत्यंत महत्वाचें कार्य आहे; आणि हाच उद्देश डोळ्यांपुढें ठेवून प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.



प्रस्तुत पुस्तक, या विषयांवरील अनेक उपयुक्त पुस्तकांच्या आधारानें लिहिलें आहे. स्वतंत्र अभ्यासक अशी ग्रंथकाराची भूमिका नसल्यामुळें पुष्कळशा टीपा वगैरे देण्यास प्रस्तुत सारख्या लोकोपयोगी ग्रंथांत स्थान देणें शक्यच नव्हतें. त्याचप्रमाणें धर्मग्रंथांचें विशेष विवेचन न करतां त्याची फक्त संक्षिप्त माहिती दिली आहे. सर्वसामान्य वाचकांसाठीं ग्रंथ मनोरंजक, बोधपर व उपयुक्त व्हावा, असा प्रयत्न करण्यांत आला आहे. तत्कालिन् स्थलांची व व्यक्तींची बरीचशी माहिती, समकालीन् विचारक्रान्तीचें दिग्दर्शन इत्यादि गोष्टींनीं ग्रंथाच्या उपयुक्ततेंत भर पडेल अशी पूर्ण आशा आहे.

सांप्रतच्या पुस्तकाचे कर्ते रा. रामराव मार्तंड भांबुरकर यांचा लेखक या नात्यानें महाराष्ट्रास पूर्वींपासून परिचय आहेच. भाषेची शुद्धता, सरळता आणि रसाळता हे त्यांचे गुण प्रस्तुत ग्रंथांतही दिसून येतील.

बडोदा कॉलेज
ता. १२-११-१९३४

**चिंतामण विनायक जोशी.**
पाली-भाषाध्यापक

# अनुक्रमणिका.

## भाग १ ला.

### प्रकरण १ लें.—प्रास्ताविक. पृष्ट १—१२

(१) बुद्धचरित्र हें ऐतिहासिक आहे, १—२; (२) स्वर्गांतून अवतरण. ३; ( ३ ) भारहटचा शिलालेख " भगवतो ओकंटी." ४; ( ४ ) स्वप्नांतला दृष्टांत व त्याचें फलश्रुतिकथन. ४—५; ( ५ ) शुद्धोदन राजाची राणी महामायायेचें माहेरीं प्रयाण. ५; (६) वनांत हिंडतांना प्रसूति. ५; (७) बालकाचे जयघोषांत उद्गार. ६; (८) यशोधरा, छन्न, कालुदायिन, कंथक यांचे जन्म. ६; (९) बोधिवृक्षाचें व चार निधानांचे हांडे यांचें अस्तित्व. ६; (१०) देवलास बोधिसत्वाचें दर्शन व दैविक चमत्कार. ७; (११) बोधिसत्वाविषयीं देवलाचें भविष्य. ७; (१२) सिद्धार्थ असें नांव ठेविलें. ७; (१३) मुलगा "बुद्धच होणार" असें कौण्डिण्याचें वचन. ८; ( १४ ) सर्वसंगपरित्यागास कारणीभूत झालेलीं चार दृश्यें. ९; (१५) दृश्यें सिद्धार्थाच्या दृष्टीस न पडूं देण्याबद्दल बंदोबस्त. ९; (१६) दैविकचमत्कार. १०; (१७)

राजपुत्राचें यशोधरेशीं लग्न व राज्याभिषेक. ११–१२; (१८) राजपुत्राचें सामर्थ्य. १२; (१९) यशोधरेचा भाऊ देवदत्त धनुर्धारीचा मत्सरभाव. २१.

**प्रकरण २ रें.–भविष्यकथन. पृष्ट १३–३१**

(१) तारुण्यभरांत विलासांची रेलचेल. १३; (२) मदनाचा प्रभाव. १४; (३) देवतांनीं त्याचा ज्ञानदीप प्रज्वलित केला. १४; (४) अमंगलसूचक चार दृश्यें. १४–१५; (५) राजपुत्र व छन्नसारथी यांचा चटकदार संवाद. १५-१९; (६) त्यावरील संस्कृत श्लोक. १५-१९; (७) दृश्यें पाहिल्यावर राजपुत्राच्या स्थितींत बदल. १९-२०; (८) स्वर्गीय वस्त्रालंकारांचें परिधान. २०; (९) राहुलाचें जन्म. २०; (१०) किसागौतमीचे उद्गार व तिला बक्षीस मिळालेला कंठा. २१; (११) सर्वसंगपरित्यागाची जिज्ञासा, अशांत नृत्यांगनां नाच. २१; (१२) छन्नास घोडा तयार ठेवण्याची आज्ञा. २२; (१३) पत्नि व पुत्र ह्यांना भेटून जाण्याची इच्छा. २३; (१४) छन्नास बरोबर घेऊन सिद्धार्थाचें प्रयाण. २४-२५; (१५) अंतरिक्षांतून माराचें ( सैतानाचें ) आगमन. २५; (१६) मारास स्पष्टोत्तर. २६; (१७) देवतांनीं पुष्पवृष्टि केली. २७; (१८) अनोमा नदीवरून अश्वासह उड्डाण. २७; (१९) छन्नास अखेरचा निरोप; कंथक–अश्वाचें मरण. २८; श्रमणाचें दीक्षाग्रहण. २८; (२१) दृश्यें पाहून विरक्ति उत्पन्न होण्याचें विवेचन. २९-३१.



**प्रकरण ३ रें.–योगसाधन. पृष्ट ३२–४१**

(१) अनुपिय आम्रांईत मुक्काम करून राजगृह गांठलें. ३२; (२) राजगृहाविषयीं प्राचीन माहिती. ३२; (३) भिक्षावृत्ति. ३२-३३; (४) बिम्बिसार राजाची भेट व त्यांस स्पष्टोत्तर. ३३-३४; (५) आलारकालाम व उदक यांची भेट. ३४; (६) उद्दिष्ट कार्यसिद्धीस्तव उरुबेला येथें आगमन. ३४; (७) पंच वग्गियस ( पांच भिक्षू ) यांची भेट. ३४; (८) उग्रतपश्चर्येनें क्षीणबल अशी स्थिति झाली. ३५; (९) सरदारकन्या नंदबला इची भेट व भक्ति. ३६; (१०) नागराजा काल " नवीन बुद्धाचा उदय. " ३७; (११) सिद्धार्थाची ध्यानस्थ वृत्ति. ३८; (१२) माराशीं विलक्षण युद्ध व माराचा पराजय. ३८-४०; (१३) सिद्धार्थ त्रिकालज्ञानसंपन्न झाला (बुद्ध झाला.) ४१.

**प्रकरण ४ थें. धर्मोपदेश व दीक्षा. पृष्ट ४२–५२**

(१) भगवान् बुद्धाची परमानंद वृत्ति. ४२; (२) रत्नजडित मंदिरांत अभिधर्मपिटकाचें पठन. ४२; (३) " धर्म " विषयाचें तात्विक ज्ञान मिळविण्यास प्रारंभ; (४) गोथर्डची प्राचीन माहिती ४३; (५) माराच्या कन्यांनीं बुद्धासभोंवतीं पसरलेलें मोहजाल ४४; (६) त्यांना मिळालेलें स्पष्टोत्तर व त्यांचा पराजय. ४४; (७) मुकलिंद पर्वतावर मुसळधार पाऊस नागाचें फणाधारण; (८) तपुस्स व भल्लूक या दोन व्यापाऱ्यांची भेट व भक्ति; (९) ब्रह्मसहंपतीची सूचना. ४६; (१०) बनारसकडे प्रयाण ४७;

(११) आजीवक उपक यांची भेट. ४७; (१२) पांच भिक्षूंची पुन: भेट व त्यांना केलेला धर्मोपदेश. ४८; (१३) अष्टांगिक मार्ग व चार आर्यसत्यानी. ४९; (१४) कौण्डिण्य, वप्प, भद्दिय, महानामन्, अस्साजी, यांना दीक्षा; (१५) यशस् त्याचे आई-बापबायको व मित्र यांना दीक्षा ५०; (१६) अग्निपूजक जटाजूटधारी यांना दीक्षा. ५०; (१७) बिम्बिसार राजास सर्व समाजासह दीक्षा. ५१; (१८) संघाप्रीत्यर्थ वेणुवनाचें दान ५२; (१९) सारीपुत्र व मौद्गल्यायन यांना " शिष्यश्रेष्ठ " पदवी ५२.

प्रकरण ५ वें–राजगृहास पुनरागमन. पृष्ट ५३–५९

(१) शुद्धोदनाकडून पुत्रास (बुद्धास) बोलावणें. ५३; (२) निरोप घेऊन जाणारे सरदार व राजदूत यांना दीक्षा; (३) उदायिन यांस दीक्षा. ५४; (४) शुद्धोदन राजाची भेट व दैविक चमत्कारानें जलवृष्टि; (५) राजास दीक्षा व त्याची अरहत् पदावर स्थापना. ५६; (६) सहधर्मचारिणी यशोधरा इची भेट व तिला धर्मोपदेश. ५७; (७) नंदाचें लग्न मोडून त्यास इच्छेविरुद्ध दीक्षा. ५७; (८) राहुलास धर्म-दीक्षा दिली. ५८; (९) राजगृहाजवळील सीतावनांत मुक्काम. ५८; (१०) अनाथ पिण्डिकाकडून जेतवनाची खरेदी. ५८; (११) विशाखा उर्फ मिगार माता. ५९.



प्रकरण ६ वें–स्त्रियांचा भिक्षुसंघांत प्रवेश. पृष्ट ६०–६४

(१) सर्वांगसुंदर वेश्या आम्रपाली. ६०; (२) सालवतीचा पुत्र, जीवक. ६०; (३) साथीपासून लोकांचा बचाव व त्या सर्वांना दीक्षा ६१; (४) शाक्य व कोळीय यांत समेट व सर्वांना संघांत घेतले. ६१; (५) शुद्धोदनाचा मृत्यू. ६२; (६) गौतमाच्या उत्कटेच्छानुसार स्त्रियांना भिक्षुसंघांत घेतले. ६२; (७) भिक्षुसंघांत स्त्रियांच्या प्रवेशासंबंधांत बुद्धाचें भविष्य. ६३; (८) बिम्बिसारपत्नि खेमा इची अरहत पदावर स्थापना. ६४.

प्रकरण ७ वें.–स्वर्गांत गमन. पृष्ट ६५–७६

(१) बुद्धाचा हेवा करणारे ६ भिन्न पंथाचे साधू. ६५; (२) चमत्कार दाखविण्यासंबंधांत बुद्धाची योजना. ६५; (३) चंदनाच्या लाकडाचा चमत्कार. ६६; (४) बुद्धाची शिष्यवर्गास आज्ञा. ६७; (५) बुद्धानें स्वत: दाखविलेला चमत्कार. ६८; (६) मृत्युलोकाहून स्वर्गलोकास प्रयाण. ६९; (७) चिञ्चामाणविका तरुणीनें आणलेला आरोप. ७०; (८) भ्रमाचा मोपळा फुटला व ती नरकांत गेली. ७१; (९) बोधिराजपुत्रानें कोकनद राजवाड्यांत केलेला समारंभ; (१०) बुद्धानुयायांनीं वस्त्रावर पाय न देण्याबद्दल नियम. ७२; (११) संघांतील अनुयायी वर्गांतील भांडणें. ७२; (१२) संन्यासधर्मपालन व एकांतवासाच्या सुखाचा अनुभव. ७२; (१३) गजराजाशीं सहवास. ७३; (१४) संघांतील अंत:कलहाचा निर्णय. ७४; (१५) भारद्वाज

ब्राह्मणाची भेट व त्यास दीक्षा. ७४; ( १६ ) बुद्धानें स्वतःच्या सासऱ्यास दिलेला शाप. ७५; ( १७ ) बुद्धाच्या सासऱ्यास सुप्रसिद्ध पापाचें प्रायश्चित. ७६.

प्रकरण ८ वें.—सुंदरीचा खून व अङ्गलोकांस दीक्षा.

(१) यक्षास दीक्षा. ७७; (२) आनंदाची उपस्थायिकाचे जागीं नेमणूक. ७८; (३) अङ्गुलीमान दरोडेखोरास दीक्षा. (४) सुंदरीच्या खुनाचा गौतमावर खोटा आरोप. ७८; (५) नग्न साधूंकडे पाहाण्याचा तरुण कन्येचा नकार. ७८; (६) अङ्गप्रांतांतील लोकांस बुद्धानें दीक्षा दिली. ७९.

प्रकरण ९ वें-अजातशत्रूस दीक्षा शाक्यांचा नाश.

(१) अजातशत्रूची कारकीर्द. ८०; (२) बुद्धाचें ७२ वें वर्ष. ८०; (३) बुद्धदेवाबद्दल देवदत्ताचा मत्सराग्नि भडकला. ८०; (४) देवदत्ताची संघाधिपति होण्याची महत्वाकांक्षा. ८०; (५) देवदत्ताच्या कृतीचा निषेध. ८१; (६) राज्यपद व बुद्धपद याबद्दल देवदत्ताचे कुत्सित विचार. ८१; (७) देवदत्तास राज्याभिषेक. ८१; ( ८ ) बुद्धास ठार करण्याविषयीं देवदत्ताचें कृष्णकारस्थान. ८२; (९) बुद्धाच्या अंगावर फेकलेली शिला पर्वतशिखरांनीं झेलली. ८२; (१०) पिसाळलेल्या गजराजानें बुद्धाच्या चरणावर मस्तक ठेवलें. ८२; (११) संघांत कलह माजविण्याविषयीं देवदत्ताचे डाव. ८३; (१२) सारीपुत्र व मौद्गल्यायन यांची कामगिरी. ८४; (१३) देवदत्तास नरकाच्या यातना भोगण्याची तीव्र शिक्षा. ८४; (१४) अजातशत्रूला पश्चात्ताप होऊन त्यानें दीक्षा घेतली. ८५; (१५) शाक्यांचा नाश. ८६.



प्रकरण १० वें—तथागताचें देहावसान.

(१) गृध्रकूटांत बुद्धाचें वास्तव्य. ८६; (२) व्रुजिअन लोकांवर स्वारी करण्याचा बेत रहित. ८६; (३) प्रवास करतांना प्रवचनें व बुद्धानें वर्तविलेलें भविष्य. (४) आम्रपाली वेश्येचें औदार्य. ८७; (५) अवतार समाप्ति व त्याबद्दल मारास सूचना. ८७; (६) बुद्धास अतिसाराची व्यथा. ८९; (७) दर्शन घेण्याचीं स्थळें. ८९; (८) मरणोत्तर करावयाच्या विधीबद्दल विवेचन. ९०; (९) आनंदाचें तथागतानें केलेलें समाधान. ९०; (१०) भिन्न पंथाच्या साधूस दीक्षा. ९०; (११) बुद्धाचा संसार म्हणजेच बुद्धसंघ. ९१; (१२) तथागताचे अखेरचे शब्द. ९१; (१३) कुशीनगर येथें तथागताचें देहावसान. ९१; (१४) जगाचा ज्ञानसूर्य मावळला. ९१; (१५) काश्यप आल्यावर चिता पेटली. ९२; (१६) अस्थींची व्यवस्था. ९२; (१७) धर्म विषयक विचार. ९२–९३; (१८) आत्म्याचें अस्तित्व. ९३; (१९) बुद्धाचें बिकट कार्य. ९४; (२०) भागवत धर्माची संस्थापना. ९४.

## भाग २ रा.


### प्रकरण ११ वें-तत्वज्ञान. पृष्ट ९५-९९.

(१) दोन महान धर्मतत्वें. ९५; (२) आर्यसत्यानी व द्वादश प्रतीत्यसमुत्पाद. ९५; (३) योगविषयक साम्य ९५; (४) अविद्या किंवा प्रसुप्तावस्था. ९७; (५) आत्म्याविषयीं बौद्धमत. ९८; (६) कर्मवाद. ९९.

### प्रकरण १२ वें जीवतत्वें, कर्म व मोक्ष मार्ग.

(१) नामरूपाविषयीं. १००; (२) जन्मपुनर्जन्माचें कारण म्हणजे कर्म. १००; (३) निर्वाणाच्या पायऱ्या. १०१; (४) गोत्रभूमि. १०१; (५) निर्वाणाचे प्रकार. १०१-१०२; (६) मरणोत्तर अस्तित्वाचा प्रश्न अपूर्ण. १०२.

### प्रकरण १३ वें-निर्वाणाचीं साधनें-आध्यात्मिक व्यायाम.

(१) भावना चतुष्टय. १०३; (२) अशुभ भावना. १०३; (३) कसिण भावना. १०३; (४) अनुस्मृति. १०३; (५) समाधीचे प्रकार. १०४; (६) योगाची वाढ. १०४;

### प्रकरण १४ वें-विश्वाची रचना; प्राणिमात्रांचें वर्गीकरण.

(१) अनंत गोलाचें विश्व, प्रत्येक गोलाच्या मागें ग्रहमाला (२) चार खंडे व प्रत्येक गोलांत तीन लोक. १०५; (३) रूप





लोकाचे सोळा पोट विभाग. १०६; (४) प्रत्येक विभागांत सोळा देवतांचें वास्तव्य. १०६; (५) ब्रह्मलोकाचे चार विभाग. १०६; (६) नरक लोकाची योजना. १०६; (७) अशा गोष्टीवर सामान्य जनांचा विश्वास. १०६; (८) प्राणिमात्रांच्या वर्गीकरणाचा दुसरा प्रकार. १०७; (९) उन्नति व अवनति यांचें कर्मावर अवलंबन. १०७; (१०) वर्गीकरणाचें चौदा प्रकार. १०७; (११) अरहत, प्रत्येक बुद्ध व त्यांचीं लक्षणें. १०७-१०८; (१२) बुद्धांचीं विशेष लक्षणें. १०८-१०९; (१३) दहा प्रकारची शक्ति. १०९; (१४) अष्टादश "अवेणिकधर्म" १०९; (१५) वैशारद्य. ११०; (१५) गौतम बुद्धाची नामावली. ११०; (१६) मैत्रेय अजित. ११०; (१७) बुद्धानें सांगितलेलें स्वतःचें स्वरूप. १११; (१८) बोधिसत्वाचे गुणधर्म. १११-११२.

### प्रकरण १५ वें-नीतिविषयक कल्पना.

(१) बुद्धाचे मनावर स्मृतिग्रंथाचा पगडा. ११३; (२) पूर्ण आत्मज्ञान्यास नीतिनियम लागू नाहींत. ११४; (३) नीतिशास्त्राचें सर्वमान्यतत्व आत्मप्राप्ति. ११४; (४) बौद्धांचें दशशील. ११५; (५) बौद्धांचे नीतिनियम लोकमतानुवर्ती. ११५; (६) बौद्धधर्मांत औदार्याचें तत्व. ११६.

## भाग ३ रा.

### प्रकरण १६ वें–मठसंस्था

(१) बुद्धाच्या धर्मसंस्थापनेचें मर्म. ११७; (२) मठस्थापना अशोकाच्या पूर्वीं अस्तित्वांत होती. ११८; (३) प्रतिमोख्खधर्म-पुस्तकांतील नियमांचें पठन. ११८; (४) धूतांगांतील नियम यतींनींच पाळावयाचे. ११९; (५) संघप्रवेशांतील अंतर्व्यवस्था. ११९; (६) अन्नवस्त्र व राहाणी याविषयीं. ११९–१२०; (७) भिक्षूंचा परिवार. १२०; (८) भिक्षूंचें वसतिस्थान. १२०–१२१; (९) मठांतील अधिकारी. १२१; (१०) खाण्यापिण्याच्या बाबती. १२१; (११) प्रतिमोक्ष आणि मठांतील शिस्त. १२१–१२२; (१२) त्याची आठ प्रकरणें, नियम वगैरे. १२२; (१३) बौद्धधर्मीयांचें आराध्यदैवत. १२३; (१४) बौद्धांचे धर्मोत्सव. १२४–१२३.

---

## भाग ४ था.

### प्रकरण १७ वें–धार्मिक इतिहासाचें सिंहावलोकन

(१) भिक्षूंच्या दोन महासभा त्यांतील रहस्य (राजगृह वैशाली) १२६–१२७; (२) पाटलिपुत्र येथील सभा. १२९; (३) मोग्गालिपुत्र तिस्सा याचे संबंधांत वर्तविलेलें भविष्य. (४) राजा अशोक. १२९; (५) शिलालेखाविषयीं. १२९; (६) अशोकाचा काळ. १३०-१३१; (७) राजा अशोक व बौद्धधर्म. १३१–१३१ (८) राजे महाराजे यांची समदृष्टि होती. १३२; (९) अशोकानें बौद्ध धर्म स्वीकारला. १३२; (१०) अशोकाची उत्पत्ति. १३३; (११) अशोकाची माता सुभद्रांगी ही ब्राह्मणकन्या होती. (१२) या ब्राम्हणकन्येची मनोरंजक हकीकत. १३४; (१३) सुभद्रांगीस प्राप्त झालेले सुखाचे दिवस. १३४; (१४) मंगलकार्यांत अशोक पाल्याचीं तोरणें बांधण्याचा प्रघात. (१५) अशोकास बौद्ध धर्माविषयीं खरी सहानुभूति. १४५; (१६) अशोकाच्या मुलानें व मुलीनें दीक्षा घेतल्या. (१७) अशोकाकडून ठिकठिकाणीं मठस्थापना. १३६; (१८) सिलोनमध्यें बौद्धधर्माचा प्रवेश. १३७; (१९) ब्रह्मदेश, सिआम, जावा, इ. ठिकाणीं बौद्ध धर्माचा प्रसार. १३७; (२०) अशोकानंतर बौद्धधर्मांची स्थिति. १३७–१३८; (२१) बुद्धाच्या गुणसंकीर्तनापासून होणारा सात्विक आनंद. १३९.

### प्रकरण १८ वें–धार्मिक ग्रंथ.

(१) विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्मपिटक १४१; (२) महावस्तु ग्रंथाविषयीं. १४४; (३) अभिधर्मपुस्तकाविषयीं. १४५; (४) प्राकृत वाङ्मयाचा लोप व संस्कृत वाङ्मयाचा प्रसार. १४६; (५) वैपुल्यसूत्रें व ललितविस्तरांतीलवाक्यें यांचा संबंध. (६) महायानी सूत्रांचें चिनी भाषेंत भाषांतर. १४७;

(७) नागार्जुनाचा जन्म. १४७; (८) नागार्जुन हा महायानी-पंथाचा उत्पादक. १४७; (९) धारणीधर्मपुस्तकाविषयीं. १४८; (१०) बुद्धाचे बहुतेक ग्रंथ शुद्ध संस्कृत भाषेंत झाले. १४८; (११) सिलोनांत संस्कृत वाङ्मयाचा उत्कर्ष. १४८; (१२) अठ्ठकथा ग्रंथाविषयीं. १४९; (१३) त्याचें पाली भाषेंत भाषांतर. १४९; (१४) अठ्ठकथा ग्रंथाचा कालनिर्णय. १४९; (१५) सारसंग्रह ग्रंथाविषयीं. १५०; (१६) अठ्ठवय्यूग्रंथाची टीका. १५०; (१७) मिलिंदर व नागसेन यांचा धर्मग्रंथावरील संवाद. १५०; (१८) त्याचा कालनिर्णय. १५०; (१९) अनागत वंश ग्रंथाविषयीं. १५१; (२०) रसवाहिनी कथासमुच्चय. १५१; (२१) पद्यात्मक धार्मिक काव्यें. १५१; (२२) बुद्धसरिता, जातकमाला. १५१; (२३) अवदानकल्पलता वगैरे ग्रंथाविषयीं. १५१.

**प्रकरण १९ वें—बौद्धधर्म व जैनधर्म.**

(१) बौद्धसंप्रदाय व जैनसंप्रदाय या दोहोंतील मुख्य फरक. आणि (२) त्या दोहोंचा हिंदुधर्मांत अंतर्भाव. १५२—१५३; (३) यज्ञयाग व वेदपारायण बुद्धास मान्य नव्हतें. १५३; (४) बुद्धधर्माचें स्वरूप. १५३; (५) बौद्धधर्माचा प्रभाव व प्रसार. १५४; (६) पीटक अथवा करंडक. १५४; (७) बौद्धधर्मास विशेष चालन अशोकानें दिलें. १५४; (८) बुद्धानें लोभाषेंत



लोकांस उपदेश केला. १५४; (९) जैनांची लोकसंख्या, पंधरा लक्ष. १५४; (१०) कुमारिलभट्ट व शंकराचार्य. १५५; (११) बौद्धधर्माचा हिंदुधर्मावर परिणाम. १५५; (१२) शंकराचार्यांच्या पूर्वीच बौद्धधर्माचा ऱ्हास झाला होता. १५६; (१३) बौद्धधर्म व वैदिकधर्म यांचा एकत्र वास. १५६; (१४) शिलादित्यानें सभा भरवून केलेलें कार्य. १५६; (१५) कुमारिलभट्टाचें कार्य. १५६—१५७; (१६) विद्यारण्य स्वामीनें केलेलें कार्य. १५७; (१७) शंकराचार्यानें केलेलें कार्य. १५७; (१८) ज्ञानकोशांत या दोन्ही धर्मांबद्दल माहिती आहे. १५८.

**प्रकरण २० वें—दशविध पातकें.**

(१) दिल्यावाचून वस्तू घेणें. १५९; (२) जीव घेणें. १६०; (३) व्याभिचार. १६१; (४) खोटें बोलणें. १६२; (५) आळ घेणें. १६३; (६) असंबद्ध भाषण. १६३; (७) लोभ. १६३; (८) खुनशीपणा. १६४.

**प्रकरण २१ वें—सर्व साधारण ( सामाजिक, नैतिक )**

(१) कैफ आणणें. १६५; (२) जुगार खेळणें. १६५; (३) आळस. १६६; (४) वाईट संगत. १६६; (५) करमणुकीस्तव खेळण्याच्या जागा. १६६; (६) आईबाप आणि त्यांचीं मुलें. १६७; (७) गुरू आणि शिष्य. १६८; (८) नवरा आणि बायको. १६९; (९) मित्र मंडळी आणि

बरोबरीचे सोबती. १६९; (१०) धनी आणि नोकर. १७०; (११) गृहस्थ आणि मठवासी ( जोगी ). १७१; (१२) भिक्षू आणि भिक्षुणी. १७२–१७४; (१३) ब्रह्मचर्य आणि तपश्चर्या. १७४–१७५; (१४) बौद्धभिक्षूंची कर्तव्यें. १७६-१७७; (१५) भिक्षूनें बोलतां कामा नये असे ३२ विषय. १७८; (१६) खरा भिक्षू कसा ओळखावा. १७९.

प्रकरण २२ वें–बुद्धाचे उद्गार ( नीतिविषयक सूत्रें )

(१) नीतिविषयक सूत्रांतील बुद्धाचे उद्गार. १८०–१८२; (२) बुद्धाचीं सुबोधवचनें व विधानें. १८२–१९४.

प्रकरण २३ वें–बुद्धानुयायी राजे

(१) बिंबिसार. १९५; (२) अजातशत्रू. १९६; ( ३ ) पसेनदी. १९७–१९८.

प्रकरण २४ वें–बौद्धधर्माचीं मूळतत्त्वें

(१) वैदिक धर्माविषयीं. १९९; ( २ ) बुद्धानें शोधून काढलेला मोक्षप्राप्तीचा मार्ग. १९९; (३) बौद्धधर्माचा सुवर्णमध्य मध्यमाप्रतिपदा. १९९; (४) आष्टांगिकमार्ग. १९९; ( ५ ) बौद्धधर्माचीं पांच शीतें. २००; (६) बौद्धधर्माचा प्रसार. २००;



(७) बौद्धधर्माचा समाजावर परिणाम. २००; (८) संस्कारविधियुक्त बौद्धधर्म. २०१; (९) बुद्धानें कथन केलेला निर्वाणमार्ग. (१०) भिक्षूउमेदवाराकडून विधानांचा उच्चार. २०१; (११) मठवासी बौद्धजोग्यानें सर्वस्व संघास अर्पण करणें. २०१; (१२) बुद्धाच्या निधनानंतर लोक त्याला ईश्वर मानूं लागले. २०२; (१३) बौद्ध-अनुयायीवर्गासाठीं स्तुपें. २०२; (१४) यात्रेचीं स्थळें २०२; (१५) बुद्धाच्या प्रतिमाविषयीं. २०३; ( १६ ) बुद्धाच्या व्यक्तित्रयात्मक देवतांच्या प्रतिमा. २०३; (१७) मंजुश्री, अवलोकितेश्वर आणि वज्रपाणी. २०३.

---

॥ श्री ॥

# भगवान् बुद्ध ।

( सर्वांगसुंदर चरित्र व धर्मसारसंग्रह )

## भाग १ ला.

## प्रकरण १ लें.

### प्रास्ताविक

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

( श्रीमद्भगवद्गीता )

बौद्ध-धर्मग्रंथांतून उपलब्ध होणारी भगवान् बुद्धाबद्दलची ऐतिहासिक माहिती इतकी वैचित्र्यपूर्ण व आश्चर्यकारक आहे कीं, अन्य धर्मीय लोक त्यांत सत्याचा अंश तितपतच आहे असें म्हणण्यास प्रवृत्त होतील; पण कोणाही धर्मसंस्थापकाचे बाबतींत आपणास बहुधा असेंच आढळून येईल. ख्राइस्ट काय, महमदपैगंबर

काय, अगर आपलें राम-कृष्ण काय, कोणाचेही ऐतिहासिक चरित्राकरितां आपणास धर्मग्रंथ व प्रचलित रूढ कल्पना ह्यावरच प्राय: अवलंबून राहावें लागतें; आणि ह्याचें कारणही पण उघडच आहे. इतिहास लिहिण्याची मानवी जातीची पद्धति त्या मानानें फारच अर्वाचीन व सुधारणेच्या कालांतील आहे. फार लांब कशाला ? मराठी वृत्तपत्रें व मासिकें वाचणारांस २५०-३०० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या छत्रपति शिवाजीमहाराजांचे जन्मतिथीचे वादाची आठवण करून दिल्यास, २५००-३००० हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या बुद्धाचे इतिहासाची काय स्थिति असेल त्याची पूर्ण कल्पना होईल. आतां हें खरें कीं, अशा माहितींत थोडीशीं दंतकथेची भेसळ असूं शकेल; म्हणून सर्वच मूळांत निखालस खोटें व बुद्धचरित्र म्हणजे फक्त एक दंतकथा हें म्हणणें कोणासच पटणें शक्य नाहीं. असें म्हणणारे लोक नव्हते असें मात्र वाचकांनीं समजूं नये. एका* फ्रेंच टीकाकारानें तर बुद्धचरित्र हें सूर्यचरित्रावर एक सुंदर रूपक होय, असें सिद्ध केलें आहे. असो; वरील टीकाकारासारखें मत आतां कोणासच ग्राह्य वाटत नाहीं, व बुद्ध होऊन गेला किंवा नाहीं ह्या बद्दलही कोणी वाद घालूं इच्छित नाहीं. तसेंच दंतकथा व इतिहास ह्यांची निवड करण्याचें अचुक साधन आपणास उपलब्ध नसल्यामुळें विशेष

* १ M. Senart; २ मन्मथनाथशास्त्री यांचे Buddha, His life, His teachings, His order. हें पुस्तक ( प्रस्तावना ).



खोल पाण्यांत न शिरतां व फाजील उहापोह न करतां, ज्या सच्चिदानंद बुद्धाला बुद्धधर्माचे कोट्यावधि लोक परमपूज्य मानून सर्व धर्माचा मुकुटमणी समजतात, व जो बुद्ध होण्यापूर्वीं स्वत: सिद्ध झाला व ज्याला " निंदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं सदयहृदय दर्शित

" पशुघातं केशवधृत बुद्धशरीर जय जगदिश हरे " ( जयदेव )

असें विनवून त्याचे गुणानुवाद गातात, अशाच बुद्धाचा वृत्तांत सत्य मानला पाहिजे. निर्वाणीच्या ग्रंथांतून आणि युगायुगांच्या धर्मपुस्तकांतून ज्या बुद्धांच्या कथा आपण वाचीत आलों, त्या दंतकथा मिश्रित असल्या तरी त्या खऱ्याच ऐतिहासिक समजून त्यांतच आपणांस संतोष मानला पाहिजे, असें हार्डी यानें सुद्धां स्पष्ट प्रतिपादन केलें आहे.

## स्वर्गांतून अवतरण.

बोधिसत्वानें पूर्वजन्मीं तीस+ पारमितांचा अनुभव घेतला होताच; व तोच सर्वज्ञ बुद्धाचा अवतार घेणार असें ब्रह्मलिखित होतें. त्या विधिघटनेस अनुसरून बुद्ध प्रथम तुशित नांवाच्या स्वर्गांत जन्मला. देवतांनीं प्रार्थना केली कीं, 'मानवजातीचा उद्धार करावा.' त्यांस हो म्हणण्यापूर्वीं त्यांनीं पांच गोष्टी निश्चित केल्या. त्या अशा:- ( १ ) अवतार घेऊन प्रकट होण्याचा समय. ( २ ) खंड ( ४ ) वंश व कुल, व ( ५ ) जिच्या पोटीं जन्म घ्यावयाचा अशी धर्मनिष्ठ व पवित्र माता. प्रसूतिनंतर मातेचा निश्चित

\+ भवसागर तरून परमपदास पोंहोंचलेला

मृत्युकालही त्यांस समजला. अवतरण्यास योग्य समय प्राप्त झाला तेव्हां बोधिसत्वानें विचार केला कीं, आजपर्यंत जे जे बुद्ध ब्राह्मणांत व क्षत्रियांत होऊन गेलें, ते ते सर्व मध्यदेशांतील **जंबुद्विपांत** होऊन गेले, त्या अर्थी आपणही श्रेष्ठ अशा क्षत्रिय-जातींतील शक्यवंशीय कपिलवस्तूचा राजा **शुद्धोदन** ह्याची महाराणी **महामाया** आहे, तिच्या पोटीं जन्म घ्यावा; आणि अवतरल्यानंतर सातवे दिवशीं मातेचा अंत होणार हेंही निश्चित होय. त्याप्रमाणें वैशाख शुद्ध पौर्णिमेस पुष्य नक्षत्रांत बोधिसत्वानें स्वर्गांतल्या इंद्राच्या नंदनवनांतून अवतीर्ण होऊन महामायेच्या गर्भाशयांत प्रवेश केला. या प्रवेशाचें दृश्य **भारहटच्या** शिलालेखांत स्पष्टपणें कोरलेलें आढळतें, व त्यावर "**भगवतो ओकंटी**" अशीं अक्षरें खोदलेलीं आहेत.

आषाढी महोत्सवाच्या शेवटच्या दिवशीं रात्रींच्या वेळीं महामाया निद्रावश झाली असतां पहांटेचे सुमारास तिला स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं, "बोधिसत्व हा शुभ्र हत्तीच्या रूपानें सुवर्णपर्वतावर इतस्तत: भटकून तिच्याजवळ हळू हळू उत्तर दिशेकडून येऊन पोहोंचला आणि मग त्यानें तिच्या गर्भाशयांत प्रवेश केला." त्या दिवसापासून महामायाही गरोदर दिसूं लागली. सकाळीं उठल्यावर सर्व स्वप्नवृत्तांत राणीनें राजास कथन केला. राजानें तत्काळ विद्वान ब्राह्मणांस बोलावून आणून स्वप्नाची फलश्रुति विचारली. सर्व ब्रह्मवृदांनीं जयघोष करून एकमतानें



असें भविष्य वर्तविलें कीं, राणीला होणारा पुत्र एकतर सार्वभौम राजा होईल अथवा बुद्ध होईल.

गर्भाला व मातेला कोणत्याही प्रकारची इडापीडा होऊं नये म्हणून चार देवदूत तिच्या भोंवतीं अहोरात्र पहारा करीत होते. प्रसूतिसमय समीप येत चालला असतां राणीस आपल्या आई-बापाकडे **देवदह ( देवऱ्हाद )** येथें जाण्याची उत्कंठा लागली. राणीनें आपली इच्छा पतीस कथन करतांच राजानें देवदह येथें राणीस पोंहचविण्याची तयारी करण्याबद्दल तत्काल हुकूम सोडले. सर्व तयारी होतांच राणीसाहेबांची स्वारी योग्य त्या लवाजम्या-निशीं प्रवासास निघाली. वाटेंत लुंबिनी वृक्ष लागला. तेथें तिला वनांत फिरावेसें वाटलें. मनांत आल्यावर उशीर कसला ? महामाया वनांतच हिंडाहिंड हिंडलीं व हिंडतांना मध्येंच एका पवित्र शालवृक्षाखालीं थोडी थांबली; त्या वृक्षाची एक डहाळी ओढावी असें मनांत येतांच तिनें आपला हात उंच केला; पण डहाळी फार उंच असल्यानें कितीही हात उंच केला तरी पोंहचणार कसा ? निरुपाय होतांच राणीनें एकवार त्या फांदीकडे प्रसन्नचित्तानें व अनन्यभावानें पाहिलें तोंच फांदी जणूं पवित्रतम अशा त्या बुद्ध-मातेस वंदन करण्याकरतांच कीं काय खालीं वांकली. मग राणीनें तिला स्पर्श केला; आणि स्पर्श होतां क्षणींच राणी प्रसूत झाली. हातांत फांदी तशीच धरून ठेवलेली होती. त्या समयीं चारी दिशेचे दिक्पाल प्रकट झाले, व प्रथम त्यांनीं बालक हातांत

झालें. मग इतरजनांनीं त्याला हातांत घेतलें. त्या बालकास आतां बालक न म्हणतां सत्पुरुष म्हणूनच आपणास संबोधिलें पाहिजे. कारण, माणसांच्या हातांतून त्यानें तत्काल जमीनीवर उड्डाण केलें; मग जन्मभूमीला वंदन करून, सात पावलें चालून "या जगांत अनादि असा सर्वश्रेष्ठ मीच होय" असा जयघोष केला.

ज्या दिवशीं बोधिसत्व अवतरला, त्याच दिवशीं **राहुलची** माता **यशोधरा, छन्न** (चंद) **कालुदायीन्** (उदाइन) कंथक नांवाचा अश्व व आनंद (बुद्धाचा चुलत भाऊ **अमृतोदनाचा** मुलगा) ह्या व्यक्ति जन्मास आल्या; आणि त्याच वेळीं बोधिवृक्ष व चार निधानाचे हंडे अस्तित्वांत आले. त्याचप्रमाणें **बिम्बिसार, प्रसेनजित, प्रद्योत** व **उदयन**, हे चार राजेही त्याच वेळीं जन्मास आले, अशाबद्दल उत्तर भागांतील मूळ ग्रंथांतून विश्वसनीय आधार सांपडतो. बुद्धाचे पुढील चरित्रांत वरील चार राजांचा बराचसा संबंध आला आहे, असें क्रमाक्रमानें दिसून येईलच.

बोधिसत्वाचा जन्म होतांच स्वर्गांतील तेहतीस* देवांना अत्यानंद झाला. त्या आनंदमहोत्सवांत **देवल** उपस्थित होता. बोधिसत्वाचा जन्म हेंच आनंदमहोत्सवाचें कारण, असें समजतांच तो शुद्धोदनाकडे आला, व त्याजपाशीं बालकाचें दर्शन घेण्याची त्यानें आपली इच्छा प्रदर्शित केली. शुद्धोदनानें त्या महासिद्धपुरुषास तत्काल दर्शन करविलें. बालकास पुढें आणतांच एक दैविक चमत्कार घडून आला. तो असा कीं, बालकानें देवलाच्या मस्तकावरील जटाजूटांस पादस्पर्श केला. हें अवलोकन करतांच सर्वांची पुनश्च खात्री पटली कीं, हा खास अवतारी पुरुष होय. मग देवलानें भक्तिभावानें व आदरपूर्वक त्यांस वंदन केलें. शुद्धोदनानेंही त्या सिद्धपुरुषाचें तत्क्षणीं अनुकरण करून बालकास साष्टांग प्रणिपात केला. देवलांनीं त्याचवेळीं भविष्य वर्तविलें कीं, हा बालक पुढें बुद्ध म्हणून मोठ्या प्रसिद्धीस येईल; पण त्यावेळीं आपलें अवतारकृत्य संपणार हेंही त्यास स्पष्ट दिसलें, व त्यामुळें त्यास रडूं कोसळून एखाद्या अर्भकासारखा तो ढसढसा रडला. आपणास नाहीं तर नाहीं; निदान आपल्या आप्तविषयांस तरी या अवतारीपुरुषाचे आशीर्वाद मिळावे या सदिच्छेनें तो आपला पुतण्या नालक यांजकडे गेला, व त्याला त्यानें सन्यास घेण्याची आज्ञा केली; आणि निक्षून बजाविलें कीं, हें बालक आपल्या वयाच्या पस्तिसाव्या वर्षीं बुद्ध होईल. चुलत्याच्या आज्ञेनुसार नालकानें श्रमणाची दीक्षा घेतली, व तो उपदेशक होऊन क्रमाक्रमानें अरहत् पदापावेतों जाऊन अखेर निर्वाणपदाला पोंहोंचला. (मोक्षपद मिळविलें).

* तेहतीस ह्या आंकड्याचे साम्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे.



जन्मानंतर पांचवे दिवशीं बोधिसत्वाचा नामकरण विधि मुक्रर करण्यांत आला, आणि सिद्धथ्य (सिद्धार्थ, अथवा सर्वार्थसिद्ध) असें त्याचें नांव ठेविलें. राजानें १०८ विद्वान् ब्राह्मणांस आमंत्रण करून ब्राह्मण-भोजन घातलें. त्या जमलेल्या ब्रह्मवृंदांत आठ

मोठे नामांकित ज्योतिषी होते. राजास मुलाचें विधिलिखित जाणण्याची अनिवार उत्कंठा सकारण होती असें कोणीही म्हणेल. सार्वभौम राजा काय, अगर अन्नासाठीं हापापलेला दाही दिशा भटकणारा भणंग भिकारी काय, भविष्य समजण्याबद्दल प्रत्येक सारखाच उत्सुक असतो. अर्थात् ह्या उत्सुकतेचें कारण प्रत्येकाचे बाबतींत निराळें असतें, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. असो; राजानें त्या आठ जणास प्रश्न केला कीं, 'या मुलाचें नशिबांत काय आहे तें कृपा करून सांगा,' त्यापैकीं सात जणांनीं सांगितलें कीं, हा एक सार्वभौम राजा तरी होईल अगर बुद्ध तरी होईल. पण ह्या उत्तरानें राजाचें समाधान होणें शक्य नव्हतें. त्याला कांहींतरी निश्चित उत्तर पाहिजे होतें. असें निश्चित उत्तर देऊन राजाचें शंकानिरसन करण्यास फक्त राहिलेला **कोण्डण्ण** (कौंडिण्य) नामक ब्राह्मणच समर्थ होता. त्यानें मात्र छाती ठोकून सांगितलें कीं, "हा मुलगा बुद्धच झाला पाहिजे." कालेंकरून बुद्धाच्या पंचवग्गीय (पंचवर्गीय) शिष्यांपैकीं जो सर्वत्र प्रसिद्ध झाला तोच हा कौंडिण्य होय.

हें भविष्य ऐकून राजा मनांत अत्यंत खिन्न झाला. आपला मुलगा चक्रवर्ति होणार असें निश्चित भविष्य जर त्याला कळलें असतें, तर त्याचा आनंद गगनांत मावेनासा झाला असता. बिचाऱ्यास काय माहीत कीं अशा कित्येक चक्रवर्तीचीं नांवें



स्मृतिशेष झालीं व होतील, आणि त्यांचीं सिंहासनें ढांसळून त्याच्याखालीं त्यांच्या वंशजांचा मागमूसही दिसणार नाहीं! परंतु भगवान् बुद्धाचें नांव त्याचे कोट्यावधीं अनुयायी आचंद्रार्क विसरणें शक्य नाहीं! अस्तु, राजाला मात्र आपला मुलगा गजांतलक्ष्मीचा त्याग करून रानावनांत संन्याशी होऊन भटकत हिंडणार, ही कल्पनाच दु:सह होऊं लागली. ह्या भविष्याचा प्रतिकार करणें शक्य आहे कीं काय, ह्या विचारांत त्याचें मन गर्क झालें. विचार करतां करतां त्याच्या मनांत असा प्रश्न उद्भवला कीं, ह्या सर्वसंगपरित्यागाचें कारण तरी काय असूं शकेल? लागलींच त्यानें तो प्रश्न बसलेल्या ज्योतिषांना विचारला. त्याला उत्तर मिळालें कीं, (१) एक वृद्ध पुरुष, (२) रोगग्रस्त मनुष्य, (३) एक प्रेत, (४) मठांत रहणारा एक योगी, अशीं चार दृश्यें अवलोकन करून पुत्राचें मनांत विरक्ति उत्पन्न होईल. हें ऐकून राजाला थोडें समाधान झाल्यासारखें दिसलें. त्याला वाटलें आपलें काम आतां थोडें सुलभ झालें! ही चार दृश्येंच राजपुत्राचे पाहण्यांत न येतील अशी व्यवस्था आपण ठेविली म्हणजे पुरें झालें! मनांत येण्याचाच अवकाश, लागलींच त्याची अमलबजावणी सुरू झाली. राजवाड्यापासून चारी दिशेला दहा मैलाचें अंतरांवर सक्त पहारा ठेवून वरील दृश्यें राजपुत्राचे दृष्टिपथांत न येऊं देण्याबद्दल पहारेकऱ्यांस हुकूम करण्यांत आले. बिचारा शुद्धोदन राजा! त्याला वाटलें कीं सत्तेच्या जोरावर

आपण हें कार्य सहज करूं शकूं. अशा रीतीनें प्रत्यक्ष भवितव्यतेशीं झगडा करण्यांत आपण आपल्या अहंकाराचें व मूर्खपणाचें प्रदर्शन मात्र करीत आहों याची त्याला काय कल्पना ? त्याच्या ह्या निष्फळ कृतीकडे पाहून भवितव्यता मात्र खरोखरच पोटभर हंसली असेल; पण भवितव्यता हंसली म्हणून आपणांस हंसण्याचा अधिकार आहे कीं काय ? हें ज्याचें त्यानेंच विचार करून ठरवावें !

अशा स्थितींत राजपुत्राचे बालपणाचे दिवस हळू हळू जात चालले. त्याच्या पालन पोषणाची मुख्य जबाबदारी त्याची आत्या व सापत्नमाता प्रजापती गौतमी यांच्यावर सोंपविली होती. त्याचे तैनातीस निवडक व भरपूर लवाजमा दिलेला होता. एके दिवशीं राजा शेतीचे उत्सवाप्रीत्यर्थ शेतांत गेला. दायांनीं राजपुत्रासही तेथें नेलें; व खास तयार केलेल्या एका पलंगावर जंबुवृक्षाचे छायेंत त्याला बसविलें. सुवर्णाच्या रत्नखचित नांगरानें जमीन नांगरण्यांत राजा गुंतला होता. सर्व दायाही ती गम्मत पाहण्याकरतां तिकडे गेल्या. ही संधी साधून व जवळ कोणी नाहीं असें पाहून, राजपुत्राची स्वारी पलंगावरच आसन मांडी घालून ध्यानस्थ बसली. त्यावेळीं एक असा चमत्कार घडून आला कीं, सूर्य जसाजसा खालीं जात चालला, त्या मानानें इतर वृक्षांच्या छायाही फिरत गेल्या; पण जंबुवृक्षाची छाया मात्र तेथेंच कायम राहिली. तिच्यांत यत्किंचितही फरक पडला नाहीं.



दाया उत्सव समारंभ पाहून परततात, तों वरील चमत्कार त्यांचे दृष्टीस पडला. त्यांनीं लगेच पळत जाऊन ती बातमी राजाचे कानावर घातली. तो चमत्कार प्रत्यक्ष अवलोकन करून जमलेली मंडळी तर आश्चर्यचकित होऊन गेली; पण राजानें पुत्रास साष्टांग नमस्कार घातला व म्हणाला; “ प्रियपुत्रा ! मी तुला पुनः साष्टांग प्रणिपात करतों, त्याचा प्रेमपुरस्कर स्वीकार कर. ” उत्तरेकडील धर्मपुस्तकांत अशी एक कथा आढळते कीं, राजपुत्र शाळेंत जात असे त्यावेळीं त्याचा अध्यापक विश्वामित्र त्याचें अद्भुत चमत्कारयुक्त अलौकिक बुद्धिकौशल्य पाहून आश्चर्यचकित होऊन गोंधळून जात असे. ह्याशिवाय राजपुत्राचें बालपणाबद्दल विशेष माहिती मिळत नाहीं. असो राजपुत्रानें ऐषआरामांत दंग असावें म्हणून राजानें फार खबरदारी घेतली होती. कारण भविष्यकथन त्यास स्वस्थ बसूं देत नव्हतें. राजपुत्राकरितां राजानें तीन नवीन राजवाडे बांधविले, व त्यांत सर्वप्रकारच्या चैनीच्या सोयी करून ठेविल्या होत्या. राजपुत्रास सोळावें वर्ष लागतांच राजानें त्याचें लग्न अत्यंत रूपगुणसंपन्न अशा यशोधरा कन्येशीं लावून दिलें. ही यशोधरा त्याचा चुलत भाऊ सुप्रबुद्ध याचीच कन्या होय. लग्नानंतर राजपुत्रास राज्याभिषेक करून सर्व राज्यकारभार त्यांच्यावर सोंपविला.

त्यावेळची अशी एक हकीकत सांगण्यात येते कीं, राजानें सर्व राजेरजवाड्यांस त्यांच्या उपवरकन्यांची राजपुत्राकरितां

मागणी केली. त्याचें लग्न आधींच झालेलें असल्यामुळें " सवत साहिना " या न्यायानें पोटचा गोळा बळी देण्यास कोण धाडस करणार ? त्यांनीं उलट निरोप पाठविले कीं, " राजपुत्र म्हणजे एक कोंवळे पोर ! अतिशय सुकुमार ! धड एका शास्त्राचाही त्यास गंध नाहीं ! लढाईचे प्रसंगीं तर तो कुचकामाचा ! त्यास दोन बायकांचें प्रस्थ झेंपण्याचें व रक्षण करण्याचें बिलकुल सामर्थ्य नाहीं ! करितां आम्ही आपल्या कन्या देऊं इच्छित नाहीं ! " ही बातमी राजपुत्राचे कानावर जातांच त्यानें असें जाहीर करविलें कीं, ज्या कोणास माझें सामर्थ्य पहाण्याची इच्छा असेल त्यांनीं आजपासून सातवे दिवशीं येथें यावें. मग ठरविलेल्या दिवशीं एका भव्य मैदानांत जमलेल्या लोकांस त्यानें आपलें अद्भुत सामर्थ्य दाखविलें. शेंकडों माणसांना उचलणार नाहीं असें भयंकर धनुष्य त्यानें आपणापुढें ठेविलें, व एका पायाचा आंगठा त्यावर ठेवून हातानें बसल्या बसल्याच धनुष्याचा टणत्कार केला. तोंच याबरोबर आसपासच्या लोकांस मेघाच्या गडगडाटाचा भास झाला. त्यानंतर लांब एका कोपऱ्यांत चार केळीचे खुंट ठेवण्यास सांगून त्यानें असें शरसंधान केलें कीं, चारी खुंटांतून बाण निघून गेला. या प्रमाणें अद्भुत शक्तिसामर्थ्याचा व अलौकिक धनुर्धारित्वाचा सर्वांस प्रत्यक्ष अनुभव दाखविला. सारांश, चौदा विद्या व चौसष्ट कला यांत राजपुत्राची पारंगता झालेली पाहून हां हां म्हणतां त्याची कीर्ति सर्वत्र पसरली; पण प्रख्यात धनुर्धारि देवदत्त ( यशोधरेचा भाऊ ) यास तें सहन न होऊन त्याच्या मनांत असूयेचें बीज येव्हांपासून रुजलें गेलें.

---

# प्रकरण २ रें.

## १ भविष्यकथन.

अंगीं ऐन तारुण्याचा भर, नानाप्रकारच्या विलासांची व चैनीची रेलचेल, व ते सर्व उपभोगण्यास योग्य असें अमानुषशक्तिसामर्थ्य अशा स्थितींत राजपुत्राचें कालक्रमण होऊं लागलें. वरील गोष्टींपैकीं प्रत्येक गोष्ट कोणाचाही नाश करण्यास पूर्ण समर्थ होती. " एकैकमपि अनर्थाय किमुत समवाय: ! " असें बाणकवीनें ह्या बाबतींत म्हटलेंच आहे. पण बोधिसत्वाचे बाबतींच विधिलिखित निराळेंच होतें. नाहींतर

" न जातु काम: कामानां उपभोगेन शाम्यति ।

हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवा भिवर्धते ॥ " (महाभारत)

कवीनें वर्णन केल्याप्रमाणें अशी त्याची स्थिति व्हावयाची; पण वरून चक्र फिरलें, भविष्यकथन खरें होण्याचा समय समीप आला, आणि तत्क्षणीं सर्व विलासांचा, किंबहुना आयुष्याचा त्यास इतका तिटकारा आला कीं, विलासप्रियता, पितृप्रेम, पुत्रप्रेम आणि कांचन, या मोहचतुष्टयावर तिलाञ्जली सोडून त्यानें सर्वस्वाचा त्याग केला, व अरण्याचा रस्ता धरला. तो सर्व वृत्तान्त फारच मनोवेधक व उद्बोधक आहे; करितां सविस्तर येथें वर्णन करण्याची वांचकांची परवानगी घेतो.

॥ बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपिकर्षति ॥

मदनाचा प्रभाव खरोखर फारच बलवान् ! मी मी म्हणणाऱ्या महातपस्वी विश्वमित्रासारख्यांना ज्यानें आपलें दास बनविलें त्या पुढें इतरांचा काय पाड ? राजपुत्राची स्थिति तर फारच विचित्र ! प्रत्यक्ष पित्याची इच्छा अशी कीं आपल्या पुत्रानें हव्या त्या विलासांचा उपभोग यथेच्छ घ्यावा, त्यांत कोणत्याही प्रकारें उणेपणा पडूं देऊं नये, पडल्यास त्यावर लक्ष देण्यास व तो भरून काढण्यास आपण स्वत: डोळ्यांत तेल घालून बसलेला. इतकी सर्व जय्यत तयारी असल्यावर मदनाच्या कर्तबगारीस आणखी काय हवें होतें ? कामिनीचे नेत्रकटाक्ष व यौवनचेष्टा ह्यापुढें त्याचा कितीसा टिकाव लागणार ? बाहेरच्या जगाशीं कांहीं संबंध नाहीं, सदासर्वदा तारुण्यरंगांत दंग, अशी त्याची स्थिति झाली. स्वर्गस्थ देवतांना वाटलें कीं, यौवन विषय सुखाचे उपभोग हेंच त्याचे आयुष्याचें इति कर्तव्य होऊन बसतें कीं काय ? मग देवतांनीं आपली सभा भरविली व ठरविलें कीं, या अज्ञानांध:काराचा नाश करून त्याचा ज्ञानदीप प्रज्वलित केला पाहिजे. त्यांना हेंही दिसलें कीं, तसें करण्याचा समयही ( भविष्य कथनाप्रमाणें ) समीप येऊन ठेपला आहे. लागलीच पूर्वीची ती चार अमंगल सूचक दृश्यें राजपुत्राला क्रमाक्रमानें दाखविण्याचें निश्चित केलें. देवापैकीं एकानें वृद्ध मनुष्यरूप धारण करून राजपुत्राच्या दिलखुष बागेंत प्रवेश केला. त्याच दिवशीं छन्न ( चंद ) नांवाच्या



सारथ्यासह रथारूढ होऊन त्या बागेंत हवा खाण्याची राजपुत्रास इच्छा झाली. राजपुत्राचा रथ येतांच तो वृद्ध मनुष्य रथासमोरून गेला. दु:ख म्हणजे काय, व तें जगांत कोणाचे वाट्यास आहे किंवा कसें ? ह्याचें राजपुत्रांस ज्ञान कदाचित असलें तरी त्याचें आतांपर्यंत त्याला भान मात्र खचित नव्हतें. म्हणूनच तें वृद्धरूप एकाएकीं अवलोकन करतांच त्याचें मन चरकलें. त्यानें छन्नास विचारिलें:-

**राजपुत्र**:-हे सारथे ? हा ( इतका ) दुर्बल व कृश मनुष्य कोण आहे ? अंगांतील मांस नाहींसें झाल्यानें हाडें व शिरा स्पष्ट दिसत आहेत. केस पांढरे शुभ्र झाले आहेत व काठी घेऊन अडखळत चालत आहे. 'अंगं गलितं पलितं मुण्डम्' अशी याची दशा कां व्हावी ? *

**सारथी**:-महाराज ! हा एक म्हातारा मनुष्य आहे; शरीर अगदीं कृश झालेलें व गात्रें शिथिल झालेलीं म्हणून कोणत्याही कामास नालायक झाला आहे. मित्रांनीं व आप्तवर्गानीं, पाळलेला वृक्ष जसा पशुपक्षी सोडून जतात, त्याप्रमाणें त्याचा आतां त्याग केला असल्यानें तो असा हताश झाला आहे. +

---

* किं सारथे पुरुषदुर्बल अल्पस्थाम, उच्छुष्कमांसरुधिरत्वच स्नायुनद्धः। श्वेतशिरो विरलदन्तकृशाङ्गरूप, आलम्ब दण्डव्रजरेह सुखं स्खलन्त ॥

+ एषोहि देव पुरुषो ज्वराभिभूतः, क्षीणेन्द्रियः सुदुःखितो बलवीर्यहीनो। बन्धूजनेन परिभूत अनाथभूतः, कार्यासमर्थ अपविद्ध वनेवदारु ॥

**राजपुत्र**:–हे सारथे ! ही स्थिति ह्याची एकाचीच व्यक्तिशः आहे किंवा हा निसर्गसिद्ध नियमच आहे ? मला ह्याचें कारण लवकर सांग, म्हणजे मला त्याबद्दल विचार करतां येईल.

**सारथी**:–महाराज हा एक निसर्गसिद्ध जागतिक नियम आहे. मनुष्यमात्राची हीच अवस्था होणार. तुमचे आईबाप, आप्तवर्ग व स्वतः आपण ह्याच स्थितीप्रत येणार.

हें ऐकून "**धिक् जीवितम्**" असे उद्गार त्याचे मुखावाटे बाहेर पडले, व छन्नास त्यानें रथ परत राजवाड्याकडे नेण्यास सांगितलें. मग त्यादिवशीं तो दिलखुष् बागेंत गेलाच नाहीं.

शुद्धोदनास हा सर्व वृत्तान्त विदित होतांच त्यानें "राजपुत्र इतक्या लवकर परत राजवाड्यांत कां आला ?" म्हणून विचारलें. "एक वृद्ध मनुष्य त्याचे दृष्टीस पडल्यामुळें तो माघारा फिरला." असें सांगतांच तो संतप्त झाला. "तुमच्या असल्या कृतीनें माझा सर्वनाश कराल." असें म्हणून त्यानें नाचरंग व नाटकाची तयारी करण्याबद्दल हुकूम सोडले; आणि म्हणाला कीं, जोंपर्यंत तो ऐषआरामांत दंग आहे, तोंपर्यंत वैराग्याचे विचार त्याचे मनांत येणें शक्य नाहीं.

---

*** कुलधर्म एष अयमस्य हितं भणाहि, अथवाऽपि सर्व जगतोऽस्य इयं ह्यवस्था, शीघ्रं भणाहि वचनं यथभूत मेतच्छ्रुत्वा, तथार्थमिह योनि सञ्चिन्तयिष्ये ॥**

**"नैतस्य देव कुलधर्म्म न राष्ट्रधर्म्मः, सर्वे जगस्य जर-यौवन धर्षयन्ति, तुभ्यंपि मातृपितृबान्धवज्ञातिसंघो, जरया अमुक्तं नहि अन्यगतिर्जनस्य ॥**



कांहीं दिवसांनंतर राजपुत्र पुनः बागेंत जाण्यास निघाला. रथावर छन्न होताच. पूर्वीं ठरल्याप्रमाणें स्वर्गस्थ देवता अशा संधीची वाटच पाहात होते. लागलींच एकानें रोगग्रस्त मनुष्याचें रूप धारण केलें, व राजपुत्रास दिसावें म्हणून त्याचे वाटेवर रस्त्याचे एका बाजूस तो जाऊन बसला. त्याला पाहतांच **राजपुत्र छन्नास** म्हणतो. "हे सारथे, हा मनुष्य कोण ? केवळ अस्थि-पंजर झालेला घाणींत लोळत पडून दुःखानें कन्हत आहे." (१)

**छन्न**:–महाराज ! हा फार आजारी असून मृत्युपंथास लाग-लेला आहे. त्याचे अत्यंत हाल होत असून आतां बरें होण्याची त्याला बिलकुल आशा नाहीं. लवकरच तो पंचत्वाप्रत जाईल.(२)

त्यादिवशीं सुद्धां राजपुत्र तसाच परत राजवाड्यांत गेला. राजास हें समजतांच त्यानें पहारा जास्त कडक ठेवण्याबद्दल हुकूम सोडले, व असें कांहीं पुनः राजपुत्राचे दृष्टीस पडल्यास सर्वांस तीव्र शासन होईल म्हणून फर्माविलें.

---

**टीप**–या पुस्तकांत जागोजागीं दिलेले श्लोक ( गाथा ) ललित विस्त-रांतून घेतलें आहेत व ते बुद्धाचे स्वतःचे उद्गार असल्यानें येथें जसेच्या-तसेच दिले आहेत.

**"किं सारथे पुरुष रूपविवर्णगात्रः । सर्वेन्द्रियेभि विकलो गुरु प्रश्वसन्तः ॥ सर्वाङ्गशुष्क उदराकुल प्राप्तकृच्छ्रा मूत्रे पूरीष स्वकि तिष्ठति कुत्सनीये ॥ (१)**

**"एषो हि देवपुरुषः परमं गिलानो व्याधीभयं उपगतो मरणान्तप्राप्तः ॥ आरोग्यतेजरहितो बलविप्रहीनो, अत्राण द्वीपशरणो ह्यपरायणश्च ॥" (२)**

२

पुनः तिसऱ्यांदा राजपुत्र बागेंत जाण्यास निघाला, तेव्हां त्याला एक प्रेत दिसलें. त्यानें छन्नास विचारलें:-अरे, हें काय ? ह्याला ताटीवर घालून कां नेत आहेत ? केस मोकळे सोडून लोक त्याच्या मागून रडत व ऊर बडवीत आक्रोश करीत कां चालले आहेत ? (१)

छन्नः-महाराज, हें एक प्रेत आहे. ह्या मृतदेहास आतां आप्तेष्ट मित्रांची भेट होणें अशक्य आहे. आतां जगांतून तो कायमचाच गत झाला. (२)

हें उत्तर ऐकून राजपुत्रानें एक दीर्घ निश्वास टाकला, व उद्गारला. "ज्या तारुण्याचा शेवट वृद्धत्वांत होणार त्या तारुण्याला धिःकार असो; ज्या आरोग्याभोंवतीं नाना व्याधि पसरलेल्या आहेत, त्या आरोग्याला धिःकार असो; जो विद्वान ( अशा स्थितींत ) ऐष आरामांत दंग होतो; त्याला धिःकार असो."(३)

"किं सारथे पुरुष मञ्चोपरिगृहितो, उद्धूतकेशन खपांशुशिरे क्षिपन्ति । परिचारयित्व विहरन्तु रस्ताडयन्तो, नाना विलापवचनानि उदीरयन्तः ॥" (१)

"एषो हि देवपुरुषो मृतु जम्बुद्वीपे, न हि भूय मातृपीतृ द्रक्ष्यति पुत्रदाराम् । अपहाय भोगगृहमातृपितृमित्रज्ञाति सङ्घं, परलोक प्राप्तु न हि द्रक्ष्यति भूय ज्ञातिम् ॥" (२)

"धिग्यौवनेन जरया समभिद्रुतेन, आरोग्य धिग्विविधव्याधिपराहतेन। धिग्जीवितेन पुरुषो नचिरस्थितेन, धिक् पण्डितस्य पुरुषस्य रतिप्रसङ्गैः ॥" (३)



नंतर तो तसाच राजवाड्यांत परत आला व बरेच दिवस एकान्तांत राहिला. कोणाचीच भेट घेण्याचें त्यानें नाकारलें. पुनः चवथ्यांदा छन्नासह बागेंत जावयास तो निघाला असतां, त्याचे दृष्टीस एक योगी पडला; त्यानें छन्नास पूर्वीप्रमाणें विचारलें:-"हा पीतवस्त्र परिधान केलेला, धीरगंभीर व शांतपणानें कोठेंही न पाहतां असा रस्त्यावरून चालत असलेला मनुष्य कोण आहे ?" (१)

छन्नः-महाराज ! हा एक योगी आहे. सर्व आशेचा व जगाचा त्यानें त्याग केला आहे. सर्वांकडे हा समदृष्टीनें पाहतो, व भिक्षेवर उपजीविका करतो.(२)

राजपुत्र म्हणाला; "हा मनुष्य मला फारच आवडतो. विद्वान् लोक अशा पुरुषाच्या जीवितक्रमाचीच स्तुति स्तोत्रें गातात. सर्वांत सुखी जीवित हेंच होय." त्या योग्याचे दर्शनानें त्याला एकप्रकारची शांती मिळाली. तसाच तो बागेंत गेला, आणि सर्व दिवस त्यानें तेथेंच घालविला. त्यानंतर स्नान करून वस्त्रें परिधान करण्याकरितां तो एका शिलेवर बसला.

"किं सारथे पुरुष शान्तप्रशान्तचित्तो, नोत्क्षिप्तचक्षु व्रजते युगमात्रदर्शी । काषाय वस्त्रवसनो सुप्रशान्तचारी, पात्रं गृहीत्व न च उद्धत उन्नतो वा ॥" (१)

"एषो हि देवपुरुष इति भिक्षुनामा, अपहाय कामरतयः सुविनीतचारी । प्रव्रज्यप्राप्तः सममात्मन एषमाणो, संरागद्वेषविगतो तिष्ठति पिण्डचर्य्या ॥ (२)

टीपः- मन्मथनाथशास्त्री यांचे पुस्तकाचे आधारानें सदरहू चार श्लोकांचा सारांश दिला आहे.

राजपुत्र ध्यानस्थ बसतांच स्वर्गलोकीं इंद्राचें सिंहासन डळमळूं लागलें. इंद्रानें ज्ञानदृष्टीनें पाहिलें, तो त्याला कळून आलें कीं, आज रात्रीं बोधिसत्व राजवाड्यांतून सर्वसंगपरित्याग करून निघून जाणार आहे. त्यानें विश्वकर्म्याला बोलावून आज्ञा केली कीं, मृत्युलोकीं जाऊन सिद्धार्थाला स्वर्गीय वस्त्रें परिधान करवून भूषित करावें. इंद्राज्ञा होतांच विश्वकर्म्यानें मृत्युलोकीं येऊन राजपुत्रास स्वर्गीय वस्त्रालंकार व केशरचना इत्यादिकांनीं भूषित केलें. राजपुत्र त्या वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन उद्यानांतून राजवाड्याकडे जाण्यास निघणार, इतक्यांत यशोधरा पुत्ररत्नाला प्रसवल्याचें शुभवर्तमान त्याला कळलें. तो म्हणाला, "राहूल जन्मास आल्यानें आणखी एक ऐहिक बंधन वाढलें." *

राजपुत्राची स्वारी नगरप्रवेश करून मोठ्या थाटानें चालली असतां **किसा गौतमी** नांवाची एक तरुण स्त्री आपल्या रंगमहालाच्या खिडकींतून तो थाटमाट सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन करीत होती. राजपुत्राचें तेज व ऐश्वर्य पाहून तिला अत्यानंद झाला. त्या आनंदाच्या भरांत ती उच्चस्वरानें म्हणाली:—

**"निबभूत नून समाता, निबभूत नून सपिता, निबभूत नून स नारी, यस्य यत इ दिस पति"**

**अर्थः**—धन्य ती माता, धन्य तो पिता आणि धन्य ती पत्नि, कीं जिला असा ऐश्वर्यसंपन्न पति लाभला.

---

**टीप**—शुद्धोदन राजास नातू झाल्याचें वर्तमान समजतांच त्यानें मोठा उत्सव केला, आणि बारावे दिवशीं त्याचें नांव "राहुल" असेंच ठेविलें.



हे उद्गार ऐकतांच बोधिसत्व विचारमग्न झाला; त्यावेळीं ऐहिक विचारांना त्याचे मनांत थाराच नव्हता. लागलींच त्यानें रथ थांबविण्यास आज्ञा केली. त्यानें विचार केला कीं, 'काम, द्वेष व मोह ह्या त्रिदोषांना जिंकलें म्हणजेच खरें परम सुख मिळूं शकेल' असा त्या तरुणीच्या उद्गारांचा अर्थ दिसतो. तिनें मला योग्यवेळीं जागृत केलें यांत संशय नाहीं. निर्वाणाचें खरें शांतिसुख कशांत आहे त्याचा मला शोध लावलाच पाहिजे. या करिता आजच्या-आज सर्व संसाराचा त्याग करून मी त्या मार्गाला लागणार. ह्याप्रमाणें विचार करून आपल्या गळ्यांतील एक मौल्यवान् कंठा त्यानें किसा गौतमीकडे कृतज्ञतापूर्वक पाठवून दिला; आणि त्यानंतर रथ राजवाड्याकडे रवाना झाला.

घडलेल्या एकंदर प्रकारानें त्याचे मनांत विचाराचें काहूर माजलें होतें. अशा स्थितींत विश्रान्ति घेण्याच्या उद्देशानें आपल्या रंगमहालांत जाऊन तो पलंगावर बसला; पण विचारतरंग इतके उसळले असतां विश्रांति मिळणार कोठून? प्रियपत्नीचा व पित्याचा विरह आणि राजधर्माचा त्याग, वगैरे गोष्टी त्यास एकीकडे संसारांत ओढीत होत्या, आणि दुसरीकडे निर्वाणपदाच्या प्राप्तीची तीव्र जिज्ञासा त्यास सर्वसंगपरित्याग कर, म्हणून बजावीत होतीच. संसार किंवा वैराग्य अशा 'दोलाचलचित्तवृत्तींतच' त्यानें झोंप घेण्याकरतां तसेंच पलंगावर अंग टाकलें. इतक्यांत नित्यक्रमाप्रमाणें नृत्यांगनांनीं आपला नाच सुरू केला, व थोड्या

वेळानें चित्ताकर्षक गायनासही प्रारंभ केला. ज्या गोष्टींत आजपर्यंत प्रत्यहीं त्याचें मन रममाण होत होतें, त्याच गोष्टींचा आज बरोबर उलट परिणाम होऊन, त्या सर्व प्रकाराचा त्यास अत्यंत कंटाळा आला, व त्याचें मनच पार विटून गेलें. त्याची स्थिति 'सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया ॥ यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः'॥ १ ॥ या उक्तींत वर्णन केल्याप्रमाणें झाली होती. त्याच स्थितींत मन अत्यंत श्रांत झाल्यामुळें अखेर स्वाभाविक रीतीनें त्यास झोंप लागली. आपल्या गानमाधुर्यानें व नृत्यकौशल्यानें राजपुत्रास करमणूक न होतां तो एखाद्या अरसिकाप्रमाणें कंटाळून झोपी गेला, हें पाहून सौंदर्यांत एकमेकींची स्पर्धा करणाऱ्या त्या नृत्यांगनांचा फार हिरमोड झाला व त्याही तेथेंच गालीच्यावर पडून इतस्ततः लोळूं लागल्या, व कांहीं वेळानें निद्रावश झाल्या. सिद्धार्थ कांहीं वेळानें जागृत होऊन सभोंवती पाहतो तों त्यास काय दिसलें ? रात्रीं लाविलेले अत्तराचे दिवे विझण्याच्या बेतांत आले होते, आणि इकडे सर्व दिवाणखानाभर अस्ताव्यस्त पसरलेल्या त्या नृत्यांगनांपैकीं कोणाचा केशकलाप, तर कोणाचें वस्त्र, विस्कलित झालें आहे; कोणाच्या तोंडांतून फेस येत आहे, तर कोणी झोपेंतच करकरा दांत खांत आहेत; कोणी जांभया देत आहेत, तर कोणी बरळत आहेत, असा तो किळसवाणा प्रकार दृष्टीस पडतांच मायावी संसारावरून त्याचें मन अजीबात उडालें, व सर्वसंगपरित्यागाच्या त्याच्या दृढनिश्चयास दुजोरा मिळाला. सुंदर स्त्रियांनीं भरलेला हा दिवाणखाना नसून भेसूर प्रेतांनीं व्यापलेला एक कत्तलखानाच आहे; असें त्यास त्याक्षणीं वाटलें. संसारांत राहाणें म्हणजे कामक्रोधादि मनोविकारांनीं सर्वत्र व्यापलेल्या ज्वालामुखींवरच वास्तव्य करणें होय; अशी त्याची बालंबाल खात्री झाली. "छे ! आतां हें सहन करवणें शक्यच नाहीं." असें सहजोद्गार त्याचे मुखांतून बाहेर पडले. त्यानें लागलींच छन्नास हांक मारली, व त्यास सांगितलें, "प्रिय छन्ना ! आज मी सर्व संगपरित्याग करणार. कंथकावर (या नांवाच्या घोड्यावर) ताबडतोब जीन टाक."



धन्याचे हुकुमाप्रमाणें छन्नानें घोडा तयार केला; व त्याप्रमाणें वर्दी दिली. पण जाण्यापूर्वीं एकवार पत्नी व पुत्र ह्यांची भेट घ्यावी, एकवार त्यांना डोळे भरून पाहावें, असें त्यास साहाजिकच वाटलें. "जिचा सर्व जन्म आपल्या विरहानें दुःखांत जाणार, तिचा निरोप न घेतां आपण गेल्यास अपराधी ठरूं. आपल्यावर निर्व्याज प्रेम करणाऱ्या व आपल्या सुखानें सुखी व दुःखानें दुःखी होणाऱ्या निष्पाप अबलेचा निरोप घेणें अवश्य आहे." असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. पत्नीची भेट घेण्यानें कदाचित् आपला सर्वच बेत ढांसळेल, ती आपणास नानाप्रकारें विनवून आपल्या उद्दिष्ट कार्यापासून परावृत्त करील, व आपणासही न जाणो तिचें प्रेमळ बाहुपाश तोडून जाणें कठीण जाईल, ह्याची त्यास जाणीव नव्हती असें नाहीं. पण धर्मपत्नीचा त्याग करण्यांत आधींच आपण एका कर्तव्यापासून

भ्रष्ट होत आहोंत, ह्या विचारामुळें म्हणा, अगर आपण करीत आहों तें अंतीं आपल्या आध्यात्मिक उन्नतीचे दृष्टीनें इष्ट असून पत्नी या नात्यानें आपले आड न येतां आपणास मदत करणेंच तिचें कर्तव्य आहे अशी आपण तिची खात्री करूं असें वाटल्यावरून म्हणा, तिचा शेवटचा निरोप घेण्याचा निश्चय शेवटीं त्यानें अमलांत आणला खरा. तो तसाच यशोधरेचें महालांत जावयास निघाला. राजपुत्राची स्वारी येतांच दासींनीं बाजूला होऊन रंगमहालाचा दरवाजा उघडला. आंत पाऊल टाकून पाहातो तों, यशोधरा राहुलचे अंगावर हात टाकून गाढ झोंपी गेली आहे, असें त्यास दिसलें. आपल्या सुख-दु:खाची काळजी घेण्यास तो जगन्नियंता समर्थ आहे. अशा भावनेनेंच ती स्वस्थ निजली असावी. त्यावेळीं तिच्या तोंडांवर हास्य विलसत होतें. आपणांबद्दल मनांत विचार आल्यामुळेंच ती हंसली असेल असेंही त्यास क्षणभर वाटलें. अशा सुखी जीवाला दु:खांत लोटण्यास आपण कारणीभूत होणार, अशा विचारानें क्षणभर त्याचा निश्चय डळमळूं लागला. त्याबरोबर तिला जागें करण्याचा आपला पूर्वीचा बेत त्यानें रहित केला. पुत्रास एकवार घ्यावें तरीही ती जागीं होईलच म्हणून तोही बेत त्यानें रहित केला. "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि" ह्या उच्चकोटींतील तो होता, म्हणूनच त्या सर्व प्रेमळ बंधनाकडे पाठ फिरवून तो निघाला. व तडक जाऊन कंथकावर आरूढ झाला. उंबऱ्याबाहेर त्याचें पाऊल



पडतें तोंच राहूल झोंपेंतच जरा रडूं लागला. पुढें वाढून ठेवलेल्या पितृविरहाचें दु:खानेंच तें अज्ञ बालक रडलें असेल काय! यशोधराही त्यास झोंपेंतच थोपटूं लागली. तिला काय माहीत कीं, ज्याक्षणीं आपण आपले पुत्रास सुखानें निद्रा करण्यास सांगत आहोंत, त्याच क्षणापासून आपली ह्या संसारांतील सुखाची निद्रा कायमची अंतरली!

कंथकाजवळ छन्न उभा होताच. त्या धिप्पाड अश्वाची लांबी १८ हात होती. छन्नास बरोबर घेऊन त्यानें तसाच महाद्वाराचा रस्ता धरला. अश्व वायुवेगानें धांवणारा असूनही त्यानें त्यास सावकाशच चालविलें होतें. महाद्वाराजवळ येतांच दरवाजे बंद असून पहारेकरी निद्रामग्न झालेले त्याला दिसले. सत्पुरुषाला सत्कार्यांत स्वर्गीय देव साहाय्यकारी असतात, हें सत्य मनांत आणलें म्हणजे बोधिसत्वानें एकवार दिव्यदृष्टीनें अवलोकन करतांच महाद्वारें सबंद उघडलीं गेलीं, व पहारेकरीहि जागे झाले नाहींत, यांत आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. महाद्वारांतून बाहेर पडताच कंथकास वायुवेगानें चालण्याची त्यानें आज्ञा केली; व तो कपिलवस्तूच्या रस्त्यावरून एका क्षणांत दिसेनासा झाला.

याप्रमाणें वायुवेगानें मार्ग क्रमण करीत असतां अंतरिक्षांतून "मार"+ (सैतान) एकाएकीं दत्त म्हणून त्याच्यापुढें उभा

+ मदनो मन्मथो **मारः** प्रद्युम्नो मीनकेतनः ॥ यांतील "**मार**" शब्दाशी सांप्रतच्या माराचें साम्य दिसतें.

राहिला. बोधिसत्वानें राजैश्वर्याचा स्वीकार करावा आणि बुद्ध होण्याच्या मार्गापासून परावृत्त व्हावें, न झाल्यास त्याच्या मार्गांत नानाप्रकारच्यीं विघ्नें उपस्थित करून त्यास तो मार्ग सोडून देणें भाग पाडावें; असा माराचा हेतू होता. सत्कार्यांत सैतानाचें विघ्न नेहमीं ठेवलेलेंच असतें ! मारास पाहून बोधिसत्वानें अश्वाचा वेग कमी केला, व त्याला आगमनाचें कारण विचारलें. त्यावर मार उपदेश करण्याच्या हेतूनें म्हणाला " हें तरुण राजपुत्रा ! अशा रसरसलेल्या तारुण्यांत मुसमुसलेल्या नवयुवतीच्या मुग्धमधुश्रीच्या विलासांचा उपभोग घेण्याचें सोडून अंगाला राख फासून अरण्यांत जाण्यांत अर्थ नाहीं. हा मार्ग तू मुकाट्यानें सोडून दे. मागाहून पश्चात्ताप पावण्यापेक्षां तुझ्यासारख्या शहाण्यानें वेळींच सावध राहावें हें योग्य आहे. तूं माझ्या बरोबर ह्याच पावलीं परत चल. मीं माझ्या अतुल सामर्थ्यानें आठ दिवसांचे आंत तुला सार्वभौम राजा करतों. तूं मोठा ज्ञानी आहेस खरा, पण त्या ज्ञानाचा असा दुरूपयोग करूं नकोस. " परंतु, राजपुत्र आतां अशा प्रकारच्या लोभास बळी पडणें शक्य नव्हतें. तो म्हणाला, " तुझ्या उपदेशाची अगर तुझ्या त्या सार्वभौमत्वाची मला बिलकुल जरूर नाहीं. माझा मार्ग मला मोकळा आहे. " असा स्पष्ट ज़बाब त्यानें मारास दिला. तत्क्षणीं स्वर्गस्थ देवतांना अत्यानंद होऊन त्यांनीं आकाशांतून पुष्पवृष्टि केली. आपला डाव साधत नाहीं असें पाहून माराच्या मनांत द्वेषाग्नि धुमसूं लागला;



व शरीराबरोबर जशी छाया तद्वत " मार " हा केवळ द्वेषबुद्धीनें संधि साधण्यासाठीं गुप्तरूपानें त्याच्या मागोमाग चालता झाला.

राजपुत्र बोधिसत्व यानें कपिलवस्तु राजधानी सोडली, तो दिवस आषाढी पौर्णिमेचा होता. नभोमंडळांत कोठें कोठें कृष्ण-मेघ दृग्गोचर होत होते. वर दिलेलें संभाषण झाल्यावर राजपुत्र पुढें जाऊं लागला, इतक्यांत रजनीनाथाची स्वारी एका कृष्ण-मेघाचा आश्रय सोडून भावी बुद्धाचें दर्शनाकरतांच कीं काय बाहेर आली. सर्व जीवसृष्टीवर निगूढ अशी शांतता पसरली होती. तशा त्या निर्जन प्रदेशांत देवतांनीं मानवरूपानें अवतीर्ण होऊन त्याच्यापुढें मशाली धरल्या. पर्जन्याचे प्रारंभीं मोठमोठे थेंब पडतात, त्याप्रमाणें त्यावर पुष्पवृष्टि होऊं लागली. अशा थाटांत राजपुत्राची स्वारी तीस योजनें ( १२० कोस ) गेली, व अनोमा नदीच्या तीरावर येऊन पोहोंचली; आणि नदीच्या पात्रा-वरून अश्वासह उड्डाण करून पैलतीरावर येऊन खालीं उतरली.

नदीकांठचा सर्व प्रदेश अवलोकन केल्यावर आतां आपणांस छन्नाची अगर कंथकाची कांहींच जरूरी नाहीं; असें त्यानें मनाशीं ठरविलें; व तो छन्नास म्हणाला, 'हे माझे अंगावरील सर्व मौल्यवान् अलंकार तुला बक्षीस घे, व अश्वास घेऊन परत जा. मला आतां योगी व्हावयाचें आहे. " याप्रमाणें बोलून श्रमणाच्या वेषाची सर्व तयारी करण्याचे विचार त्यानें आपल्या मनांत निश्चित केले. आपल्या नूतन आश्रमास हा सुंदर केशकलाप शोभणार नाहीं

असें जाणून त्यानें केसाचा झुबका तलवारीनें छाटून टाकला, व मस्तकावरील रत्नखचित मुकुट तुऱ्यासहित उंच आकाशाकडे फेंकून म्हणाला, " जर मी बुद्ध होणार हें निश्चित असेल तर ह्या वस्तू वर अंतरिक्षांत स्थिर राहोत, " चमत्कार असा कीं, आकाशाकडे झोकून दिलेल्या त्या वस्तू अंतरिक्षांतच लोंबत राहिल्या ! त्यानंतर स्वर्गांत त्या वस्तू सोन्याच्या तबकांत घालून तेहतीस कोटी देवांचा कूळामणि ( कुलमणी ) ज्या रत्नखचित देव्हाऱ्यांत होता, त्याचे सन्निध देवांनीं ठेविल्या. अलंकारांचा व केशकलापाचा त्याग केला, त्याप्रमाणें उंची बनारसी वस्त्रांचाही त्याग करावा असा विचार त्याचे मनांत येतांच अनेक जन्माचा त्याचा परममित्र महाब्रह्म देवदूत **घटीकार** तेथें उपस्थित झाला, व त्यानें बोधिसत्वाला तीन झगे आणि श्रमणाच्या दीक्षेस शोभतील अशीं सर्व वस्त्रें सादर केलीं. तीं सर्व नवीं वस्त्रें परिधान करून त्यानें छन्नास निरोप दिला, व सांगितलें; ' माझ्या पित्यास व सर्व आप्तेष्टांस माझा साष्टांग प्रणिपात सादर कर; आणि मीं श्रमणाची दीक्षा घेतली असें त्यांना नम्रपणें समजावून सांग. " त्याप्रमाणें छन्न परत जाण्यास निघाला; परंतु इमानी कंथक मात्र प्रेमळ धन्याचा विरह दुःसह होणार, व धन्यावाचून जीवित कंठणेंही अशक्य ठरणार असें वाटल्यामुळें तो मटकन् खालीं बसला, तो पुनः उठलाच नाहीं. बिचाऱ्याचें तेथेंच प्राणोत्क्रमण झालें. पुढें स्वर्गलोकीं देवता म्हणून त्याच नांवानें त्यानें पुनर्जन्म घेतला.



वरील सर्व वैराग्यप्राप्तीचा वृत्तान्त वाचून जिज्ञासू वाचकांच्या मनांत असा प्रश्न उद्भवेल कीं, हीं कारणें विरक्ति उत्पन्न होण्यास खरोखर पुरेशीं होतीं कीं काय, आणि केवळ त्यायोगेंच बोधिसत्वाचे मनांत इतकी कडकडीत वैराग्यवृत्ति उत्पन्न झाली, किंवा आणखी कांहीं अज्ञात अशी कारणें असूं शकतील ? अर्थात् वरील प्रश्नाचें निश्चितार्थी कोणतेही पक्षीं उत्तर देणें धाडसाचें असलें तरी थोडासा विचार केल्यास बऱ्याच गोष्टींचा उलगडा होऊं शकेल असें वाटतें.

बुद्धानें अवलोकन केलेल्या गोष्टी अशा कांहीं लोकविलक्षण नाहींत कीं, त्यामुळें एकाएकीं वैराग्यवृत्ति इतकी प्रबळ व्हावी. आधि, व्याधि, जरा, मरण, अगर संन्याशाचें दर्शन, ह्या प्रपंचांतील चिरपरिचयाच्याच गोष्टी आहेत. तसेंच दिवाणखान्यांत अस्ताव्यस्त निद्रित झालेल्या नृत्यांगनांचें अवलोकन अगर किसा गौतमीचे उद्गार, ह्यांतही कांहीं इतकी जादू दिसत नाहीं कीं, त्यायोगें कोणी संसार सोडून अरण्याचा रस्ता धरावा. बुद्धाच्या पूर्वीं व बुद्धानंतरही संसाराची स्थिति कवीनें खालीं वर्णन केल्याप्रमाणें नाहीं काय ?

> क्वचिद्वीणावाद्यं क्वचिदपि च हाहेति रुदितम् ।
> क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलहः ।।
> क्वचिद्रामारम्याः क्वचिदपि गलित्कुष्टवपुषः ।
> न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः ॥ १ ॥
>
> ( भर्तृहरि )

अर्थ—कोठें गाण्याच्या बैठकी ऐन रंगांत आल्या आहेत, तर कोठें प्रियजनांच्या मृत्यूमुळें आप्तेष्टजन हृदयविदारण करणारा आक्रोश करीत आहेत, हें आपणही रोज पाहात नाहीं काय? कांहीं ठिकाणीं विद्वज्जनांचा काव्यशास्त्रविनोद चालू आहे, तर जरा पलीकडे दारुड्यांचें भांडण व अपशब्द ऐकूं येत आहेत, ही गोष्ट तरी आजकाल नेहमींचीच नाहीं काय? सुंदर स्त्रिया व कुरुप स्त्रिया, ह्या तर जेथें जाल तेथें आढळतीलच. असें असून आपणापैकीं किती लोकांस वैराग्य प्राप्त होतें? आणि झालें तरी कितीजणांचे बाबतींत तें टिकतें? किंबहुना अशा रीतीनें उत्पन्न होणाऱ्या वैराग्यास आपण जरा उपहास बुद्धीनेंच 'स्मशानवैराग्य' म्हणत नाहीं काय? मग ह्या अगर तत्सम गोष्टींनीं बुद्धाचें मनावरच असा परिणाम कां व्हावा? पण ह्या प्रश्नाचें उत्तर वाचकांस आम्ही एका प्रतिप्रश्नानेंच देऊं इच्छितों. न्यूटनचे आधीं झाडावरून फळ पडतांना कोणी पाहिलें नव्हतें काय? मग एकट्या न्यूटननेंच गुरुत्वाकर्षणाचा नियम कां शोधून काढावा? चुलीवर ठेविलेल्या भांड्यावरील झांकण वाफेचे योगानें उडतांना पूर्वीं कोणी अवलोकन केलें नव्हतें काय? मग एकट्या स्टीव्हन्सनेंच वाफेच्या अजब शक्तीचा शोध कां लावावा? पण ह्याही पुढें जाऊन आम्ही असें म्हणतो कीं, निदान बुद्धकालीं तरी संन्यास घेण्याचा एक प्रकारें प्रघातच पडला होता. असें असतां इतरांचे नांव ऐकूंही न येतां एकटा बुद्धच पन्नास कोट लोकांचा



धर्मसंस्थापक कां व्हावा? कोणी म्हणेल त्याची परिस्थितीच तशी होती; कोणी सांगतील कीं त्याची मन:स्थितीच वैराग्याला फार अनुकूल होती. हिंदु संस्कृतीचा मनुष्य म्हणेल कीं, त्याचें पूर्वसंचितच तसें होतें? अर्थात् एक निर्णायक कारण तर सांगतां येणें शक्य नाहींच; तसेंच तर्कप्रधान मनाचें कांहींतरी समाधान होऊं शकेल असेंही कांहीं ठाम सांगणें कठीण आहे, पण इतकें मात्र खरें कीं, बुद्धाच्या पूर्व आयुष्याचा स्थूलमानानेंही विचार करतां विषयोपभोगाच्या अतिरिक्त सेवनांतच त्याच्या भावीं वैराग्यवृत्तीचें बीज रुजत घातलें गेलें होतें. अशा स्थितींत 'मेणाहूनहि मऊ' असणाऱ्या त्याच्या मनावर दु:खाची कधींच ओळखही नसल्यामुळें परमावधीचें परदु:ख एकाएकीं अवलोकन करतांच आपल्या ठरीव आयुष्यक्रमाचा त्याला अत्यंत तिटकारा आला, आणि म्हणूनच सर्वसंगपरित्याग करून चित्तवृत्ति शांत करण्याकरितां व अक्षय्य सुखाची प्राप्ति होण्याकरितां त्यानें अखेर अरण्याचा मार्ग स्वीकारला.

# प्रकरण ३ रें.

## योगसाधन

बोधिसत्वानें संन्यास आश्रमांत प्रवेश केल्यावर, " एको वासः पत्तने वा वने वा " ह्या उक्तीस अनुसरून ' अनुपिय ' नांवाच्या आमराईंत मुक्काम केला; तेथें त्यानें एक आठवडा काढला. तेथून एका दिवसांत **मगधदेशाची** राजधानी * **राजगृह** शहर गांठलें; आणि शहरांत भिक्षा मागून

* जनरल कनिंगहामकृत प्राचीन हिंदुस्थानचा भूगोल या पुस्तकांत " राजगृह " या ऐतिहासिक स्थळाची संपूर्ण माहिती दिलीच आहे. ( पृ. ४६२ ते ४ ८ ) " हॅमिल्टन् गॅझेटिअर " या पुस्तकांत राजगृहासंबंधांत जी माहिती दिली आहे ती येणेंप्रमाणें:–" राजगृह " यास सांप्रत " राजगिर असें म्हणतात, व तें बिहारच्या दक्षिणेस सुमारें १६ माईल अंतरावर वसलें आहे. अशोक यानें या राजधानीचा त्याग केला होता; त्यानंतर " फा हिअन् " जेव्हां तेथें गेला तेव्हां त्याला तें स्थळ ओसाड व निर्जन असें दिसलें; मात्र बुद्धांची कांहीं जीर्ण मोडकळीस आलेलीं देवालयें तेथें अस्तित्वांत होतीं. हिंदू लोकांच्या यात्रेचें हें प्रसिद्ध स्थान आहे. जैनलोक या स्थानाला पूज्य व पवित्र मानतात, आणि प्रतिवर्षी यात्रेसाठीं तेथें एकत्र होतात. तेथील पांच टेकड्यावर त्यांनीं जैनमांदिरें उभारली आहेत. तेथें इ. स. १८११ सालीं एका झोंपडीच्या सज्जांत मोकळ्या जागेंत एक मोठा हिंदू तपस्वी, बुद्धाची अचलमूर्ति ज्याप्रमाणें कोठें कोठें बसविण्यांत येते तशा स्थितींत, अचल आसनस्थ बसविला होता. संदरहु पांच टेकड्यांचीं नांवें. महाभारतांत दिलेलीं आढळतात तीं येणेप्रमाणें:—१ वैहर, २ वरब, ३ त्रिशव, ४ रिथिगिरी व ५ चैतक.



उपजीविका करण्यास प्रारंभ केला. त्याला पाहून गांवकरी लोकांना फार आश्चर्य वाटलें; कारण वैराग्याचा वेष असला तरी कोणाही पाहाणाराला तो नखशिखांत दिव्यतेजानें चमकणारा कोणी महापुरुष आहे असें सहज वाटे. एके दिवशीं तेथील राजा सेनीय ( श्रेण्य, श्रेणिक ) बिंबिसार हा राजवाड्याच्या गच्चीवर हवा खात असतां त्याची दृष्टि सहज त्या महापुरुषाकडे गेली, व त्यानें लागलींच तो महापुरुष कोण, कोठून आला वगैरे चौकशी करून येण्यास सेवकास आज्ञा केली. राजदूतांनीं गांवाच्या बाहेर जाऊन पाहिलें तो बोधिसत्व हा पाण्डव रॉक ( खडक ) पायथ्याशीं शिळें भिक्षान्न जरा प्रयासानेंच खातानां त्यांना दिसला. राजदूतांनीं ताबडतोब ती साग्र हकीकत राजापुढें येऊन निवेदन केली. ती सर्व हकीकत ऐकून घेऊन राजानें त्या महापुरुषाची समक्ष भेट घेण्याचा निश्चय केला, आणि तसाच तिकडे जाण्यास निघाला. त्यावेळीं सर्व नित्यक्रम आटोपून बोधिसत्व ध्यानस्थ बसण्याचे बेतांत होता. तें दिव्य तेज अवलोकन करतांच आपलें सर्वस्व अर्पण करून त्यास अनन्यभावें शरण जाण्याची राजास प्रेरणा झाली; आणि तो म्हणाला, " हे दिव्यपुरुषा, हें सर्व राज्य मी आपणाला अर्पण करीत आहे त्याचा स्वीकार करावा, आणि आपण ह्या नगरींत वास्तव्य करून सर्वांस पावन करावें. " विरक्तस्य तृणं भार्या निस्पृहस्य तृणं जगत् " अशी बोधिसत्वाची स्थिति झाल्यामुळें त्याला कोणत्याच प्रकारें लोभ, मोह वगैरे-

पासून पीडा होणें शक्यच नव्हतें. त्यानें लागलींच उत्तर दिलें:— " सर्वांत श्रेष्ठ अशा मोक्षाच्या ज्ञानप्राप्तीस्तव मी सर्वसंगपरित्याग केला, आणि हा आश्रम स्वीकारला; करितां मला तुझ्या त्या राज्यवैभवाशीं कांहींच कर्तव्य नाहीं." ही त्याची निष्कामवृत्ति अवलोकन करतांच राजा पुनः म्हणाला कीं, " निदान माझ्यावर इतका तरी अनुग्रह करावा कीं, बुद्धांचीं पाऊलें प्रथम माझ्या राज्यास लागावीं."

आतां आपणास ह्या ठिकाणीं पूर्ण एकांतवास मिळणें कठीण जाईल, असें जाणून बोधिसत्वानें तें ठिकाण सोडून दिलें. पुढें मार्गक्रमण करतां करतां त्याला ' आलारकालाम ' व रामपुत्र " उदक " हे दोघे प्रसिद्ध तत्ववेत्ते भेटले; त्यांचेजवळ राहून योगसाधनाचा तो अभ्यास करूं लागला. अंगीं तीव्र वैराग्य बाणल्यामुळें त्याची प्रगतिही भराभर होऊं लागली; पण कांहीं काळ लोटतांच त्याला असें वाटलें कीं, अशानें ज्ञानप्राप्तीचें खरें ध्येय्य साधणार नाहीं; म्हणून त्यानें स्वत: सिद्ध भगिरथ प्रयत्न करून " **महापधान** " पद्धतीनें आपलें उद्दिष्ट कार्य साधण्याचा निश्चय केला, व त्याकरतां उरुवेला येथें जाऊन राहिला. त्याच-ठिकाणीं पञ्चवग्गियस—कोण्डण्ण आदिकरून पांच भिक्षू—भेटले. हा पुढें बुद्ध होणार असें जाणून ते सर्व त्याचे जवळच राहिले.

पुढें सहा वर्षें बोधिसत्वानें ध्यानस्थ राहून उग्र तपाचरण केलें. नित्य निराहार वृत्ति असल्यानें तो दिवसानुदिवस अतिशय क्षीणबल होत जाऊन केवळ अस्थिपंजर असा दिसूं लागला. एके दिवशीं नित्यनियमाप्रमाणें तो ध्यानस्थ बसला असतां, शरीरांत बिलकुल त्राण न राहिल्यानें त्याला मूर्च्छा आली. " प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति "। हेंच खरें ! कांहीं वेळानें मूर्च्छा निवारण होऊन तो चांगला सावध झाला. आपण अनुसरीत आहों तो मार्ग योग्य किंवा अयोग्य ह्याबद्दल तो विचार करूं लागला. प्रथम शरीररक्षण केल्याशिवाय ज्ञानप्राप्ति होणें अशक्य होय; अशी त्याची खात्री पटली. ' आपण जगलों तरच आपलें ध्येय्य सिद्धीस जाईल, मग मार्ग कोणताही कां असेना ' हें प्रत्यक्ष अनुभवांनींच त्याला उत्तम रीतीनें शिकविलें, आणि ' आत्मानं सततं रक्षेत् ' ' अशा बाबतींत आपल्याही शास्त्र-कारांच्या आज्ञा नाहींत काय ? ' असें तो मनांत म्हणाला. इकडे त्याची ती मूर्छा पाहून कित्येक देव म्हणाले कीं, ' श्रमण गौतम मृत्यु पावला, ' कांहीं म्हणाले कीं, ' अर्हतांना ह्या स्थितींतून गेलेंच पाहिजे. ' त्यालाही मूर्छा आल्याबद्दल थोडा वेळ वाईट वाटलें; पण लागलींच त्याचे मनांत असा विचार आला कीं, मूर्छा येऊन हताश झालों याची क्षिति बाळगणें हें खऱ्या ज्ञानाचें लक्षण खास नव्हे. ह्याप्रमाणें पूर्ण विचार करून फिरून त्यानें पथ्याहार चालू केला. पण, जवळ असलेल्या पांच भिक्षूंना वाटलें कीं, ह्याची वासना अनावर झाल्यामुळेंच ह्यानें इतके दिवस आक्रमिलेला मार्ग एकाएकीं सोडून पुनश्च आहारास

प्रारंभ केला. अर्थात् त्यामुळें त्यांची श्रद्धाही त्याच्यावरून उडाली, व ते त्याला तेथेंच सोडून बनारस नजीकच्या **ऋषीपतन मृगोपवनांत** जाऊन राहिले. वास्तविक अशा प्रसंगीं त्यास मानवी सहानुभूतीची अत्यंत अवश्यकता होती; पण त्या भिक्षूंच्या मनांत तशा प्रकारच्या सहानुभूतीला स्थानच उरलें नव्हतें.

त्या वेळेस उरूवेला येथें सुजाता अथवा **नंदबला** नांवाची एक सरदार कन्या राहत होती. वैशाख शु॥ पौर्णिमेच्या दिवशीं पंचपंच उषःकालीं उठून तिनें जवळच असलेल्या पवित्र वृक्षास ( अश्वत्थ ) नैवेद्य समर्पण करण्याच्या हेतूनें गोदोहनास प्रारंभ केला, व त्या वृक्षाखालील सर्व जागा झाडून, सारवून स्वच्छ करण्यासाठीं पूर्णा नांवाच्या दासीला आज्ञा केली; कारण तिनें बऱ्याचशा अद्भुत गोष्टींचा अनुभव घेतला होता.

पौर्णिमेच्या पूर्वदिवशींच्या उत्तर रात्रीं बोधिसत्वाला पांच स्वप्नें पडलीं होतीं. त्यावरून त्याची पूर्ण खात्री होऊन चुकली कीं, आपण पौर्णिमेच्या सबंद दिवसांत बुद्ध खास होणार. नित्यक्रमाप्रमाणें प्रातःकाळीं बोधिसत्व भिक्षान्नार्थ निघाला असतां त्या पवित्र वृक्षाखालीं येऊन ध्यानस्थ बसला. पूर्णा दासीनें ती जागा स्वच्छ केलीच होती; अशांत तिनें त्या ध्यानस्थ मूर्तीकडे पाहिलें, तों त्याचें तेजःपुंज शरीर व त्याच्या त्या दिव्य तेजोबलानें ती सर्व जागा, तो पवित्र वृक्ष आणि सर्व पूर्वदिशा सर्वत्र सुवर्णमय झालेलें पाहून ती आश्चर्यचकित झाली;



व धांवत धांवत जाऊन तिनें नंदबालेस हा सर्व वृत्तांत कथन केला. नंदबलेनें तत्क्षणीं एका सुवर्णपात्रांत दुधभात कालवून तें सुवर्णपात्र त्या महापुरुषापुढें आदरपूर्वक नेऊन ठेविलें व त्याला नमस्कार केला. तें सुवर्णपात्र पुढें येतांच त्या महापुरुषाच्या दैवी सामर्थ्यानें घटिकारानें दिलेलें मृण्मयपात्र एकाएकीं अदृश्य झालें. त्यानें तें पात्र नैरञ्जना नदीचे कांठीं नेलें व तेथें आसन ठोकून ध्यानस्थ बसला. त्यांत त्याला असें कळलें कीं, या पवित्र नदीतीराच्या सुप्रसिद्ध स्थळीं अगणित बोधिसत्व ज्ञानसंपन्न होऊन मोक्षपदाला गेले. त्यास अनुसरून त्या महापुरुषानें अर्हताचें वस्त्र परिधान केलें, व पुढें सात आठवडे पावेतों आपल्यास भोजन मिळणार नाहीं असें जाणून, त्या सुवर्णपात्रांतील अन्नाचे ४९ ग्रास करून यथेच्छ भोजन केलें. मग तें पात्र नदीच्या प्रवाहांत फेंकून दिलें. फेंकतांना म्हणाला कीं, " जर मी आज बुद्ध होणार हें सत्य असेल, तर हें सुवर्णपात्र उदकावर तरंगत राहील, नाहींपेक्षां तें नदींत बुडून जाईल. " त्या नंतर आश्चर्य असें झालें कीं, तें सुवर्णपात्र तरंगत तरंगत बऱ्याच अंतरावर जाऊन नदीच्या तळाला **नागराजाकाल** याच्या निवासस्थानाजवळ गेलें, व मागील तीन बोधिसत्वाचीं सुवर्णपात्रें तेथें होतीं त्या पात्राशीं हें सुवर्णपात्र लागतांच एक मोठा ध्वनी झाला; त्यावरून **नागराजाकाल** यानें जाणलें कीं, " नवीन बुद्धाचा उदय झाला असावा. "

सायंकाळीं तो महापुरुष ( ज्याच्या खालीं बसून पूर्ण ज्ञान-प्राप्ति होते अशा ) पवित्र वृक्षाकडे पूर्व दिशेस जात असतांना त्याला एक गवतकाप्या स्वस्तिक (सोथ्थिय) भेटला; त्यानें त्यास गवताच्या आठ पेंड्या दिल्या, त्या घेऊन पवित्र वृक्षाखालीं येऊन पोहोंचला. त्या आठी पेंड्या वृक्षाखालीं आंथरून चौदा हात लांब रुंद असें आसन सिद्ध केलें, व त्यावर पश्चिमाभिमुख ध्यानस्थ बसला. याच पद्धतीनें व याच ठिकाणीं बसून पूर्वींचे महापुरुष बुद्ध झाले होते. अशा रीतीनें ध्यान धरल्यावर कांहीं वेळानें त्यानें उच्चस्वरांत सत्यघोष केला कीं, " माझी त्वचा, माझे ज्ञानतंतू व हाडें जीर्ण होऊन जावोत; माझ्या शरीरांतील सर्व रक्तही आटून जावो, तरीपण पूर्ण ज्ञानप्राप्ति झाल्यावांचून मी येथून हालणार नाहीं. "

माराच्या भेटीची हकीकत वाचकांचे स्मरणांत असेलच. तेव्हांपासून त्याचें सुदर्शनचक्र या महापुरुषाभोंवतीं गुप्तरूपानें फिरतच होतें. या माराचीं अनेक ग्रंथांतून अनेक नांवें आढळ-तात; तीं अशीं:-मार-मदन-कामेश्वर-भूत-पिशाच्य-राक्षस-पापात्मा-सैतान इत्यादि. मारानें त्या महापुरुषाचा कृतनिश्चय पाहून विचार केला कीं, हा माझ्या तडाक्यांतून सटकूं पहात आहे. परंतु, तसें न होऊं देतां मी त्यास पुरून उरेन. असा पूर्ण विचार करून ही योग्य संधी पाहून त्याच्याशीं झुंजावयास मार आपलें सैन्य जमा करूं लागला. प्रथम त्यानें आपलें राक्षसी



मायेचे सहाय्यानें अनेक भूतचेष्टा आरंभिल्या. पण त्या सर्व फुकट गेल्या. नंतर तो स्वतः आपल्या गिरिमेखला नांवाच्या हत्तीवर आरूढ झाला; आणि त्या अक्राळ विक्राळ व भीषण सेनेसह बोधिसत्वावर तुटून पडला. त्या युद्धाचें व सैन्याचें वर्णन कांहीं ठिकाणीं फार मजेदार केलेलें आढळतें. " प्रत्येकानें निरनिराळीं रूपें धारण केलीं, कोणी तलवारी व भाले घेतले आहेत, कोणी झाडेंच तोडून हातांत घेतलीं, तर कोणी वज्राचे परशू धारण केले आहेत. " अशा रीतीनें तें सैन्य सशस्त्र होऊन युद्धास सज्ज झालें. त्यापैकीं कोणाचीं डोकीं डुकरांचीं, तर कोणांचीं माशांचीं, कोणांचीं गाढवांचीं, कोणांचीं घोड्यांचीं, वाघांचीं, सिंहांची, अगर सुसरी सारखीं, कांहींना अनेक मुखें तर एकच डोळा. कांहींना अनेक डोळे, कांहींचीं पोटें नगाऱ्याएवढीं, तर कांहींचीं पोट व पाठ जणूं एक झालेले, कोणीं आवाढव्य, तर कोणी केवळ हाडांचे सापळे ! ! अशा तऱ्हेच्या त्या सैन्यानें-कोणी मोठ्यानें किंकाळ्या मारीत, कोणी नाचत, कोणी दांत खात-त्या बोधिवृक्षाला चहूंकडून व्यापून टाकलें. " सैन्यानें आपली पराकाष्ठा केली, पण बुद्धाच्या एका केसालाही धक्का लागला नाहीं. हें अवलोकन करतांच तें सर्व सैन्य भेदरून इतस्ततः पळत सुटलें. इकडे बुद्धाची स्वारी मात्र पारमितांवर पूर्ण विश्वास ठेवून अगदीं निश्चिंत होती. त्यानंतर मारानें आपल्या राक्षसी मायेनें मोठा झंझावात सुरू केला. अजस्त्र पर्वत-शिलांचा त्याचे अंगावर वर्षाव केला. नानाप्रकारचीं अग्न्यस्त्रादि

अस्त्रें सोडीलीं; पण सर्व व्यर्थ! सर्व प्रयत्न निष्फळ झालेले पाहून तो सैतान त्या महापुरुषाजवळ आला आणि त्याला बसल्या जागेवरून निघून जाण्याबद्दल फर्मावूं लागला. बुद्धानें शांतपणें उत्तर दिलें:—" दुष्टा मारा! आजपर्यंत ज्ञान संपादन करून परोपकारार्थ देह झिजविला नाहींस असें असून ह्या जागेवर हक्क सांगतोस? माझ्या पुढें व्यर्थ घमेंड कशाला दाखवितोस? ही जागा तुला मिळणार नाहीं." हें उत्तर ऐकून मार क्रोधाविष्ट झाला. रागानें लालबुंद होऊन त्यानें निर्वाणीचें प्राणघातक अस्त्र त्या महापुरुषावर सोडलें; परंतु चमत्कार असा कीं; महापुरुषाच्या दिव्य तपोबळानें त्या प्राणघातक अस्त्राचा एक मोठा सुंदर पुष्पहार होऊन तो त्याचे गळ्यांत पडला. हें पाहून मारानें पुन: पर्वतशिला फेंकण्याचा सपाटा चालविला; पण त्या दगडांचे सुवासिक पुष्पगुच्छ होऊन त्याच्या दिव्य शरीरावर पडले. " आतां आपण विजयी झालों " अशी खात्री होतांच, बोधिसत्व उच्च स्वरानें म्हणाला, " ही पवित्र जागा माझी आहे. " नंतर शत्रूच्या सैन्याकडे रोख धरून त्याचा धि:कार करून पुन: म्हणाला, " तूंच माझ्या गुणांची साक्ष आहेस. " शत्रूच्या सैन्यानें प्रश्न केला कीं, " तूं अन्नदान केलेंस याला साक्षी कोण? " हें ऐकून सिद्धार्थानें वसुंधरेस ( पृथ्वीस ) प्रार्थना केली कीं, " तूंच माझी साक्ष दे. " यावरून लागलींच वसुंधरेंतून ध्वनि निघाला. तो इतका भयंकर होता कीं, त्यायोगें—शत्रू-



कडील गिरिमेखला हत्ती भीतीनें खालीं बसला व तसाच घसरत घसरत जाऊन त्यानें त्या महापुरुषाला वंदन केलें. माराचें सैन्य सैरावैरा पळत सुटलें; अखेर " माराचा पराजय " आणि " सिद्धार्थाचा जय " असा जयघोष करीत व जयाचीं गीतें गात गात सर्व स्वर्गीय देवता नागासहित त्या सत्पुरुषाजवळ येऊन पोंहचल्या व त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें. माराच्या प्रचंड सैन्याचा पूर्ण पराजय होऊन सर्वत्र सामसूम झाली; त्यावेळीं श्रीसूर्यनारायण क्षितिजासन्निध येऊन ठेपला होता. भगवान् बुद्धाचा विजय अवलोकन केल्याशिवाय क्षितिजापलीकडे जावयाचें नाहीं, अशा निर्धारानेंच जणु काय तो तेथें थांबला असावा. त्याचरात्रीं सिद्धार्थ पूर्ण ज्ञानी झाला. प्रथम प्रहरांत त्या सत्पुरुषांस ( पूर्वनिवास ) भूतकालाचें ज्ञान प्राप्त झालें; द्वितीय प्रहरांत त्यांस दिव्यदृष्टि प्राप्त झाली; आणि तृतीय प्रहरांत त्यास भूत—भविष्य—वर्तमान असें त्रिकालज्ञान पूर्णपणें प्राप्त झालें. त्यानंतर उलट सुलट अशा प्रकारें बारा निदानांचा तो सिद्ध पुरुष जप करूं लागतांच वसुंधरा हालूं लागली व अनेक चमत्कार दृष्टोत्पत्तीस आले. याप्रमाणें सिद्धार्थ सर्वज्ञ झाला व बुद्धांच्या सांप्रदायास अनुसरून आनंदगीत गाऊं लागला.

# प्रकरण ४ थें.

## धर्मोपदेश व दीक्षा.

भगवान् बुद्ध सर्वज्ञ झाल्यानंतर आत्मोन्नतीचा परमानंद अनुभवीत आणि पूर्वजन्माचीं सत्कृत्यें ( म्हणजे वेषांतराशिवाय कांहींच फरक नाहीं ) याविषयीं विचार करीत तेथेंच स्वस्थ बसून राहिला. त्याची ती स्तब्ध वृत्ति अवलोकन करून कित्येक देवतांना तर " भगवान् बुद्ध कृतार्थ झाला असावा " अशा शंका उत्पन्न झाल्या. भगवान् बुद्धानें ह्या त्यांच्या शंका ओळखून योगबळानें एकदम आकाशांत उड्डाण केलें व त्यांना अनेक चमत्कार दाखविले; त्यामुळें देवतांच्या शंका दूर झाल्या. त्यानंतर तो एक आठवडा पावेतों वायव्यदिशेकडे टक लावून पाहात एक सारखा तटस्थ वृत्तीनें उभा राहिला. ती जागा " अनिमिष दृष्टीनें अवलोकन करण्याचें प्रसिद्ध स्थळ. " या नांवानें सर्वत्र प्रसिद्ध झाली. पूर्वीचें त्याचें पवित्रासन व हल्लींचें पवित्र स्थळ यांच्यामध्यें तो पूर्वेकडून पश्चिमेकडे व पश्चिमेकडून पूर्वेकडे इतस्ततः एक आठवडाभर एकसारखा शतपावली करीत होता. चवथ्या आठवड्यांत देवांनीं वायव्य दिशेकडे जवळच एक रत्नजडित मंदिर त्याच्यासाठीं निर्माण केलें; त्यांत स्वस्थ मनानें भगवान् बुद्धानें अभिधर्मपिटक पठण करण्यांत बरेच दिवस घालविले.



याप्रमाणें एक मास बोधिवृक्षाखालीं राहून पांचव्या आठवड्यांत भगवान् बुद्ध ( गोथर्डच्या* ) वटवृक्षाखालीं गेला; आणि तेथें " धर्म " या विषयाचें तात्विकज्ञान संपादन करण्यास त्यानें प्रारंभ केला.

माराचा पराभव झाल्यानें तो हताश झाला होता तरी आपला शत्रू भगवान् बुद्ध याचें व्यंग तो शोधीतच होता. त्यानें आपल्या

* गोट+हर्ड=गोथर्ड. जसें शीप+हर्ड शेफर्ड, तसेंच मेंढ्या चारतात तें स्थळ=गोथर्ड.

**टीपः**—बौद्धधर्मांचे लोक सांगतात कीं–बुद्धानें स्वतः सांगितलें आहे कीं–हा वटवृक्ष ही माझ्या धर्मवृद्धीची खूण आहे; माझा धर्म आहे तावत्काल पावेतों हा वृक्षही असणार; आणि त्याच्या शाखा वृद्धिंगत होतील, तसतसा माझ्या धर्माच्याहि शाखा वृद्धिंगत होतील. हा वृक्ष वटवृक्षासारखाच आहे, पण त्यास शुद्ध वटवृक्ष म्हणतां येणार नाहीं. कारण वडास पारंब्या फुटतात तशा ह्यास फुटत नाहींत. ह्याचीं पानें इतर वडाप्रमाणें बदामी आकाराची असून त्याचे देठ इतके बारीक असतात कीं, त्यामुळें तीं अहोरात्र हालत असतात. जणुं काय तीं बुद्धाच्या वेळचें वैभवच आनंदातिशयानें सर्वांस जाहीर करतात असें वाटतें.

ह्या वृक्षांपैकीं पहिला वृक्ष, मगध देशाचा राजा अशोक ह्यानें प्रथम सिलोनांत पाठविला; याची डाहाळी उरुवेला येथील वृक्षाची होती; आणि ती इ. स. पूर्वी २४५ व्या वर्षी जुनी राजधानी अनर्जापुर येथें लाविली गेली. ह्यावरून पाहतां हा जगांतील अत्यंत प्राचीन वटवृक्ष होय; आणि सिलोनांत ह्या जातीचे वटवृक्ष जे सारे पसरले आहेत ते सर्व ह्यांचीच अपत्यें होत. ह्या पवित्र वृक्षांच्या दर्शनार्थ चिनांतून व जपानांतून यात्रा येत असते. ( लोकमित्र पृष्ठ २७२ ).

तीन कन्या " १ तृष्णा, २ प्रीति, ३ रति ( हा त्रिवेणी संगमच म्हटला पाहिजे ) त्या महापुरुषाचें सत्वहरण करण्याकरतां पाठविण्याचा विचार निश्चित केला; कारण आपल्या प्रेमळ पित्याचे म्लानवदन पाहून त्यांना वाईट वाटलें व त्यांनींही त्याला धीर दिला कीं, " आम्ही आमच्या नवयौवनश्रीनें त्याचें चित्त हरण करण्याचा पुनः प्रयत्न करतों. " पित्याची संमति मिळतांच त्या भगवान्-बुद्धाजवळ आल्या व अनेक प्रकारें आपलें मोहजाल त्याच्या सभोंवतीं त्यांनीं पसरलें; पण सर्व व्यर्थ ! अखेर तो त्या तिघींनां म्हणाला, " मुकाट्यानें येथून लवकर पाय काढा. अशा मदनचेष्टांचा प्रयोग, ज्यांनीं आत्मसंयमन केलें नसेल अशाच लोकांवर यशस्वी होऊं शकेल. माझ्या सारख्या तथागतावर तुमचे हे प्रयोग करणें म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणेंच होय. मी, माया, मोह, मत्सर, यांचा त्याग केला आहे." अखेर निराश होऊन त्या आपल्या पित्याकडे परत चालत्या झाल्या.

मग एक आठवडा तेथेंच वास्तव्य करून तो महापुरुष **मुकलिंद्** नांवाच्या पर्वतावर गेला; तेथें एका वृक्षाखालीं विश्रान्ति घेत असतां मुसळधारांची पर्जन्यवृष्टि होऊं लागली. त्यावेळीं नागराजानें त्याच्या सभोंवतीं वेंटोळें घालून आपली विशाल फणा छत्र म्हणून त्याच्या मस्तकावर धरली. त्यानंतर तो **राजायतन** वृक्षाखालीं गेला, व तेथें एक आठवडा पावेतों राहिला. सातव्या



आठवड्याच्या शेवटच्या दिवशीं तो महात्मा राजायतन वृक्षाखालीं बसला असतांना तपुस्स व भल्लुक ( बंधुद्वय ) या नांवाचे दोघे व्यापारी पांचशें गाड्यांनिशी त्या रस्त्यानें उत्कलाहून ( ओरिसा ) मध्यदेशाकडे मुशाफरी करीत जातांना त्याला दिसले. त्या व्यापाऱ्यांची कुलदेवता तेथें अकस्मात् प्रकट झाली, व तिनें त्यांना सुचविलें कीं, " वृक्षाखालीं बसलेल्या महापुरुषास मध व रोट्या द्या. " त्याप्रमाणें ते बंधुद्वय व्यापारी भगवान्-बुद्धासन्निध आले, व त्यांनीं त्यास साष्टांग नमस्कार घालून, " कृपा करून या खाद्याचा स्वीकार व्हावा, " अशी नम्र प्रार्थना केली. भगवान्-बुद्धाजवळ तें खाद्य घेण्यास पात्र नव्हतें. तेव्हां चारी दिशाकडून चार दिक्पाल प्रकट झाले, व त्यांनीं इंद्रनीलमण्यांचीं चार पात्रें त्याच्यापुढें आणून ठेविलीं. पण बुद्धानें तीं घेण्याचें स्पष्ट नाकारलें. तेव्हां पाषाणाचे चार प्याले त्यांनीं आणून ठेविले. भगवान् बुद्धानें त्या चारी दगडी पात्राकडे दिव्य दृष्टीनें अवलोकन करतांच त्या चारी पात्राचें एकच दगडीपात्र निर्माण झालें; त्यांत त्यानें तें खाद्य घेतलें व त्याचा स्वीकार केला. आपण अर्पण केलेल्या नैवेद्याचा स्वीकार झाल्याचें पाहून त्या व्यापाऱ्यांनीं भगवान् बुद्धाच्या चरणांवर लोटांगण घातलें. प्रत्यक्ष घडलेली चमत्कृति अवलोकन करतांच त्या व्यापाऱ्यांची त्याच्यावर दृढ श्रद्धा बसली. व ते म्हणाले, " महाराज ! आम्ही अनन्य भावानें आपणास शरण आलों

आहों ! आम्ही बुद्धाचे उपासक या नात्यानें सर्व नियम व कायदे आमरणान्त पाळूं, करतां आम्हांस बुद्ध धर्माची दीक्षा द्यावी." याप्रमाणें ते बंधुद्वय बुद्धाचे कट्टे उपासक झाले. त्या वेळपावेतों बुद्ध अनुयायांचा संघ अशी संस्था अस्तित्वांत आलेली नव्हती. त्यामुळें भगवान् बुद्ध यांच्या उपासनेचें कांहीं तरी साधन त्यांचे जवळ असावें, अशी त्या व्यापाऱ्यांची उत्कटेच्छा दिसल्यावरून त्या महापुरुषानें आपल्या मस्तकावरील थोड्या जटा त्यांना दिल्या. व्यापाऱ्यांनीं आनंदानें व अढळ श्रद्धापूर्वक त्या पवित्र केंसास बुद्धाचें एक स्मारक असें समजून आपल्या गांवांत एक मंदिर उभारून देव्हाऱ्यांत त्यांची स्थापना केली व नित्य त्याची पूजा अर्चा ते करूं लागले.

त्यानंतर तथागत् ( बुद्ध ) पुन: त्या गोथर्ड वृक्षाखालीं परतला. तेथें त्यानें स्वस्थान्तःकरणानें विचार केला कीं आपण ज्या सूत्रांच्या योगानें उपदेश करणार तीं सूत्रें लौकिक दृष्टीनें समजण्यास अत्यंत गहन आहेत; म्हणून त्यांत कांहीं फेरफार करणें जरूर आहे किंवा कसें ? परंतु **ब्रम्हासहंपति** यानें जाणलें कीं, तथागतानें आपली गहन सूत्रें जशींच्या तशींच जर समाजास उपदेशिलीं नाहींत तर लोकांचा अज्ञानांधःकार दूर होणार नाहीं. म्हणून तो तथागतासन्निध आला व गहन सूत्रें आहेत तशींच लोकांस उपदेशण्यास त्यानें विनंती केली. व तीं तथागतानेंही मान्य केलीं. सूत्रांचा उपदेश प्रथम कोणास करावा ह्या बद्दल



तो विचार करूं लागला असतां त्याला प्रथम आलार ह्याचें स्मरण झालें; पण ध्यान धरून अंतर्ज्ञानानें पाहतांच त्याला दिसलें कीं, गुरुजी आलार स्वर्गवासी झाले होते. पुनः विचार करतांच उद्रकाचें नांव डोळ्यांपुढें आलें, पण तोहि कालरात्रीं इहलोक सोडून गेल्याचें दिसलें. नंतर त्या पूर्वींच्या पांच भिक्षूंची आठवण झाली. त्यांची आपणावर दृढ श्रद्धा असून त्यांनींही ज्ञानप्राप्तीकरितां उग्र तपाचरण केलें आहे, हें जाणून त्यांना उपदेश करणें योग्य व हितावह होईल असें त्यानें ठरविलें. ते पांच भिक्षू बनारस जवळील मृगवनांत आहेत असें अंतर्ज्ञानानें जाणून आषाढ शुद्ध पौर्णिमेस तिकडे जाण्याकरतां त्यानें आपला मुक्काम तेथून हालविला.

मार्गांत त्याला आजीवक उपक या नांवाचा एक सिद्ध भेटला. तथागताचें तें अलौकिक दिव्य तेज अवलोकन करून त्यानें प्रश्न केला कीं, " आपण कोणत्या पंथाचे आहांत व आपला गुरू कोण ? " तथागतानें आपली सर्वज्ञता व अलौकिकत्व त्यास सिद्ध करून दाखवून " आपण धर्मप्रसाराकरितां बनारस येथें जात आहोंत व जगाच्या कल्याणासाठीं लोकांना अज्ञानांधकारांतून ज्ञानाच्या दिव्य प्रकाशांत आणण्यासाठीं निर्वाणाचा अखेरचा मार्ग दाखवून जगाच्या उद्धारार्थच अवतरलों आहोंत " असें त्यास स्पष्ट दर्शविलें.

सायंकाळीं तथागताची स्वारी मृगवनांत येऊन पोहोंचली. त्याला त्या पांच भिक्षूंनीं दुरून पाहतांच आपसांत ते असे म्हणूं लागले कीं, " धर्म बांधवहो ! श्रमण गौतमाची स्वारी आपणाकडे येत आहे; सर्व तपाचरणाचा त्याग करून स्वारीला पुन: विषयसुखाची गोडी लागली आहे, म्हणून त्याचा पूर्वीं-प्रमाणें कोणत्याही प्रकारें मान सन्मान न करतां, राजकुलोत्पन्न असल्यामुळें फक्त त्यास बसावयास आसन देऊं, " त्यांनीं असें ठरविलें, पण दैवीशक्तीपुढें बिचाऱ्यांचें काय चालणार ? ती दिव्य तेजोमूर्ती समीप येतांच, त्यांची इच्छा नसतांही ते उठून उभे राहिले व त्यांनीं त्याचें उत्तम स्वागत केलें. आपला पूर्व-परिचयाचा राजपुत्र बुद्धत्वाप्रत गेलेला आहे हें माहीत नस-ल्यामुळें, त्यांनीं त्यास नेहमींप्रमाणें ' महाराज ' संबोधिलें; पण बुद्धानें सांगितलें " भिक्षूहो ! मला आतां पूर्वींप्रमाणें संबो-धण्याचें कारण नाहीं. कारण मी आतां ' तथागत ' झालों आहें. ह्या जन्मांतच तुम्हां सर्वांस पूर्ण मुक्ति प्राप्त होईल, असा धर्मोपदेश मी आतां करणार आहे. " त्यानंतर त्यास सावधान होण्यास सांगून व आपल्या अंगीकृत कार्यांस हा क्षण सर्वतोपरी इष्ट आहे असें जाणून, त्यानें आपल्या धर्मव्याख्यानास प्रारंभ करून पहिलें व्याख्यान संपविलें. त्यांत मुख्यत: असें प्रतिपादन केलें कीं, " सर्व संगपरित्याग करून संन्यास घेणाऱ्यांनीं, आत्यं-तिक विषयोपभोग व आत्यंतिक तपाचरण हीं दोन टोकें वर्ज्य करून त्यांचा सुवर्णमध्य साधला पाहिजे; आणि हाच निर्वाण-



प्राप्तीचा मार्ग शोधून काढला आहे. हा मार्ग म्हणजेच प्रसिद्ध ' अष्टांगिक मार्ग ' होय. (१ शुद्ध मतें, २ शु. वि .ार, ३ शु. वाणी, ४ शु. आचार, ५ शु. जीवन, ६ शु. तपाचरण, ७ शु. स्मृति, ८ शु. ध्यानसाधन, ) तदनंतर या खालील चार **आर्यसत्यांनी** निरुपण केलें:–१ दु:ख, २ दु:खाचें मूळ, ३ दु:खाचा नाश, व ४ त्या नाशाचा मार्ग. हें निरुपण चालू असतां कौण्डिण्य यांस दिव्यदृष्टि प्राप्त झाली, व ज्याला आदि आहे त्याला अंत हा ठेवलेलाच आहे हें तत्व त्याचे मनांवर पूर्णपणें बिंबलें; त्या योगें त्यानें निर्वाण प्राप्तीच्या मार्गांतील प्रथमावस्था ओलांडली व त्यांस तात्काळ धर्मदीक्षाही दिली गेली. दुसरे दिवशीं बप्प ( वाष्प ) व नंतर तीन दिवस अनुक्रमें, **भद्दिय** ( भद्रिक ) **महानामन्**, व **अस्साजि** ( अश्वचित् ) ह्या सर्वांना दिक्षा दिली. पाचवे दिवशीं ' अनत्तलखन ( सुत्तंत) अंत:सृष्टि व बाह्यसृष्टि कशी आहे हें त्यांना विस्तरश: निरुपण केलें; तेणेंकरून त्यांच्या सर्व पापांचें क्षालन होऊन ते अर्हत झाले.

त्याकाळीं बनारस येथें ' यशस् ' म्हणून एक तरुण साव-कारपुत्र राहात असे. ज्याप्रमाणें बुद्धानें गृहत्याग करण्यापूर्वी निद्रित नृत्यांगनांचा तांडा अवलोकन केला होता तसाच ह्या सावकार पुत्रानेंही केला व त्याचीही बुद्धाप्रमाणेंच अवस्था झाली. त्यानें घर सोडून थेट मृगवनाचा रस्ता धरला. तथागताची त्याच्यावर दृष्टि जातांच, ह्याचे अंगीं पूर्ण वैराग्य बाणलें आहे असें

दिव्यदृष्टीनें जाणून त्यानें त्याचा पहिले दिवशींच ( निर्वाणाचे ) प्रथमावस्थेंत प्रवेश करवून दुसरे दिवशीं अर्हत पदावर त्यास अधिष्ठित केलें. त्याचे मागून त्याची बायको, आईबाप व चोपन्न मित्र इतक्या सर्वांना अर्हतपदाची प्राप्ति करवून दिली.

पावसाळा संपतांच ह्या साठ शिष्यवरांना धर्म प्रसाराकरितां ठिकठिकाणीं रवाना केले, व स्वत: तथागताची स्वारी उरुवेला येथें येऊन राहिली. मार्गांत फिरून माराशीं एकवार सामना झाला व नंतर भद्दवग्गीयस् यांना दीक्षा दिली. त्यावेळीं तेथें उरु-वेल, कस्सप, नदी-कस्सप व गया-कस्सप ह्या नावांचे अग्नि-पूजक जटाजूटधारी ( जटिलस् ) बंधुत्रय वास्तव्य करीत होते; अनेक अद्भुत चमत्कार दाखवून तथागतानें आपल्या दैवी सामर्थ्याबद्दल त्यांची खात्री केली, आणि त्यांच्या सर्व शिष्य-गणांसह त्यांना धर्मदीक्षा दिली. त्यानंतर सर्वांना घेऊन गया-शीर्ष पर्वतावर जाऊन दहन ( आदित्तपरियाय ) या विषयावर व्याख्यान दिलें. व सर्वांची अर्हतपदांवर स्थापना केली. तेथें कांहीं काल वास्तव्य करून सुपत्तिठ्ठ मंदिरांत ( राजगृहा जवळ लठ्ठिवन ) सर्व शिष्यासह प्रयाण केलें; कारण बिम्बिसार राजाला दिलेलें वचन पुरें करावयाचें होतें. राजाचे कानांवर हें वर्तमान जातांच सर्व ब्रह्मवृंदांस घेऊन तो त्या महापुरुषाचें स्वागतार्थ गेला व दर्शन होतांच चक्रचिन्हांकित व तेज:पुंज त्या तथाग-ताच्या पदकमलावर आपलें मस्तक ठेवलें. हें पाहतांच सर्व



ब्राह्मण बुचकळ्यांत पडले; त्यांना शंका आली कीं ह्या श्रमण उरुवेला काश्यपाचा शिष्य कीं गुरू ? हीं परिस्थिति अंतर्ज्ञा-नानें जाणून तथागतानें त्या स्थविरालाच आपल्या शिष्यत्वाची साक्ष देण्यास पुढें बोलाविलें. लागलींच काश्यप पुढें होऊन, आपण आपल्या अग्निपूजेचा त्याग केल्याचे सांगून उच्चस्वरानें म्हणाला, " भगवान् बुद्ध हे माझे सद्गुरु व मी त्यांचा शिष्य." असें म्हणून तो एकदम अंतराळांत उड्डाण करून गेला आणि त्या चमत्कारानें जमलेल्या जनसमूहाची खात्री पटविली कीं आपण तथागतांस शरण गेलों आहोंत. त्यावर तथागत म्हणाला, ह्या जन्मांतच नव्हे तर सर्व पूर्वजन्मांतही सर्वदा काश्यप मला शरण आलेला आहे. " त्यानंतर तेथेंच त्यानें प्रसिद्ध 'महानारद कस्सप जातक ' सांगितलें, व शेवटीं चार आर्यसत्यांचें निरुपण करुन आपले धार्मिक व्याख्यान संपविलें. अखेर राजासह जम-लेल्या सर्व समाजाचा ' निर्वाणा'च्या प्रथमावस्थेंत प्रवेश करवून त्यांना धर्म दीक्षा देऊन दुसरेंच दिवशीं अर्हतपदावर त्यांची स्थापना केली. तेथून प्रयाण करण्यापूर्वी राजानें तथागतास दुसरे दिवशीं भोजनास आमंत्रण दिलें. त्याप्रमाणें दुसरें दिवशीं सकाळीं राजगृहांत प्रवेश करतांच ब्रह्मरूप घेऊन प्रत्यक्ष शक्रच त्यास सामोरा आला आणि बुद्धधर्म, बुद्धसांप्रदाय व स्वत: भगवान् बुद्ध ह्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागला. अतिथीचें यथोचित स्वागत करून राजानें तथागतांचे ( संघाचा मुख्य ) हातांवर वेणुवनाचें

उदक सोडलें; बुद्धानें आनंदानें त्या दानाचा स्वीकार केला व सर्व ' संघास ' घेऊन वेणुवनांत वास्तव्य करण्यास निघून गेला.

त्यावेळीं राजगृहांत ' संजय ' नांवाचा एक भटकणारा भिन्नमताचा विधर्मी योगी ( परिव्राजक ) राहात होता. त्याच्या शिष्यगणांत सारिपुत्र व मौदगल्ल्यायन म्हणून दोघे होते. एके दिवशीं प्रात:काळीं अश्वजित हा नित्यक्रमाप्रमाणें भीक्षा मागत असतां सारिपुत्राचे नजरेस पडला. त्याचा वेष अवलोकन करून सारिपुत्रानें त्यास त्याच्या गुरुचें नांव विचारलें. शाक्यवंशीय एक महान् श्रमण आपला गुरू असल्याचें त्यानें सांगितलें. पण आपल्या धर्मतत्वाचें त्यांस विस्तरश: निरूपण न करतां आल्यामुळें त्यानें त्याचें ( धर्माचें ) सार थोडक्यांत असें सांगितलें कीं, " ज्या कोणत्याही कार्याला कारण म्हणून आहे तें सर्व कारण तथागतानें सांगितलें आहे आणि त्या कारणाचा मोक्षमार्गही त्यानें ( तथागतानें ) दाखविला आहे. " हें श्रवण करतांच सारिपुत्रानें निर्वाणाच्या प्रथमावस्थेंत प्रवेश केला आणि ते सर्व त्यानें मौदगल्ल्यायनास सांगतांच त्याचीही तीच स्थिति झाली. त्यानंतर त्या शिष्यद्वयांनीं आपल्या गुरूचा त्याग केला; आणि उभयतां एक आठवड्यांत पंधरा दिवसांत अनुक्रमें अर्हत स्थितीला पोंहचले. तथागतानेंही आपले शिष्यश्रेष्ठ अशी त्यांना पदवी दिली.

---

## प्रकरण ५ वें

### राजगृहास पुनरागमन.

त्या रम्य वेणुवनांत भगवान् बुद्ध व त्याचे अनुयायी ह्यांचा धार्मिक चर्चेत काल व्यतीत होऊं लागला. नितांत शांतता, निसर्ग सौंदर्याचें अखंड साहचर्य, अतिशय निष्ठावान् अनुयायीवर्ग व प्रत्यक्ष भगवान् बुद्धासारखा धर्मोपदेशक, अशी सामुग्री जमल्यावर आणखी काय हवें होतें ? पण ह्या कर्मभूमींतील जीवन कोणासच इतकें स्वास्थ्य दीर्घकालपर्यंत उपभोगूं देणें शक्य नव्हतें; मग स्वत: भगवान् बुद्ध झाले म्हणून काय झालें ? शुद्धोदन राजाचे कानांवर ही बातमी जातांच त्यानें लागलींच मोठा लवाजमा देऊन एका सरदाराची रवानगी केली आणि त्याला आपल्या पुत्रास कपिलवस्तूस परत आणावयास सांगितलें. राजाज्ञेप्रमाणें तो सरदार त्या वेणुवनांत येऊन दाखल झाला. पण तेथें येऊन पाहतात तों त्यांचे दृष्टीस काय पडलें ? " धर्मानुयायांचा तो प्रचंड श्रोतृवर्ग एखाद्या चित्राप्रमाणें तटस्थ राहून त्या धीरगंभीर व दिव्य वाणींतून बाहेर पडणाऱ्या धर्मामृताचें आकण्ठ पान करीत आहे आणि त्यामुळें त्या श्रोतृसागराला तन्मयतेची जणुं भरतीच आली आहे " असा देखावा त्यांचे दृष्टीस पडला; त्याबरोबर आपलें उद्दिष्ट कार्य विसरून जाऊन सरदारा-

सह त्या सर्व राजदूतांनीं धर्मदीक्षा घेऊन अरहत् पदाची प्राप्ति करुन घेतली. इकडे राजा त्या सर्वांची वाट पाहातच होता. त्यास घडलेला वृत्तान्त समजतांच आणखी असेच अनेक सरदार रवाना केले, पण सर्वांची स्थिति तीच ! शेवटीं हें काम करण्याचें उदायिन् यानें आपलें अंगावर घेतलें. सिद्धार्थाचा जन्म झाला त्याच दिवशीं ह्याचाही पण जन्म झाला होता. पण उदायिन यानेंही अशी अट घातली कीं आपणासही भिक्षू होण्याची परवानगी मिळाली पाहिजे. राजानें त्याची ती मागणी मान्य करतांच तो निघाला तो थेट राजगृहाकडे गेला, आणि भगवान बुद्धाचें धर्मप्रवचन श्रवण करून अरहत पदाप्रत गेला. उदायिन येऊन पोंहोंचला तेव्हां बुद्धदेवास बनारस सोडूनही पांच महिने झाले होते, व तो आल्यावर एका आठवड्यानंतर हिंवाळा संपला. मग फाल्गुनी पौर्णिमेला त्या राजदूताचे मनांत विचार आला कीं भगवानास कपिलवस्तूस घेऊन जाण्यास हा समय इष्ट असाच आहे. त्यानें त्याप्रमाणें गुरूसन्निध जाऊन आपली विनंती सादर केली. आपल्या पित्याची भेटण्याची इच्छा आहे हें समजतांच बुद्धदेवानेंही प्रवासास निघण्याचें आनंदानें कबूल केलें. भिक्षूंचा मोठा संघ बरोबर घेऊन दोन महिन्यांत पितृगृहीं पोंहचण्याच्या बेतानें सर्व मंडळी बाहेर पडली; पण उदायिन् हा योगविद्येनें आधींच राजा जवळ जाऊन पोंहोंचला व त्यानें त्यास त्या महापुरुषाच्या आगमनाची बातमी सांगितली. पुत्रदर्शनाच्या बातमीनें



त्या वृद्ध राजाचा आनंद गगनांत मावेनासा झाला; आणि तो स्वागताची सर्व तयारी करूं लागला. सर्व आप्तवर्ग नगराबाहेर त्याचें स्वागतार्थ गेला; पण अहंकारामुळें त्यांस प्रणिपात करण्यास ते कचरूं लागले. अर्थात् त्या दैवी तेजापुढें त्यांचे कांहीं एक न चालतां त्यांची इच्छा नसतां ही त्यांचीं मस्तकें बुद्धदेवाचे चरणांवर नम्र झालीं. तो चमत्कार पाहून राजानेंही आपल्या पुत्रास तिसऱ्यांदा साष्टांग प्रणिपात केला. त्यानंतर तथागतानें एक चमत्कार करून दाखविला. एकदम आकाश मार्गानें अवतीर्ण होऊन त्यानें पाऊस पाडण्यास सुरुवात केली; आणि आश्चर्य असें कीं, पाऊस पडणें ज्यांना आवडलें त्यांच्याच आंगावर पावसाचें पाणी पडलें, बाकीचे अगदीं कोरडे ठणठणीत राहिले !! लोक आश्चर्यमूढ झालेले पाहून तथागत म्हणाला, माझ्या आप्तवर्गांवर हा असा प्रथमच पाऊस पडत आहे असें मानण्याचें कारण नाहीं; पूर्वजन्मींही असेंच घडलें होतें." त्या प्रसंगीं त्यानें ' विश्वंतर जातक ' सांगितलें. दुसरें दिवशीं पहाटे नित्यक्रमाप्रमाणें त्याची स्वारी भिक्षाटनार्थ कपिलवस्तूंतून हिंडूं लागली. राहुलचे मातेस हा वृत्तान्त समजला आणि आपल्या प्रियपतीचें दर्शनसुख घेण्याकरतां ती पतिपरायण साध्वी राजवाड्याचे खिडकींत येऊन उभी राहिली. राजपुत्राचे वेषापेक्षां तो भिक्षूचा साधा वेषच त्यास अधिक भूषवीत होता अशी तिची खात्री पटली. तिनें त्या नरशार्दुलाची स्तुतिस्तोत्रें गाण्यास प्रारंभ

केला आणि ही सर्व हकीकत राजास विदित केली. राजा तसाच आपल्या पुत्राचे भेटीस गेला आणि यतिवेष धारण करून प्रत्यक्ष आपल्या राजधानींत अशी भीक्षा मागत हिंडणें राजपुत्राचे धर्मास अनुचित होय, असें सांगून त्यांस भीक्षावृत्ति पासून पराङ्मुख करूं लागला. पण ' मागावें हें अन्न तरि भिक्षा थोर ' अशी स्थिति असल्यामुळें, " हें विश्वाचि माझें घर " अशी ज्याची तन्मय वृत्ति झालेली, त्या तथागताच्या मनावर अशा उपदेशाचा काय परिणाम होणार ? राजासही हें समजत नव्हतें असें नाहीं. पण पुत्रप्रेम आड येत होतें त्याला तो तरी काय करणार ? तथागतानेंही आपल्या यतिवेषास व पुत्रधर्मास साजेसेंच उत्तर दिलें; कारण त्याची वैराग्यवृत्ति ही आजकालच्या कित्येक नामधारी साधूप्रमाणें फक्त लोकांना उपदेशण्यापुरतीच नसून त्याच्या रोमरोमांत भिनून गेली होती. तथागत उत्तरला, " हे राजा ! तुझी परंपरा राजांची आहे हें खरें ! पण माझी परंपरा बुद्धांची आहे हेंही तितकेंच खरें ! आणि दीपंकरापासून काश्यपापर्यंत सर्व बुद्धांनींही भीक्षेवरच उदरनिर्वाह केला आहे." इतकें म्हणून त्यानें एक दिव्य श्लोक म्हणून दाखवला; तो ऐकतांच राजाचा निर्वाणाच्या प्रथमावस्थेंत प्रवेश झाला; मग लवकरच त्यास धर्मपाल जातक ऐकविलें आणि शेवटीं अरहत पदांवर त्याची स्थापना केली.

प्रथमावस्थेंत दीक्षा घेतल्यावर राजानें सर्व भिक्षूसह राजवाड्यांत भोजन केलें; भोजनोत्तर सर्व स्त्रियांनीं येऊन तथागतास



साष्टांग प्रणिपात केला. पण त्या समुदायांत राहुलची माता यशोधरा ही न दिसल्यामुळें, तथागताची स्वारी सारिपुत्र व मौद्गल्यायन यांस बरोबर घेऊन तिच्या मंदिराकडे गेला. आपणास ज्ञानप्राप्ति होऊन आणि इतक्या प्रचंड शिष्यवर्गास त्या ज्ञानाचा फायदा देऊन आपल्या पूर्वाश्रमींच्या सहधर्मचारिणीस अज्ञान तिमिरांत ठेवणें त्यास इष्ट वाटेना. यशोधरेनें तथागतास पाहतांच त्याच्यापुढें लोटांगण घातलें. मग शुद्धोदनानें तिची स्तुति करून तिचें पातिव्रत्य किती कडक होतें हें सांगितलें. तेव्हां तथागत म्हणाला, " ह्यांत आश्चर्य असें कांहींच नाहीं; पूर्वजन्मींही तिला असेंच करावें लागलें होतें " त्यानंतर त्यानें ' कंद-किन्नर जातक ' सांगितलें.

दुसरे दिवशीं बुद्धाचा सापत्नबंधु नंद यास युवराजाची वस्त्रें मिळून ' जनपदकल्याणी ' ( भूमीचें सौंदर्य ) बरोबर त्याचा विवाह होण्याचें निश्चित झालें होतें. पण तथागतानें त्यास धरून रानांत नेलें. आणि त्याचे इच्छेविरुद्ध त्यास धर्मदीक्षा दिली. बिचारी नवरी मुलगी प्रियकराची वाट पाहातच होती ? पण भवितव्यता ही अशी होती ! !

सातवे दिवशी बुद्धाची स्वारी राजवाड्यांत येत आहे असें पाहून राहुलमाता आपल्या पुत्रास म्हणाली, " ते पाहा, तुझे वडीलच इकडे येत आहेत. त्यांचे जवळ आपल्या पितृधनाची मागणी कर. " मुलाला काय ? आईनें सांगण्याचाच अवकाश !

लागलींच धांवत जाऊन वडिलांस म्हणाला, " अहो स्वामी महाराज, माझें पितृधन मला पाहिजे. देतां कीं नाहीं ? " त्या अज्ञ बालकास काय कल्पना कीं आपल्या पित्याची वृत्ति लक्ष्मीस मृत्तिकेसमान मानण्याची झाली आहे. तथागतानें मुलाचे ते बोल ऐकून आपली आध्यात्मिक संपत्ति त्यास देण्याचें ठरविलें, आणि त्या प्रमाणें सारिपुत्रास सांगितलें. गुरूंच्या आज्ञेप्रमाणें सारिपुत्रानें त्यास दीक्षा दिली ( सामणेर पव्वज्जा ). शुद्धोदनास ही बातमी समजल्यावर फार वाईट वाटलें आणि अज्ञ मुलास पालकांच्या इच्छेविरुद्ध दीक्षा देणें अयोग्य होय, असें त्यानें त्यास सांगितलें; व इत:पर तरी बुद्धसांप्रदायांत अशी गोष्ट घडणार नाहीं असें तथागतापासून आश्वासन मागून घेतलें. इतका सर्व कार्यक्रम आटोपून तथागताची स्वारी मातृभूमीहून निघून राजगृहाजवळील ' **सीतवनांत** ' येऊन राहूं लागली. मार्गांतील मुक्कामांतही पुष्कळांना दीक्षा दिली गेली; त्यांत प्रमुखपणें, अनुरूद्ध, भगु, किंबल, आनंद, देवदत्त वगैरेचा उल्लेख केला असतां पुरें होईल. पुढें सीतवनांत राहात असतां सुदत्त **अनाथपिण्डिक** या नांवाचा एक धनिक व्यापारी श्रावस्तीहून तेथें आला. तेथील बुद्ध देवाची धर्मप्रवचनें ऐकून त्यानेंही धर्मदीक्षा घेतली; आणि बुद्ध संघास मोठी देणगी देऊन आमच्या गांवीं येण्यास आमंत्रण दिलें. आपल्या धर्म संस्थपकाचें योग्य प्रकारें स्वागत करण्याकरतां अनाथ पिण्डिकानें जेत राजापासून ' जेतवन ' फार



भारी किंमत देऊन खरेदी केलें; आणि तेथें एक भव्य विहार उभारला, त्या विहारांत तथागताकरतां मध्यभागीं एक मोठी खोली ठेवून भोंवतालीं बऱ्याचशा खोल्या उभारल्या होत्या. बुद्धाची स्वारी तेथें आल्यावर त्यानें बुद्ध संघाकरतां म्हणून त्या विहाराचें उदक त्या धर्मगुरूचे हातांवर सोडलें. त्याचप्रमाणें ' **पूर्णवर्धन** ' या धनिक व्यापाऱ्याची पत्नि विशाखा हिनें एक विस्तीर्ण विहार बांधवून दिला, व आपला श्वशुर ' मिगार ' यांस धर्मदीक्षा देण्यांतही तिनें तथागतास मदत केली; त्यामुळें तिचें नाव ' मिगारमाता ' असें त्यानें ठेवलें.

# प्रकरण ६ वें.

## स्त्रियांचा भिक्षुसंघांत प्रवेश.

वेणुवनांत तथागत वास्तव्य करीत असतां **वैशाली** नगरींतें एक सर्वांगसुंदर वेश्या राहात होती. तिचें नांव **आम्रपाली** असें होतें. बिम्बिसार राजास त्या नगरींचा हेवा वाटून, आपल्या राजगृहांत सुद्धां अशी एक अत्यंत रूपसंपन्न वेश्या निर्माण करावी असा त्यानें निश्चय केला. राजांची लहर ! निश्चय होतांच त्याच्या अंमलबजावणीसही सुरवात ताबडतोब झाली. ' सालवती ' नांवाची एक रूपसंपन्न मुलगी या कामासाठीं त्यानें हुडकून काढली. व पुढें कांहीं कालानें राजपुत्र अभय याजपासून या मुलीला एक पुत्र झाला. राजानें त्यास राजवाड्यांत नेले व त्याचें नांव ' जीवक ' असें ठेवलें, आणि त्याचें सर्व शिक्षण आपले देखरेखी खालीं सुरू केलें. मोठा झाल्यावर त्यास तक्षशिला येथील एका विद्वान वैद्याजवळ वैद्यकी शिक्षणाकरतां ठेवण्यांत आलें. सात वर्षें तेथें अध्ययन करून जीवक आपल्या विद्येंत पूर्ण निष्णांत झाला आणि बिम्बिसार याचे जवळ राजवैद्य म्हणून राहिला. बुद्धदेवास एकदां अग्निमांद्य झालें असतां त्यानें अतिशय उत्तम औषधाची योजना करून रोग ताबडतोब हटविला. प्रद्योत राजापासून मिळालेलीं दोन महावस्त्रेंही त्यानें बुद्धास अर्पण केलीं.



जीवकाचे भेटीनंतर कांहीं दिवसांनीं वैशालीच्या नागरीकांनीं बुद्धदेवाजवळ एक शिष्टमंडळ पाठविलें. गांवांत एक भयंकर प्राणघातक सांथ फैलावली होती. त्या साथीपासून बचाव करण्याकरतां हे शिष्टमंडळ आलें होतें. त्यांच्या विनंतीस मान देऊन बुद्धाची स्वारी गंगानदीच्या दक्षिण तीरावर येऊन दाखल झाली. तत्क्षणीं लोकांना असा चमत्कार दृष्टीस पडला कीं, बुद्धाचे पाय त्या प्रदेशास लागतात तोंच सांथ पसरविणारीं महाभूतें पार निघून गेलीं, आणि सर्व लोक पूर्ण रोगमुक्त झाले. त्या नंतर शहरांत येऊन ' रतनसुत्त ' म्हणून लोकांना त्यानें उपदेशिलें आणि पुष्कळांना धर्मदीक्षा दिली.

मध्यंतरीं कांहीं काळांत ' शाक्य व कोळिय ' ह्या लोकांत **रोहिणी नदीच्या** पाण्याबद्दल तंटा सुरू झाला; कारण अवर्षणामुळें नदीचें पाणी भोंवतालच्या शेतीस पुरेनासें झालें. तंटा विकोपास जाऊन प्रकरण हातघाईवर आलें, व युद्धाची जय्यत तयारी झाली. पण अशाप्रकारें भांडण होऊन व्यर्थ प्राणहानि व्हावी ही गोष्ट त्या अहिंसेच्या पित्याला अर्थात् अयोग्य वाटली. त्यानें तेथें येऊन समेट घडवून आणला आणि सर्वांस धर्मोपदेश करून पुष्कळ अनुयायी संघांत सामील करून घेतले.

पुढें कांहीं दिवसांनीं पिताश्री शुद्धोदन मरणोन्मुख झाला आहे अशी वार्ता बुद्धदेवास समजली. एक क्षणाचाही विलंब न करतां कांहीं अनुयायी घेऊन तो कपिलवस्तूस येऊन पोह-

चला. तेथें आल्यावर विश्वाचे अशाश्वतेबद्दल पित्याला बोध केला आणि तेणेंकरून त्याची निर्वाणपदावर स्थापना केली. शेवटीं निसर्गनियमाप्रमाणें राजा कालवश झाला. पतिनिधनानंतर गौतमीस संसार त्याग करून धर्मदीक्षा घेण्याची इच्छा झाली. बुद्धाकडे जाऊन तिनें आपली मनीषा त्यास व्यक्त केली. पण स्त्रियांना भिक्षुसंघांत घ्यावयाचें नाहीं असा त्याचा निर्धार असल्यामुळें त्यानें अर्थात् तसें करण्याचें नाकारलें. परंतु गौतमी निराश न होतां तिनें पुष्कळ स्त्रिया गोळा केल्या आणि सर्वांनीं केशवपन करून पीतवस्त्र परिधान केलें, व वैशालीस प्रयाण केलें. सर्व प्रवास पायानें करावयाचा असल्यामुळें त्या स्त्रिया तेथें येऊन पोंहोंचल्या खऱ्या, पण सर्व अगदीं थकून म्लानवदन झालेल्या, सर्वांग व कपडे धुळीनें माखलेले, चालण्याच्या श्रमानें पाय सुजून गेलेले आणि ह्या सर्व परिस्थितीमुळें डोळे पाण्यांनीं भरून आलेले अशा स्थितींत त्या तेथें येऊन पोंहचल्या ? तो देखावा शिष्यवर आनंद यांचे दृष्टीस पडतांच त्यास फार वाईट वाटलें. ‘ कूटागार ’ विहारांत आनंदाची त्यांची भेट झाली. अशा तऱ्हेनें येण्याचें कारण विचारतांच बुद्धसंघांत सामील होण्याची आपली मनीषा त्या स्त्रियांनीं व्यक्त केली. आनंद तसाच गुरुजीकडे गेला आणि त्यानें त्यांची बरीच शिफारस केली. बुद्धाची प्रथम इच्छा नव्हतीच; पण गौतमीनें बालपणीं आपणांकरतां किती हाल सोसले असतील हें जेव्हां आनंद वर्णन करून सांगूं



लागला, तेव्हां त्या महापुरुषाचेंही मन द्रवलें आणि त्यानें त्याचें विनंतीस रुकार दिला. मात्र आठ कडक नियम ( गरुधम्म ) पाळण्याबद्दल त्या सर्वांकडून वचन घेतलें. धर्मपंथाचे शाश्वतीचे दृष्टीनें आपण केलें हें अयोग्यच झालें अशी मात्र त्याची पक्की खात्री होऊन चुकली. कारण तो आनंदास म्हणाला, कीं– “ स्त्रियांचा प्रवेश झाला नसता तर माझा धर्मपंथ १००० वर्षें तरी टिकला असता, पण आतां मात्र त्याचें मरण ५०० वर्षें अलीकडे ओढवलें खरें ? ” बुद्ध धर्माचा पुढील इतिहास व त्याचा ऱ्हास होण्याचीं कारणें पाहिलीं असतां बुद्धाची ही भविष्यवाणी खोटी नव्हती असेंच सिद्ध होतें. ॥ बलवानिन्द्रियग्रामो- विद्वांसमपिकर्षति ॥ हेंच खरें ! पण आमच्या आजकालच्या साधूंच्या भोंवतीं स्त्रियांचा अष्टौप्रहर खडा पाहारा असला तरी त्या ‘ साधू ’ बद्दल मात्र कोणी थोडीशी शंका घेतली कीं ब्रह्महत्येचें पातक ! लागलींच ‘ नास्तिक, इंग्रजी शिकलेला ’ अशा शेलक्या शब्दांनीं त्याची संभावना व्हावयाचीच ! भोळे बिचारे भाविक लोक ! इतिहासाच्या अशा धड्यापासून थोडा तरी बोध घेतील तर किती तरी अनर्थ थांबतील.

वैशालीस हा सर्व वृत्तान्त घडल्यानंतर तथागताची स्वारी श्रावस्तीस जाण्यास निघाली. आणि तेथेंच सहावा पावसाळा मुक्काम केला त्यानंतर तेथून त्यांनीं राजगृहाकडे प्रयाण केले. तेव्हांच वेणुवनांत वास्तव्य करीत असतां बिम्बिसार खेमा

इला दीक्षा दिली. ती हकीकत मात्र फार मनोरंजक व चमत्कार परिपूर्ण आहे. खेमा ही त्रिभुवन सुंदरी म्हणून प्रसिद्ध होती आणि त्या अलौकिक सौंदर्यानें फुगल्यामुळें तिनें बुद्धाच्या वेणुवनाकडे कधीं ढुंकूनही पाहिलें नव्हतें. अशा स्थितींत वेणुवनाचे आसपास एकदां ती मजेनें फिरत असतां राजानें मोठ्या युक्तीनें बुद्ध राहात होता त्या बाजूस तिला आणविलें. तिचा गर्व हरण करण्याकरितां बुद्धानें तिला एक अद्भुत चमत्कार करून दाखविला: आपल्या दैवी सामर्थ्यानें त्यानें खेमाहूनही अधिक रुपयौवन संपन्न अशी अप्सरा तेथें तिच्या समोर निर्माण केली; खेमा तिला पाहून थक्कच झाली. त्या अप्सरेवर तिची दृष्टि खिळली असतां त्यानें त्या अप्सरेच्या, बाल्य, तारुण्य, वृद्धत्व व मृत्यू अशा चार अवस्था तेथेंच तिला दाखविल्या. तो सर्व प्रकार पाहून खेमा शुद्धीवर आली, तिच्या गर्वाचा परिहार झाला आणि बुद्धाचा उपदेश ऐकण्याबद्दल ती आतुर झाली. त्यानंतर बुद्धानेंही तिला योग्य तो उपदेश करून क्रमाक्रमानें तिला ‘ अरहत ’ पदाची प्राप्ति करून दिली.

---



# प्रकरण ७ वें

## स्वर्गांत गमन.

बुद्धाच्या कारकीर्दींत साधु लोकांचा फार सुळसुळाट होता. अशा स्थितींत सुष्टांपेक्षां दुष्ट लोकांचाच साधुसांप्रदायांत फार भरणा असणार हें उघडच होय. अर्थांत अशा केवळ पोटभरू साधूंना खऱ्या वैराग्यशील साधूंचा हेवा करणें साहजिकच होतें; आणि तीच गोष्ट बुद्धाचे बाबतींतही घडून आली. संजय, अजित, वगैरे ६ भिन्नपंथी साधूंची गणनाही अशांतच केली पाहिजे. ह्या लोकांचा अनुयायी वर्गही कांहीं लहान नव्हता आणि त्यांचे सहायानें बुद्धास नानाप्रकारें त्यांनीं त्रास दिला. आपल्या दिव्य सामर्थ्याची लोकांना साक्ष पटवून देऊन त्यानें त्यांची अनेक वेळा फजीती केली, आणि मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या सांथीचा रोग नाहींसा करण्याच्या प्रकारानें तर त्यांचीं तोंडें कायमचींच बंद केलीं होतीं. वेळ प्रसंग पडेल तेव्हां आणि जरूर तितक्याच कारणाकरतां जरी बुद्ध ह्याप्रमाणे चमत्कार दाखवून लोकांची मतें आपल्या धर्मास अनुकूल करून घेत असे, तरी हे चमत्कार फारसे कोणी करूं नयेत असेंच एकंदरींत त्याचें धोरण होतें; आणि आपल्या अनुयायांस तर त्यानें तशी ताकीदही देऊन ठेविली होती. अर्थांत ह्याचें कारणही पण उघड होतें. चमत्कार

करण्याची व पाहण्याची लोकसमाजास एकदां चटक लागली म्हणजे खऱ्या धर्मसाधनापासून समाज तेव्हांच विन्मुख होईल हें तो पूर्ण जाणून होता. धर्मसंस्थापना करून संघशक्ति वाढविणें हें बिकट कार्य त्यास करावयाचें असल्यामुळें त्याला स्वत: मात्र तो मार्ग अनुसरावा लागला हें खरें; आणि पुढील इतिहासावरून त्याच्या अतुल संघटनाचातुर्याची कल्पना केल्यास त्यानें केलें, तें सर्वतोपरी इष्टच होतें यांत शंका नाहीं. प्रस्तुत प्रकरणांत अशाच कांहीं प्रकारचे चमत्कार त्यानें करून दाखविले असें आपणास दिसून येणार आहे.

राजगृहाजवळ राहात असतां तेथील एका लहरी धनिक व्यापाऱ्याचे मनांत असें आलें कीं, ह्या साधु वर्गाच्या सामर्थ्याची परीक्षा घ्यावी. आपला हेतु साधण्यासाठीं त्यानें एक विचित्र मार्ग अवलंबिला. एक चंदनाच्या लाकडाचा ठोकळा त्यांस सांपडला. त्याचें त्यानें एक भिक्षापात्र कोरवून घेतलें आणि तें एका तराजूंत घालून तो तराजू कळकावर कळक बांधून पुष्कळ उंच केला. त्यानंतर जमलेल्या साधुसमुदायास तो म्हणाला, "तुमच्यांत जर कोणी खरा श्रमण अथवा ब्राह्मण असेल तर त्यानें आपल्या अतुल सामर्थ्यानें तें भिक्षापात्र काढून घ्यावें." परंतु तसें करण्यास कोणाची हिंमत चालली नाहीं. संजयादि सहा साधूंनीं त्याला तें तसेंच देण्यास सांगितलें; पण तें त्यानें नाकारलें. अशी परिस्थिति पाहून बुद्धशिष्य



मौद्गल्यायन व पिण्डोल भारद्वाज ह्यांच्यामध्यें थोडी कुजबुज होऊन पिण्डोलानें तें भिक्षापात्र घेऊन यावें असें ठरलें. तावडतोब त्यानें अंतराळांत योगबलानें उड्डाण केलें आणि तें भिक्षापात्र हातांत घेऊन शहराभोंवतीं ( हवेंतून ) त्यानें तीन प्रदक्षिणा घातल्या. ह्या अतुल सामर्थ्यप्रदर्शनानें जमलेला सर्व समाज बुद्धाचा आणि बुद्धधर्माचा जयजयकार करूं लागला. पण हा सर्व वृत्तान्त जेव्हां बुद्धदेवाचे कानावर गेला तेव्हां त्यांस वाईट वाटलें. त्या बाबतींत पिण्डोलाची तर त्यानें थोडीशी कान-उघाडणीही केली; आणि असें समजावून सांगितलें कीं, अशा मार्गानें नवीन लोक धर्मदीक्षा घेतील अशी आशा करणें जसें व्यर्थ, तसेंच दीक्षा घेतलेल्या लोकांचेंही त्यायोगें कांहीं कल्याण होईल असें समजणेंही मूर्खपणाचें होईल. इतकें सांगून ह्यापुढें आपल्या शिष्यापैकीं कोणीही अशा भानगडींत पडूं नये म्हणून त्यानें सर्वांना बजावून सांगितलें. अर्थात् बुद्धदेव स्वत: तर ह्या नियमाला अपवाद होता हें खरेंच; पण अनुयायांनाही विशिष्ट प्रसंगीं तसें वागण्याची मोकळीक होती. कारण लवकरच पुढें त्यांनीं बरेच चमत्कार करून दाखविल्याचें इतिहासांत नमूद केलें आहे.

बिम्बिसार राजाच्या दरबारांत बुद्धापुढें आपला कांहींच टिकाव लागत नाहीं असें जाणून, वरील संजयादि प्रसेनजिता-कडे श्रावस्ती येथें गेले. बुद्धास अंतर्ज्ञानानें हें सर्व समजलें आणि त्याच ठिकाणीं ( श्रावस्ती येथें ) पूर्वींच्या बुद्धांनींही आपलें

सामर्थ्य प्रकट केलें होतें हें ध्यानांत येऊन त्यानेंही तिकडेंच प्रयाण केलें आणि जेतवनांत आपला मुक्काम ठेवला. कांहीं दिवसानंतर प्रसेनजित, संजयादि व सर्व लोकसमाज यांचें समक्ष चमत्कार प्रदर्शनाचा कार्यक्रम निश्चित करण्यांत आला. त्यावेळीं बुद्धदेवानें आकाश मार्गांत पूर्वपश्चिम असा एक भव्य पंथ निर्माण करून आपला सामर्थ्यप्रभाव दाखविण्यास सुरुवात केली. प्रथम रस्त्यावर जाऊन उभा राहतांच थोडा संधिप्रकाश तेथें दिसूं लागला आणि कांहीं वेळानें सर्व दाही दिशा सुवर्णतेजानें इतक्या तळपूं लागल्या कीं पहाणारांचे डोळेच दिपून गेले. मग त्या उच्चासनावरून तो मानवास धर्मप्रवचन सांगूं लागला. त्या प्रवचनानें ज्यांचें ' श्रोत्रयुग्म ' परिपूत झालें त्यांचे मनांत त्या चार आर्यसत्याबद्दल शंकाच राहिली नाहीं. अतुल दैवी सामर्थ्याचा हा प्रभाव अवलोकन करून संजयादि तर निस्तेज झाले; म्हणूनच बुद्ध उच्चस्वरांत म्हणाला, " सूर्योदय झाला नाहीं तोंपर्यंतच काजव्याचा प्रकाश; पण तो सहस्त्ररश्मि उदयाचलावर येतांच त्या क्षुद्र कीटकांची किंमत ती काय ? " पूरण काश्यपानें त्या सामर्थ्याची व शिकवणुकीची निंदा करून लोकांचीं मनें कलुषित करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत यश येत नाहीं असें पाहून, गळ्याला एक कुंभ अडकवून घेऊन नदींत जाऊन जीव दिला; आणि आपल्या कर्मानेंच 'अवीकि' नांवाच्या अति नीच नरकांत अधोगतीला गेला.



चमत्कार समाप्तीनंतर सर्व बुद्धांनीं स्वर्गांत कांहीं दिवस वास्तव्य करावें असा एक नियमच होता. त्या नियमास अनुसरून भगवान् बुद्धाची स्वारी ३३ देवतांच्या स्वर्गांत येऊन अवतरली. मात्र मृत्युलोकाहून प्रयाण करतांना, आपण परत येईपर्यंत आपली कार्यपरंपरा अखंड राहावी या हेतूनें इहलोकीं त्यानें आपली एक प्रतिकृति निर्माण करून ठेवली होती; आणि तीन महिन्यांनीं बुद्धदेव मृत्युलोकावर अवतरेपर्यंत त्या प्रतिकृतीनें अभिधर्मप्रसार वगैरे सर्व नित्यनैमित्तिक कार्यें यथास्थित पार पाडलीं. स्वर्गलोकीं बुद्धानें आपली माता जी महामाया तिला धर्मोपदेश करून निर्वाणपदप्राप्ति करून दिली. शेवटीं, स्वर्गावरोहणाचा समय समीप येतांच इंद्रानें विश्वकर्म्यास एक तिहेरी शिडी तयार करावयास सांगून, " संकाश्य " नगरींत त्या शिडीचें एक टोक ठेवावयास सांगितलें. त्यानंतर उजवीकडे ब्रह्म व डावीकडे इंद्र आणि मध्यंतरीं तथागताची स्वारी, अशा थाटांत स्वर्गारोहणाचा समारंभ पार पडला. ज्या ठिकाणीं बुद्ध अवतरला तेथें एक भव्य मंदिर उभारण्यांत आलें आणि त्याचें अस्तित्वही अद्याप कायम आहे.

**संकाश्याहून** पुन: बुद्ध जेतवनांत येऊन राहूं लागला. त्याची उत्तरोत्तर वृद्धिंगत होणारी कीर्ति आणि धर्मसांप्रदायाचा प्रसार या त्याच्या भरभराटीमुळें कांहीं लोक बुद्धाचा फार द्वेष व तिरस्कार करूं लागले. अशांत तीर्थिकांची गणना प्रामुख्यानें

केली पाहिजे. सर्व उपाय करून थकल्यामुळें त्यांनीं आतां एक अजब मार्ग शोधून काढला. नैतिक दृष्ट्या बुद्धाचे पवित्र चारित्र्यावर शिंतोडे टाकतां आल्यास आपला कार्यभाग फार सुलभ होईल, अशा समजुतीनें त्यांनीं हा मार्ग अवलंबिला. आपल्याच अनुयायी वर्गांतील चिञ्चामाणविका नांवाच्या एका तरुणीस या कामासाठीं तयार केलें; आणि तिनें बुद्धांशीं आपला शरीरसंबंध असल्याचा बोभाटा करावयाचा; अशा प्रकारचें हें कृष्णकारस्थान होतें, व तें सिद्धीस जावें म्हणून जेतवनांत नित्य जाण्यायेण्यास तिनें प्रारंभ केला. याचा मुख्य उद्देश असा कीं, लोकांचे मनांत कांहीं विपरीत शंका येऊं लागाव्या. त्यानंतर आपण गरोदर आहोंत असें सर्वांस भासविण्यासाठीं पोट वाढल्याचें सोंग घेऊन एके दिवशीं बुद्धाचें धर्मोपदेशपर व्याख्यान चालूं असतां ती त्यांचे समोर जाऊन " तुझ्यामुळें मला ही गरोदर स्थिति प्राप्त झाली आहे, करितां माझ्या प्रसूतीची सर्व व्यवस्था सत्वर करण्याची तुझ्यावर जबाबदारी आहे " असें स्पष्ट म्हणूं लागली. हें पाहून तथागत म्हणाला, " हे भगिनी, तूं म्हणतेस तें खरें किंवा खोटें हें तूं किंवा मी ह्याशिवाय दुसरें कोण कसें जाणूं शकेल ? " हे उद्गार त्याचे मुखावाटे बाहेर पडतात न पडतात तोंच अकस्मात् एका दैवीक चमत्कारानें त्या तिच्या सोंगासंबंधांत लोकांची पूर्ण खात्री पटवून दिली. प्रत्यक्ष इंद्र मूषकरूपांत असलेले चार देवदूत बरोबर घेऊन तेथें प्रकट झाले, व तिनें



पोटावर बांधलेल्या लांकडी ठोकळ्याच्या दोऱ्या त्या मूषकांनीं एकदम तोडल्यामुळें तो ठोकळा धाडकन् तिच्याच पायांवर पडला ! आपल्या भ्रमाचा भोपळा फुटल्यामुळें लोकसमाज अत्यंत प्रक्षुब्ध झाला आहे असें पाहून दुष्ट चिञ्चामाणविका ईनें तेथून पलायन केलें; आणि पळत पळत पुढें जातांच वसुंधरेच्या उदरांतून अग्निज्वाला निघून ती त्या अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडली. आणि अखेर अवीचि नांवाच्या नरकांत अधोगतीला गेली. त्यावेळीं बोधिराजपुत्राचा " कोकनद " राजवाडा नुकताच तयार झाला होता. नूतन राजवाड्याचा उद्घाटन समारंभ भगवान बुद्धाचे हातून करावा अशी इच्छा असल्यामुळें राजपुत्रानें एक विद्वान ब्राह्मण पाठवून बुद्ध व त्याचे अनुयायीवर्गांस राजवाड्यांत भोजनाकरितां आमंत्रण दिलें. बुद्धाची स्वारी येणार असें समजतांच त्याचे स्वागतार्थ शांततादर्शक म्हणून, सर्व प्रासादावर आणि आजूबाजूस शुभ्र वस्त्रें पसरण्यांत यावींत असा हुकूम राजपुत्रानें सोडला. ठरल्याप्रमाणें बुद्धाची स्वारी येऊन पोंहचली. सर्व लवाजम्यासह राजपुत्रानें त्यांचें यथोचित स्वागत केलें. मार्गांवर शुभ्र वस्त्र पसरलेलें पाहतांच बुद्धाची स्वारी थबकली. त्या शुभ्रवस्त्रावर पाय देण्याचें त्याच्या जिवावर आलें. मग त्यानें आनंदाकडे एकवार सूचक दृष्टीनें पाहिलें. तेव्हां आनंद राजपुत्रास म्हणाला, " शुभ्रवस्त्रावर पाय देण्याची तथागताची इच्छा नाहीं. करितां तें सत्वर काढून घेण्याचा हुकूम व्हावा.

वस्त्रासारख्या शुभ्र वस्तूवर पाय देणें म्हणजे निष्ठुर होणें होय, अशीच तथागताची वृत्ति झालेली आहे." त्याप्रमाणें वस्त्रें बाजूला होतांच अनुयायासह तथागताची स्वारी राजवाड्यांत गेली आणि भोजन वगैरे होऊन मग त्यानें जमलेल्या समाजास एक उपदेशपर व्याख्यान ऐकविलें. त्या दिवसापासून त्यानें असा एक कडक नियमच केला कीं, "कोणाही बुद्धानुयायानें वस्त्रावर पाय देऊं नये." त्यानंतर बुद्धानें पुढील मुक्कामाकरितां श्रावस्तीस प्रयाण केलें.

हा नववा मुक्काम **कौशांबी** नगरींतील घोसिताराम उद्यानांत बुद्धानें केला. त्या ठिकाणीं संघांतील अनुयायी वर्गामध्यें फार भांडणतंटे होऊन तें प्रकरण फार विकोपास गेलें. एका भिक्षूचे हातून शिस्तीचें उल्लंघन झालें पण त्यानें तें जाणूनबुजून केलें नव्हतें इतकें मात्र खरें. लागलींच त्याच्याविरुद्ध दुसऱ्या एकानें कागाळी केली; आणि त्याच्यावर उघडउघड आरोप केला. मनुष्य स्वभावास अनुसरून प्रथम त्याचा इनकार करण्यांत आला. कोणी याचा तर कोणी दुसऱ्याचा पक्ष घेऊन कलहाग्नि फारच प्रज्वलित केला. अनुयायांना शांत करण्याचा गुरुजींनीं आपल्याकडून शिकस्तीचा प्रयत्न करून पाहिला पण तो व्यर्थ गेला. त्याशिवाय गुरुजींनीं **कोसलाधिपति दिघीति** याचा पुत्र "**दीघावु**" याची सुंदर गोष्ट सांगून पाहिलें, पण त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. इतकें करूनही कांहीं होत नाहीं



असें पाहून तथागताचें मन त्या सर्वप्रकाराविषयीं अगदीं विटून गेलें. आणि "गाढवापुढें वाचली गीता, आणि रात्रींचा गोंधळ बरा होता." असें जाणून त्यानें त्यांचा त्याग केला; पण जातांना प्रसंगोचित श्लोकबद्ध उपदेश करण्यास मात्र तथागत विसरला नाहीं. तेथून निघाला तों "**बालकलोणकार**" खेड्यांत येऊन राहिला. असें करण्यांत त्याचा हेतु असा कीं, राहिलेलें आयुष्य शांतपणें पूर्ववत् संन्यासधर्मपालनांत तेथेंच घालवावें. मग पूज्यपद भगु याची भेट झाल्यानंतर पूर्वेकडील वेणुकुंजाकडे त्यानें प्रयाण केलें. तेथें अनुरुद्ध, किंबिल व नन्दीय (भिक्षू) सलोख्यानें राहून धर्मपालन करीत होते. तथागताची स्वारी येतांच त्यांना फार आनंद झाला आणि त्यांनीं त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. त्यानंतर त्यांना तेथें एक धर्मोपदेशपर व्याख्यान ऐकवून तो 'पारिलेय्यक' येथें रक्षित बागेंत भद्रसाल वृक्षाच्या छायेंत एकांतवासाचें सुख अनुभविण्याकरतां निघून गेला.

जवळच एक गजराज राहात होता; आपल्या जातिबांधवाकडून बराच उपद्रव झाल्यांमुळें त्यानेंही त्यांचा त्याग करून एकांतवास पत्करला होता. भगवान बुद्धाचें आगमन होतांच त्यानेंही आपलें वास्तव्य जवळच ठेवलें आणि त्या एकांतवासी गजराजास अन्नपाणी वगैरे पुरविण्याचा परिपाठ ठेवला. बुद्धानें त्याची मनःस्थिति पूर्णपणें ओळखून यथोचित श्लोकांत आपली

सहानुभूति व्यक्त केली. तेथून पुनः श्रावस्तीस प्रयाण केलें. दरम्यान **कौशांबी** येथील त्या कलहप्रिय भिक्षूंची गावकऱ्यांनीं चांगलीच संभावना केल्यामुळें त्यांनींही निश्चय केला कीं, श्रावस्तीस जाऊन तथागताकडून सर्व प्रकारचा अखेरचा निर्णय करवून घ्यावयाचा आणि त्याप्रमाणें शेवटीं त्यानेंच उभयपक्षांचें म्हणणें ऐकून घेऊन योग्य निर्णय केला आणि अशाप्रकारें एकदाचा इतक्या विकोपास गेलेल्या अंत:कलहाचा शेवट लागला.

अकरावा मुक्काम राजगृहाजवळच केला. एके दिवशीं ‘ दक्खिणागिरी प्रदेशातील ‘ एकनाला ’ गांवीं असतां भारद्वाज या नांवाचा ब्राह्मण आपल्या शेतांतील मजुरांवर देखरेख करीत असतांना बुद्धास पाहतांच ब्राह्मण म्हणतो; “ हे भिक्षूश्रेष्ठा ! मी जमिनीची मशागत करून बीं, बियाणें, पेरून त्यायोगें प्राप्त होणाऱ्या धान्यसामुग्रीवर आपला उदरनिर्वाह करतों; तूंही असेंच करणें योग्य व उचित होणार नाहीं काय ?” धर्मोपदेश करण्यास हा द्विजवर योग्य आहे असें एकंदर त्याच्या भाषणावरून व चर्येवरून जाणून तथागतानें उत्तर दिलें, “ हें ब्रह्मन् ! आपण म्हणतां त्याप्रमाणें मीही मशागत पेरणी वगैरे करूनच माझी उपजीविका करीत असतों. ” हें अनपेक्षित उत्तर ऐकून ब्राह्मणास अर्थात फार आश्चर्य वाटलें; कारण त्याचा वेष तर सर्व श्रमणाचा होता. शंकानिरसनार्थ ब्राह्मणानें प्रश्न केला, “ हें पूज्यवर गौतमा ! आपणाजवळ नांगर, औत, बैल वगैरे



कांहींच दिसत नाहीं. असें असून शेती करून आपण आपला चरितार्थ चालवितां हें आपलें म्हणणें मी खरें कसें मानावें ?” त्याचें समाधान करण्याकरतां, आपण करीत असलेल्या धर्मप्रसाराच्या कार्यावरून शेतीविषयीं एक सुंदर रूपकात्मक श्लोकबद्ध असें त्यांस उत्तर दिलें. तें ऐकून ब्राह्मण फार संतुष्ट झाला; आणि त्यानें बुद्धाच्या पायांवर मस्तक ठेवून धर्मदीक्षा घेतली.

त्यानंतर बुद्धानें बारावा मुक्काम ‘ **वेरंजा** ’ नगरीजवळ केला. तेथेंही एका ब्राम्हणास दीक्षा दिली. सर्व पावसाळा तेथेंच राहून, तेथून “ **सोरेय्य** ” **तक्षशीला, संकाश्य, कनौज, प्रयाग,** वगैरे करून गंगा उतरून **बनारस** येथें प्रयाण केलें; आणि तेथून **वैशाली** येथें येऊन ‘ कूटागार ’ विहारांत वास्तव्य करण्यास प्रारंभ केला. पुढें तेरावा मुक्काम श्रावस्ती आणि **कालिका** येथें आणि पुढील पावसाळा जेतवनांत राहिला व तेथेंच २० वर्षाच्या राहुलास ‘ उपसंपदा ’ दीक्षा दिली. त्याच वर्षीं कपिलवस्तूसही प्रयाण केलें. तथागत न्यग्रोधवनांत रहात असतां त्याचा सासरा सुप्रबुद्ध यानें एकदां त्याचा मोठा अपमान केला. नित्याप्रमाणें तथागत भिक्षेची फेरी करीत असतां, सुप्रबुद्ध आकण्ठ मदिरापान करून त्याच्या वाटेंत आडवा येऊन उभा राहिला आणि त्यास शिव्याची लाखोली वाहूं लागला. त्या महापुरुषानें एकवार शांतपणें आनंदाकडे पाहिलें आणि

नंतर सुप्रबुद्धास त्याच्या दुष्टकृत्याबद्दल पृथ्वी तुला आठ दिवसांच्या आंत गिळून टाकील " असा शाप दिला. त्या मूर्खास असें वाटलें कीं, आपल्या राजवाड्याच्या मनोऱ्यांत बसून आपण हा शाप सहज निष्फळ करूं शकूं; पण बरोबर आठवें दिवशीं पृथ्वी दुभंग होऊन सुप्रबुद्ध त्यांत गडप झाला, आणि आपल्या पापाचें प्रायश्चित भोगण्याकरतां ' अवींचि ' नरकांत अधोगतीला गेला.

# प्रकरण ८ वें.

## सुंदरीचा खून व अङ्गलोकांस दीक्षा.

कपिलवस्तूहून तथागत जेतवनांतील मठांत राहण्यास परत आला. तेथून **आळवी** येथें जाऊन तेथें लहान मुलें भक्षण करणाऱ्या एका यक्षास जिंकून त्यास धर्मदीक्षा दिली. दोघांची भेट होतांच यक्षानें त्यास प्रथम धमकीच दिली, पण तथागताच्या निरहंकारवृत्तीनें आणि शांतपणानें त्याच्या अंतःकरणांतील कोमल वृत्ति परिपक्व होऊन शेवटीं कांहीं प्रश्नांचीं योग्य उत्तरें मिळाल्यास त्याचे शिष्यत्व पत्करण्यास तो तयार झाला. तथागतानें त्याचें म्हणणें ताबडतोब कबूल केलें आणि त्याच्या सर्व प्रश्नांस समाधानकारक उत्तरें देऊन शेवटीं त्यास त्याच्या विचित्र व अमानुष आयुष्यक्रमापासून भ्रष्ट केलें. ज्या ठिकाणीं हा सर्व प्रकार घडला तेथें एक मठ स्थापण्यांत आला.

**आळवीहून** निघून राजगृहाजवळील वेणुवनांत तथागतानें वास्तव्य करून सतरावा पावसाळा काढला. पुढें सर्व देशभर धार्मिक प्रवचनार्थ हिंडून, व कांहीं दिवस **श्रावस्तीस** मुक्काम करून तथागत परत आळवीस येऊन राहिला. त्यानंतर १८ वा मुक्काम ' **चालिका** ' पर्वतांवर, एकोणिसावा वेणुवनांत आणि

विसावा मुक्काम जेतवनांत केला; व ह्याच ठिकाणीं आनंदास त्यानें आपला उपस्थायिक नेमला. आणि अंगुलीमाल ह्या प्रसिद्ध खुनी दरोडेखोरास धर्मदीक्षा दिली.

जेतवनांत असतांना त्याचे शत्रू तीर्थिक यांनीं त्याची कीर्ति कलंकित करण्याचा आणखी एक प्रयत्न केला. कांहीं मारेकरी तयार करून सुंदरी नांवाच्या दीक्षा घेतलेल्या युवतीचा त्या मारेकऱ्या करवीं वध करविला, आणि तिचें प्रेत मठाजवळील जंगलांत टाकून देण्यास सांगितलें. प्रेत सांपडल्याचा बोभाटा झाला, तेव्हां हा खून गौतमाशिवाय इतर कोणी केला नाहीं अशी ओरड करण्यास तेच तीर्थिक प्रथम पुढें आले; पण त्यांच्या दुर्दैवानें खरा खुनी सांपडला आणि ते विनाकारण तोंडघशीं पडले !

त्याच सुमारास धर्मनिष्ठ अनाथपिण्डिक यांस आपल्या मुलीचें लग्न कर्तव्य होतें. अंगप्रांतांतील आपल्या मित्राचा एक मुलगा वर म्हणून निश्चित केला; पण त्याचें सर्व घराणें दिगंबरपंथी होतें. मुलीची धर्मविषयक मतें तेथें राहून कदाचित् बदलतील ह्या भीतीनें सासरीं जातांना अनाथपिण्डिकानें तिच्याबरोबर बऱ्याच दासी बोळवणीस्तव पाठवून दिल्या. ही तरुणकन्या ऐन तारुण्याच्या मुग्ध मधुश्रीनें जिचें मुखकमल सतेज दिसत होतें अशी सासरीं येतांच सर्व दिगंबर यतींना नमस्कार करावयास तिच्या सासऱ्यानें तिला सांगितलें. नमस्कार



करण्याचें कार्य तर बाजूलाच राहिलें तें राहिलेंच आणि त्याशिवाय वस्त्रहीन अशा त्या नग्न साधूकडे पाहाण्याचें सुद्धां तिनें स्पष्ट नाकारलें. अर्थात अशा असभ्य वर्तनामुळें सासऱ्याच्या नखाची आग मस्तकाला जाऊन त्याच्या सर्व अंगाचा तिळपापडच झाला. पण बुद्ध व बुद्धसंघ ह्याच्या गुणसंकीर्तनानें तिनें आपल्या सासूचें व इतर सर्व स्त्रियांचें मन इतकें अनुकूल करून घेतलें कीं, बुद्धाचा धर्मोपदेश श्रवण करण्याची त्या सर्वांस अनिवार इच्छा उत्पन्न झाली. अङ्गप्रांतांत घडत असलेला हा सर्व वाणेरडा प्रकार बुद्धानें अंतर्ज्ञानानें जाणला; आणि पांचशें भिक्षू बरोबर घेऊन तावडतोब त्या गृहस्थाच्या अंगणांत आकाशमार्गानें बुद्धाची स्वारी तेथें येऊन पोहोंचली. बुद्धाचा हा दिव्य प्रकार पाहतांच सर्वांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्याची दिव्य अमृतवाणी श्रवण करून घरांतील सर्व मंडळींनीं आणि गावांतील सुद्धां बऱ्याच लोकांनीं बुद्धधर्माचा स्वीकार केला. त्यानंतर अनुरुद्धास तेथील राहिलेलें कार्य पूर्ण करण्यास ठेवून भगवानूबुद्ध स्वत: श्रावस्तीस परत येऊन पोहोंचला.

## प्रकरण ९ वें.

——:०:——

### अजातशत्रूस दीक्षा व शाक्यांचा नाश.

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या वृत्तान्तानंतरच्या बऱ्याच कालावधीविषयीं फारशी ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं. सुमारें २३ वर्षांची ऐतिहासिक तपशीलवार माहिती उपलब्ध नाहीं असें म्हटलें तरी चालेल. एक गोष्ट मात्र ठळकपणें दिसून येते ती अशी कीं, बिम्बिसार राजाच्या मृत्युनंतरचा काल फार धामधुमीचा व घडामोडीचा गेला, ह्यांत शंका नाहीं. त्याचे मृत्यूनंतर पितृहत्या करणारा त्याचा पुत्र अजातशत्रू गादीवर आला त्यावेळीं बुद्धाचें वय ७२ वर्षाचें होतें.

देवदत्ताचा वृत्तान्त वाचकांचे स्मरणांत असेलच. बरेच दिवसांपासून त्याचें मनांत बुद्धदेवाबद्दल मत्सराग्नि धुमसत होता हें पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. जसजशी बुद्धाची कीर्ति सर्वत्र पसरूं लागली, आणि त्याचें धार्मिक वर्चस्व सर्वमान्य होऊं लागलें, तसतसा हा मत्सराग्नि शांत न होतां त्याच्या ज्वाला अधिकाधिक प्रज्वलित होऊं लागल्या. आपल्या अलौकिक सामर्थ्यानें राजपुत्र अजातशत्रू याचें मन स्वत:कडे त्यानें वळविलें आणि त्याच्या कृपाछत्राखालीं वास्तव्य करून संघाधिपति होण्याची आपली महत्वाकांक्षा पूर्ण करण्याचें देवदत्तानें ठरविलें.



अशा स्थितींत कांहीं काल लोटला. एकदां वेणुवनांत तथागताचें धर्मविषयावर व्याख्यान चालू असतां, देवदत्त मध्येंच उठून उभा राहिला, आणि मोठ्या नम्रतेनें आपणास संघाधिपति नेमण्यास सांगू लागला; आणि तसें करण्यास त्यानें जें कारण सांगितलें तें तर फारच विलक्षण होतें ! तें कारण असें आहे— "बुद्ध आतां फार थकून गेला आहे !!" देवदत्ताचें वय मात्र बुद्धाहून फार कमी होतें असें नव्हे !!! अर्थात् बुद्धानें त्यास साफ नकारात्मक उत्तर दिलें. त्याच क्षणापासून कांहींतरी विपरीत अशा वाममार्गानें कार्यभाग साधण्याचा देवदत्तानें आपला निश्चय कायम केला. देवदत्ताचें हें वर्तन संघाच्या शिस्तीच्या दृष्टीनें फारच भयंकर होतें. अशा अपराधाला शासनही कडक दिलें पाहिजे असें तथागतानें ठरविलें. देवदत्ताच्या कृतींचा सार्वत्रिक निषेध करवून इत:पर त्याच्या वचनाशीं व कृतीशीं, बुद्ध, बुद्धधर्म व बुद्धसंघ, यांचा कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं असें त्यानें जाहीर करविलें.

ही सर्व कामगिरी शिष्यवर सारिपुत्र यांजवर सोंपविली, आणि कांहीं भिक्षूंच्या साहाय्यानें त्यानें ती योग्य प्रकारें पारही पाडली. पण ह्या प्रकारानें देवदत्त मात्र इतका बेफाम झाला कीं, अजातशत्रूशीं संगनमत करून बिम्बिसार व बुद्धदेव ह्या दोघांनाही ठार करून आपणास बुद्धपदप्राप्ति व अजातशत्रूस राज्यप्राप्ति करवून घेण्याचा त्यानें बेत केला. राज्यलक्ष्मीचा मोह भयंकर

तर खराच ! पहा कीं, या मोहाला बळी पडून अजातशत्रू हा प्रत्यक्ष पित्याचा खून करण्यास सिद्ध झाला. जगाच्या इतिहासाचीं पानें अशाच रक्तांनीं रंगलेलीं दिसत नाहींत काय ? असो; * राजदूतांनीं हा सर्व व्यूह मोठ्या शिताफीनें ढांसळून पाडला आणि राजपुत्रास राजापुढें नेऊन उभें केलें. राजास फार वाईट वाटलें. पण त्यानें असा विचार केला कीं, आपण इतकें म्हातारें झालों तरी, आपणास जर हा लोभ सुटत नाहीं, तर इतरांस दोष देण्यांत अर्थ काय ? असा पोक्त विचार करून त्यानें उदार मनानें राज्यत्याग केला आणि पुत्रास राज्याभिषेक करविला. आतां मात्र आपला कार्यभाग फार सुकर झाला, अशी देवदत्ताची खात्री झाली. आपलें उद्दिष्ट साधण्याकरतां त्यानें लागलींच राजाची संमति मिळविली आणि बुद्धास मारण्याकरतां सोळा मारेकरी जमा केले. सर्व मिळून खून करण्याकरितां बुद्धाजवळ गेले खरें, पण त्याचे दिव्य तेज पाहतांच बिचारे हतबल होऊन सर्वांनीं त्याच्या पायांवर लोटांगण घातलें; आणि आपणास धर्मोपदेश करण्याकरतां त्यास विनविलें. बुद्धानें त्यांना प्रेमानें वागवून धर्मदीक्षा दिली. त्यापैकीं एकानें मात्र परत येऊन बुद्धाचा खून करणें कसें अशक्य आहे तें देवदत्तास सांगितलें.

एक प्रयत्न निष्फळ होतांच देवदत्तानें आणखी एक उपाय योजिला. गृध्रकूटपर्वताच्या छायेंतून बुद्धाची स्वारी जात

* इतिहासांत हा खून अजातशत्रूनेंच करविला असें आहे.



असतां त्याच्या अंगावर एक भली मोठी शिला फेकून दिली. त्यावेळीं एक दैवी चमत्कार असा झाला कीं, दोन पर्वतशिखरांनीं ती शिला झेलून धरली. बुद्धाचे पायास थोडेसें खरचटल्यासारखी एक लहानशी दुखापत मात्र झाली. आतां ह्याची उपेक्षा करणें अनर्थावह होय असें ठरवून, देवदत्ताच्या पापाचें प्रायश्चित त्यास ताबडतोब मिळालेंच पाहिजे, असें त्यानें जवळच्या भिक्षूसही बोलून दाखविलें. तसेंच तथागताचा मृत्यू अशा मार्गानें होणें अशक्य आहे, व सर्व तथागतांचा अंत निसर्गनियमानें योजल्याप्रमाणेंच होणार हेंही निश्चित होय; अशी सर्व अनुयायांची त्यानें खात्री केली. पण देवदत्त मात्र इतकी शोभा करवून घेऊन थांबला नाहीं. मदोन्मत्त नालागिरी गजाकडून बुद्धाचा वध करविण्याचा त्यानें पुनः एक प्रयत्न केला. पिसाळलेला तो गजराज तथागतासमीप येण्याचाच अवकाश ! लागलींच आपलें सर्व क्रौर्य विसरून तो त्या महापुरुषाच्या चरणांवर नम्रतेनें विलीन झाला; आणि त्याची चरणधूली मोठ्या भक्तिभावानें आपल्या मस्तकावर धारण करून चालता झाला.

भगवान् बुद्धास ठार करण्याचा आपला प्रयत्न फलद्रूप होत नाहीं असें पाहून देवदत्तानें बुद्धसंघांत कलह माजविण्याचा निराळाच एक उपाय शोधून काढला. संघांतील भिक्षूंनीं योगी म्हणून अरण्यांतच वृक्षाच्या आश्रयानें राहावें; भिक्षान्नावरच निर्वाह करावा, अर्थात् कोणाचेंही आमंत्रण स्वीकारून भोजनास कधींही जाऊं नये; मांसादि अभक्ष्य–पदार्थ वर्ज्य मानावे आणि

फाटक्या तुटक्या कपड्याशिवाय दुसऱ्या वस्त्रांचा अंगाला स्पर्शही करून घेऊं नये, असा हा नवा उपाय होता. बुद्धाच्या शिकवणुकीचें रहस्य समजल्यामुळेंच ही उपाययोजना करण्यांत आली होती हें उघडच आहे. कारण, आत्यंतिक विषयसेवन व आत्यंतिक तपाचरण, ह्या दोहोंचा सुवर्णमध्य म्हणजेच बुद्धाच्या धर्मोपदेशाचें सार होय, हें पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. अर्थात् केवळ आत्मक्लेशाचा मार्ग बुद्ध नापसंत करणार हें निश्चितच होतें. आणि त्यायोगें आपणास सवंग लोकप्रियता मिळून बुद्धाची निंदा करण्याचें एक साधन आयतें उपलब्ध होईल असा हा देवदत्ताचा डाव होता. आपल्या बाजूस ' कोकालिक, कट्टमोरक-तिस्स्क, खण्डदेवीपुत्त व समुददत्त ह्यांचीं मनें वळवून त्यांच्यासह वरील मार्ग सर्व बुद्धसंघाकडून सक्तीनें अनुसरण्यांत यावा, अशी विनंति करण्याकरतां देवदत्त बुद्धासमीप एके दिवशीं गेला. बुद्धानेंही पण मोठ्या खुबीनें ह्यांतून मार्ग काढलाच. त्यानें सांगितलें कीं, ज्यांची इच्छा असेल त्यांना असें वागण्याची मी पूर्ण मोकळीक देतों, पण सर्वांवर सक्ति करणें केव्हांही शक्य होणार नाहीं. एवढ्यानेंच देवदत्ताचें उद्दिष्ट साधलें. नुकतीच धर्मदीक्षा घेतलेल्या पांचशें भिक्षूंनां संघांतून फोडण्यास हें एकच कारण त्यास पुरें झालें. मग त्यांना बरोबर घेऊन, आपण त्यांचा पुढारी होऊन त्यानें ' गयाशीर्ष ' पर्वताकडे प्रयाण केलें. पुढें तेथें धर्म या विषयावर प्रवचन चालू असतां जमलेल्या समुदायांत त्यांस सारिपुत्र व मौद्गल्यायन दिसले. त्याची अशी



कल्पना झाली कीं, हे दोघेही आपणासारखेच संघांतून फुटून निघाले आहेत. मग त्यांनांच प्रवचन करण्यास सांगून तो स्वत: विश्रांति घेण्याकरितां निघून गेला. त्यांनीं मात्र मिळालेल्या संधीचा चांगलाच उपयोग करून घेऊन त्या पांचशें लोकांचीं मनें परत बुद्धाकडे वळविलीं आणि त्यांना बरोबर घेऊन तेथून पाय काढला. इतक्या थराला गोष्टी गेल्यानंतर देवदत्ताला शिक्षा करण्याचें लांबणीवर टाकणें अशक्य होतें; म्हणूनच एक ' कल्प ' पावेतों घोर नरकाच्या असह्य यातना भोगण्याची तीव्र शिक्षा बुद्धानें त्यास फर्माविली. कारण दुष्ट मनोविकारांचा त्याच्या मनावर फारच पगडा बसला होता.

इकडे देवदत्ताचा मित्र अजातशत्रू ह्यालाही कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन त्यानेंही बुद्धाकडून धर्मदीक्षा घेतली. पुढें त्याच्या कारकीर्दींत शाक्यवंशाची फारच दुर्दशा झाली; आणि या दुर्दशेचें मूळ म्हणजे शुद्धोधनाचा वारस ' महानामन ' ह्याची एक दासीपुत्री " वासभक्खतिया " ही होय. कोसलाधिपति प्रसेनजित ह्याचे डोळ्यांत धूळ टाकून त्याच्याशीं हिचें लग्न लावून दिलें होतें. तिच्या पोटीं ' विडयूडभ ' नांवाचा एक पुत्रही जन्माला आला. पण आपल्या मातेचें जन्मरहस्य जेव्हां चव्हाट्यावर आलें, तेव्हां त्या राजपुत्रानें सर्वांचा सूड घेण्याचा निश्चय केला. प्रथम सेनापतीस वश करून पित्यास पदच्युत केलें आणि पुढें कपिलवस्तूंवर स्वारी करून सर्व शाक्यवंशाचा उच्छेद केला; आणि शेवटीं तोही सर्व सैन्यासह एका महापुरांत गडप् झाला.

---

# प्रकरण १० वें.

## तथागताचें देहावसान.

भगवान्‌बुद्धाचें वय आतां ७९ वर्षांचें झालें होतें. राजगृहा-जवळील **गृध्रकूटांत** त्याचें वास्तव्य होतें. तेथें असतांना एकदां अजातशत्रू राजानें आपला वर्षाकार नांवाचा दरबारांतील ब्राह्मण त्याजकडे पाठविला. राजाचे मनांत शेजारच्या वैशाली येथील वृजिअत लोकांवर स्वारी करावयाची होती; आणि त्याकरितां त्यानें बुद्धाची अनुज्ञा मिळविण्यासाठीं त्या ब्राह्मणास पाठविलें होतें. ब्राह्मणानें येऊन आपल्या आगमनाचें कारण सांगतांच तथागतानें पहिला प्रश्न केला कीं, ज्या लोकांवर स्वारी करण्याची राजाची इच्छा आहे, त्यांच्यांत विशेष अंत:कलह वगैरे आहेत किंवा काय, आणि ते सन्मार्गानें वागून धर्मपालन करतात किंवा नाहीं, ह्या प्रश्नास अनुकूळ उत्तर मिळतांच तथागतानें सांगितलें कीं, अशा लोकांची सदैव भरभराटच होणार. अर्थात हा निरोप ऐकून राजानें आपला स्वारी करण्याचा बेत रहित केला.

गृध्रकूटाहून बुद्धाची स्वारी आनंद वगैरे शिष्यवर्गास नीतिविषयक व समाधीचे गुणधर्म समजावून त्यांचे सहित "अंबलट्ठिका" येथें येऊन पोंहचली; आणि तेथून 'नाळंद' येथील पावारिक



नांवाच्या आंबराईंत राहावयास गेली. तेथें कांहीं दिवस शिष्य-वर्गास पूर्वीच्या विषयांचा पुन: बोध करून नंतर पाटलिग्राम येथें प्रयाण केलें; आणि नागरिकास धर्मोपदेश करून आपला मुक्काम तेथून हलविला. जातांना एक भविष्य वर्तविलें कीं, हें ग्राम पुढें फार प्रसिद्धीस येईल खरें, पण त्यावर तीन मोठीं संकटें येणार आहेत. त्यानंतर भगवान् बुद्ध हे श्री गंगेच्या कांठीं येऊन पोंहोंचले. त्या वेळीं गंगा नदी पाण्यानें तुडुंब भरलेली व तुफानी वारा सुटल्यामुळें गंगेचें पाणी खवळलेलें होतें. इतर लोक होड्यांचा तपास करीतच होते, व गंगेच्या पार कसें जाववेल याचा विचार करीत होते. परंतु भगवान् बुद्ध हे योगबळानें गुप्त होऊन सर्व शिष्यासहीत गंगेच्या पार जाऊन उभे राहिले. **कोटिग्राम, नादिका,** वगैरे ठिकाणीं ठराविक विषयावर प्रवचनें व व्याख्यानें देऊन वैशाली येथील आम्रपाली आंबराईंत सर्व शिष्यांसह कांहीं दिवस राहिले. बुद्धाची स्वारी आली असें समजतांच 'आम्रपाली' वेश्येनें त्यांस आमंत्रण देण्याचें ठरविलें. मोठा लवाजमा बरोबर घेऊन ती आपल्या सुंदर रथांत बसून निघाली आणि प्रवेश द्वाराजवळ उतरून तेथून भगवान् बुद्ध बसला होता त्या ठिकाणीं येऊन पोंहोंचली. थोडा वेळ उपदेश श्रवण करून, जातांना सर्व शिष्यांसह बुद्धास दुसरें दिवशीं भोजनास आमंत्रण दिलें. दुसरें दिवशीं भोजनोत्तर त्या आंबराईचें उदक तिनें तथागताचे हातावर सोडलें. मग तेथून शेवटला

मुक्काम बेलुवा ह्या खेडयांत केला. तेथेंच त्यास भयंकर दुखण्यानें गांठलें, पण लौकरच त्यांतून थोडा बरा झाला. तथापि, वय ८० वर्षांचें झाल्यानें अंत:काल समीप आला असें त्यास कळून चुकलें. एकदा आनंदास बरोबर घेऊन "चापाळ" मंदिरांत गेला असतां त्यानें आपल्या शिष्यास सांगितलें कीं, मनांत आणल्यास मी माझ्या अलौकिक योगबळानें एक कल्पपर्यंत जिवंत राहूं शकेन. पण आनंदाचे मनांवर माराचें प्रभुत्व असल्यामुळें, तथागताच्या वरील विधानांतील रहस्य ध्यानांत न येऊन त्यानें तथागतास तसें करण्याची ( कल्पान्तापर्यंत जगण्याची ) विनंति केली. परंतु आश्चर्य असें कीं, स्वत: बुद्धही माराच्या प्रभावापासून मुक्त नव्हता. कारण धर्मसंस्थापना सुव्यवस्थित राहण्यासाठीं आपण जगणें अवश्य आहे, असें तथागतानें म्हणतांच "धर्मसंस्थापनेची काळजी करण्याचें कारण आतां उरलें नाहीं" असें जेव्हां मारानें उत्तर दिलें, तेव्हां त्यानेंही सांगितलें कीं, "मारा! काळजी करूं नकोस; लौकरच तीन महिन्याचें आंत तथागत अवतार समाप्ति करणार हें खास!" मग कांहीं दिवस तेथें राहिल्यानंतर त्यानें आपला मुक्काम महावना येथील कुरागार पर्वतावर नेला. कांहीं दिवसांनीं सारिपुत्र व मौद्गल्यायन निजधामास गेले.

कांहीं दिवसांनंतर भगवान् बुद्ध पावा येथें "कुंद" (घडकाम करणारा ) याच्या आमराईंत राहावयास गेला. जेथें जेथें मुक्काम राहील, तेथें तेथें धर्मोपदेश करण्याचें त्याचें काम सुरूच होतें.



त्या घडकाम करणारानें सर्वांस भोजनास बोलाविलें होतें. मंडळी भोजनास बसली तेव्हां बुद्धानें आपणास फक्त डुकराचें मांस वाढण्यास सांगितलें, आणि इतर कोणी तें खाऊं नये म्हणूनही बजाविलें. शेवटीं राहिलेलें डुकराचें मांस त्याचेकडून जमिनींत पुरून टाकविलें. कारण तथागताशिवाय असलें अन्न कोणास पचणें शक्य नव्हतें. अखेर तेथेंच त्यास भयंकर अतिसाराची व्यथा लागू पडली. आलारा शिष्य पुक्कुस यास तेथेंच दीक्षा दिली; त्यानें गुरुभेट म्हणून दोन जरतारी महावस्त्रें तथागतास अर्पण केलीं. तेथून निघून कक्कुथ नदींत त्यानें स्नान केलें. मग नदीपार होऊन हिरण्यवती पलीकडे **कुसिनारा** उपवर्तन माल प्रदेश येथें मुक्काम केला. दोन सालवृक्षामध्यें एक शय्या आनंदानें तयार केली, आणि उत्तर दिशेकडे मस्तक करून उजव्या अंगास पायावर पाय ठेवून सिंहाप्रमाणें भगवान् बुद्धाची स्वारी तेथें निजली. आनंदास सर्व परिस्थिति समजावून सांगण्यांत व उपदेश करण्यांत शेवटचे क्षण निघून जात होते. त्याच वेळीं आपल्या अनुयायांनीं धार्मिक भावनेनें ज्या स्थळांचें दर्शन घेणें अगत्याचें होतें त्याच स्थळांचीं नांवें सांगितलीं. तीं येणेंप्रमाणें:— ( १ ) जन्मस्थान. ( २ ) ज्ञान प्राप्त झालें तें स्थान. ( ३ ) पहिला धर्मोपदेश करण्याचें ठिकाण आणि ( ४ ) परिनिर्वाण स्थान. या धर्मक्षेत्रांचीं यात्रा करणारांना स्वर्गप्राप्ति खास होईल असेंही पण त्यानें आश्वासन दिलें.

मरणोत्तर करावयाच्या विधीबद्दल आनंदानें विचारलें; तेव्हां भगवान् बुद्ध म्हणाला कीं, तुम्ही अशा गोष्टींची बिलकुल काळजी करूं नका; चक्रवर्तिप्रमाणेंच माझा अंत्यविधि करण्यास उच्च वर्गांत माझे पुष्कळ शिष्य आहेत ते सर्व कांहीं करतील. तो प्रसंगच असा होता कीं, तथागताची स्वारी लौकरच इहलोक सोडून आपणास आतां कायमची अंतरणार ह्या कल्पनेनें आनंदास तर रडूं कोसळलें. बिचारा बाजूला एका कोपऱ्यांत जाऊन रडूं लागला; पण तथागतानें त्यास बोलावून आणून त्याचें समाधान केलें.

आनंदास वाटलें कीं, अशा महापुरुषाचा अंत एका बाजूच्या लहानशा खेड्यांत व्हावा, हें अनुचित होय. त्यानें आपला विचार स्पष्ट बोलूनही दाखविला. पण बुद्धानें त्याचें समाधान केलें कीं, कुसिनारा हें लहान खेडेंच पूर्वी कुसावती म्हणून प्रसिद्ध राजधानीचें शहर होतें. मग तेथील मल्लांना आनंदाकरवीं त्यानें निरोप पाठविला कीं, "आजरात्रीं शेवटचे प्रहरीं तथागताचें देहावसान होणार." निरोप पोहोंचतांच तें सर्व बुद्धासमीप येऊन पोंहोंचले. त्याचवेळीं सुभद्र ( सुभद्द ) म्हणून एक भिन्न-पंथाचा साधू त्याचे भेटीस आला. शिष्यांनीं त्रास होईल म्हणून त्यास मज्जाव केला, पण बुद्धास हें समजतांच त्यानें त्यास आपणाजवळ आणवून बसविलें. शेवटीं बुद्धाचा उपदेश ऐकून त्यानेंही दीक्षा घेतली. अंतकाल अधिकाधिक जवळ येत



चालला. बुद्धानेंही सर्व निरवानिरव करण्यास सुरुवात केली. त्याचा संसार म्हणजे बुद्धसंघ. त्याचे पश्चात् संघाचे नियमच त्यांना कसे मार्गदर्शक होतील, तसेच प्रत्येकानें काय काय करावें; व कोणास कांहीं शंका असल्यास विचाराव्या. याप्रमाणें सर्व शिष्यांस त्यानें सांगितलें. कोणास कांहींच शंका नाहीं असें दिसतांच तो म्हणाला, "भिक्षूंनो ! मला आतां कांहींच सांगावयाचें राहिलें नाहीं; ज्याला जन्म आहे त्याचा नाश हा ठेवलेलाच आहे; करितां अहर्निश मोक्षाकरतां झटा." हेंच तथागताचे अखेरचे शब्द ! ते शब्द बोलून ती दिव्य प्राण-ज्योती कायमची मालवली ! आणि याप्रमाणें तो पुण्यात्मा आपलें अवतारकार्य समाप्त करून नेपाळच्या तराईंत कुशीनगर येथें इ. स. पू. ४८७ चे सुमारास निजधामास गेला ! !

त्यावेळीं धरणीकंपाचे धक्के बसले. आकाशांत मेघांचा भयंकर कडकडाट झाला. सर्व शिष्यसांप्रदाय शोकानें व्याकुळ झाला. "जगाचा ज्ञानसूर्य फारच लौकर मावळला" असे सहजोद्गार पुष्कळांच्या मुखांतून बाहेर पडले.

सर्व मल्ल लोक बायका पोरांसह तेथें त्या पुण्यपुरुषास वंदन करण्याकरतां जमा झाले. मग वाद्यें वगैरे वाजवून सर्वांनीं त्याची स्तुतिस्तोत्रें गायिलीं. सात दिवसपर्यंत असाच क्रम सुरू ठेवला. आठवे दिवशीं चार मल्लांनीं 'मकुट बन्धन' येथें चिता तयार करविली होती, तेथें तो जड देह उचलून आणला. आकाशातून

सारखी मांदार दिव्य पुष्पांची-वृष्टि होतच होती. तेथें येऊन पोहोंचतांच चितेवर तें प्रेत ठेवलें. पण चितेस अग्नि लावण्याचा प्रयत्न केला तरी चिता पेट घेईना. अनुरुद्धास त्या मल्लांनीं त्याचें कारण विचारतांच, काश्यप येथें आल्याशिवाय चिता पेटणें शक्य नाहीं, असें त्यानें सांगितलें. शेवटीं काश्यप येऊन त्यानें चितेस तीन प्रदक्षिणा घालतांच चिता आपोआप भडकून त्या जडदेहाचें भस्म झालें. अखेर अस्थि बाकी राहिल्या तेव्हां पर्जन्यवृष्टि झाली व चिता शांत झाली.

अस्थि कोणी घ्याव्या ह्याबद्दल भिन्न मतें होऊं लागलीं; तेव्हां ' द्रोण ' नांवाच्या ब्राह्मणानें सर्वांचें म्हणणें ऐकून घेऊन अस्थींचे आठ भाग केले; आणि ते भाग नेऊन त्या प्रत्येकावर खालील ठिकाणीं आठ स्तूपें बांधण्यांत आलीं.

१ राजगृह, २ वैशाली, ३ कपिलवस्तू, ४ अल्लाकप्प, ५ रामग्राम, ६ वेठ्ठादीप, ७ पावा, व ८ कुसिनारा. ह्या शिवाय द्रोण व मौर्य ह्यांनीं बांधलीं तीं स्तूपें निराळींच होतीं.

## बुद्धकालीन धर्मविषयक विचार.

बुद्धनिर्वाणाचा काल निश्चितपणें सांगणें कठिण असलें तरी, तत्पूर्वी औपनिषदिक विचार पूर्णपणें विकसित झाले होते हें निःसंशय होय. उपनिषदांतील अतिशय प्रमुख तत्व म्हणजे जगांत सर्वत्र परमेश्वर व्यापून उरला आहे, हें होय. ईश्वर जगांत



आहे एवढेंच नव्हे, तर तो जगाच्या बाहेरही आहे, असेंही त्यांत सांगितलें आहे. तसेंच, तो सर्वांत श्रेष्ठ आहे, ह्या तत्वाचें प्रतिपादनही त्यांत आहे. शिवाय तो प्राणिमात्रांचा पालनकर्ता आहे; तो सर्वांचा शास्ता असून सर्वांच्या अंतर्यामीं तो वास करतो; तो सर्वत्र आहे हें जाणणें, व तो जसा आहे तसा जाणणें म्हणजेच मोक्ष होय. ध्यान व आत्म्याची शुद्धि यांच्या योगानें मोक्ष मिळवितां येतो व मोक्षप्राप्ति झाली म्हणजे जीवात्मा परमात्म्याशीं पूर्ण साम्य पावतो (" परमं साम्यमुपैति "). परमात्मा निरनिराळ्या स्वरूपांत व्यक्त होतो, सर्व देव येथून तेथून एकच हें जर खरें, तर एका देवास निरनिराळीं रूपें घेतां येणें शक्य आहे, हेंही तितकेंच खरें असलें पाहिजे. हेंही तत्व वरील तत्त्वापासून निघालें आणि त्यांतच अवतारांच्या कल्पनेचा उगम आहे.

ही जी विचारांची लाट उसळली तिचें पर्यवसान पूर्वेकडील भागांत ( मगधदेशांत ) बौद्ध व जैन ह्या सांप्रदायांत झालें. सृष्टीचा उत्पत्तीकर्ता या नात्यानें परमेश्वराचें अस्तित्व या दोन्ही पंथास संमत नाहीं. बौद्ध आत्म्यास स्वतंत्र अस्तित्वच मानीत नाहीं. तथापि, ह्या सांप्रदायांनीं प्रतिपादलेली विचारसरणी विशेष नवीन होती असें मात्र मानण्याचें बिलकुल कारण नाहीं. बहुतेक सर्व विचार थोड्या फार फरकानें पूर्वी उपनिषदांत आले आहेत. तसेंच यज्ञसंस्थेविरुद्ध बौद्धपंथानें बंडाचें निशाण रोवलें असें मानण्याचें कारण नाहीं. तसें करण्यांत स्वारस्यच नव्हतें. कारण

आरण्यकीय ब्रह्मवेत्त्यांनीं लोकसमाजास यज्ञ संस्थेपासून परावृत्त करून ज्ञानमार्गाकडे नेण्याचें बिकट कार्य आधींच केलें होतें. या पंथाचें कार्य निराळ्या स्वरूपाचें होतें. 'गहना कर्मणो गतिः' व 'संसार म्हणजे दुःखमूळ' हें सर्व खरें असलें तरी त्या बाबतींत विद्वान वर्गाशीं वाद घालीत बसून ज्ञानब्रह्माच्या घोटाळ्यांत पडण्यापेक्षां सामान्य लोकांस प्राकृत वाङ्मयानें आपणाकडे ओढून, त्यांच्यामागें कर्में लावून एक प्रकारची शिस्त लावणें, त्या करितां एक सांप्रदाय निर्माण करून टिकविणें, द्रव्य जमविणें, आचार्यपद स्थापणें, हें सर्व कार्य किती कठिण होतें याची कोणालाही कल्पना होईल. असलें बिकट कार्य बुद्धानें किती उत्तम रीतीनें पार पाडलें याची साक्ष इतिहास देत आहे आणि या बाबतींत त्याची कोणी बरोबरी करूं शकेल असें वाटत नाहीं.

याच वैचारिक आंदोलनाचें दुसरें पर्यवसान भागवत धर्माची संस्थापना व त्याचा प्रसार यांत झालें. त्या धर्मांतील भक्तिमार्गानें सामान्य जनांचा मोक्षमार्ग कसा सुकर झाला; तसेंच, त्या धर्मानें कर्म, ज्ञान व भक्ति, यांची कशी सुंदर जोड घातली, व त्याच्या प्रसारानेंच इतर धर्मपंथांचें कार्य कसें शिथिल झालें, वगैरे वृत्तान्त हिंदुधर्मीयांस साधारण अवगत आहेच.

---

# भाग २ रा.

# बौद्धधर्म सारसंग्रह.

## प्रकरण ११ वें.

### तत्त्वज्ञान.

बोधिवृक्षाखालीं बसून बुद्धास पूर्ण ज्ञान प्राप्त झालें. हें त्याच्या चरित्रभागांत आपण पाहिलेंच आहे. त्याच वेळीं त्याला दोन महान धर्मतत्त्वांचा साक्षात्कार झाला आणि तीं तत्वें म्हणजेच बौद्धधर्माचें सार होय. प्रसिद्ध आर्यसत्यानी चतुष्टय व द्वादश प्रतीत्यसमुत्पाद हींच तीं तत्वें होत.

प्रथम आर्यसत्यानी चतुष्टय म्हणजे काय तें पाहूं. त्रोटक नांवें देऊन संबोधावयाचे झाल्यासः—१ दुःख ( भोक्तृत्व ). २ समुदय (कारण). ३ निरोध (नाहींसें करणें). आणि ४ मार्ग. असें त्यांचें वर्णन करतां येईल. म्हणजे याचा अर्थ असा कीं, दुःख भोगणें आहे हें निर्विवाद होय. तसेंच, त्या दुःखाचें कारण आणि त्या कारणाच्या निरोधनाचा अर्थात नाशाचा मार्ग आहे

हें ही निश्चित आहे. यावरून दुःख नाहींसें करण्यास प्रत्येकानें खरा मार्ग कोणता हे जाणलें पाहिजे. थोडासा विचार केल्यास हें एक आर्यवैद्यकांतील मूलभूत सिद्धान्तावरून सुंदर रूपक केलें आहे, असें दिसून येईल. आणि योगशास्त्रांतही पण असेंच आढळून येतें.

आतां प्रतीत्यसमुत्पादाकडे वळूं. रोगनिदान व चिकित्सा या शास्त्राचा जो सर्व वैद्यकशास्त्राशीं संबंध, तसाच प्रतीत्यसमुत्पादाचा वरील सत्यचतुष्टयाशीं निकट संबंध होय. ह्यांत वर्णन केलेलीं द्वादश निदानें येणेंप्रमाणें:–१ अविद्या; (अज्ञान). २ संस्कार; ( मनावर उमटणारा ठसा ). ३ विज्ञान ( शुद्धजाणीव ). ४ नामरूप (नांव आकार=माया). ५ षडायतन ( ६ ज्ञानेंद्रियें ). ६ स्पर्श; ७ वेदना; ८ तृष्णा; ९ उपादान (यत्न;) १० भाव; ११ जाति; १२ जरामरण.

योगविषयक परंपरेचेंही ह्याच्याशीं थोडेसें साम्य दिसून येईल; कारण तेथेंही अविद्या हेंच सर्व दुःखाचें मूळ होय असें सांगितलें आहे. तथापि योगाशीं खरें साम्य पहावयाचें झाल्यास तें सृष्टीच्या उत्पत्तीच्या बाबतींत होय.

तें साम्य थोडक्यांत असें:—

| बौद्ध-धर्म. | सांख्ययोगशास्त्र. |
|---|---|
| १ अविद्या; | प्रधान; |
| २ संस्कार; | बुद्धि; |
| ३ विज्ञान; | अहंकार; |
| ४ नामरूपम्; | तन्मात्राणि; |
| ५ षडायतनम् ; | इंद्रियाणि; |



वरील द्वादशनिदानांचा विश्वोत्पत्तीशीं संबंध पाहूं गेले असतां जी विचारपरंपरा डोळ्यांपुढें उभी राहाते ती अशी:–अविद्या म्हणजे पूर्ण अज्ञानावस्था किंवा एक प्रकारची पूर्ण प्रसुप्तावस्था ललितविस्तरांत या स्थितीचें वर्णन असें आढळतें:–

चिरप्रसुप्तमिमं लोकं तमःस्कन्धावगुण्ठितम् ।
भवान् प्रज्ञाप्रदीपेन, समर्थः प्रतिबोधितुम् ॥

–( ल. वि. पा. ४५८ )

या स्थितींतून मनुष्य प्रथम अर्धवटसुषुप्तावस्थेंत प्रवेश करतो. ह्या वेळीं अर्धवट पुसट संस्काराशिवाय त्याच्या मनावर इतर कशाचाही परिणाम झालेला नसतो. त्या नंतर सृष्टि आपला पसारा त्याच्यापुढें मांडूं लागते तेव्हां इंद्रियांचा व्यापार सुरू होतो. अशा ( काल्पनिक अगर सत्य ) रितीनें बाह्यसृष्टपदार्थांशीं इंद्रियांचा संयोग झाला म्हणजे वेदना प्रादुर्भूत होते; वेदनेपासून तृष्णा आणि तृष्णेपासून उपादान ( स्थित्यन्तराची तीव्र जिज्ञासा ) अशी ही साखळी आहे. अर्थात् नूतन स्थितीच्या जन्माबरोबरच तिचा दुःखानुगामी अंत ठेवलेलाच आहे आणि ह्या प्रमाणें ॥ एतान्प्रपश्यसि घटान् जलयन्त्रचक्रे ॥ रिक्ता भवन्ति भरिता भरिताश्चरिक्ताः॥ ह्या उक्तीस अनुसरून हें भवचक्र सारखें फिरत राहाणार. अजंठा येथील लेण्यांत नुकताच एका आकृतीचा

शोध लागला आहे, आणि त्या आकृतींतही वरील बारा निदानांचें वर्णन चित्ररूपानें फार सुंदर केलें आहे. एवंच, या सर्व गोष्टींवरून ( प्रतीत्यसमुत्पादाचा ) निष्कर्ष इतकाच निघतो कीं, सर्व दुःखाचें मूळ अविद्या ( अज्ञान ) होय. योगाचा आधारभूत सिद्धान्त फार निराळ्या अर्थानें हाच आहे. तो अर्थ हाच कीं, प्रकृतीशीं संयोग झाला असतांही पुरुष पूर्णपणें निर्विकार, स्वतंत्र असतो आणि हें त्याचें भिन्नत्व अविद्येमुळें ( मायेमुळें ) न ओळखणें हेंच सर्व दुःखाचें मूळ होय.

वरील दोन धार्मिकतत्वांत पुनर्जन्म अगर कर्मवाद ह्याबद्दल अनुकूल किंवा प्रतिकूल असें कांहींच दिसत नाहीं, हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. आतां आत्म्याविषयीं बौद्धमत काय आहे तें थोडक्यांत पाहूं.

इहजन्मांत अथवा पुनर्जन्मांत गौतमबुद्धास आत्म्याचें अस्तित्व बिलकूल मान्य नाहीं. अर्थात कर्मवादाशीं ह्या तत्वाची सांगड घालणें अशक्य होय आणि म्हणूनच बुद्धांनीं हें तत्व थोडा फेरफार करूनच स्वीकारलें आहे. कारण कर्मवाद त्यांना कबूल आहे. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें कीं, मानव शरीर कांहीं खंडाचें झालेलें असतें; मरणानंतर हें खंड नाश पावतात, परंतु लागलींच कर्मप्रभावानें अन्यलोकांत नवीन खंड निर्माण होतात, आणि त्यायोगें एक व्यक्ति अस्तित्वांत येते; ह्या व्यक्तीचा आकार व खंड निराळे ( पूर्वींच्याहून ) असले तरी कर्म तेंच असल्यामुळें ही व्यक्ति ही तीच होय असें म्हणावें लागतें. अर्थात कर्म म्हणजे



भवचक्रांत फिरत असतांना व्यक्तिमात्राचें सादृश्य कायम राखणारा एक दुवा अथवा लागाबांधा होय यांत शंका नाहीं. अशा प्रकारचें आत्म्याबद्दलचें मत बुद्धीला ग्राह्य नाहीं हें उघडच आहे; पण बौद्धधर्म बुद्धिप्रधान नसून बोद्धन चाद्धन मनुष्यशक्तीच्या पलीकडचा ( उत्तरिमानुस्स ) असल्याकारणानें असली गूढतत्वें त्यांत सहजच खपतात. परंतु ' सर्वमनित्यम् ' ह्या तत्वाचा मेळ वरील तत्वाशीं कसा घालावयाचा हें मात्र एक कोडें आहे; कारण सर्वच अनित्य म्हणजे नाशवंत तर कर्मही अनंत कसें असूं शकेल ? अर्थात कर्म हीं नाशवंतच ठरतें. पण कांहीं लोक ह्याचाही मेळ घालूं शकतात. ते म्हणतात 'सर्वमनित्यम्' ही एक बोलण्याची रीत आहे, त्या सर्वांमध्यें कर्माचा समावेश करणें बरोबर नाहीं.

वरील सर्व विवेचनावरून असा एक विचार सुचतो कीं, कदाचित बुद्धाच्या मूळ शिकवणुकींत कर्मवाद नसेलही, आणि कर्मवाद वगळण्यास बौद्धधर्म हा शांत, निष्पाप, एकान्तवासप्रिय जीवास निर्वाण प्राप्तीचें एक चांगलेंच पूर्णपणें सुसंगत असें आणि कोणालाही सहज समजूं शकेल अशा प्रकारचें एक सर्वोत्तम साधन आहे यांत शंका नाहीं. असो; मूळ बुद्धधर्म कसा होता ह्याबद्दल आपलें मत कांहींही असलें तरी इतकें मात्र निःसंशय होय कीं, वर प्रतिपादन केलेलीं बुद्धाचीं तत्वें बुद्धधर्म ग्रंथरूपानें ( त्रिपिटक ) पुढें येण्याच्या आधींच त्यांत पूर्णपणें समाविष्ट केलीं गेलीं होतीं.

---

# प्रकरण १२ वें

## जीवतत्त्वें, कर्म व मोक्षमार्ग.

नामरूपांशिवाय वस्तुमात्राचें अस्तित्व शक्य नाहीं, पैकीं नाम हें मन:सृष्टि अगर अंत:सृष्टीचें निदर्शक होय, तर दुसरें म्हणजे रूप हें बहि:सृष्टीचें निदर्शक होय. पहिल्यांत वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान ह्या चार स्कंधाचा समावेश होतो, तर दुसऱ्यांत सर्व पंचमहाभूतांचा (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) व त्यांचेपासून उत्पन्न होणाऱ्या सर्व पदार्थमात्रांचा समावेश होतो. त्यानंतर विज्ञानाचे ८९ विभाग केले आहेत. त्यांत पांच स्पर्शेन्द्रियें व सहावें मन या सर्वांच्या क्रियांचा समावेश होतो. तसेंच, सदसद्विवेकबुद्धीचाही त्यांत अंतर्भाव होतो.

वरील पंचस्कंधसमुच्चयासच 'पुग्गल' अशी संज्ञा आहे. आपण कदाचित त्यास प्राणिमात्र म्हणून संबोधूं. कारण प्राणिमात्र झाला तरी ह्या स्कंधसमुच्चयाचाच संयोग होय! पण बौद्ध तसें समजत नाहींत. दोहोंत अवश्य असा फरक आहे, असें त्यांचें स्पष्ट म्हणणें आहे. पंचस्कंधाचें संयोगाचें कारण (जन्मपुनर्जन्माचें) म्हणजे अर्थांत कर्म; आणि संसार म्हणजे जन्मपुनर्जन्माचा मार्ग होय. कर्मांस आदि म्हणजे आरंभ नसला



तरी अंत असूं शकतो, व तो कर्मांत साधनाचा किंवा कर्माचा नाश करण्याचा मार्ग म्हणजे बुद्धांनीं प्रथमोपदेशांत सांगितलेला अष्टविध मार्ग होय.

मोक्ष म्हणजेच बौद्धांचें निर्वाण होय. निर्वाणाच्या अनुक्रमें चार पायऱ्या आहेत. त्या अशा:–१ श्रोतापन्न, २ सकृदागामिन, ३ अनागामिन व ४ अरहत. पहिली पायरी श्रोतापन्न ही मनोविकारांच्या बंधत्रयापलिकडे गेलेली असते, व दुसऱ्या पायरीला फक्त एकच पुनर्जन्म यावयाचा असतो, आणि ही बंधत्रयापासून मुक्त असूनही राग, द्वेष व मोह यांच्यावर तिनें विजय मिळविलेला असतो. तिसऱ्या पायरीला फक्त ब्रह्मलोकांत पुनर्जन्म येणार आणि चौथी अरहत ही सर्व क्लेश व पुनर्जन्मापासून पुर्णपणें मुक्त असते. ह्या शिवाय वरील अनुक्रम न अनुसरतां जो एकदम पूर्ण शुद्ध होतो, त्यांस "गोत्रभूमि" अशी संज्ञा आहे.

आतां आर्यांचें मुख्य ध्येय जें निर्वाण, तें काय तें थोडक्यांत पाहूं. त्याचें स्थूलमानानें दोन प्रकार:–एकास प्रथमनिर्वाण व दुसऱ्यास अखेरचें अथवा अंतिम निर्वाण असें म्हणण्याचा प्रघात आहे. प्रथमनिर्वाण म्हणजेच वेदान्त्याची जीवन्मुक्ति होय. अरहतांना ह्याची प्राप्ति इहजन्मींच होते. त्यास 'उपादिशेस' असेंही एक विशेषण लावतात. दुसऱ्या म्हणजे अंतिमनिर्वाणाची प्राप्ति अगर परिनिर्वाणाची ही स्थितिमात्र मरणोत्तरच मिळाव-

ज्ञाची असते. त्यायोगें सर्वप्रकारच्या दुःखापासून पूर्ण मुक्ति मिळते; या स्थितींत सुखदुःखाची पूर्ण जाणीव असते किंवा कसें हा एक प्रश्न उद्भवतो. तर्कदृष्ट्या पाहिलें तर ती जाणीव शक्य दिसत नाहीं. पण बौद्धमतांत याचा असंदिग्ध खुलासा नाहीं; कारण तथागताच्या मरणोत्तर अस्तित्वाचा प्रश्न निरुपयोगी म्हणून बुद्धानें कधींच सोडविलेला दिसून येत नाहीं.

## प्रकरण १३ वें.

### निर्वाणाचीं साधनें अथवा आध्यात्मिक व्यायाम.

आध्यात्मिक विचार करण्याची पूर्णपणें पात्रता अंगीं येण्याकरितां ध्यान, समाधि, वगैरे योगिक व्यायामाची आवश्यकता आहे, अशी भारतीय लोकांची खात्री होती. त्याची पूर्वतयारी म्हणून मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा, ह्या भावनाचतुष्टयाचा पूर्ण विकास झाला पाहिजे, असें बौद्ध मानीत होते; या सर्वांस 'ब्रह्मविहार' असें अन्वर्थक नांव होतें. आणखी एक अशुभभावना म्हणून ( शरीराच्या ओंगळपणाची जाणीव ) मानण्याचा प्रघात होता. त्याचेही दहा प्रकार आहेत. मूळ चाळीस **योगिक** ( कम्मट्ठाण ) **आचाराचे** हे पोटभाग होत; " कसिण" भावना म्हणूनही एक दशविधा भावना मानतात; यांत खालील दाहा पदार्थांवर विचार केन्द्रीभूत झाला पाहिजे.

१ पृथ्वी, २ आप, ३ तेज, ४ वायू, ५ आकाश, ६ अग्नि, ७ पीत, ८ शुभ्र, ९ रक्त, १० नील.

वरील आचारांतच दहा प्रकारच्या अनुस्मृतीचा समावेश होतो. बुद्ध, बुद्धधर्म, बुद्धसंघ ह्याबद्दल सतत विचार करणें, यास अनुस्मृति म्हणतात.

हे सर्व ध्यानाचे प्रकार झाले. त्यानंतर समाधीचेही निरनिराळे प्रकार दिसून येतात. त्यांत प्रथमत: दोन वर्ग. १ उपचार समाधि ( कमी प्रतीची ) २ अप्पना समाधि ( उच्च प्रतीची ). ह्याचे आणखी पोटभेद:-१ सवितर्क-सविकार; २ अवितर्क विकारमत्त व ३ अवितर्क-अविकार.

आणखीही कांहीं प्रकार आहेत; परंतु तपशिलांत जाण्याचें हें स्थळ नव्हे, आणि आपला उद्देशही तो नाहीं. वरील सर्व माहितीवरून एक गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. ती ही कीं, यांत बुद्धाचें विशेष असें कांहींच नाहीं. बुद्धापूर्वीं योगाची वाढ पूर्णपणें झाली होती; हिंदुधर्मांतील तसेंच अन्य कांहीं लोक त्यांत पूर्ण निष्णात होते. आणि त्याच ज्ञानाचा बुद्धानींही पण उपयोग करून घेतला.

---

## प्रकरण १४ वें.

### विश्वाची रचना; प्राणिमात्रांचें वर्गीकरण.

विश्व हें अनंत गोलांचें केलेलें असून प्रत्येक गोलाच्यामागें चंद्र, सूर्य, पृथ्वी, स्वर्ग व नरक अशी ग्रहमाला आहे; या गोलामध्येंच लोकान्तरिक अथवा नरकाचें अस्तित्व आहे. आपल्या पृथ्वीचा मध्य 'सुमेरु' पर्वत हा असून त्याभोंवतीं कुलाकल नांवाचे पर्वत, आणि त्या पलीकडे चार खंडें अथवा महाद्वीपें आहेत. ती येणेंप्रमाणें:-१ उत्तर कुरु ( Hyperboreans लोकांचा देश ) २ जंबुद्वीप ( मेरुचे दक्षिणेस हिंदुस्थान ) ३ अपरगोदान (पश्चिमेस) ४ पूर्वविदेह (पूर्वेस). प्रत्येक गोलांत अनुक्रमें काम, रूप व अरूप म्हणून तीन लोक आहेत. सर्वांत कनिष्ठ प्रकारचा जो काम लोक (इंद्रियांच्या सुखोपभोगाचा) त्यांत १ चार श्रेष्ठ दिक्पाल, २ तेहतीस देव, ३ यम, ४ तुषित, ५ निर्माणरति व ६ परिनिर्मित वशवर्तिन् यांचे वास्तव्य असतें. वरील सहा देवलोक ( अन्तरिक्षवासिन् ) तसेंच मानव लोक, असुरलोक, प्रेतलोक, प्राणिलोक आणि नरक, मिळून एकंदर ११ कामलोक आहेत.

दुसऱ्या रूपलोकाचें ( साकार ) अथवा रूपब्रह्मलोकांचे सोळा पोटविभाग आहेत आणि प्रत्येक विभागांत कनिष्ठ वरिष्ठ

मानानें सोळा प्रकारच्या देवतांचे वास्तव्य आहे. कनिष्ठापासून सुरवात केल्यास त्यांचीं नांवें खालीलप्रमाणें, १ ब्रह्मपारिसज्ज, २ ब्रह्मपुरोहित, ३ महाब्रह्म, ४ परित्ताभ, ५ अप्पमाणाभ, ६ आभस्सर, ७ परित्तसुभ, ८ अप्पमाणसुभ, ९ सुभकिण्ण, १० वेहफ्फल, ११ असञ्ञसत्त्व. १२ अविह, १३ अतप्प, १४ सुदस्स, १५ सुदस्सिन, १६ अकनिठ.

तिसऱ्या म्हणजे 'अरूप' ( निराकार ) ब्रह्मलोकाचे चार विभाग आहेत. वरील एकतीस लोकांपैकीं सर्वांत खालीं नरक—( निरय=शिक्षास्थान ) लोकाची योजना आहे. सञ्जीव, कालसूत्र, संघात, रौरव, महारौरव, तपन, प्रतपन व सर्वांत खोलअवीकि असे नरकाचे आठ मुख्य प्रकार आहेत. नरकलोकांवर प्राणिलोक, त्यावर प्रेतलोक व त्यावर असुरलोक असा हा एकंदर क्रम आहे.

वरील सर्व हकीकत वाचून अधुनिक वाचकांचे मनांत कदाचित अशी शंका येईल कीं, अशा गोष्टींवर तत्कालीन लोकांचा तरी पूर्ण विश्वास होता कीं नाहीं? सर्व धर्मग्रंथांत ब्रह्मलोक वगैरे ठिकाणीं स्वत: गेल्याबद्दलची खास गौतमाच्या तोंडची रसभरित वर्णनें आढळतात. अर्थात धर्मग्रंथ लिहिणाऱ्या लोकांचा पूर्ण विश्वास होता किंवा कसें याबद्दल जरी आपणास निश्चितपणें कांहीं विधान करतां आलें नाहीं, तरी इतकें मात्र खास म्हणतां येईल कीं, सामान्य जनांचा तरी असल्या सर्व प्रकारावर पूर्ण विश्वास होता.



प्राणिमात्राच्या वर्गीकरणाचा दुसराही एक प्रकार दिसून येतो. यांत आध्यात्मिक उन्नतीच्या उच्चनीच स्थितीवरून प्राण्यांचा वर्ग ठरविला जातो. कर्माच्या योगानें एका वर्गांतील प्राणि दुसऱ्या वर्गांत जाऊं शकतो; मात्र बुद्ध, प्रत्येक बुद्ध व अरहत यांची कधींहीं अवनति न होतां उन्नतीच होणार. इतरांसंबंधांत उन्नति किंवा अवनति ज्याच्या त्याच्या कर्माच्या बरेवाईटपणावर अवलंबून असते. वरील वर्गीकरण येणेंप्रमाणें:—

१ श्रेष्ठतम बुद्ध, २ प्रत्येक बुद्ध, ३ अरहत, ४ देव, ५ ब्रह्म, ६ गन्धर्व ( दिव्य गायक वर्ग ) ७ गरुड (विजेप्रमाणें आकाशांत उडणारे प्राणी) ८ नाग, (सर्पाकृति प्राणी) ९ यक्ष, (कुबेरदूत) १० कुभाण्ड ( पिशाच्चें ), ११ असुर ( दैत्य ), १२ राक्षस, १३ प्रेत ( भूतें ), १४ नरकवासी,

वरील सर्वांत महत्वाचे जे पहिले तीन म्हणजे बुद्ध, प्रत्येक बुद्ध, व अरहत याबद्दल थोडासा जास्त विचार करून, मग बौद्धधर्माच्या नीतिविषयक कल्पना काय आहेत त्याबद्दल थोडक्यांत पाहूं.

### १ अरहत, प्रत्येक बुद्ध व त्यांचीं विशेष लक्षणें.

निर्वाणाच्या चतुर्थावस्थेंत ज्यांची स्थापना होते, त्यांस अरहत अशी संज्ञा आहे. त्यांना मृत्युलोकच्या मानवाहून दिव्य शक्ति फार मोठ्या प्रमाणांत अनुकूल असते. अर्थ, धर्म, निरुक्ति व

प्रतिभान या चार प्रकारच्या प्रतिसंविद त्यांच्यांत प्रामुख्यानें वास्तव्य करीत असतात. याशिवाय आणखी विशेष म्हणजे ऋद्धि, पूर्वजन्मस्मृति, दिव्यदृष्टि, दिव्यश्रुति व परचित्तप्रवेश अशा पांच बाबतींचें दिव्यज्ञान, आणि अष्टविद्या हें सर्व त्यांनीं आत्मसात केलेलें असतें. तसेंच, विदर्शना व समथ अथवा शान्ति यांचीही त्यांना प्राप्ति झालेली असते. दिव्य चमत्कारही ते करूं शकतात. पण त्याकरतां चतुर्विध सम्माप्पधानाची अनुकूलता लागते. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास अरहतांचा मुख्य विशेष म्हणजे त्यांची सर्वगामी प्रज्ञा हें होय; आणि या प्रज्ञेचे योगानेंच ते भवसागर तरून जातात. आध्यात्मिक प्रगतींत त्यांची गणना प्रत्येक बुद्धाच्या खालीं लागते; कारण प्रत्येक बुद्धास निर्वाणाचें ज्ञान पूर्णपणें झालेलें असतें, फक्त त्याची प्राप्ति व्हावयाची असते, इतकेंच.

## २ बुद्ध व त्यांचीं विशेष लक्षणें.

आध्यात्मिक श्रेष्ठतेंत बुद्धांची पायरी सर्वांत वरची असते; करितां त्यांची अंतर्बाह्य लक्षणें काय तें समजणें अवश्य आहे. बाह्य लक्षणांत अत्यंत महत्वाची म्हणजे चक्रवर्ती, अरहत् आणि नामांकित व्यक्ति यांच्यांत असलेलीं ३२ महा-पुरुष लक्षणें, तसेंच ८० अनुव्यंजन अगर उपलक्षणें हीं बुद्धांत स्पष्ट दिसतात. महापुरुष व पुरुषोत्तम विष्णूलाहि म्हण-तात हें विसरतां कामा नये. याशिवाय त्यांचे प्रत्येक पायावर



१०८ मांगल्य लक्षणें असतात तीं निराळींच. सर्व बुद्ध दिवसां-तून सहा वेळां अखिल विश्वाची घडामोड व त्याचे व्यापार दिव्यदृष्टीनें पाहूं शकतात. गौतमबुद्धाचा एक विशेष म्हणजे त्याची उंची १८ हात होती असें म्हणतात; आणि सिलोन येथील ॲडम-शिखरावर त्याचें 'श्रीपाद' उमटलेलें आहे. त्याची लांबी ५ फूट व रुंदी दोन पूर्णांक एक द्वितीयांश फूट आहे. या गोष्टीवरून वरील हकीकतींत सत्य असलेंच पाहिजे असें दिसतें.

आतां अंतर्लक्षणांविषयीं थोडा विचार करूं. याचे एकूण चार विभाग केले आहेत. ते येणें प्रमाणें:—

### (अ) दहा प्रकारची शक्ति अथवा बळें.

१ योग्यायोग्यज्ञान, २ कर्मविपाकज्ञान, ३ ध्येयज्ञान, ४ जीवतत्वांचें ज्ञान, ५ जीवाकांक्षाज्ञान, ६ इंद्रिय सामर्थ्यज्ञान, ७ समाधि सुखज्ञान, ८ पूर्वजन्मज्ञान, ९ अनीतिनाशाचें सामर्थ्य १० अंतःशुद्धि, यावरून बुद्धाला "दशबल" असेंहि म्हणतात.

### (ब) अष्टादश 'अवेणिक' धर्मः—

१, २, ३ भूतभविष्य वर्तमान दृष्टि (त्रिकालज्ञानदृष्टि) ४ शारीरक्रियाज्ञान, ५--१८ वाचा, विचार, हेतु, स्मृति, समाधि, उत्साह, मोक्ष, ज्ञान, स्थिरता, शांति इत्यादींची योग्या-योग्यता, भ्रम, घाई, निष्काळजीपणा, अविचार यांपासून मुक्ति.

(क) वैशारद्यः—

१ सर्वज्ञता, २ पापापासूनमुक्त, ३ अन्तरायिक धर्म अथवा निर्वाण, ४ मोक्षमार्ग योग्यप्रकारें दाखवून दिल्याची खात्री.

गौतमाच्या अलौकिक सामर्थ्यामुळें त्यास "तथागत, भगवत्, सर्वज्ञ, नरोत्तम वगैरे अनेक विशेषणांनीं संबोधिलेलें दिसून येतें. जशीं परमेश्वराची अनेक नांवें आहेत, तशींच बुद्धाचींसुद्धां अनेक नांवें आहेत. तीं:--जिन, सुगत, दशबल, लोकविद, पुरुषदम्यसारथी, सर्वज्ञ, षडभिज्ञ, अनुत्तर, देवातिदेव, त्रिकालज्ञ, त्रिप्रातिहार्यसंपन्न, निर्भय, निरवद्य, शाक्यसिंह, शाक्यमुनि, शाक्यपुंगव, शौद्धोदनी, आदित्यबंधु, सूर्यवंश, सिद्धार्थ, सर्वार्थसिद्ध, आङ्गिरस, गौतम, इत्यादि. गौतमबुद्धापूर्वी २४ बुद्ध होऊन गेले असें कांहीं म्हणतात, पण त्यांत सत्याचा अंश फारसा असेल असें दिसत नाहीं. पूर्वी बुद्ध झाले, तसेंच पुढेंही होतील असेंही धर्मग्रंथांत सांगितलें आहे. पुढें होणाऱ्या बुद्धाचें नांव "मैत्रेय अजित्" असून तो सध्यां 'तुषित' स्वर्गांत आहे असें मानतात. शरीराचा आकार, आयुष्यमान, इत्यादि किरकोळ गोष्टी वगळल्यास सर्व तथागत सारखेच असतात. अर्थात सर्वांनीं उपदेशिलेला धर्मही एकच असतो. गुरुकृपेशिवाय गौतमबुद्धानें केवळ ध्यानस्थ होऊन धर्मतत्व शोधून काढलें असें जें चरित्रप्रकरणांत सांगितलें, त्याचा



अर्थच असा कीं, ज्या ज्ञानाची कालरात्रीमुळें विस्मृति झाली होती, तेंच ज्ञान अंतर्मुख झाल्यावर पुनश्च प्राप्त झालें.

असो; अंतर्बाह्य लक्षणांबद्दल इतकी माहिती मिळूनही बुद्ध ही व्यक्ति निश्चित कशी होती हें ध्यानांत येणें कठीण आहे; म्हणूनच कीं काय, स्वतः बुद्धास एकदां एका ब्राह्मणानें विचारलें, "आपण देव, गंधर्व, यक्ष, अगर मानव, यापैकीं कोणत्या कोटींतील आहां"? ब्राह्मणास मिळालेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे! तथागत म्हणाला, "हे द्विजश्रेष्ठा, मी यापैकीं कोणीही नसून बुद्ध आहे यांतच माझें स्वरूप जाण."

## ३ बोधिसत्व व त्यांचे गुणधर्म.

परमोच्च बुद्धपदाची प्राप्ति अनंत जन्मांच्या फेऱ्यानंतर होणारी आहे; अर्थात तत्पूर्वी बुद्ध होणाऱ्या जीवास निरनिराळे जन्म घेऊन आध्यात्मिक उन्नति करून घ्यावयाची असते. याप्रमाणें उन्नति करून घेतलेल्या आणि म्हणून बुद्धपदाची प्राप्ति होणाऱ्या जीवास 'बोधिसत्व' असें म्हणतात. योगांतील मूर्तिमंत बुद्धिसत्व म्हणजेच बोधिसत्व.

बोधिसत्वाच्या उत्क्रांतीचे (कार्याचे) तीन विभाग करतात. १ अभिनीहार (बुद्ध होण्याची इच्छा); २ व्याकरण (तथागतानें बुद्ध होण्याच्या कालाबद्दल वर्तविलेलें भविष्य); ३ हलाहल (अखेरच्या जन्मप्रसंगीं होणारा जयजयकार);

बोधिसत्वासही बुद्धाप्रमाणेंच महासत्व, लोकेश्वर वगैरे निरनिराळीं नांवें आहेत.

भद्रकल्पांतील बुद्धाचे अथवा गौतमबुद्धाचे पूर्वीं अनेक जन्म झाले होते, आणि शेवटीं त्यास बुद्धपदाची प्राप्ति झाली. हा भाग पूर्व जन्मांचा वृत्तान्त 'जातकांत' व 'अवदानांत' सविस्तर वर्णन केलेला आहे. कार्यपीटकांत ३५ कथा आहेत व जातकमालांतही ३४ कथा आहेत. एक पालींत तर दुसरें संस्कृतांत, याप्रमाणें क्रम आहे. दोहोंचा कांहीं संबंध आहे कीं काय, तें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. ३५ ह्या आकड्याचें साम्य सिद्धार्थास पूर्ण-ज्ञान मिळण्याकरतां लागलेल्या वर्षांशीं दिसतें.

बोधिसत्वाचा मुख्य सद्गुण म्हणजे कारुण्य किंवा दयार्द्र हृदय हा होय. आणखी दहा पारमितक अगर पूर्ण सद्गुण खालीलप्रमाणें:—

१ दान ( दातृत्व ), २ शील ( नीति ), ३ नेख्खम्म ( त्याग ), ४ पञ्ञा ( ज्ञान ), ५ वीर्य ( उत्साह ), ६ खन्ति ( सहनशीलता ), ७ सच्च ( सत्य ), ८ अधिटठान ( निश्चय ), ९ मेत्ता ( उपकार ), १० उपेक्षा.

वरील नैतिक गुणांबरोबरच ३७ बौद्धिक गुणही बोद्धिसत्वाचे ठायीं असतात. अरहताप्रमाणें गौतमबुद्धाच्या बोधिसत्व जन्मास अवतार असेंही म्हणण्याचा धर्मग्रंथांत प्रघात आहे. हे अवतार पूर्वीं होऊन गेलें, इतकेंच नव्हें तर, पुढेंही होणार अशाच अवतारापैकींच अशोकपुत्र कुणाल हा होता !

---

# प्रकरण १५ वें.

## नीतिविषयक कल्पना.

"वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्यच प्रियमात्मनः ।
सम्यक् संकल्पजः कामः धर्ममूलमिदं श्रुतम् ॥
—मनुस्मृति—

हिंदूच्या नीतिशास्त्राचें अधिष्ठान वरील श्लोकांत फार मार्मिकपणानें बोधप्रद झालेलें दिसतें. बौद्धधर्मांतील नीतितत्वें मूळ बुद्धापासूनच घेतलीं आहेत असें बौद्धग्रंथ कितीही नेटानें म्हणत असले, तरी त्याचा अर्थ असा नाहीं कीं बुद्धानेंच सर्व नीतितत्वें स्वतः शोधून काढलीं. उलटपक्षीं बुद्ध स्वतः प्राचीन ऋषींच्या नैतिक श्रेष्ठतेची मुक्तकंठानें स्तुति करीत आहे, आणि पुर्वींच्या ब्राह्मणांचें जीवित त्यांच्या उच्च नैतिक आचारामुळें आदर्शभूत होऊन बसलें आहे, असेंही वारंवार म्हणत आहे. असें होतें म्हणूनच हिंदूंचीं बरीच नीतितत्वें बौद्धांनीं तशींच आपल्या धर्मांत समाविष्ट केलेलीं आढळतात. प्रत्यक्ष उदाहरणच द्यावयाचें झाल्यास तें असें देतां येईल कीं, ज्या अर्थीं बुद्ध आत्म्याला, राजाला, पितरांना अगर देवांना पंचबली अर्पण करावयास सांगतो, त्या अर्थीं हें स्पष्ट दिसून येतें कीं त्याच्या मनावर स्मृति-ग्रंथांचा बराच पगडा बसला होता.

बौद्धांच्या नीतिशास्त्राचा विचार करतांना दुसरी एक गोष्ट नेहमीं ध्यानांत ठेवली पाहिजे. ती अशी कीं, संघानुयायीं व इतर जन या दोघांचीही त्यांत तरतूद करणें अवश्य होतें. ती न करतां, एका वर्गांस म्हणजे अरहत, मुनि, वगैरे लोकांना कोणतीच नीतिबंधनें लागू नाहींत असें म्हटलें आहे. आत्मज्ञानाच्या शेवटच्या पायरीवर जे गेले आहेत त्यांनां सामान्य नीतिनियम लागू नाहींत, हें तत्व हिंदूंनांहीं कबूल आहे, आणि म्हणूनच कविकुलगुरूनें म्हटलें आहे,

"सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः"

(कालिदास—शाकुन्तल).

असो; प्राचीन काय अगर अर्वाचीन काय, पौर्वात्य काय अगर पाश्चात्य* काय, कोणतेंही नीतिशास्त्र घ्या; त्यांतील नीतिविषयक नियमांचे स्थूलमानानें दोन मुख्य विभाग पडतात:—एक विधियुक्त व दुसरा विधिनिषेध, (यम व नियम अशीं दुसरींही नावें आहेत). सर्व नीतिशास्त्राचें ध्येय काय हें लक्षांत घेतलें म्हणजे वरील नियमांचें कारण तेव्हांच लक्षांत येतें. आत्मप्राप्ति हेंच नीतिशास्त्राचें सर्वमान्य तत्त्व होय. आतां ही आत्मप्राप्ति जशी एकास करावयाची असते, तशीच समाजांतील इतर घटकांनाही करावयाची असते, आणि त्याच करतां कांहीं गोष्टी करणें जसें

* पाश्चात्य लोक यांसच Justic of Benevolence अशी नांवें देतात.



अनिष्ट व अनर्थावह, तसेंच इतर कांहीं गोष्टी समाजाकरतां करणें अवश्यक ठरतें. किंबहुना असेंही म्हणावयास हरकत नाहीं कीं, त्याशिवाय कोणाची आत्मप्राप्ति पूर्णत्वास जात नाहीं. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास कांहीं गोष्टींचा निषेध करावा लागतो तर कांहीं गोष्टी मुद्दाम करावयास सांगावें लागतें. नीतिशास्त्राचें विशेष विवेचन मग तें कितीही मनोरंजक अथवा उद्बोधक असो, तें सांगण्याचें हें स्थळ नाहीं. आपणांस सांप्रत पाहावयाचें आहे कीं, बौद्धांचें 'दशशील' अथवा 'शिक्षापद' कशांत आहे? त्याचें वर्गीकरण येणेंप्रमाणें:-दशशील:—१ जीवहत्या, २ चोरी, ३ व्यभिचार पापाचरण, ४ असत्यभाषण, ५ मादकपदार्थसेवन, ६ अकालभोजन, ७ विलाससेवन, ८ अलंकार, ९ सुंदरशय्या, १० अर्थप्राप्ति, या सर्व गोष्टी वर्ज्य आहेत. पहिले पांच नियम हे सर्वसाधारण लोकाकरतां व दुसरे पांच फक्त संघानुयायांकरतां असा यांत आणखी एक भेद आहे. संघानुयायांत चोरीविषयीं इतकें तीव्र बंधन आहे कीं, फुलांचा वास घेणें याचा सुद्धां चोरींत समावेश होतो.

संन्याशाकरतां आणखी अनेक बंधनें आहेत. उदाहरणार्थः—यज्ञयाग, फलज्योतिष वगैरेपासून अलिप्त राहाणें इत्यादि.

वरील हकीकतीवरून एक गोष्ट दिसून येते, ती अशी कीं, लोकमताचा तिरस्कार न करतां बौद्धांचे नीतिनियम लोकमतानुवर्तीच (Customary morality) होते. कोणाच्या अप-

राधाचा निकाल करावयाचा झाल्यास बुद्ध लोकमताचा कल पाहूनच करी. भिक्षूंचे आचारनियम जास्त कडक करण्याविषयीं बुद्धानें देवदत्तास दिलेलें उत्तरही विचार करण्यासारखें आहे. सारांश काय कीं, प्रचलित नितिनियमांत आपल्या जरूरीप्रमाणें कोठें छाटाछाट करून, तर कोठें थोडा बदल करूनच बुद्धानें भागवून घेतलें. आणि याच कारणामुळें नीतितत्वाच्या बौद्धधर्माचें कांहीं वैशिष्ट्य होतें असें आपणास दिसून येत नाहीं; मात्र एवढें येथें सांगणें भाग आहे कीं, बौद्धधर्मांत औदार्याचें तत्व जेवढ्या प्रमाणांत आहे, तेवढ्या प्रमाणाचें कोणत्याहि इतर धर्मांत नाहीं.

---

# भाग ३ रा.

## प्रकरण १६ वें.

### मठसंस्था.

मागील दोन भागांत गौतमाचें चरित्र आणि बौद्धधर्माचें सामान्यस्वरूप याविषयीं आपण थोडासा विचार केला; पण हिंदुधर्म अगर त्यांतील पंथोपपंथ यांहून बौद्धधर्माची स्थिति फार निराळी आहे, हें येथें संक्षिप्तरीतीनें दाखविणें इष्ट आहे. धर्ममतप्रवर्तकाचें लोकोत्तरत्व आणि त्यानें प्रतिपादन केलेल्या तत्वज्ञानविचारांचें अनन्यसाधारणत्व यांतच हिंदुधर्मांतील निरनिराळ्या पंथांचें वैशिष्ट्य आहे. तत्वज्ञानविचारांत बुद्धाच्या वरचढ ठरणारे, नैतिक आचारांत त्याची स्पर्धा करणारे आणि महानुभावत्वास त्यास सहज मागें टाकणारे, असे अनेक लोक या आर्यावर्तांत जसे बुद्धापूर्वी, तसे त्याच्यानंतरही होऊन गेले. पण इतर कोणास साधली नाहीं अशी धर्मसंस्थापना त्यानें केली. याचें मर्म त्याच्या लोकसंग्रहांत अगर संघटनाचातुर्यांत आणि राज्यसंस्था व धर्मसंस्था यांच्या पाश्चात्य सुधारणेंत दिसून येणाऱ्या अन्योन्यसंबंधांत दिसून येतें; आणि म्हणूनच

त्या बद्दल थोडयोडें विवेचन केल्याशिवाय बौद्धधर्माचें वर्णन अपुरें राहील.

संसारास वैतागून आत्मशोधन करण्याकरतां अरण्याचा आणि एकान्तवासाचा आश्रय सर्व काळीं व सर्व देशांतील लोक करीत आले आहेत. त्यांत आर्यभूमींतच असें विशेष कांहीं दिसतें कीं, तेथें वैराग्याचें बीज जास्त रुजावें. हिंदूंच्या आश्रमसंस्थेंत वैराग्यवृत्तीस पूर्ण वाव होता; आणि बौद्धाच्या मठस्थापनेचें मूळ म्हणजे हा आश्रमधर्मच होय, असें मानण्यास हरकत नाहीं. बौद्धधर्माचा उदयकाल निश्चित नसल्यामुळें ही मठस्थापना अगर संघस्थापना केव्हांपासून झाली तें ठरविणें कठीण आहे; तथापि, इतकें मात्र खास म्हणतां येईल कीं, ज्याअर्थीं अशोककालीं या संस्थेस पूर्ण व्यवस्थित स्वरूप आलें होतें, त्याअर्थीं तत्पूर्वीं बराच काळ ती अस्तित्वांत होती.

संघाच्या शिस्तीचें व नियमांचें मुख्य धर्मपुस्तक म्हणजे 'प्रातिमोक्ख' (प्रातिमोक्ष) हें होय. यांतील नियमांची संख्या २२७ आहे. या ग्रंथाचें तोंडपाठ विवेचन निदान चार भिक्षूंनीं एकत्र जमून पौर्णिमेस व अमावस्येस करावें, असा बुद्धाचा आदेश आहे. प्रत्येक नियमाचे पठन झाल्यावर आपणापैकीं कोणी याचें उल्लंघन केलें आहे कीं काय, असें पाठक विचारतो; व कोणी तसें केलें असल्यास ते कबूल केल्यानंतरच पुढील पठन सुरू होतें.



याशिवाय 'धुतांग' म्हणून एक १३ नियमांचा संग्रह आहे. हे नियम फक्त यतींनींच पाळावयाचे होते असें दिसतें.

**संघप्रवेश:**—समाजांतील उच्चनीच भेद अगर जातिनिर्बंध लक्षांत न घेतां ज्या कोणास (पुरुष असो वा स्त्री असो) संसार त्याग करून यतिधर्म स्विकारावयाचा असेल त्यास संघांत दाखल करून घेतलें जात होतें. मात्र खुनी, दरोडेखोर, रोगग्रस्त, सैनिक, अशा सारख्यांना संघांत प्रवेश करण्यास प्रतिबंध होता. संघप्रवेशासच 'प्रव्रज्जा' अगर 'संसारत्याग' असें नांव आहे. या वेळीं संघाचा शपथविधी करण्यास आपण तयार आहों, असेंच फक्त सांगावयाचें असतें. नंतर कांहीं दिवसांनीं १० अथवा ५ यतींच्या सभेंत, भिक्षापात्र, कफनी वगैरे सामग्री सज्ज करून व आपल्या गुरुचें नांव सांगून आपणास दीक्षा द्यावी, असें सभापतीस सांगितलें म्हणजे सभासदांनीं संमति दिसल्यास, चार (१ भिक्षान्नग्रहण. २ चिंधुक पांघरणें. ३ वृक्षाच्या पायथ्यांशी निवास. ४ गोमूत्र हेंच औषध) निस्सय (निश्चय) करण्यास व चार मुख्य पापापासून वरावृत्त राहाण्यास सभापति नूतन सभासदास बजावतो. हा विधि म्हणजेच उपसंपदा होय.

## अन्नवस्त्र, राहाणी वगैरे.

संघांत प्रवेश होतांच संघाचें वस्त्र वगैरेसंबंधीं सर्व नियम लागू होतात. भिक्षूंचा ठराविक पोषाख म्हणजे:—

१ 'अंतर्वासक' (हें कायाबंधनानें कंबरेला बांधून कंबरेखालीं सोडलेलें असतें); २ 'उत्तरासंग' (हें छातीवर व खांद्यावरून घ्यावयाचें असतें); ३ संघाटी (ही एक प्रकारची कफनी असते. या कफन्यांचा रंग काषाय (तांबूस) असला पाहिजे. याप्रमाणें असतो. संघांतील अधिकाऱ्यांचे कपडे ठिगळें लावून तयार केलेले असत.

पायांत कांहींच घालीत नसत, खडावासही प्रतिबंध होता. छत्री तर एक चैनीचीच वस्तु समजत. तेव्हां ती वापरण्याचीही अर्थात मनाई होती; मात्र पंखा अगर चौरी चालत असे. याशिवाय भिक्षूचा परिवार म्हणजे एक भिक्षापात्र, करगोटा, वस्तरा, सुई, व परिस्सावन (पाणी गाळण्याकरतां). वस्तऱ्याचा उपयोग अर्थात स्मश्रु दाढीकरतां; आणि बहुधा पंधरा दिवसांनीं सर्व भिक्षू एकमेकांची स्मश्रू करीत असत. कधीं कधीं 'कत्तर' अथवा दंडही भिक्षूजवळ असे. आणि दन्तकाष्टही कोणी वापरीत. जपमाळ ही बौद्धधर्मानुयायांच्या हातात असलेली दिसून येते. परंतु जपमाळेचा प्रघात केव्हांपासून अमलांत आला याचा मात्र कोठें पत्ता लागत नाहीं.

भिक्षूंचे वसतिस्थान म्हणजे ते सदैव मठांत असावयाचे. प्रथम जरी कांहीं भिक्षू रानावनांत, दऱ्याखोऱ्यांत योग्य जागा सांपडेल तेथें राहात असले, तरी पुढें पुढें धनिक वर्ग व राजेलोक यांच्याकृपेनें मठांची संख्या फार वाढली, आणि त्यांच्या योग-



क्षेमाची व्यवस्थाही सर्वप्रकारें उत्तम राहत होती. भिक्षूंच्या मागें धर्मविचाराशिवाय इतर काळजी कोणत्याही तऱ्हेची नव्हती. अतिथींची सर्व सोय कांहीं त्रास न पडतां मठांतच करतां येत असे; आणि त्यांच्या आदरसत्काराचे नियमही विनयपीटकांत आहेत. मठांतील कामाची सर्व जबाबदारी त्यांतील योग्य व लायक भिक्षूवर सोंपवून निरनिराळे अधिकारीही नेमले जात असत. १ भांडगोपक,* २ चीवरगोपक, ३ चीवरभाजक, ४ यागुभाजक, ५ फलभाजक, ६ भाण्डभाजक वगैरे अनेक हुद्दे निर्माण झाले होते.

खाण्यापिण्याचे बाबतींत, आजारीपणाशिवाय, तूप, लोणी, दही, मध, साखर, मांस, माशे, वगैरे पदार्थ भिक्षूंना निषिद्ध मानले होते. त्यांनां भिक्षेवर निर्वाह करावयाचा असला तरी इतरलोकांप्रमाणें त्यांनीं भिक्षा मागावयाची नाहीं, न मागतां कोणी घातली तरच घ्यावयाची. कोणी आजारी पडल्यास औषधोपचार करण्याचेही नियम असत आणि ते सर्वांना पाळावे लागत असत.

## प्रातिमोक्ष आणि मठांतील शिस्त.

या बाबतींत प्रातिमोक्ष या ग्रंथाचा मागें एकदां उल्लेख आलाच आहे. यांत एकंदर आठ प्रकरणें असून प्रत्येकांत अनेक नियम आहेत.

*१ कोठीकामदार, २ वस्त्रें घेणारा, ३ वस्त्रें वाटणारा, ४ तांदुळाची कणेरी वाटणारा, ५ फळे वाटणारा, ६ जडखाद्य वाटणारा.

प्र. १ लें:—पाराजिक धम्म अथवा संघांतून भ्रष्ट होणें म्हणजे हकालपट्टी. चोरी, खून इत्यादि घोर पातकें करणारांस ही शिक्षा आहे. यांत चार नियम आहेत.

प्र. २ रें:—संघादिसेस ( संघावशेष ) तात्पुरती हकालपट्टी. यांत एकूण तेरा नियम आहेत.

प्र. ३ रें अनियता धम्मः—यांत दोनच नियम आहेत.

प्र. ४ थें:—निस्सग्गिया पाकित्तिया धम्मः—यांत तीस नियम आहेत.

प्र. ५ वें:—पाकित्तया धम्मः—यांत ब्याणव नियम आहेत.

प्र. ६ वें:—पाटिदेसनिया धम्मः—यांत चार नियम आहेत. भावार्थः—गुन्हे कबूल करून प्रायश्चित्त घेणें वगैरे.

प्र. ७ वें:—सेखिया धम्मः—यांत ७५ नियम आहेत व ते सर्व सदाचाराबद्दल आहेत.

प्र. ८ वें:—अधिकरण समथा धम्मः—यांत शिक्षेचे प्रकार असून नियम ७ आहेत.

शिस्त पाळावयास लावण्यास संघाच्या हातांतील मुख्य शस्त्र म्हणजे संपूर्ण बहिष्कार हें होय. आणि याचा उपयोगही बराच होत असे. कधीं कधीं याचाच सौम्य प्रकारांत उपयोग ( तात्पुरता बहिष्कार ) केला जात असे. याचें उदाहरण पातक कबूल न केल्यास ही शिक्षा देत असत, हें होय.



आराध्यदैवत :— भिक्षूंची आणि सर्व बौद्धधर्मीयांची सर्वांत मुख्य आराध्य दैवतें म्हणजे बुद्ध, बौद्धधर्म व संघ, हें रत्नत्रय होय. याशिवाय पुण्यात्म्यांचें शारीरिक अवशेष व त्यांचीं स्मारकें यांसही बौद्धधर्मांचे लोक फार मानतात. यांचें शारीरिक, उद्देसिक ( स्मारकें ) व पारिभोगिक असे तीन प्रकार आहेत. पारिभोगिक म्हणजे बुद्धाचीं पवित्र स्थळें, वृक्ष वगैरे. स्वतः गौतमाच्या अस्थींचे आठ विभाग करून त्याच्यावर त्याचीं स्मारकें कशीं उभारलीं हें आपण चरित्रभागांत पाहिलेंच आहे. या सर्वांचीं पूजा मोठ्या भक्तिभावानें केली जाते. तसेंच गांधार, कलिंग येथें व नागलोकीं व स्वर्गलोकीं एक एक दाताची पूजा करतात असें म्हणतात. तसेंच वरील त्रिविध वर्गीकरणांतच बुद्धाचें व इतर महापुरुषाचें स्मारक म्हणून मानलेल्या वस्त्र, भिक्षापात्र, विशिष्ट वृक्ष, वगैरे गोष्टींचा समावेश केला पाहिजे. बोधिवृक्षाची याबद्दलची ख्याती सर्व विश्रुत आहे; आणि ती फार पुरातन काळापासून आहे. भारहट येथील खोदकामांत शाक्यमुनिसह सहा बुद्धाचे बोधिवृक्ष दाखविले आहेत. ज्या झाडाखालीं बसून गौतमास पूर्णज्ञान झालें तो गया येथील वृक्ष यात्रेचें प्रसिद्ध स्थानच आहे. वृक्षाप्रमाणेंच बुद्धाच्या पावलांचे निरनिराळ्या ठिकाणीं उमटलेले ठसेही पवित्र मानले जातात. त्यांत सीलोन येथील ॲडम शिखरावरील आणि मृगोप वनांतील ठसे फार प्रसिद्ध आहेत. इतरत्रही कांहीं सांपडतात,

पण त्यांचा आकार फार मोठा नाहीं. बुद्धाचें धर्मचक्रही असेंच पूजनीय आहे. भारहूट येथें याचेंही एक चित्र सापडतें.

## बौद्धांचे धर्मोत्सव

धार्मिक आचारांचेच धार्मिक उत्सव हें एक महत्वाचें अंग आहे. या बाबतींतही बौद्धांनीं अन्य पंथीयांचेंच अनुकरण केलेलें दिसतें. प्रचलित लोकमताची छाप बौद्धधर्मावर किती होती याचें हें एक लहानसें उदाहरण आहे.

या उत्सवांत प्रथम लक्षांत येण्यासारखा म्हणजे साप्ताहिक उपोसथ. हा दर अष्टमीस, पौर्णिमेस व अमावास्येस पाळावयाचा असतो. हा दिवस पूर्ण विश्रांतीचा समजला जातो. सर्व कामकाज या दिवशीं बंद असतें. शाळा, कचेऱ्या वगैरेंना सुट्टी असते आणि धार्मिक लोक या दिवशीं उपवास करतात. भिक्षूही याच दिवशीं प्रतिमोक्खाचें ( प्रतिमोक्षाचें ) पठन करतात.

धर्मोपदेशाचा खरा हंगाम म्हणजे पावसाळा. कारण, या दिवसांत प्रवासास प्रतिबंध असतो. तसेंच फाल्गुन, आषाढ व कार्तिक या पौर्णिमेस धर्मोत्सव साजरा केला जातो. आषाढी पौर्णिमेस सर्व मठांत राहावयास येतात आणि या बैठकीचा शेवट प्रवारणा नांवाच्या उत्सवानें होतो. या दिवशीं सर्व भिक्षूंना भोजन, बक्षिसें वगैरे मिळतात. प्रवारणानंतर त्यांना कपडे वाटण्यांत येतात.



याशिवाय अबरुद, वैशाखपूजा, इत्यादि उत्सव कोठें कोठें पाळतात. धर्मप्रसाराच्या प्रारंभीच्या काळांत पंचवार्षिक सभा अथवा महामोक्ष परिषद बोलावीत असत. या वेळींही प्रवारणाप्रमाणेंच मोठ्या प्रमाणावर अन्नवस्त्रदान होत असे. कनोजचा प्रसिद्ध राजा हर्षसीलादित्य अशा प्रकारची परिषद भरवीत असे.



# भाग ४ था.

## प्रकरण १७ वें.

### धार्मिक इतिहासाचें सिंहावलोकन.

धार्मिक चळवळीच्या इतिहासांत भिक्षूंच्या महासभांना फार प्रमुख स्थान आहे; कारण याच वेळीं बुद्धांचे प्रमुख भिक्षू एकत्र जमून गौतमाच्या धर्मतत्वांचा खल करीत असत. ह्या महासभा फारच थोड्याफार अशा तीनच झाल्या आणि त्यांत अंतरही बरेंच वर्षांचें होतें; पण त्यांचा धर्मप्रसाराचे दृष्टीनें पुष्कळसा उपयोग झाला असल्याकारणानें त्यांची येथें थोडक्यांत माहिती करून घेणें आवश्यक आहे.

पहिली महासभा बुद्धनिर्वाणानंतर थोडेच वर्षांनी भरवावी लागली. त्याचें कारण थोडक्यांत असें:—

सुभद्द नांवाचा एक भिक्षू धर्मविघातक व पाखंडी मतांचें प्रतिपादन करून अनुयायांचा बुद्धिभेद करूं लागला होता. “ गौतमाचा नाश झाला त्यामुळें आपण सुखी झालों. विनाकारण नसते नियम व निर्बंध उपस्थित करून आपणास त्रास देत होता; व आतां मात्र यथेच्छ वागण्यास आपण सर्व पूर्ण



मुखत्यार आहों ” इत्यादि उपदेश तो उघड उघड करूं लागला होता. अशा उपदेशाचा परिणाम धर्मसंरक्षणाचे दृष्टीनें फार भयंकर होईल, हें जाणून काश्यप महाशयानें सर्व भिक्षूंनीं बुद्धाचा खरा उपदेश ऐकण्याकरतां एकवार एकत्र जमावें अशी सर्वांना विनंति केली. या विनंतीस अनुसरून पांचशे अरहतांची सभेकरतां निवडणूक ( काश्यपानें केली ) झाली आणि राजगृह हें स्थळ सभेच्या बैठकी करतां निश्चित करण्यांत आलें. सभेची बैठक एकंदर सात महिने चालली. धर्मतत्वांचा बराच उहापोह झाला आणि उपालि व आनंद यांचेकडून विनयपिटक व धम्मपिटक याची रचना निश्चित करण्यांत आली. या सभेंत काय काय झालें असेल या बाबतींत विद्वानांत बराच मतभेद दिसून येतो. पण तात्विक चर्चा तरी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झाली असावी यांत संशय नाहीं.

यानंतर शंभर वर्षांनीं दुसरी महासभा वैशाली येथें भरविण्यांत आली. त्याचें कारणही साधारण पहिल्यासारखेंच होतें. वज्जिच्या ( वृज ) भिक्षूंनीं द्रव्यप्राप्ति, खाद्यपेय वगैरे बाबतींत बुद्धमतास विसंगत असें दहा आचार सुरू केले आणि त्यास स्वतः गौतमाचाच आधार सांगू लागले. एकदां काकण्डकपुत्र स्थाविर यश हा वैशाली येथें आला असतां त्याला वृज्यांचे हे आचार पाहून वाईट वाटलें आणि त्यांनां त्यापासून परावृत्त करण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला. पण तें सर्व पालथ्या घड्यांवर

पाण्याप्रमाणें ठरून, त्यांनीं त्यांच्याविरूद्ध एकच गिल्ला केला. हें पाहून यशानें वैशालीच्या लोकसभेंत वृज्यांची सर्व कृत्यें चव्हाट्यांवर आणिलीं. याचा योग्य तो उपयोग होऊन लोकसभेनें आपला निर्णय वृज्यांच्या विरुद्ध दिला. अशानें ताळ्यावर न येतां व्रज्यांनीं यशांवरच बहिष्कार पुकारला. हें न खपून तो एकदम आकाशमार्गानें-उड्डाण करून कौशांबी येथें उतरला, आणि तेथून अवन्ति येथें सर्व भिक्षूंची सभा भरविण्याचा आपला बेत जाहीर केला. मग तेथून संभूतसाणवासि यांस बोलावण्याकरतां तो अहोगंग पर्वतांवर गेला. तसेंच भिक्षुश्रेष्ठ रेवत याची मदत घेणेंही उपयुक्त होईल असें सर्वांनीं ठरविलें. या भांडणांत पडावें अशी रेवताची इच्छा प्रथम नव्हती, पण शेवटीं तो कबूल झाला. ठरल्याप्रमाणें एकदांची सभा भरली. जेथें हा प्रश्न प्रथम उत्पन्न झाला, तेथील ( वैशाली ) सभेनेंच त्याचा निकाल द्यावा असें रेवताचें म्हणणें पडलें; पण त्याप्रमाणें निर्णय होऊं शकत नाहीं असें दिसल्यावर रेवतानें आठ जणांची एक समिति नेमावी व त्या समितिनें निर्णय द्यावा, असा ठराव आणला. हा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला. समितीनें नंतर योग्य चौकशी करून दहाही मुद्यावर वृज्यांच्या विरुद्ध निकाल दिला. येथें हें सांगितलें पाहिजे कीं, ही महासभा केव्हां कोठें भरली, तसेंच त्यांतील प्रमुख व्यक्ति कोण कोण होत्या, याबद्दल विद्वानांत बरेच मतभेद आहेत. कांहीं सिंहली कागदपत्रांत तर निराळींच माहिती मिळते.



## पाटलिपुत्र येथील सभा.

ही सभा सर्वपक्षीय नसून फक्त विभज्यवादी ( थेरवाद ) यांचीच होती. प्रख्यात आर्यसम्राट अशोक याच्या राज्याभिषेकानंतर १८ वर्षांनीं ही सभा भरविण्यांत आली. वैशाली येथील सभेंतच असें भविष्य वर्तविण्यांत आलें होतें कीं, १२० वर्षांनीं ब्राह्मणकुलांत मोग्गालि पुत्र तिस्सा या नांवाचा श्रमण जन्म घेऊन, तिर्थकारांच्या तत्वांचा विध्वंस करून बौद्धधर्माची पुनः प्राणप्रतिष्ठा करील. याप्रमाणें मोग्गलिपुत्र यानें १००० थेरांची सभा भरवून विरुद्ध मतांचें पूर्ण खंडन केलें, आणि **अभिधम्मकथावत्थु** या ग्रंथांचे प्रतिपादन केलें. धर्मदीक्षा घेण्यापूर्वीं अशोक हा फार क्रूर व दुराचारी होता, म्हणून त्याला लोक चंड असेंही म्हणावयास कमी करीत नव्हते. पण या म्हणण्यांत कांहींच अर्थ दिसत नाहीं. अशोककालीन शिलालेखावरून तो फार परधर्म सहिष्णु होता असें स्पष्ट दिसतें.

पहिला शिलालेख—बैरट येथील शिलालेखांत अशोकास बुद्धधर्म व संघ याबद्दल किती प्रेम व आदर आहे हें व्यक्त केलें असून, कांहीं धर्मग्रंथांतील उतारे दिले आहेत.

दुसरा शिलालेख—यास रूपनाथ असें म्हणतात. त्याचा सारांश थोडक्यांत असा:—

' देवानांपिय ' म्हणतोः—दोन अडीच वर्षांपूर्वी संघांत प्रवेश करण्याच्या आधीं मी फार प्रयत्न केला नाहीं, पण अलीकडे संघांत सामील झाल्यापासून एक वर्षभर मी फार नेटानें प्रयत्न करीत आहे. त्या दरम्यानच्या काळांत जंबुद्वीपांत जे देव होते ते खोटे ठरले.

इतर ठिकाणच्या लेखांत कांहीं बदल आहे. तसेंच याचा निश्चित काळ कोणता हें सांगतां येत नाहीं. पण इतका सूक्ष्म विचार करण्याचें आपणास कारण दिसत नाहीं. तसेंच अशोकाचे जीवनवृत्तान्ताशीं आपणास फारसें कर्तव्य नाहीं. आपणास इतकेंच ध्यावयाचें कीं, त्यानें बौद्धधर्मप्रसाराकरतां अत्यंत परिश्रम केले. राज्यांत धर्माचें एक नवीन खातें निर्माण करून त्यावर एका प्रधानाची नेमणूक केली; आणि धर्मप्रसाराकरतां देशोदेशीं बौद्धभिक्षू रवाना केले. काश्मीर, सिलोन, म्हैसूर, ग्रीस वगैरे अन्य देशांतील धर्मप्रसारास त्याचेच कारकीर्दींत सुरुवात झाली, इतकें मात्र निश्चित सांगतां येईल. धर्मप्रवर्तक महेन्द्र हा पांचानिकाय-सांत अभिधम्म व विनय अशोकापासूनच शिकला.

## अशोकाचा काल

गौतमाच्या चरित्रप्रकरणांत बिम्बिसार, प्रद्योत, प्रसेनजत व उदयन या समकालीन राजांशीं त्याचा संबंध कशा प्रकारचा होता वगैरे वर्णन पूर्वीं केलें आहेच. धर्मसंस्थेस राज्यसंस्थेची प्रत्यक्ष मदत अत्यंत हितपरिणामी होय, हेंच त्यांच्याशीं झालेल्या



वर्तनांतील रहस्य होय. विशेषतः बिम्बिसार राजाचा खून त्याचा पुत्र अजातशत्रु यानें करविल्यानंतर जेव्हां अजातशत्रु बुद्धाकडे आला, तेव्हां त्याची विशेष निंदा न करतां पुढील आयुष्याबद्दल त्यांस जो बुद्धानें सर्वसामान्य उपदेश केला आहे, त्यांतील बीजही हेंच होय. वास्तविक गौतमासारख्या धर्मसंस्थापकानें अशा कृत्याचा तीव्र निषेध करून अपराध्यास योग्य तें शासन करावयास पाहिजे होतें. पण नीतिदृष्ट्या त्याच्या ( गौतमाच्या ) या कृतीचें समर्थन करणें जरी अशक्य असलें, तरी या कृतीनेंच त्याच्या धार्मिक धोरणांवर पूर्ण प्रकाश पडतो, हें निर्विवाद होय. त्या काळचा साद्यंत इतिहास उपलब्ध असता तर या बाबतीचा बराच खुलासा सहज झाला असता. याच धोरणाचें परिणत स्वरूप सम्राट अशोकाच्या धर्मप्रसारांत दिसून येतें. किंबहुना असेंही म्हणावयास प्रत्यवाय दिसत नाहीं कीं, अशोकासारख्याच्या प्रयत्नाशिवाय बुद्धधर्माचा प्रसार कितीसा झाला असता याची शंकाच आहे. अशोकाबद्दल पुष्कळ प्रकारचीं निरनिराळीं वर्णनें बौद्धग्रंथांत आढळतात, म्हणून त्या संबंधांत येथें संक्षिप्त माहिती दिली असतां अप्रयोजक होईल असें वाटत नाहीं.

## राजा अशोक आणि बौद्धधर्म

या वेळपावेतों शुचिर्भूत, श्रद्धाळू असेच पवित्र लोक बौद्ध-धर्म पाळीत होते. त्याला राष्ट्रीय अथवा सार्वजनिक स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. मोठमोठे राजे, महाराजे आणि संस्थानिक यांच्याकडून

ब्राह्मणांना व बौद्धधर्माच्या भिक्षूंना सारखाच आश्रय मिळत होता. म्हणूनच ब्राह्मण व श्रमण यांच्यांत कोणत्याहि प्रकारचा किंतु अगर द्वेष अथवा चढाओढ असें कांहींच दिसून येत नव्हतें. उभयतां आपापल्या धर्मबंधनाप्रमाणें वर्तन करीत होते. परंतु राजेलोकांचा मात्र ब्राह्मणीधर्माकडे विशेष ओढा होता हें विसरतां कामा नये.

त्यावेळच्या संस्थानिकांत प्रसिद्ध अशा चंद्रगुप्तराजाचा नातु जो अशोक, त्यानें प्रथमच अगदीं उघड रीतीनें व सार्वजनिक दृष्टीनें बौद्धधर्माचा स्वीकार केला. राजा अशोक हा मूळचा हिंदू होता. परंतु थॉमस नांवाचा ग्रंथकार म्हणतो कीं, अशोक हा हिंदू नसून जैन होता. आतां ऐतिहासिक दृष्टीनें जी हकीकत आज बाहेर आली आहे, त्यावरून अशोक हा हिंदू होता असेंच दिसून येईल. अशोकाला मगध देशाचें राज्यपद प्राप्त झालें, तेव्हां त्याच्या राज्याची पूर्वेकडील आसामापासून पश्चिमेकडील सिंधूनदीपावेतो उत्तम भरभराटी होती. जेव्हां अशोकानें स्वतः बौद्धधर्म स्वीकारला तेव्हां 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें उत्तरेकडील बहुतेक प्रांतांतील लोक बौद्धधर्म स्वीकारूं लागले.

अशोकानें बौद्धधर्म स्वीकारूं नये म्हणून ब्राम्हणांकडून भगीरथ प्रयत्न करण्यांत आले; पण त्यानें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. त्याची बौद्धधर्मावर अढळ श्रद्धा बसली व तो



गौतमबुद्धाचा कट्टा अनुयायी झाला. अशोकाची उत्पत्ति एका ब्राह्मण-कन्येपासून झाली. ही हकीकत ऐतिहासिक दृष्टीनें महत्वाची व मनोरंजक असल्यानें येथें दिली आहे. अशोकाच्या मातोश्रीचें नांव सुभद्रांगी असें होतें. भागलपुरानजीक चंपा नांवाच्या खेड्यांतील एका गरीब ब्राह्मणाची ही मुलगी होती. त्या ब्राह्मणाला निष्णात अशा ज्योतिष्यांनीं असें भविष्य वर्तवून दिलें होतें कीं, ही मुलगी राजाची राणी होईल. कालेकरून ती मुलगी रूपगुणसंपन्न अशी विवाहास योग्य झाल्यावर तो गरीब ब्राह्मण आपल्या कन्येस घेऊन मगधदेशाची राजधानी पाटलीपुत्र येथें आला, आणि अनेक कष्ट सोसून मोठ्या प्रयत्नानें त्यानें बिंदुसार राजाची भेट घेतली; आणि स्वतःची ती सर्वांगसुंदर कन्या राजाला अर्पण करून तो स्वदेशीं निघून गेला.

राजानें त्या कन्येचें नांव सुभद्रांगी असें ठेवून तिला स्वतःच्या जनानखान्यांत ठेविलें व तो तिला मोठ्या प्रेमानें वागवूं लागला. परंतु, जनानखान्यांतील इतर राण्या सवतीमत्सराचा संचार झाल्या कारणानें तिच्याशीं द्वेषबुद्धीनें वागून तिचा पदोपदीं अपमान करूं लागल्या; आणि अगदीं नीच प्रकारचें काम म्हणजे श्मश्रू करण्याचें तें तिच्या कपाळीं आलें. त्यामुळें राजाचें दर्शनही तिला मोठें दुर्लभ झालें. बिचारी सुभद्रांगी अतिशय कष्टी झाली व मनांत म्हणूं लागली, "देवा! ब्राह्मणासारख्या श्रेष्ठ कुळांत माझा जन्म असून माझ्या कपाळीं असलें नीच कर्म करण्याचें लिहिलेंस

असें मी कोणतें पातक पूर्वजन्मीं केलें होतें. ज्योतिषी म्हणाले, " ही राजाची राणी होईल " त्याप्रमाणें औट घटका सुख भोगून अखेर माझी ही दशा झाली. बाबाला वाटलें मुलगी राजाची राणी होईल आणि सदैव सुखांत राहील; पण आतां हें माझें असह्य दु:ख त्यांना कसें कळावें ? यापेक्षां एखाद्या सत्पात्र गरीब ब्राह्मणाच्या पदरीं पडलें असतें तरी बरें झालें असतें. " असे अनेक प्रकारचे विचार डोक्यांत अहोरात्र घोळूं लागल्यामुळें ती बिचारी दु:खानें होरपळून जाऊन, दिवसानुदिवस कृश होत चालली. परंतु संसारांत सर्वच दिवस सारखे राहत नाहींत. म्हणून

॥ नीचैर्गच्छत्युपरिचदशाचक्रनेमिक्रमेण ॥

या न्यायानें थोडक्याच दिवसांत तिची ती ग्रहदशा संपली. एके दिवशीं खुद्द राजाचीच श्मश्रू करण्याचें काम तिच्याकडे आलें, श्मश्रूकार्य संपल्यावर राजेसाहेब अत्यंत खुष झाले व म्हणाले, " मी अत्यंत प्रसन्न झालों आहे तर पाहिजे असेल तें याच वेळीं मागून घे " योग्य संधी आलेली पाहून " मला आपली पट्टराणी करावें " असें मागणें तिणें मागून घेतलें व त्याप्रमाणें ती पट्टराणी पदाला पावली. कालेकरून तिला कुलदीपक असा दिव्य पुत्र झाला. ज्योतिष्यानें वर्तविल्याप्रमाणें सर्व कांहीं मनाप्रमाणें घडलें आणि शोकाचे दिवस नष्ट होऊन, अशोकाचे ( सुखाचे ) दिवस प्राप्त झाले म्हणूनच त्या पुत्राचें नांव **अशोक** असें ठेविलें. इतकेंच नव्हें तर, सर्वत्र अशोकवृक्षांची वाढ करून त्याच्या पाल्याचीं तोरणें व माळा मंगलकार्यप्रसंगीं व आनंदोत्सवांत



घरोघर बांधण्यांत यावीं असा हुकूम काढण्यांत आला, आणि तेव्हांपासून मंगलकार्यांत अशोकपाल्याचीं तोरणें घरोघर महाद्वाराला बांधण्याचा प्रघात पडला, तो अद्याप हिंदुस्थानांत हिंदूसमाजांत जारीनें चालू आहे.

समुद्र नांवाचा एक नउकोटनारायण व्यापारी होता; तो बुद्धधर्म स्वीकारून भिक्षूच झाला होता; परंतु दुर्दैवानें तो एकदां एका अतिदुष्ट पाहाडी माणसाच्या तावडींत सांपडला. हा पाहाडी माणूस अशोकाच्या खास मेहेरबानींतला असून, तो त्याचा उजवा हातच होता असें म्हटलें तरी चालेल. काय कारण असेल तें असो, त्या पाहाडी माणसानें त्या भिक्षूस ठार मारण्याचे भगीरथ प्रयत्न केले परंतु ते सर्व फसले. अखेर त्यानें ती गोष्ट अशोकाच्या कानावर घातली. अशोकानें लागलींच त्या भिक्षूस समक्ष बोलावून एकीकडे सर्व हकीकत विचारली; नंतर त्या भिक्षूनें प्रथम बौद्धधर्माचीं मुख्य तत्वें अशोकास समजावून सांगितलीं आणि मग त्या पाहाडी माणसाचा दुष्ट हेतू त्याला कळविला. अशोकानें लागलींच त्या पाहाडी माणसाचा, जरी तो उजवा हात होता तरी, शिरच्छेद केला व बौद्धधर्माविषयीं संपूर्ण सहानुभूति दाखविली.

अशोकाचा प्रसिद्ध व सद्गुणी मुलगा कुणाल, जरी त्याच्या सावत्र आईनें बौद्धधर्म न स्विकारण्याविषयीं त्याला दुराग्रह केला तरी, त्यानें बौद्धधर्म स्वीकारून तो भिक्षू झाला. त्याचप्रमाणें

अशोकाचा दुसरा मुलगा महेन्द्र व मुलगी संघमित्रा अनुक्रमें भिक्षू व भिक्षूणी झाल्या.

अशोकानें अनेक ठिकाणीं मठ उभारून व ठिकठिकाणच्या भिक्षूंना चांगला आश्रय देऊन उत्तरप्रांतांत बौद्धधर्माचा प्रसार अतिशय केला; आणि पुष्कळ ठिकाणीं योग्य अधिकारी नेमून नीतींचें व न्यायाचें उत्तम बीजारोपण केलें. तसेंच राजघराण्यांतील स्त्रियांना गौतमबुद्धाची धर्मतत्वें उत्तमरीतीनें समजावून सांगण्याची उत्तम व्यवस्था केली.

उत्तर–प्रांताप्रमाणेंच दक्षिण-प्रांतांतसुद्धां अशोकानें बौद्धधर्माचा प्रसार केला. अशोक हा राज्यपदारूढ झाल्यानंतर १८ व्या वर्षी त्याचा पुत्र महेन्द्र हा सिलोनमध्यें पुष्कळसे बौद्धधर्मोपदेशक बरोबर घेऊन गेला होता. तेथें महावंश व दीपवंश असे दोन प्रसिद्ध ग्रंथ पालीभाषेंत त्याला आढळले. त्याचें योग्य पठन करून त्या दोन्ही ग्रंथांस बौद्धधर्माचें स्वरूप महेन्द्रानें दिलें. त्यावेळीं सिलोनचा राजा देवानां प्रिय टिष्य यानें महेन्द्राचा मोठा सत्कार करून त्याच्यासाठीं सिलोनची राजधानी अनुराधपुर येथें एक भव्य स्तूप उभारून दिला. एक वर्षानंतर राणी व राजघराण्यांतील इतर स्त्रिया यांनीं बौद्धधर्म स्वीकारण्याची इच्छा दर्शविल्यावरून महेन्द्रानें लागलीच स्वत:ची बहीण संघमित्रा इच्याकडे निरोप पाठविले. त्याप्रमाणें संघमित्रा मगध देशाहून बऱ्याचशा भिक्षुणी बरोबर घेऊन सिलोन येथें येऊन पोंहचली. ज्या बोधिवृक्षाखालीं



बसून गौतमबुद्धानें निर्वाण मिळविलें, त्या पवित्र–वृक्षाची एक फांदी बरोबर घेऊन संघमित्रा सिलोनला आली होती. ती फांदी अनुराधपुर येथें रोवण्यांत आली; ती तशीच वाढत जाऊन तिचा एक मोठा वृक्षच तयार झाला होता. अखेर राणीनें व राजघराण्यांतील इतर स्त्रियांनीं बौद्धधर्माची दीक्षा स्वीकारली.

(इ.स. ४१०–४३२) महानामा राजाच्या कारकीर्दींत इ.स. ४३० सालीं हिंदुस्थानांतून बुद्धघोष हा सिलोनमध्यें येऊन पोंहचला. तेथें त्यानें बौद्ध धर्माचा प्रसार केल्यामुळें तो चांगला प्रसिद्धीला आला. तेथील संघानें त्यास संघाधिपतीच्या जागीं नेमिलें. त्यानें विशुद्धीमार्ग नांवाचा मोठा ग्रंथ लिहिला आणि २० सिंहली ग्रंथांचीं पालीभाषेंत बौद्धधर्मास अनुसरून भाषांतरें केलीं. त्यानंतर इ. स. ४५० सालीं तो ब्रह्मदेशांत गेला व तेथें बौद्धधर्माचा प्रसार केला. इ. स. ९३८ मध्यें सिआम, जावा, सुमात्रा, वगैरे ठिकाणच्या लोकांनींसुद्धां बौद्धधर्म स्वीकारला.

## अशोका नंतर

अशोकानंतर बौद्धधर्माची भरभराट बराच कालपावेतों सर्वतोपरी समाधानकारक अशीच होती. मौर्यघराण्यानंतर संगघराणें सामान्यपदारूढ झालें आणि या घराण्याचें व बौद्धधर्माचें विशेषतः संगघराण्याचा संस्थापक पुष्यमित्र याचें फारसें सूत कधींच नव्हतें, तरी बौद्धधर्माच्या प्रगतीची कमान चढतीच होती, असें म्हणावयास प्रत्यवाय दिसत नाहीं. ही स्थिति कनिष्काचें अम-

दानीपर्यंत कायम होती; म्हणजे कालगणनेच्या दृष्टीनें तीनशें वर्षांचा काळ, चीन, सीलोन, ग्रीस वगैरे देशांतील धर्मप्रसाराच्या दृष्टीनें फार महत्वाचा ठरतो. प्रख्यात ग्रीक राजा मिलिंद व त्याचा समकालीन स्थवीर नागसेन यांची नांवें तर सर्व विश्रुत आहेतच. असो; धर्मप्रसाराच्या वाढीबरोबरच धर्मपंथांची संख्याही फुगूं लागली. ती इतकी कीं, कनिष्काचे काळांत जवळ जवळ १८ निरनिराळे पंथ अस्तित्वांत होते. कनिष्काची एकंदर कारकीर्दच धामधुमीची झाली; त्यांत त्यानें काबूल, कंदहार (गांधार), सिंध व वायव्येकडील बराच प्रांत पादाक्रांत करून तेथें आपला अंमल स्थिर केला. मुलुखगिरीप्रमाणें धर्मप्रसारही त्यानें अशोकाच्या तोडीचाच केला. त्याच्याच कारकीर्दींत जालंधर येथील प्रसिद्ध समिति अथवा महासभा भरली. विविध धर्मपंथांचें एकीकरण हेंच या सभेचें मुख्य कार्य होतें. विनय, सूत्र व अभिधम्म वगैरेवर बरीच चर्चा होऊन त्यांनाही बरेंच व्यवस्थित स्वरूप देण्यांत आलें. याप्रमाणें धर्ममतांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न झाला तरी, त्यामुळें मतभिन्नता थांबली असें मात्र समजण्याचें बिलकुल कारण नाहीं. कारण पुढें लौकरच महायान वगैरे पंथभेद अस्तित्वांत येऊन फार भरभराटीस आले, त्यांतही वैभाविक, सौत्रान्तिक, योगाचार, माध्यमिक वगैरे पोटभेद कसे झाले, तसेंच पंथाचें प्रवर्तकाचें वैशिष्ट्य काय, त्याचा धर्मप्रसारावर परिणाम कसा झाला, विशेषत: महायान पंथाचें गीता



धर्माशीं साम्य असल्यामुळें इतर पंथापेक्षां या पंथाचाच प्रसार कसा झपाट्यानें झाला आणि शेवटीं कुमारिलभट्ट, शंकराचार्य वगैरे हिंदुधर्मीयांच्या तेजानें व कांहीं अंशीं तंत्रविद्येच्या प्रसारानें व प्रभावानें आपल्या जन्मभूमींतच बौद्धधर्म कसा मृतवत् झाला इत्यादि वृत्तान्त मनोरंजक असला तरी, स्थलसंकोचास्तव त्याचा नुसता नामनिर्देश करून भागविणेंच प्राप्त आहे. असो; परधर्म साहिष्णुता हिंदुमात्राच्या रोमरोमीं भिनल्यामुळें भगवान बुद्धाच्या गुणसंकीर्तनांत व त्याच्या धर्ममतकथनांत, लेखकास जसा एक प्रकारचा सात्विक आनंद झाला, तसाच वाचकांस होवो.

# प्रकरण १८ वें.

## धार्मिकग्रंथ.

बौद्धधर्माचें पावित्र्य, ज्ञान व व्युत्पत्ति, हीं शास्त्रसंमत ज्या धार्मिक ग्रंथांच्यायोगानें प्रस्थापित झालीं आहेत, त्यांस त्रिपिटक असें म्हणतात. १ विनय, २ सूत्र व ३ अभिधर्म, या त्रिपुटी ग्रंथसमुच्चयास त्रिपिटक हें नांव दिलें आहे. या नांवाच्या सर्व समुच्चयांपैकीं पाली भाषेंत लिहिलेलें त्रिपिटक सिंहलद्वीपांतील सत्पथावलंबी थेरास (वैभाज्यवादी) यांनीं मान्य केलें आहे, आणि त्यांत विषयविवेचन उत्तम रीतीनें सटिक केलें असल्यामुळें त्या काळांत तें कांहीं अशीं तरी सर्वमान्य झालें होतें, असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

१ **विनयः**—यांत मुख्यत्वेंकरून विद्याविनयसंपन्न व्हावयाचें वळण या विषयाची अनेक रीतीनें निर्णयात्मक उदाहरणें देऊन चांगली समजूत दिली आहे; तसेंच प्रो. ओल्डेनबर्ग यानें लिहि-



लेल्या महावग्ग नांवाच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत या विषयासंबंधांत अत्यन्त महत्वाच्या उपयुक्त सूचना देऊन उत्तम स्पष्टीकरण केलें आहे. त्यानें बौद्धधर्माच्या प्राचीन ऐतिहासिक साहित्यांत ज्या थोडक्यांत निर्णित गोष्टी ग्रथित केल्या आहेत, त्यांचा अनुक्रम खाली लिहिल्या प्रमाणें:—(१) धार्मिक साहित्याचा प्रारंभ ज्या ग्रंथापासून झाला त्या पातिमोक्ख ग्रंथाची उत्पत्ति (२) या पातिमोक्ख ग्रंथासंबंधांत टीका लिहिण्यास प्रारंभ झाला, त्याचा समावेश विभंग नांवाच्या ग्रंथांत केला आहे; (३) विभंग महावग्ग व चुल्लवग्ग या ग्रंथांची रचना; सुत्तान्त साहित्याची उत्पत्तीहि याच ग्रंथापासून झाली. (४) वैशाली येथील मसलत करणारांची मंत्रिसभा; (५) राजगृह येथील सभेच्या दंतकथेचें मूळ; आणि त्यांतच विनय ग्रंथाचें अखेरचें प्रकरण लिहिलें गेलें; (६) बौद्धधर्मानुयायी मंडळींत पोटभेद व विभागणी; आणि अभिधम्म ग्रंथाचा प्रारंभ; (७) पाटलिपुत्त (कथावथ्थू) येथील मसलत करणारांची मंत्रिसभा. वरील सर्व गोष्टी सामान्य लोकांस पसंत व्हावयाजोग्या आहेत.

२ **सुत्तपिटकः**—हें विनयापेक्षां विशेष विस्तृत व भिन्न आहे, यांत संप्रदाय व उपदेश यांचें कमिजास्त प्रमाणांत मोकळ्यारीतीनें उत्तम विवेचन केलें आहे. चुल्लवग्ग ग्रंथांत या सुत्तपिटकांचे चार भाग केलेले आढळतात, व त्यांस निकाय अथवा आगम असें म्हणतात. ते असे:—(१) दीघनिकाय, (२) मझिम

निकाय, ३ सम्युत्त निकाय आणि ४ अंगुत्तर निकाय. पांचवा खुद्द निकाय आहे व त्यांत जातक, बुद्धवंश, महानिदेश वगैरे १५ विषयांचा समावेश केला आहे. यांतील बरेचसे विषय निरनिराळ्या काळांत लिहिले गेले आहेत. खुद्द जातकांपासून आपण पाहत गेलों तर, त्यांत कांहीं कथा फार जुन्या म्हणजे पौराणिक काळांतल्या दिल्या आहेत, आणि कांहीं कांहीं तर बौद्धधर्माच्याही पूर्वीच्या दिल्या आहेत, असें स्पष्ट दिसून येईल. बौद्धधर्माचा जसजसा प्रसार होत चालला, तसतसा त्या त्यावेळीं विश्वसनिय धार्मिक विषयसूत्रसंग्रहांत दिसून येणाऱ्या अडचणी टाळण्यासाठीं धर्मगुरूंनीं केवळ गरजेपुरता या पौराणिक कथांचा जातकांत समावेश केला असल्याचा बराच संभव दिसून येतो. भारहट व सांची येथील शिलालेखावरून असें दिसतें कीं, जातक हा विषय अशोकाच्या कारकीर्दींत बौद्धज्ञानाचा एक संपूर्ण भाग असावा. कसेंहि असो, सदरील चार आगमामधील व सुत्तंत व खुद्दनिकाय यांतील सूत्रांचा आणि सुत्तपिटकाचा बराचसा भाग खिस्तसनापूर्वी तीन शतकांत लिहिला गेला असावा, असें पुष्कळ तज्ञांचें मत आहे.

**३. अभिधम्मपिटकः**—वैशाली येथील मसलत करणारांच्या मंत्रीसभेंत या पिटकाचा मुळींच उल्लेख झालेला नव्हता. यावरून तें त्यानंतरचें आहे हें उघड दिसतें. या पिटकाचीं सात प्रकरणें आहेत, तीं येणें प्रमाणें:—१ धम्मसंगणी, २ विभंग, ३ धातुकथा, ४ पुग्गलपण्णाति, ५ कथावथ्थू, ६ यमक आणि ७ पथ्थान.



या सर्वांच्या सारसंग्रहास " अभिधम्मथ्थसंग्रह " असें नांव दिलें आहे. निकायग्रंथांतील ज्या विषयांवर वादविवाद होऊन चांगलाच खल झाला असेल असेच विषय अभिधर्मपिटकाच्या कर्त्यांनीं आपल्या ग्रंथांत घेतले आहेत; आणि त्यांत केवळ पाठशाला विषयक लाक्षणिक रीतीनें बौद्धधर्मास लागू अशा अनेक हकीकती तपशिलवार ग्रथित केल्या आहेत. या पिटकांत वास्तविक पाहिलें तर बहुतेक विषयांच्या व्याख्या व वर्गीकरण यांचाच भरणा असल्यामुळें त्यास मातृका म्हणजेच अभिधर्म असें जें म्हटलें आहे तेंच रास्त आहे.

अभिधर्म पिटकाचें स्पष्टीकरण व बौद्धधर्मानुयायी मंडळींतील पोटभेद यांचा कालनिर्णय, वैशाली येथील मंत्रीसभा व पाटलिपुत्र येथील मंत्रिसभा या दोहोंमधील मुदत होय.

उत्तरेकडील बुद्धधर्मानुयायी लोकांत बरेच पोटभेद आहेत व त्यांच्या धार्मिक ग्रंथांची माहिती कचितच आढळते; त्यांचे जे थोडेबहुत ग्रंथ आढळतात. त्यांच्या पोट भागांचा नवीन महायानी धर्मपुस्तकांशीं संबंध नसून पाली धर्मपुस्तकांशीं संबंध असावा असें दिसतें. महिशासकांचा चिनी-विनय आणि महासर्वास्तिवादी यांचा तिबेटी-विनय या दोहोंची तुलना केली असतां असें दिसून येईल की, विनयांची जीं निरनिराळी भाषांतरें किंवा रूपांतरें झालीं आहेत, त्या सर्वांचा पाया एकच होय. त्यांची रचना करण्यासाठीं जीं साधनें आढळतात, तीं सर्वत्र

सारखींच दिसून येतात. इतकेंच नव्हे तर, त्या सर्वांतील कथां-चेंहि साम्य दिसून येतें.

यावरून इतकें मात्र स्पष्ट दिसून येतें कीं, महिशासक व महासर्वास्ति या दोहोंची उत्पत्ति स्वधर्मानें चालणारे आस्तिक स्थविरवाद यांच्या पासूनच झाली आहे; आणि आस्तिक समा-जांचे पोटभागही यांतूनच सिद्ध झालेले आहेत. म्हणून यांचा विनय व थेरासांचा विनय या दोहोंचें साम्य असणें हेंहि स्वाभा-विक होय. लोकोत्तर वाद्यांच्या महावस्तु नावांच्या ग्रंथांत बोधि-सत्त्वाच्या दंतकथात्मक चरित्रांत जातकांतून व शाक्यवंशाच्या पौराणिक कथांतून बऱ्याचशा प्रकरणांचा समावेश केला आहे, असें त्या ग्रंथांतील प्रकरणांच्या अव्यवस्थित रचनेवरून दिसतें. या ग्रंथाच्या एका भागास " अवलोकितासूत्र " असेंहि म्हटलें आहे. या सर्व हकीकती वरून अशा ग्रंथास विनयपिटका-सारख्या महत्वाच्या ग्रंथसमुच्चयांत जागा मिळावी हें खरोखरच महदाश्चर्य होय. चिनांतील विख्यात ग्रंथकार असें प्रतिपादन करतात कीं, या महावस्तु ग्रंथांत, महासंघिकांसाठीं धर्मगुप्ताच्या अभिनिष्क्रमण सुत्राचा व सर्वास्तिवाद्यांचा ललित विस्तराचा समावेश केला आहे. यांत खरेपणा मात्र बेताबेताचाच दिसतो; कारण त्यांत बोधिसत्व हा बुद्ध होई पावतोच्या हकीकतीचा संबंध घेतला आहे. एकंदरींत महावस्तु ग्रंथांतील विषयांचें महत्व आणि स्वधर्माभिमानी समाजाच्या ग्रंथसमुच्चयांतील विषयांचें



महत्व सारखेंच दिसून येतें; परंतु त्यांतील रचनेची पद्धत मात्र अगदींच निराळी दिसते; अथवा मुळींच पद्धत नाहीं असें म्हणण्यास कांहीं बाध नाहीं; कारण त्या रचनेंत " ॐनमः श्रीमहाबुद्धायातितानागतप्रत्युत्पन्नेभ्यः सर्वबुद्धेभ्यः " अशी एक उक्ति आहे म्हणजे बुद्धांची मोठी संस्था असल्याबद्दल हें जें प्रतिपादन आहे तें रचना अगदींच भिन्न असल्याचें एक उदाहरण होय, आणि या उक्तीचें वैपुल्यसूत्राशीं साम्य असल्यामुळें ही मुदत अशोकाच्या कारकीर्दीनंतरचीच असली पाहिजे असा कालनिर्णय करतां येईल. पाली व वैपुल्य हीं धर्मपुस्तकें निर्माण होण्याच्या मधील जी मुदत आहे त्यामुदतींत, महावस्तु ग्रंथाची भाषा व रचना यांची इतर लेखांशी तुलना केली असतांना जो फेरफार दिसतो, तसा फेरफार झाला असावा असें वाटतें.

पालीधर्मपुस्तकांशीं संमत अशा अभिधर्मपुस्तकांचीं भाषांतरें चिनीधर्मपुस्तकांत आढळतात ; आणि त्यांत बहुतेक बुद्धाच्या शिष्यवर्गाला लागू अशींच विवेचनें सापडतात हें कांहीं लहान आश्चर्य नव्हें. जुन्या सूत्रांतून वैपुल्यसूत्रें जर निवडावयाचीं असतील तर जुन्यांसूत्रांतील अलंकारांत फेरफार करून ते सर्व वैपुल्य सूत्रांत घेतले आहेत असें स्पष्ट दिसून येईल; त्यांत गद्य व त्याच्या पुढें त्याच मतलबाचें पद्य अशींच सर्व रचना दिसून येते. गद्यां-तील अलंकार एका प्रकारच्या संस्कृतांतच आहेत आणि पद्यें, म्हणजे गाथा, हीं प्राकृतांत वृत्तरचनेसाठीं जरूर दिसेल तसे

संस्कृत मिश्रित फेरफार करून घेषांतरेंच आहेत असें दिसून येईल. एकंदरींत आमच्या मतें गद्यरचना ही प्राकृतांतून संस्कृतांत घेतली आहे असें निःसंशय म्हणावें लागतें. गाथा वगैरे प्राकृत पद्यांचें संस्कृतांत रूपांतर होणें अशक्यच म्हटलें पाहिजे; कारण तसें करणें झाल्यास सर्वच रचना नवीन करावी लागेल; परंतु प्राकृत गद्यांचें संस्कृतांत रूपांतर करणें अगदींच सोपें आहे. यावरून आपण अशी कल्पना मात्र खास करूं शकूं कीं हीं सर्व भाषांतरें अथवा रूपांतरें त्या काळांतल्या उणीवा भरून काढण्यासाठींच झालेलीं आहेत. या फेरफाराचा परिणाम असा झाला कीं प्राकृत वाङ्मयाचा हळूं हळूं लोप होत जाऊन-संस्कृत वाङ्मयाचाच प्रसार सर्व हिंदुस्थानांत होत गेला; अर्थात शास्त्रीय, साहित्याचेंच सुधारणांचे सर्वच ग्रंथ संस्कृत भाषेंत झळकूं लागून आर्य आणि द्राविड यांच्यांत बळवत्तर असे लेखी आधारभूत होऊन बसले. या फेरफाराचा काळनिर्णय जरी होऊं शकत नाहीं तरी पण येथें आम्हीं अशीं सूचना करून ठेवतो कीं कनिष्क राजाच्या कारकीर्दींत एक प्रचंड महासभा होऊन धार्मिक विषयावर मोठा वाद विवाद झाला आणि त्यानंतर धार्मिक ग्रंथांची जी नवीन रचना झाली त्याच वेळीं संस्कृत वाङ्मयाचा उत्कर्ष झाला.

वैपुल्यांतील कांहीं सूत्रें तात्विक दृष्टीनें वरींचशीं जुन्या सूत्रांना अनुसरून आहेत. ललित विस्तरांतील कांहीं कांहीं सबंद वाक्यें



पाली धर्मपुस्तकांत शद्बशः आढळून येतात. सर्व बुद्धांना सामान्य रीतीनें लागू अशा दंत कथांचा संग्रह नास्तिक वर्गांत बराचसा वाढला आहे असें साधारणपणें म्हणतां येईल. बोधिसत्व, अवलोकितेश्वर आणि मंजुश्री ह्या नवीन व्यक्ति कल्पित दिसूं लागल्या. शाक्यमुनीची मूर्ति वस्त्रालंकारांनीं भूषित केली असून तिच्या बरोबरच भूत वर्तमान आणि भविष्य काळांतील सर्व बुद्धांचे यजमान पूज्य मानले जातात व त्यांची आराधना करण्यांत येते.

जेवढीं वैपुल्यसूत्रें आपणांस माहीत आहेत; तीं सर्व महायान सूत्रांप्रमाणेंच योग्य रीतीनें तयार झालेलीं आहेत; व त्या सर्वांचा नवीन धर्मपुस्तकांत ( महायानी ) समावेश केला आहे. एकंदरींत ललित-विस्तर म्हणजेच महायानसूत्र हें सर्वास्तिवाद्यांचें आहे याला आधार चिनी धर्म पुस्तकांत आहे. यावरून असें म्हणतां येईल कीं महायानी पंथाच्या लोकांनीं हिनायना धर्मपुस्तकांतून योग्य वाटतील तसे फेरफार करून आपल्या ग्रंथांत बराचसा भाग घेण्यास मुळींच शंका घेतली नाहीं. याच्या काळनिर्णयासंबंधांत इतकें सांगतां येईल कीं-महायानीसूत्र सुखवती-व्युह अथवा अमितयुसूत्र याचें चिनी भाषेंत इ. स. १४८-१७० या मुदतींत प्रथमच भाषांतर झालें; हें जर खरें मानून चाललें तर कनिष्काच्या कारकीर्दींत जी मोठी महासभा झाली त्या सुमारास नागार्जुनाचा जन्म झाला व तोच महायानी पंथाचा प्रसारक असें खात्रीनें म्हणतां येईल.

धारणीधर्मपुस्तकांतून महायान धर्मपुस्तकांत बराचसा भाग घेतला आहे असा एक आरोप आहे; परंतु हुएनसंगानें असें विधान केलें आहे कीं महासांघिक पंथांत धारणीपीटक प्रारंभापासूनच आढळतें; या विधानांत सत्य नाहीं असें मानून चाललें तरीपण महायानी यांनीं धारणी पीटकांतील भाग कांहीं नवीन शोधून काढले नाहींत तर धारणी पीटकाचा संपूर्ण भाग आपल्या महायानी धर्मपुस्तकांत घेतला आहे असेंच म्हणणें सयुक्तिक होय.

या सर्व धार्मिक पुस्तकांतील भाषेच्या संबंधांत अनेक प्रकारचे फेरफार झालेले दिसून येतात; त्या सर्वांचा विचार करून थोडक्यांत इतकेंच येथें लिहिणें पुरें होईल कीं बुद्धधर्माच्या लोकांनीं आपापल्या धर्म पुस्तकांतील भाषेला संस्कृत भाषेचें स्वरूप आणण्याचा प्रयत्न केला आहे; याप्रमाणें हळू हळू शास्त्रीय रीतीनें संस्कृत भाषेचा प्रवेश होत जाऊन बुद्धांचे बहुतेक ग्रंथ शुद्ध संस्कृत भाषेंत तयार झाले. महिषाशकाचें बिनय पीटक व इतर धर्मपुस्तकें शुद्ध संस्कृत भाषेंत असलेलीं दिसून येतात या वरून फाहिआन यानें प्रतिपादन केल्याप्रमाणें सिलोनमध्यें सुद्धां संस्कृतवाङ्मयाचा पूर्ण विकास होत गेला असें दिसून येतें.

धार्मिक पवित्र ग्रंथांतून त्यांस अनुसरूनच टीकात्मक वाङ्मय म्हणजे संक्षिप्त इतिहास, निबंध, वगैरे निर्माण होणें हें अगदीं स्वाभाविक होय. अशा साहित्याचा समुच्चय दक्षिण व उत्तर या



दोन्ही प्रांतांत अतिशय वाढला होता. त्या सर्वांचें येथें स्पष्टीकरण केलें तर विस्तार फार होईल म्हणून त्यांतील महत्वाच्याच ग्रंथासंबंधांत येथें थोडक्यांत विवेचन करण्यांत येत आहे.

दक्षिण प्रांतात अठ्ठकथा ( अष्टकथा ) नांवाचा ग्रंथ इतर कांहीं धार्मिक पुस्तकांसह सिलोनांत महेन्द्रानें चालू केला व त्याचे सिंहलींत भाषांतरही त्यानेंच केलें. तिपिटका (त्रिपिटक) च्या अनेक भागावर टीका व चर्चा केलेली या अष्टकथा ग्रंथांत आढळून येतें; आणि इ. स. ४२० मध्यें बुद्धघोषानें या ग्रंथाचें पुन: पालींत भाषांतर केलें. कांहीं खऱ्या व कांहीं कल्पित कथांचा या ग्रंथांत मताभिमानानें भरणा करण्यांत आला आहे असें सहज दिसून येईल. इ. स. ३०० मध्यें जेव्हां दीपवंश ग्रंथ लिहिण्यांत आला तेव्हां अर्धवट धार्मिक विषय प्रतिपादन केलेले व अष्टकथा नांव दिलेले असे बरेच टीकात्मक ग्रंथ आढळून आले परंतु इ. स. ३०० नंतर त्यांत बुद्धघोषाकडून किंवा इतरांकडून काय काय फेरफार करण्यांत आले हें मात्र निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. महावंश ग्रंथांतील कथेस अनुसरून बुद्धघोषानें अष्टकथेचें जें भाषांतर केले आहे ते वादग्रस्त आहे अशा विषयी सबळ आधार आहेत. थेरा, थेरागाथा यावरील परमार्थ—दीपनी नांवाची टीका आणि इतर कांहीं टीकात्मक लेख हे बुद्धघोषाकडून लिहिले गेले नाहींत परंतु कोणसी पुऱ्याच्या धर्मपालानें रचिले आहेत असें कळतें; परंतु हें मात्र विसरतां कामा नये कीं बुद्धघोषानें आपल्या सामंत-प्रसादिका

नांवाच्या ग्रंथांत दीपवंशाचा नामोल्लेख केला आहे; आणि ज्या अर्थी अष्टकथा हा ग्रंथ त्या कालक्रमाच्या इतिहासापूर्वीचा आहे असें निश्चयात्मक ठरलें आहे त्या अर्थी त्याच्या भाषांतरांतला कांहीं भाग त्या कालक्रमाच्या इतिहासानंतरचाच असला पाहिजे असें सहज म्हणतां येईल.

सिंहली भाषेंतील हकीकतींच्या संपूर्ण खरेपणा बद्दल आपण कांहीं शंका काढल्या तरीपण पाली भाषेंतील मुख्य टीकात्मक ग्रंथमालिका—बुद्धघोष व विसुद्धिमग्ग यांच्यामुळेंच निर्माण झाली आणि तिला बुद्धधर्माच्या विश्वसनीय विषय सूत्रसंग्रहाची एक विद्यावलीच म्हणणें सयुक्तिक होईल. बुद्धधर्माच्या गुणवर्णनात्मक असा एक सारसंग्रह नांवाचा ग्रंथ आहे-यास सुद्धां ईश्वराच्या अस्तित्वाच्या व विश्वरचनेच्या नियमांची एक संक्षिप्त विधावलीच म्हणतां येईल. अट्ठवत्थु ग्रंथाच्या टीकेंत बुद्धांच्या निरनिराळ्या शाखांविषयीं मत प्रतिपादन केलें आहे.

मिलिंदराजा व बुद्धसाधू नागसेन यांच्यांत केवळ मताभिमानानें धर्मग्रंथावर जो संवाद झाला तो संवादात्मक ग्रंथ मिलिंदपान्हा या नांवानें प्रसिद्ध आहे; याचा कालनिर्णय व मूळउत्पत्तिस्थान हीं अनिश्चित आहेत; परंतु जरी पाली धर्मपुस्तकांतून बरेचसे उतारे त्यांत घेतलेले आढळत असले तरीपण तो आपल्या शतकाच्या प्रारंभानंतर उत्तर हिंदुस्थानांतच लिहिला गेला असला पाहिजे असें अनेक कारणांस्तव खात्रीनें म्हणतां येईल. अनागतवंश अथवा भविष्यकाळाच्या बुद्धांचा इतिहास या नांवाचा ग्रंथ



संक्षिप्त हकीकतीपैकीं असून त्यांत प्राचीन धर्मपुस्तकांतून घेतलेले निराधार असे चर्वितचर्वणात्मक उतारे बरेचसे आढळतात. सध्धम्मसंग्रह आणि महाबोधिवंश हे ग्रंथ मूळसिंहली भाषेची भाषांतरें आहेत; रसवाहिनी नांवाचा १०३ कथांचा समुच्चय, दाथावंश आणि चकेशधातुवंश हे सुद्धां वर दर्शविलेल्या स्थितींतलेच ग्रंथ होत. पाली भाषेंतील पुस्तकाविषयीं आणि त्यांच्या कर्त्याविषयीं गंधवंशांत मनोरंजक सूचना देण्यांत आल्या आहेत.

पद्यात्मक धार्मिक काव्यांत पज्जमधु नांवाचें एक काव्य आहे त्यांत बुद्धाची प्रशस्ति आहे. तसेंच सद्धम्मोपायन नांवाचें दुसरें एक उपदेशात्मक काव्य आहे.

शब्दशास्त्राचे ग्रंथ, व्याकरण, कोश, आणि व्याकरणविषयावरील कागदपत्रें या संबंधांत कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. अश्वघोषाची बुद्धसरिता, आर्यसुराची जातकमाला व क्षेमेंद्राची अवदानकल्पलता हे ग्रंथ सर्वोत्कृष्ट आहेत. अर्धवट ऐतिहासिक साहित्यानें व दंतकथासंग्रहानें संपूर्ण असा दिव्यवदन नांवाचा ग्रंथ आहे; त्याची भाषाशैली जरी शुद्ध नसली तरी तो कांहीं कमी चित्ताकर्षक नाहीं. भद्रकल्पवादन व अवदानशतक या दोन्ही ग्रंथांतील उतारे व भाषांतरें प्रसिद्ध आहेत. शांतीदेवकृत बोधिसत्त्वावदान या नांवाचें धर्माचें खरें तत्त्व प्रतिपादन केलेलें असें एक पवित्र काव्य प्रसिद्ध आहे; पण तें त्यावेळच्या संस्कृत साहित्यांतून घेतलेलें आहे असा एक त्याला शिक्का लागलेला आहे.

# प्रकरण १९ वें

## बौद्धधर्म व जैनधर्म.

सामान्य लोकांत या दोन धर्मांविषयीं विशेष माहिती नसते. कोणी तर दोन्हीहि धर्म एकच आहेत असें म्हणतांना आढळतात. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तरी जैनसंप्रदाय हा बौद्धसंप्रदायाचाच पोटभाग होय ही समजूत बहुत काळ पर्यंत दृढ होती. तथापि या दोन संप्रदायांतील तत्वें इतकीं भिन्न आहेत कीं—त्यामुळें जैनसंप्रदाय हा अगदीं भिन्न आहे अशी खात्री होते.

**या दोहोंतील मुख्य फरक येणेंप्रमाणें :—**

जैन संप्रदायांत तापसवृत्ति व सांप्रदायिक आचार यांजवर फार भार दिला आहे. तसेंच पूर्ण विकास पावलेल्या आत्मतत्वाच्या अस्तित्वासंबंधानेंहि बरेंच विवेचन महावीर यानें केलेलें आहे. हा संप्रदाय पूर्ण भारतीयच राहिला; परंतु बौद्धसंप्रदाय अधिक व्यापक झाला व यामुळें बौद्धवाङ्मयास विशेष महत्व प्राप्त झालें. जैनधर्मग्रंथांत रुक्ष उपदेश केलेले आढळतात तर बौधग्रंथांत मानवजातीच्या हिताच्या दृष्टीनें विशेष विवेचन केलेलें आढळतें.

बुद्ध व जैन या दोन्ही धर्मांत पुष्कळ साम्य असून वास्तवीक पाहिलें तर त्यांचा हिंदुधर्मांतच अंतर्भाव होतो. ते हिंदु-



धर्माहून निराळे धर्म होत असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. हिंदूधर्मांत असलेलीं तत्वेंच महावीर अथवा गौतमबुद्ध यांनीं विशेष निकरानें पुढें आणलीं आणि त्यांच्या उतरत्या काळांतसुद्धां त्यांचा जो विशिष्ट तत्व-संग्रह होता तो हिंदूंनीं आपल्या तत्वज्ञानांत गोवून घेतला. उपनिषदांतील तत्वांचाच बुद्धानें स्वीकार केला; मात्र यज्ञयाग व वेदप्रामाण्य या गोष्टी बुद्धास मान्य नव्हत्या. बुद्धधर्माचा प्रसार गौतमाचे मृत्यूनंतर विशेष झाला. वासना नष्ट करून निर्वाण मिळविणें हें बुद्धधर्माचें ध्येय असून त्यास अष्टविध साधन सांगितलेलें आहे. शाक्यांच्या राज्यांत लोकनियुक्तता होती तीच बुद्धानें आपल्या संघाच्या कारभारांत स्वीकारली. मनुष्यास उच्च नीच भाव जन्मानें प्राप्त न होतां त्याच्या कर्तृत्वानें होतो, हेंच तत्व बुद्धानें स्वीकारल्यामुळें त्या धर्माचा बाह्य देशांत विस्तार फार झाला; आणि आज कालही संघ–शक्तीला पोषक असेंच बुद्धधर्माचें स्वरूप आहे, हें पुढील पद्यांत दिसून येईल:—

॥ सब्ब पापस्स अकरणं, कुसलस्स उपसंपदा,
सचित्त पर्योदपनं, एनं बुद्धस्स सासनम् ॥

१ कोणतेंहि पातक न करणें. २ सत्कृत्यांचें वर्धन करणें, व ३ मन नेहमीं ताब्यांत ठेवणें—हेंच बुद्धाचें शासन होय.

बौद्धधर्माचा प्रभाव सुमारें एक हजार वर्षें हिंदुस्थानांत होता. परंतु त्याचा प्रसार बाह्य प्रदेशांत चीन, जपान व पूर्वेकडील

ब्रह्मदेश व त्या पुढचीं बेटें यांत विशेषतः झाला. आज पृथ्वीवरील सर्व धर्मांत संख्येनें बौद्ध लोक वरचढ आहेत. गौतमानंतर त्याच्या अनुयायांनीं पाटणा शहराजवळ गुहेंत एक सभा भरवून त्याचीं प्रवचनें एकत्र करून त्याचे तीन भाग केले त्यास पीठक अथवा करंडक असें म्हणतात. ह्या मंडळींनीं बौद्धधर्म प्रसाराचें काम मोठ्या झपाट्यानें केलें. बरोबर शंभर वर्षांनीं बुद्धांच्या अनुयायांची दुसरी मोठी सभा भरली त्यांत बौद्ध लोकांत दोन पक्ष झाले. एकानें उत्तरेकडे व दुसऱ्यानें दक्षिणेकडे त्या धर्माचा विस्तार केला. पुढें आणखी शंभर वर्षांनीं चक्रवर्ती राजा अशोक यानें इ. स. पू. २४२ या वर्षीं बौद्ध विद्वानांची तिसरी सभा भरविली आणि त्या धर्मास नवीन चालन दिलें. त्या नंतर आणखी सुमारे चारशें वर्षांनीं राजा कनिष्क यानें बौद्ध धर्माच्या प्रमुख प्रचारकांची चवथी सभा भरवून त्यांतील ग्रंथ संग्रहाचे पुनः एकीकरण केलें. बौद्धभांडार बहुधा पाली भाषेंत आहे. गौतमबुद्धानें पाली भाषेंत लोकांस उपदेश केला. बौद्धांचें व जैनांचें ग्रंथभांडार अपरिमित असून त्यांत अनेक उत्तमोत्तम ग्रंथ व ग्रंथकार झाले. त्यांचे संशोधन होऊन हिंद बाहेरच्या भांडाराची भर त्यांत घातल्यास पुष्कळ प्राचीन इतिहास तयार होईल. हिंदुस्थानांत जैनांची लोकसंख्या सुमारे पंधरा लक्ष आहे; जैन धर्माचा बौद्धधर्मा इतका प्रसार हिंदुस्थानांत झालेला दिसून येत नाहीं,



कुमारिल भट्ट व शंकराचार्य या महा पुरुषांच्या प्रयत्नामुळें बौद्ध धर्माचा हिंदुस्थानांत पूर्ण लोप झाला असें म्हणतात. आज या देशांत बौद्ध धर्माचा एकहि अनुयायी नाहीं यावरून हिंदू धर्म किती मजबूत पायावर उभारला गेला आहे हें स्पष्ट दिसून येतें. बौद्ध धर्म जरी हिंदुस्थानांत नामशेष झाला तरी हिंदु धर्मावर त्याचा परिणाम झाला तो येणें प्रमाणें:—( १ ) बौद्धांच्या अहिंसा तत्वाचा विजय झाल्यामुळें व हिंसा विशेषेंकरून यज्ञांत होत असल्यामुळें यज्ञविधी कमी झाले. ( २) बौद्धांचें मोठमोठे विहार व त्यांत स्थापना केलेल्या बुद्धांच्या मूर्ति पाहून हिंदुधर्मांतहि मूर्तिपूजेचा प्रसार वाढला. (३) बुद्धधर्मांत बुद्ध, धर्म, आणि संघ अशी त्रयी होती, त्याप्रमाणें हिंदुधर्मांतहि ब्रह्मा विष्णू व महेश हे देवतात्रय झाले. ( ४ ) आर्यांचे मूळ देव पंचमहाभूतें त्यांना अग्नीच्या द्वारें सर्व कांहीं अर्पण करीत. असे अग्नी प्रत्येक कुटुंबांत होते. त्यांना गृह्याग्नि म्हणत ते बंद झाले.

शंकराचार्यांनीं भरतखंडांत बौद्धाचें खंडन करून अद्वैतमताची स्थापना केली असा बहुतेक लोकांचा समज आढळतो; परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. शंकराचार्यांचा अवतार होण्यापूर्वींच भरत खंडांत बौध्दमताचा ऱ्हास झालेला होता. अशोक, कनिष्क, इत्यादि राजानीं बौद्धधर्मास राजाश्रय देऊन तो राष्ट्रधर्म बनविण्याचे जारीनें प्रयत्न केले होते. तथापि वैदिकधर्माचा लोप कधींच झाला नाहीं. इ. स. पूर्वी २५० पासून इ. स. ९००-

पर्यंत म्हणजे १००० वर्षांपेक्षां कांहीं जास्त कालपर्यंत हे दोन्ही धर्म एकाच ठिकाणीं चालू होते. बौद्धलोकांचे विहार व ब्राम्हणांचीं देवालयें जवळ जवळ दृष्टीस पडत. इ. स. ६३४ त शिलादित्यानें, बौद्धधर्माचा प्रसार व्हावा म्हणून चोहोंकडून लोक बोलावून मोठी सभा भरविली. त्यावेळीं २१ मांडलीक राजे व त्यांच्या राज्यांतील मोठमोठे विद्वान, बौद्धधर्मांतील भिक्षु आणि ब्राह्मण हे सर्व त्या सभेला आले होते. बौद्ध व वैदिक ह्या दोहो धर्मांच्या सत्यासत्यतेचा विचार करावा हाही त्या सभेचा उद्देश होता; व त्याप्रमाणें बौद्ध आणि ब्राम्हण यांच्यामध्यें मोठाच वादविवाद झाला. अशा रीतीचे अनेक प्रसंग होऊन सातव्या शतकाच्या अखेरीस व आठव्या शतकांत वैदिकधर्म अधिकाधिक बळावत चालला. ज्या ब्राह्मणपंडितांना बौद्धांस जिंकिले त्यापैकीं कुमारिल. भट्ट हा पहिला होय. कुमारिलभट्टानें सर्व वेदांचें अध्ययन केलें होतें व सर्व शास्त्रांत प्राविण्य संपादन केलें होतें. व तेंच त्यांस बुद्धांशीं वाद करितांना फार उपयोगी पडलें. त्यानें पूर्वमिमांसेचें परिशीलन उत्तम करून शाबरभाष्यावर वार्तिकें लिहीलीं होतीं. जैमिनेय सूत्रें, ब्राह्मण व कल्प यांच्या अनुरोधानें श्रुतीचें अर्थ विधिपर दाखवून त्यानें प्रथम कर्मकांडाची सिद्धि केली व तेणें-करून बौद्धांस जिंकून टाकिलें. यामुळें कुमारीलभट्टाची कीर्ति भरतखंडभर पसरली होती. इसवीसनाच्या आठव्या शतकांत तो आपल्या मताचा लोकांस उपदेश करूं लागला. इच्छामात्रेंकरून



सर्व सृष्टि उत्पन्न करून तिचें नियमन करणारा असा एक परमेश्वर आहे, असें जें प्राचीन वैदिक मत त्याचा कुमारीलभट्टानें प्रसार केला. बौद्ध लोक हे स्वतंत्र नियता असा कोणी देव आहे असें मानित नसत. कुमारीलभट्टाचें व्रत त्याच्या पट्ट शिष्यांनीं मोठ्या नेटानें चालवून भरतखंडांत बौद्धमताचा बीमोड करून टाकिला होता. हे पट्टशिष्य म्हटले म्हणजे गुरू, प्रभाकर, मंडनमिश्र, मुरारिमित्र आणि पार्थसारथि हे होत. यावरून पाहतां शंकराचार्यास बौद्धलोकांशीं वादविवाद करण्याचें प्रयोजनच राहिलें नव्हतें. त्यांनीं इतर दर्शनांची वेदांत शास्त्राशीं संगति दाखवून, त्या शास्त्रास पूर्ण दशेला आणलें व त्यालाच सर्व लोकांना समजेल असें रूप देऊन त्याचा राष्ट्रधर्म बनवून सोडिला, व चवदाव्या शतकांत विद्यारण्यस्वामींनीं हेंच काम पूर्ण केलें. शंकराचार्यांनीं शारीरक भाष्यांत जैन, बौद्ध, चार्वाक, लोकायतिक वगैरे वेदबाह्य मतांचें असें समर्पक निराकरण केलें आहे कीं; त्यांच्या मागून जे जे पंथ निघाले यांतील प्रत्येकाला कोणी परमेश्वर नियंता आहे असें ग्रहण करून चालावें लागे. उच्चवर्णाच्या तत्ववेत्त्यांचें समाधान होऊन ते संतुष्ट होतील, असे आचार्यांचे विचार असून त्यांची विचारसरणी हीन वर्णाच्या लाखो लोकास समजेल व त्यांची भक्ति बसेल अशी असे. त्यांनीं जन्मभर जो उद्योग केला त्यापासून दोन फलें उत्पन्न झालीं. त्यापैकीं एक जुटीचा ब्राह्मणपंथ व दुसरें सर्व लोकांत ज्याचा प्रसार होईल असा धर्म.

यापेक्षां सविस्तर माहिती देण्याची येथें अवश्यकता दिसत नाहीं. जैनसिद्धांत, धर्मसंस्थापक महावीर, तसेंच श्वेतांबर दिगंबर वगैरे पोटभेद इत्यादिबद्दल सविस्तर माहिती पाहिजे असेल त्यांनी मूळ ग्रंथच वाचावेत हा उत्तम मार्ग होय; तरीपण ज्ञानकोश प्रस्तावना खंड ३ पान १२९-१३६ वाचले तर या दोन्हींही धर्मांबद्दल बरीच माहिती कळण्यासारखी आहे.

## प्रकरण २० वें.

### दशविधपातकें.

भगवानबुद्ध यानें पातकाचे दहा प्रकार सांगितले ते येणें प्रमाणें:-

॥ अदत्तानामुपादानं हिंसा चैवाविधानतः ॥ परदारोपसेवाच कायिकं त्रिविधं स्मृतम् ॥ पारुष्यमनृतं चैव पैशुन्यं चापि सर्वशः ॥ असंबद्धप्रलापश्च वाङ्मयं स्याच्चतुर्विधम् ॥ परद्रव्येष्वाभिध्यानम् मनसानिष्ट चिंतनम् ॥ वितथाभिनिवेशश्च मानसं त्रिविधं स्मृतम् ॥

याचें भाषांतर येणेंप्रमाणें:—

१ कायिक पातकें तीन प्रकारचीं ठरविलीं आहेत. तीं येणें प्रमाणें:—

( १ ) दिल्यावाचून वस्तु घेणें. ( २ ) शास्त्राज्ञेवाचून हिंसा करणें. ( ३ ) परस्त्रीगमन.

२. वाचिक पातकें चार प्रकारचीं सांगितलीं आहेत. तीं येणें प्रमाणें:—

( १ ) कठोर भाषण. ( २ ) खोटें बोलणें. ( ३ ) चाहडी सांगणें. ( ४ ) असंबद्ध बोलणें.

३ मानसिक पातकांचे तीन प्रकार सांगितले आहेत. ते येणें प्रमाणें:—

( १ ) परद्रव्यापहरण करण्याचा विचार. (२) दुसऱ्याचें वाईट इच्छिणें. ( ३ ) एखाद्या वस्तुविषयीं खोटा आग्रह धरणें.

प्रोफेसर मॅक्समुल्लर यानें बुद्धाच्या धम्मपद ग्रंथाचें भाषांतर ( वॉ १० ) केलें आहे त्यांतील अनुकरणीय नैतिक सूत्रांतून सदरील दशविध पातकांचें वर्णन केलें आहे; आणि त्यांचें जे विशेष स्पष्टीकरण केलें आहे तें येणें प्रमाणें:—

## दिल्यावाचून वस्तू घेणें ( चोरी )

चोरीचा अपराध घडला आहे हें निश्चित करण्यापूर्वी पांच प्रकारचे मुद्दे पाहिले पाहिजेत ते असे:—१ ती वस्तू दुसऱ्या कोणाची तरी असली पाहिजे. २ चोरून घेतलेली वस्तू अमुक एकाची आहे असें निश्चित झालें पाहिजे. ३ वस्तू चोरून घेण्याचा उद्देश (इरादा) असला पाहिजे. ४ वस्तू चोरून कबजांत घेण्याचा प्रयत्न होऊन तशी क्रिया घडली पाहिजे. ५ ती वस्तू घेणाराच्या प्रत्यक्ष कबजांत असली पाहिजे.

## हिंसा करणें ( जीव घेणें. )

जीव घेण्याचा अपराध घडला आहे हें निश्चित करण्यापूर्वी पांच मुख्य बाबती पाहिल्या पाहिजेत. त्या येणें प्रमाणें:—१ जीव घेणाच्या वस्तूंत जीव आहे याचें ज्ञान असलें पाहिजे.



२ जीव घेण्याची वस्तू प्रत्यक्ष आहे याची खात्री असली पाहिजे. ३ जीव घेण्याचा हेतू (इरादा) असला पाहिजे. ४ जीव घेण्याच्या हेतूनें तशी कांहीं क्रिया घडली पाहिजे. जसें तिरकमट्यानें मारणें, तसेंच भाल्यानें किंवा सोडग्यानें मारणें आणि मारण्यासाठीं चालून, धांवून अगर उडी मारून जाणें. अशा प्रकारचें वर्तन घडलें पाहिजे. ५ प्रत्यक्ष जीव घेतला आहे, म्हणजे सजीव वस्तू निर्जीव झाली असें ठरलें पाहिजे.

जीव घेण्याचे ६ प्रकार आहेत:—(१) जीव घेणाराकडून तरवार अथवा भाला यांचा उपयोग झाला पाहिजे. (२) जीव घेण्यासाठीं एकानें दुसऱ्यास हुकूम केला पाहिजे. (३) जीव घेण्यासाठीं भाला, तीर अगर दगड मारण्याची क्रिया घडली पाहिजे. (४) कपटानें फसवून जीव घेणें. जसें खड्डे खणून त्यावर हलकेंसें वस्त्र झाकणें अगर त्यांत विषारी पाणी भरणें व त्यावर सजीव वस्तूस नेणें. (५) जादू टोणा अगर चेटुक करून जीव घेणें, आणि ( ६ ) राक्षसाकडून अगर मारेकऱ्याकडून मारविणें.

जीव घेण्याला आठ कारणें असावीं लागतात. १ दुष्ट हेतू, अथवा २ क्रोध. ३ अज्ञान. ४ अहंकार. ५ लोभ. ६ दारिद्य. ७ विषयासक्ति अथवा ८ कायदा.

## व्यभिचार ( परस्त्रीसंग. )

सदरहू बाबती संबंधांत ज्या प्रकारच्या स्त्रिया वर्ज्य मानल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:-१ ज्या स्त्रीचें रक्षण तिचे आप्तविषयीं करतात.

२ पैसे देऊन जिची खरेदी झाली आहे. ३ जी स्वेच्छेनें दुसऱ्यांशीं रत आहे व उभयतां एकत्र राहतात. ४ गुलाम म्हणून नसली तरी जी दुसऱ्यासाठीं मजुरी करते. ५ जी वाचादत्त झाली आहे. ६ जी गुलाम म्हणून मालकाजवळ राहत असेल; अथवा स्वतःच्या घरांत कामधंदा करीत असेल. ७ जी युद्धांत लूट म्हणून सांपडली असेल वगैरे, अशाप्रकारची स्त्री दुसऱ्याची मिळकत समजली जाते; म्हणून ती वर्ज्य मानली आहे.

१ जी स्त्री, स्वतःची स्त्री समजण्यास गैरकायदेशीर असेल, २ जिच्याविषयीं वाईट किंवा दुष्ट हेतू असेल, ३ असा दुष्ट हेतु अमलांत आणण्यास कांहीं प्रयत्न अगर क्रिया घडली असेल, ४ तो दुष्ट हेतू सिद्ध झाला असला पाहिजे.

सदरहू गुन्हा घडण्यास वरील चार बाबती पाहाव्या लागतात.

## असत्य ( खोटें ) बोलणें.

असत्य भाषणाचा अपराध घडला हें पाहाण्यास चार मुख्य गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात, त्या येणेंप्रमाणें:—

१ जी वस्तू नसेल ती आहे असें सांगणें. २ ती वस्तू नव्हती अशी खात्री झाली पाहिजे. ३ खरा प्रकार दुसऱ्या माणसाच्या समजण्यांत येऊं नये अशाविषयीं पहिल्या माणसाकडून कांहीं प्रयत्न झाला पाहिजे. ४ सांगितलेली गोष्ट खरी



नाहीं असें फसणाऱ्या माणसाच्या प्रत्यक्ष प्रत्ययास आणून दिलें पाहिजे.

## आळ घेणें ( चाहडी करणें ).

जो कोणी दोघा मित्रांमध्यें शत्रुत्व उत्पन्न करतो, अथवा मंडळींत कलहाचें बीजारोपण करतो, तसेंच तिकडची गोष्ट इकडे व इकडची गोष्ट तिकडे सांगतो, अशा अपराधास चाहडी किंवा आळ घेणें म्हणतात. ज्या माणसाची लोक स्तुति करतात त्यांच्याविषयीं जो वाईट गोष्ट सांगतो, अथवा लाघवीपणा करून दोघा माणसांत त्यांच्या उद्योगधंद्यांत खरेपणाविषयीं प्रश्न उत्पन्न करतो, अशाला सुद्धां चाहाडखोर म्हणतात.

## असंबद्ध भाषण करणें.

योग्य संधी आल्यावांचून उगाच बडबड करणें अगर बाता मारणें, अथवा ज्यापासून कोणताच फायदा नाहीं अशा विषयावर भाषण करणें —अशा भाषणास असंबद्ध भाषण म्हणतात.

## लोभ किंवा लालुच.

दुसऱ्याची कोणतीही चांगली वस्तु पाहिली कीं, ती आपल्यास हवीशी वाटणें अथवा ती आपलीच असती तर फार उत्तम झालें असतें अशा विचारांत निमग्न असणें,—यालाच लोभ म्हणतात.

## खुनशीपणा.

जो धर्मशास्त्र मानीत नाहीं अथवा व्यवहार शास्त्रावर आणि कोणत्याहि नैतिक बाबतीवर ज्याची श्रद्धा नाहीं; तसेंच जो धार्मिक विषयावरील चर्चेंत भलतेच प्रश्न उत्पन्न करतो, दुसऱ्यास स्वत:सारखा नास्तिक होण्याची भर देतो आणि दुसऱ्यास नैष्ठिक होण्यास जो प्रतिबंध करतो—अशा माणसास खुनशी म्हणतात.

---

# प्रकरण २१ व

## सर्व साधारण ( सामाजिक-नैतिक ).

**१. कैफ आणणें:**—कैफ आणण्याच्या उद्देशानें मद्य ( दारू ) पिणें, व आणण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न करून प्राशन करीत असतांना गळ्याखालीं उतरलें म्हणजे नियमाचा भंग झाला असें समजलें जात असे; म्हणून ताडी, दारू, अगर कोणताहि मादकपदार्थ सेवन करण्याची नियमानें मनाई केली आहे.

**२. जुगार खेळणें:**—जुगार खेळण्याच्या अड्डयावर हरहमेष जाण्याचा प्रघात ठेवल्यानें सहा प्रकारचे दुष्परिणाम घडतात, ते येणेप्रमाणें:—

(१) जो जुगार खेळण्यांत हरतो तो, जो जिंकतो त्याच्यावर अतिशय संतापतो.

(२) स्वत:ला प्राप्त होण्याचा विषय दुसऱ्याला मिळतो म्हणून तो फारच कष्टी होतो.

(३) हरणाऱ्याची मिळकत फुकट जाते.

(४) जेव्हां जुगाऱ्याची फिर्याद न्यायमंदिरांत चालू असतांना तो जो पुरावा रुजू करतो, त्यावर व त्याच्या

साक्षीवर, तो खरें प्रतिपादन करीत असतांहि, त्याचें प्रतिपादन न्यायाधीश ग्राह्य करीत नाहीं.

(५) त्याच्या इष्टमित्रांचा आणि उपरी अधिकाऱ्यांचा त्याच्या सांगण्यावर विश्वासच बसत नाहीं.

(६) त्याला कोणी मुलगीहि देत नाहीं ( त्याचें लग्न होत नाहीं ) कारण तिच्या हौशीप्रमाणें व आवडीप्रमाणें तिला वस्त्रालंकार व हिऱ्या मोत्याचे दागीने पुरविण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नसतें.

३. **आळस**:—" आज फार उष्णता आहे ! आज थंडी आहे ! आज फारच लवकर आहे !" असें म्हणून जो नेहमींचें आपलें काम करीत नाहीं, त्यास आळशी म्हणतात; व तो अस्तित्वाच्या साधनांस मुकलाच असें समजावें.

४. **वाईट संगत** ( कुसंगती ):—दुराचारी मित्र, मूर्ख माणसांचा नित्य समागम, आणि ज्यांना वाईट व घातुक संवयी आहेत अशा दुष्ट माणसांत नेहमीं मिसळणें—अशा वाईट माणसांच्या समागमानें मनुष्य ऐहिक व पारलौकिक नाशास पात्र होतो.

५. **करमणुकीस्तव खेळण्याच्या जागा**:—अशा प्रकारच्या जागेंत नित्य जाणें येणें ठेवल्यानें सहा प्रकारचे परिणाम उद्भवतात, व पुढें लिहिलेल्या विषयसेवनानें आपलें चंचल मन पाशांत सांपडून संपूर्ण फसलें जातें:—१ नृत्य. २ गाणें. ३ बजावणें.



४ जुगार. ५ टाळयांचा गजर. ६ पाण्यानें भरलेल्या मडक्यांचा खेळ ( एक प्रकारचा जुगार ).

## आईबाप आणि त्यांचीं मुलें.

आईबाप यांनीं पाळावयाचे नियमः—

(१) अधर्माचरण व पापाचरण यांचा विटाळ स्वतःच्या मुलांना होऊं न देण्याविषयीं काळजी घेतली पाहिजे.

(२) मुलें सद्गुणी निपजण्यासाठीं अहोरात्र झटलें पाहिजे.

(३) मुलें कलाविशारद व शास्त्रनिपुण निघतील अशा प्रकारचें शिक्षण त्यांना दिलें पाहिजे.

(४) मुलाला पाहिजे तशी बायको व मुलीला पाहिजे तसा नवरा मिळवून दिला पाहिजे.

(५) न्यायदृष्टीनें, मुलांना ज्यांचा त्यांना, वारसा दिला पाहिजे.

मुलांना असें जाणलें पाहिजे कीं:—

(१) ज्यांनीं आमचें पालनपोषण केलें त्यांचें (आईबापांचें) आम्हीं पालनपोषण करूं.

(२) कुलाचारास अनुसरून आम्हीं आमचें कर्तव्य यथायोग्य करूं.

(३) आम्ही त्यांच्या मालमिळकतीचें योग्य रीतीनें संरक्षण करूं.

(४) वडिलांच्या नांवलौकिकाप्रमाणें शोभेल असाच आम्ही त्यांचे वारस या नात्यानें नांवलौकीक मिळवूं.

(५) आईबाप दिवंगत झाल्यावर त्यांच्या सन्मानार्थ आम्ही त्यांचें स्मारक (श्राद्ध) करूं.

गुरु आणि शिष्य.

(१) जीं जीं म्हणून चांगलीं कामें आहेत तीं तीं यथायोग्य करण्याची संवय लावून,

(२) विद्येचें ज्ञान सत्वर ग्रहण करतील अशा प्रकारचें शिक्षण देऊन,

(३) ते विद्याविनयसंपन्न व शास्त्रसंपन्न होतील अशाविषयीं त्यांना उपदेश करून,

(४) मित्र मंडळींशीं व सहवासांत येणाऱ्या सर्व लोकांशीं बोलतांना त्यांच्या सद्गुणांचें वर्णन करून,

(५) संकटांच्या व भयाच्या प्रसंगीं त्यांना धीर देऊन व त्यांचे रक्षण करून,

गुरूंनीं आपल्या शिष्यवर्गाविषयीं प्रेम व्यक्त केलें पाहिजे; आणि—

(१) गुरुजींचें दर्शन होतांच नम्रपणें उठून उभें राहून,

(२) त्यांची योग्य शुश्रूषा करून,

(३) त्यांच्या आज्ञेंत राहून,

(४) त्यांना वेळोवेळीं जे पाहिजे असेल तें पुरवून,

(५) त्यांचा उपदेश चांगल्या रीतीनें लक्षांत धरून,

शिष्यवर्गांनीं आपल्या गुरूविषयीं आदर व्यक्त केला पाहिजे.



## नवरा आणि बायको.

(१) नवऱ्यानें बायकोला आदरानें, मायाळूपणानें, एकपत्नी व्रतानें, आणि एकनिष्ठेनें, तिला सर्व लोक सन्मान देतील व चांगलें म्हणतील अशा रीतीनें, आणि तिला तिच्या हौशीप्रमाणें वस्त्रालंकार पुरवीत जाऊन, वागविलें पाहिजे.

(२) बायको नवऱ्याशीं प्रेमानें व एकनिष्ठेनें वागते असें केव्हां म्हणतां येईल ? कीं जेव्हां ती, घरांतील सर्व टापटीप व्यवस्थेशीर ठेवीत जाईल, आप्तविषयीं व मित्रमंडळी यांचे योग्य रीतीनें आदरातिथ्य करीत जाईल, कडकडीत पातिव्रत्यानें आपलें आचरण ठेवीत जाईल, काटकसर करून मोठ्या थाटानें राहणारी गृहिणी म्हणवून घेईल, आणि सतत उद्योगी राहून प्रत्येक कामांत स्वतःचें चातुर्य व तत्परता दाखवील.

## मित्रमंडळी आणि बरोबरीचे सोबती.

अन्नुदार आणि थोर मनाच्या गृहस्थानीं स्वतःच्या गृहस्थ-धर्माला अनुसरून आपल्या मित्रमंडळीशीं आणि बरोबरीच्या सोबत्याशीं वर्तन व व्यवहार ठेवतांना खालीं दिलेले मुद्दे अवश्य लक्षांत बाळगावे :—

१ देणग्या व भेटी देणें. २ सभ्य भाषण करणें. ३ हित, आस्था व कळकळ वाढविणें. ४ समदृष्टी ठेवून आपल्या

बरोबरीच्या नात्यानें वागविणें. ५ चढत्या काळांत व पडत्या काळांत समभागी होणें. ६ बेसावधपणाच्या स्थितींत समोरच्या माणसानें त्यावर सावधपणानें देखरेख ठेवणें. ७ निष्काळजीपणाच्या स्थितींत समोरच्या माणसानें त्याच्या मालमिळकतीवर काळजीपूर्वक देखरेख ठेवणें. ८ संकट काळांत आश्रय देणें. ९ ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडल्यास समोरच्या माणसानें त्याला चिकटून राहणें आणि १० कुटुंबांतील माणसांनां मायाळूपणानें वागविणें.

## धनी आणि नोकर.

१ धन्यानें आपल्या नोकराच्या कल्याणासाठीं जें काम सोपणें तें त्याचें सामर्थ्य पाहूनच सोपलें पाहिजे.

२ त्याला माफक खोराक व पगार नियमीत वेळीं पुरविला पाहिजे.

३ आजारीपणांत त्याच्या औषधपाण्याची नीट व्यवस्था ठेवणें.

४ त्यांची भीड मुरवत संभाळून त्यांत भाग घेणें.

५ सण तेहेवारांची त्यांना रजा देऊन मोकळे सोडणें.

६ नोकरानें आपल्या धन्याशीं मिळून मिसळून तत्परतेनें वागलें पाहिजे.

७ नित्य व्यवहाराचे कामकाज आटोपून धनी विश्रांति घेण्यास गेल्यानंतर नोकरानें विश्रांति घेण्यास जावें.



८ धन्याचीं कामें आनंदानें व हसतमुख ठेवून पूर्ण करणें.

९ जें मिळेल त्यांतच समाधान मानणें.

१० धन्याविषयीं लोकांत चांगलें बोलत जाणें.

## गृहस्थ आणि मठवासी ( जोगी )

गृहस्थांनीं मठवासी जोगी आणि ब्राह्मण यांच्याशीं कशा रीतीनें वर्तन ठेविलें पाहिजे त्या बाबती येणें प्रमाणें :–१ प्रत्यक्ष कृतीनें प्रेम दाखविणें, २ गोड व प्रेमाच्या शब्दानें, ३ प्रेमयुक्त विचारांनीं, ४ रोख आदरातिथ्यानें, ५ त्यांना पाहिजे तें पुरवून त्यांच्या ऐहिक अडचणी दूर करणें.

मठवासी जोगी आणि ब्राह्मण यांनीं गृहस्थलोकांशीं कसें वर्तन ठेविलें पाहिजे त्या बाबती येणेप्रमाणें:–१ त्यांना दोन गोष्टी हिताच्या सांगून, दुर्व्यसन व वाईट मार्ग यापासून त्यांचें मन वळविणें. २ त्यांना सन्मार्गोत्तेजक असा बोध करणें. ३ मोठ्या कळकळीनें त्यांच्या मनांत चांगल्या गोष्टी ठसविणें. ४ धार्मिक बाबतींत त्यांना योग्य सूचना करणें. ५ त्यांचें शंका–निरसन करणें. ६ त्यांना उत्तमलोकाचा मार्ग दाखविणें. बुद्धानें असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, जे वर दर्शविल्याप्रमाणें स्वतःचें वर्तन ठेवितील ते गृहस्थाश्रमाच्या मोठ्या योग्यतेस पात्र होतील.

## भिक्षू आणि भिक्षुणी

### ( संप्रदाय व अन्योन्य संबंध )

१ भिक्षूला त्याची इच्छा असेल तेव्हां स्वतःचे भिक्षापात्र व पीत वस्त्र यांचा त्याग करून पुनः गृहस्थाश्रम स्वीकारण्यास मोकळीक असे.

२ भिक्षुणींचा संप्रदाय भिक्षूंच्या संप्रदायाच्या देखरेखीखालीं ठेविला जात असे.

३ विवाहित स्त्रीस अगर अविवाहित स्त्रीस भिक्षुणीची दीक्षा घ्यावयाची असेल तेव्हां, त्यांना दोन वर्षेपर्यंत सहा प्रकारचे नियम पाळण्याचा संकल्प करावा लागत असे; ते नियम येणेंप्रमाणें:—

(१) अहिंसा ( सजीव प्राण्यांची हत्या न करणें ).

(२) चोरी न करणें.

(३) व्यभिचार न करणें.

(४) खोटें न बोलणें.

(५) मादक पदार्थ वर्ज्य करणें.

(६) मनाई केली असेल अशा वेळांत आहार न करणें.

याप्रमाणें दोन वर्षेपर्यंत अव्याहत वर दर्शविल्याप्रमाणें कडकडीत व्रतपालन खऱ्या संकल्पानें जी करील, तिला भिक्षुणींच्या संप्रदायाचे नियम लागू करण्यांत येत असत. भिक्षूंचे आणि भिक्षुणींचे सांप्रदायिक नियम बहुतेक एकसारखेच असत.



४. शेंकडो वर्षांपूर्वींच्या जुन्या संप्रदायाची जरी भिक्षुणी असली तरी, तिनें प्रत्येक भिक्षूचा उठून उभे राहून हात जोडून सत्कार केला पाहिजे; आणि त्यांचें यथा योग्य आदरातिथ्य केलें पाहिजे.

५. पावसाळ्यांत ज्या प्रांतांत भिक्षूंचा मुक्काम नसेल अशा ठिकाणीं भिक्षुणींना राहण्यास परवानगी नव्हती.

६. दर पंधरवड्यांत फक्त एक वेळा भिक्षुणीनें भिक्षूकडे दोन बाबतींस्तव गेलें पाहिजे. त्या बाबतीः—( १ ) धार्मिक नित्यविधि करणें, आणि ( २ ) धार्मिक प्रवचनें श्रवण करणें.

७. भिक्षुणीकडून जर एखादा भयंकर अपराध घडला असेल तर तिनें भिक्षूंच्या संप्रदायास अनुसरून पाक्षिक प्रायश्चित्त घेतलें पाहिजे.

८. कोणत्याहि कारणावरून भिक्षुणीनें भिक्षूची निंदा करूं नये व खरडपट्टीहि काढतां कामा नये.

९. दर पंधरवड्यांत एकदां मठांत एक भिक्षू दुसऱ्या एका भिक्षूच्या समक्ष भिक्षुणीची वाट पाहत खोळंबून बसतो. त्यानंतर भिक्षुणी प्रत्यक्ष तेथें येऊन त्या भिक्षूला नम्रतापूर्वक नमस्कार करते व आसनस्थ बसते; लागलींच तो भिक्षू आपल्या धार्मिक प्रवचनास प्रारंभ करतो. प्रवचन ऐनरंगांत आलें म्हणजे शंका निरसनास्तव उभयतांचीं प्रश्नोत्तरें होत असत.

१० कोणत्याहि प्रसंगीं भिक्षूच्या सहवासांत मिसळण्यास भिक्षुणीला परवानगी मिळत नसे, आणि त्याचप्रमाणें भिक्षूला भिक्षुणीच्या सहवासांत मिसळण्यास सक्त मनाई असे. फक्त भिक्षुणी जर आजारी असली तर तिच्या मनाच्या समाधानास्तवच भिक्षूला तिच्याकडे भेटीस्तव जाण्यास तेवढी परवानगी मिळत असे.

११ भिक्षुणीनें भिक्षूबरोबर मुशाफरी करणें, एकाच नौकेंत बसून दूरचा प्रवास करणें, उभयतांनीं एकान्त करणें, ह्या बाबतींची सक्त मनाई करण्यांत आली होती.

१२ रानावनांत आश्रम बांधून राहण्यास भिक्षुणीला मनाई होती; गावांतील वस्तीच्या आश्रयानें झोपडींत किंवा मठांत त्यांनीं राहिलें पाहिजे. एकटे दुकटे कधींहि राहतां कामा नये. दोघींनी किंवा त्यापेक्षां जास्त भिक्षुणींनीं एकत्र राहिलें पाहिजे.

१३ भिक्षूभिक्षुणींचे दररोजचे धार्मिक विधि एकसारखेच ठेवण्यांत आले होते.

## ब्रह्मचर्य आणि तपश्चर्या.

पातिमोक्ख ( प्रातिमोक्ष ) नांवाच्या प्रसिद्ध पालीभाषेंतील ग्रथांत भिक्षूंनीं पाळण्याचे नियम व नित्यविधी स्पष्ट दिले आहेत. हा ग्रंथ "प्रायश्चित्त" या विषयावर लिहिला गेला आहे, व तो विनयपिटकाचा मुख्य भाग आहे. बौद्धभिक्षूंच्या आयुष्यक्रमांत (१) कडकडीत ब्रह्मचर्य व (२) तीव्र तपश्चर्या, ह्या दोन मह-



त्वाच्या बाबी आहेत. भिक्षू भिक्षूणींना खालीं दर्शविलेल्या बाबतींविषयीं सक्त मनाई केली आहे, व त्याप्रमाणें वर्तन ठेवण्यांत जर चूक झाली, तर त्याच्या शुद्धीस्तव तीव्र प्रायश्चित ठरविण्यांत आलें आहे.

१ स्त्रीपुरुषधर्माचा व्यवहार कोणत्याहि जातीच्या अगर वर्गाच्या प्राण्याशीं नसावा.

२ बुद्धिपूर्वक अपवित्रतेचा स्वीकार नसावा.

३ स्त्रियांच्या शरीराशीं निकट संबंध अगर स्पर्श नसावा.

४ स्त्रियांच्या अपवित्रपणायुक्त अंगविक्षेपाची त्यांच्या समोर स्तुति कधींही करूं नये.

५ कुंटणपणाचें नीच काम अगदीं वर्ज्य करावें.

६ खास राखून ठेवलेल्या जागेंत स्त्रियांनीं पुरुषांजवळ कधींही बसतां कामा नये.

७ भिक्षूंनीं स्वत:चा झगा अगर वस्त्र भिक्षूणीला धुण्यास अगर साफ करण्यास देऊं नये.

८ भिक्षूंनीं भिक्षुणीजवळून झगा कधींच स्वीकारूं नये.

९ ज्यानें तीन वेळां उपाध्यायाचें काम केलें नसेल अशाजवळ निजूं नये.

१० भिक्षूंना भिक्षुणीला अगर स्त्रीला खासगी रीतीनें पांच अगर फार तर सहा बोधपर वाक्यांपेक्षां अधिक वाक्यें उच्चारून उपदेश करूं नये.

११ संघाच्या मंजुरी शिवाय अथवा सूर्यास्तानंतर भिक्षूंनीं भिक्षुणीस उपदेश करूं नये.

१२ भिक्षुणी आजारी असेल तरच भिक्षूनें तिची भेट घेण्यास जावें.

१३ मोठा समूह असेल तर अगर मोठ्या संकटाची भीती असेल तरच भिक्षूनें भिक्षुणीबरोबर मुशाफरी करावी.

१४ कोणत्याही जागेंत स्त्रीसंपर्क होण्याचा संभव असेल तर तेथें मिसळूं नये.

१५ खास कारणावाचून भिक्षूनें स्त्रीशीं संभाषण करूं नये.

प्रत्येक बौद्धभिक्षु स्वतःच्या संप्रदायास इतक्या तीव्र बंधनानें जोडला जातो कीं, ज्याप्रमाणें धडापासून शिर निराळें केलें म्हणजे धडांत जीव राहणें अगदींच अशक्य आहे, त्याप्रमाणें बौद्धभिक्षूनें जर कोणाबरोबर स्त्रीपुरुषधर्माचरण केलें तर तो ब्रह्मचर्यव्रतापासून भ्रष्ट झाल्यानें "शाक्यपुत्र" असें म्हणवून घेण्यास अगदींच नालायक ठरतो.

भिक्षूनें या नाशवंत जगापासून अगदीं अलिप्त व विरक्त राहावें, असें सांप्रदायिक नियमानें ठरून चुकलें आहे; कारण तसें राहिल्यानें या जगांतील अनेक प्रकारच्या अपवित्र मोहन्या टाळतां येतात हें उघड आहे. म्हणून अशा बाबतींत स्वतःच्या दृष्टिपथाचीं द्वारें बंद करून स्वस्थ राहणें हेंच उत्तम होय. नाहींपेक्षां जे डोळे उघडे ठेवल्यानें पापवासना उद्भवतात, त्या डोळ्यांत लोहदंड



चांगला लालभडक तापवावा आणि तो त्यांत खुपसून मोकळें व्हावें; हेंच श्रेयस्कर होय.

सांप्रदायिक नियम एकनिष्ठेनें पाळणारा जो खरा बौद्धभिक्षु असेल त्यानें अनावर विषयासक्तीचा त्यागच केला पाहिजे; तरी पण तें ब्रह्मचर्यव्रतपालन गौणप्रकारचें समजलें जात होतें. मायामोहविकारांचा अगदीं संपूर्ण त्याग स्वीकारला पाहिजे. या मानवीसृष्टीशीं आपला संबंध आहे अगर होता, या सर्वांचा त्याला पुरता विसरच पडला पाहिजे.

बौद्धभिक्षूनें जमीन खोदणें अगर खोदविणें, आणि गवत व झाडें कापणें, ह्या बाबती वर्ज्य केल्या पाहिजेत; तसेंच ज्यांत जीवजंतूकिडे असतील अशा ठिकाणीं पाणी शिंपडणें वर्ज्य केलें पाहिजे, अथवा कोणाकडून तसें करवितां कामा नये; तसेंच सैन्य पाहणें वर्ज्य केलें पाहिजे.

भिक्षूनें गांवांत प्रवेश न करणें बरें; तसेंच गांवांत जाऊन मोठ्यानें हंसत बसणें हें रास्त नव्हे. त्यानें हलक्या सुरांत भाषण करावें, सावकाश चालावें, हात उगाच इतस्ततः हालवूं नये, मस्तक फिरवूं नये, कमरेच्या खवाट्यावर हात ठेवूं नये, व तोंड झाकूं नये. गांवांत जाऊन टांचेवर बसूं नये, व आळसानें अंग टाकून पडूं नये. त्यानें उभ्यानें लघ्वी अगर शौचविधि करूं नये आणि उगवलेल्या भाजीपाल्यांत व पाण्यांतहि तो प्रकार वर्ज्य करावा.

भिक्षूनें गीत, वाद्य, नर्तन (नाच) अशा प्रकारचें संगीत, जलशास जाणें वर्ज्य करावें. तसेंच नाटक पाहण्यास जाऊं नये व त्यांत नटाचें कामहि करूं नये.

उच्चप्रतीच्या, बहुमानार्थ सिद्ध केलेल्या, श्रीमंती थाटाच्या किंवा विषयोपभोगार्थ तयार केलेल्या जागा अथवा रत्नखचित सिंहासनें ह्या बाबती भिक्षूनें वर्ज्य केल्या पाहिजेत. गवतादिकांचीं पानें—अशा क्षुल्लक वस्तुसुद्धां त्यानें दिल्यावाचून घेऊं नये. चंदनाचें खोड अगर त्याच्या किमती इतकी किंवा अधिक किमतीची कोणतीहि वस्तु त्यानें घेऊं नये; आणि जर घेतली तर श्रवणाच्या पदापासून तो भ्रष्ट झाला असें समजलें जात असे.

बत्तीस विषय असे ठरवून ठेवले आहेत कीं, त्या संबंधांत भिक्षूनें बोलतां कामा नये. ते ३२ विषय येणें प्रमाणें:—

(१) राजेलोकांविषयीं. (२) चोराविषयीं. (३) राजाचे पाहारेकऱ्याविषयीं. (४) सैन्याविषयीं. (५) भीति उत्पन्न होईल अशा वर्णनाविषयीं. (६) लढायाविषयीं. (७) मोठ्या सभेंत अगर सैन्यांत हजर राहून गोंगाटयुक्त व्याख्यान देणें अगर अलंकारयुक्त भाषण करणें. (८) आहाराबद्दल. (९) पेय पदार्थाविषयीं. (१०) वस्त्रप्रावर्णाविषयीं. (११) वाहनाविषयीं. (१२) पलंग, माचा, खाटलें याविषयीं. (१३) माळा, हार, याबद्दल. (१४) सुगंधी द्रव्याविषयीं. (१५) गायनाबद्दल. (१६) गांवांबद्दल, (१७) नगराबद्दल. (१८) शहरांविषयीं. (१९) प्रांताविषयीं. (२०) आप्तविषयांबद्दल. (२१) स्त्रियांविषयीं. (२२) मादकद्रव्यें, दारू, अशाविषयीं. (२३) गल्ल्याशेज्या याबद्दल. (२४) भुतांविषयीं. (२५) दिवंगत झालेल्या आप्तवर्गाबद्दल. (२६) द्रव्य, संपत्ति, याबद्दल. (२७) पृथ्वीच्या मूळाबद्दल. (२८) भविष्य सांगणाऱ्याच्या मूळाबद्दल. (२९) नास्तिक लोकांच्या सूक्तीविषयीं. (३०) मानसिक दोषाबद्दल. (३१) स्त्रीपुरुषधर्माच्या रतिसुखाविषयीं, आणि (३२) अशा सुखाविषयीं कल्पना करीत बसण्याबद्दल.



खरा भिक्षु कसा ओळखावा? आणि तो निर्वाणपदाला पोंहचण्यास लायक झाला आहे किंवा नाहीं, हें कसें समजावें? याबद्दल विशुद्धिमार्गसूत्रांत स्पष्ट खुलासा असा आहे कीं, ज्यानें—१ राग, २ द्वेष आणि ३ मोह या त्रिदोषांना जिंकून त्यावर संपूर्ण स्वामित्व मिळविलें असेल त्यासच खरा भिक्षू म्हणतां येईल.

———

## प्रकरण २२ वें

### बुद्धाचे उद्गार ( नीतिविषयक सूत्रें )

मङ्गलसुत्त ( मङ्गलसूत्र ) नांवाच्या नीतिविषयक सूत्रांत बुद्धाचे उद्गार दिलेले आहेत त्यांपैकीं वाचकांसाठीं मुख्य मुख्य सूत्रें या खालीं देण्यांत येत आहेत:—

१. शहाण्याचे चाकर व्हावें पण मूर्खाची चाकरी कधींहि करूं नये हेंच उत्तम सुख होय.

२. जे बहुमानास पात्र आहेत अशांनाच बहुमान द्यावा; हेंच उत्तम सुख होय.

३. जेथें खरा आनंद प्राप्त होईल अशाच ठिकाणीं वास्तव्य करावें; हेंच उत्तम सुख होय.

४. पूर्व जन्मांत केलेले सुकृत परम सुखाचें साधन होय.

५. न्यायनीतीला अनुसरून अंत:करणांत इच्छा धरणें हेंच खरें सुख होय.

६. ज्ञान व शिक्षण यांतच खऱ्या सुखाची प्राप्ति असते.

७. आत्मसंतोष व गोड भाषण यांतच खरें सुख आहे.

८. जो शब्दोच्चार करावा तो चांगल्याविषयीं करावा हेंच खरें सुख होय.



९. आईबापांना जवळ बाळगून त्यांचें पोषण करणें हेंच उत्तम सुख होय.

१०. बायको व मुलें यांना जवळ बाळगून त्यांचें पोषण करणें हेंच उत्तम सुख होय.

११. सुखशांतीनें चालणारा उद्योग धंदा असेल त्यास अनुसरणें हेंच उत्तम सुख होय.

१२. भिक्षा घालणें आणि नेकीनें राहणें हेंच उत्तम सुख होय.

१३. आप्तविषयांना मदत करणें हेंच उत्तम सुख होय.

१४. कोणतेंहि काम केल्यानें माथ्यावर दोष येईल असें काम न करणें हेंच उत्तम होय.

१५. पापकर्माचा तिरस्कार करणें व त्यापासून दूर असणें हेंच उत्तम सुख होय.

१६. तीव्र पेय्यांचा बिटाळसुद्धां होऊं न देणें हेंच उत्तम सुख होय.

१७. सत्कर्माचा कंटाळा न करणें हेंच उत्तम सुख होय.

१८. पूज्य बुद्धि व श्रद्धा, नम्रता, संतोष, कृतज्ञता, वेळोवेळीं स्वत:च्या धर्मबंधनांचें अंत:करणपूर्वक श्रवण करणें यांतच उत्तम सुख आहे.

१९. दीर्घानुभवानें सहनशील होणें, सौम्य असणें, शांत वातावरणांत मिसळून राहणें, आणि ठरीव वेळीं धार्मिक भाषण, यांतच उत्तम सुख आहे.

२०. आत्मसंयमन आणि पवित्रता यांत उत्तम सुख आहे.

२१. ॥ सत्येन धार्यते पृथ्वी सूर्यस्तपति सत्यतः ॥ सत्येन वायवो वान्ति सर्वं सत्यं प्रतिष्ठितम् ॥ सत्याचा असा महिमा आहे म्हणून सत्याचें ज्ञान संपादन करणें हेंच परम सुख होय.

२२ निर्वाणाविषयीं केवळ वाचाळ पंचाविशी न करतां त्यास प्रत्यक्ष कृतींत आणून तें संपादन करणें हेंच परम सुखाचें साधन होय.

२३ ॥ एतान्प्रपश्यासि घटान् जल्यंत्रचक्रे ( राहाट गाडगें ) ॥ रिक्ता भवन्ति भरिताभरिताश्वरिक्ताः॥१॥ नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण॥(मेघदूत) यांत वर्णन केलल्या ( सुभाषित ) स्थितीस अनुसरून संसाराच्या भवचक्रांत चढता काळ व पडता काळ यापैकीं पडत्या काळांत ओढवणारीं अनेक संकटें व भयंकर आघात यांत बिलकुल न डगमगतां व घाबरतां त्यांस टक्कर देऊन राहणें यांतच खरें सुख आहे.

२४ प्रत्येक बाजूनें अजिंक्य राहणें आणि प्रत्येक बाजूनें सुरक्षितपणें नीट पाहून पाऊल टाकणें यांतच उत्तम सुख आहे.

बुद्धानें आणखी कांहीं सुबोध वचनें व विधानें लिहून ठेविलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—



२५ मधमाशी फुलावर बसते परंतु त्या फुलाच्या रंगाला अगर सुवासाला यत्किंचितही दुःखवीत नाहीं; फक्त त्यांतील मधु ( अमृत ) तेवढें घेऊन उडून जाते. त्याप्रमाणें शहाण्या मनुष्यानें या जगांत स्वतःची राहणी ठेवावी.

२६ एखाद्यानें लढाईंत हजारो माणसांना जिंकून त्यावर स्वामित्व मिळविलें तरी त्यास खरा जेता म्हणतां येत नाहीं; पण जो स्वतःला जिंकून स्वतःवर स्वामित्व संपादन करतो त्यालाच खरा जेता म्हणतां येईल.

२७ मनाला धरून ठेवणें हें मोठें जड जातें, कारण तें नेहमीं उडून जाण्याचा प्रयत्न करीत असतें; अशावेळीं त्यावर एकदम झपाट्यानें हल्ला केला तर तें आपलें ऐकतें ( ताब्यांत येतें ) तात्पर्य—मनाला वठणीस आणून वश करणें (आपलेंसें करणें) यांतच शाश्वत सुखाचें मूळ आहे.

२८ द्वेष केल्यानें द्वेष नष्ट होत नाहीं पण प्रेम केल्यानें मात्र द्वेष नष्ट होतो, कारण त्याचा स्वभावधर्मच असा आहे.

२९ सात्विक वृत्तीनें दया करून रागाला जिंकावें; सत्कर्म करून दुष्कर्माला जिंकावें; कृपणावर देणग्यांचा पाऊस पाडून त्याला जिंकावें आणि खोट्यास खऱ्यानें जिंकावें.

३० नीच जातींत जन्म झाल्यानें त्या मनुष्यास नीच जातीचा म्हणतां येणार नाहीं; तसेंच ब्राह्मण जातींत जन्म झाल्यानें त्या मनुष्यास ब्राह्मण म्हणतां येणार नाहीं; तर—फक्त

त्याच्या गुणकर्मानें त्याला नीच म्हणतां येईल. तसेंच त्याच्या गुणकर्मानेंच त्याला ब्राह्मण म्हणतां येईल. तात्पर्य, जन्मानें नव्हे तर गुणकर्मानेंच जाती ठरली जाते.

॥ ब्राह्मणीं क्षत्रियां कन्यां वैश्यां शूद्रां तथैव च ॥
॥ यस्यां एते गुणाः सन्ति तां मे कन्यां प्रवेदय ॥
॥ न कुलेन न गोत्रेण कुमारी मम विस्मितः ॥
॥ गुणे सत्येच धर्मेच तत्रास्य रमते मनः ॥ (मन्मथनाथ शास्त्री)

पृष्ठ० ९

३१ राग, मद्यप्राशन, दुराग्रह, हटवाद, फसवणूक, मत्सर (हेवा), आत्मस्तुति, दुसऱ्याची अप्रतिष्ठा करणें, अरिष्टसूचक अगर अयाकारक पत्रव्यवहार ह्या सर्व बाबती अपवित्र समजाव्या परंतु वास्तविक पाहिल तर मांसाहार हा कांहीं अपवित्र म्हणतां येणार नाहीं.

३२ मत्स्याहार किंवा मांसाहार, नग्नावस्थेंत चालणें, स्मश्रू करणें, मुक्त केश, खरबरीत वस्त्र, यज्ञविधि, केवळ ह्या सर्व बाबतीपासून अलिप्त राहिल्यानें मनुष्यास शुद्धि प्राप्त होते अथवा तो मोहापासून सुटला असे मात्र समजूं नये.

३३ वेदाला चांगलें मानणें, उपाध्यायाला भेट म्हणून कांहीं अर्पण करणें, देवापुढें यज्ञयाग करून बळी देणें, थंडी, वारा, उष्णता, हद्दीबाहेर सहन करून आत्मनाश करून घेणें, आणि अमरपद प्राप्त होण्यासाठीं अनेक प्रकारचीं खडतर व तीव्र प्रायश्चित्तें घेणें, ह्या सर्व बाबतींमुळें मनुष्यास शुद्धि प्राप्त होत नाहीं; तसेंच तो मोहापासूनहि सुटत नाहीं.



३४ कर्म करण्याच्या अगोदर पुढें मन जात असतें. हेतु हा मुख्य मुद्दा होय. मनापासून कर्में उत्पन्न होतात. जर भ्रष्ट मनानें कर्म करील किंवा भाषण करील तर त्या कर्माच्या मागोमाग भोक्तृत्व हें हात जोडून पुढें उभें रहातें; उदाहरणार्थः—बैलगाडी चालतांना बैलानें पाऊल उंच केलें म्हणजे लागलींच गाडीचें चाक फिरूं लागतें.

३५ जे वरचेवर रागावतात त्यांचा राग कधींच शांत होणार नाहीं. रागाच्या आवेशांत शिव्या ( अपशब्द ) दिल्या, सडकून मारलें व सर्वस्वी लुटलें अशा रागानें राग कधींच शांत होत नाहीं. फक्त भलाईनें अथवा संथपणानें राग शांत होतो. असें आपल्या वाडवडिलांचें मत व त्यांचा उपदेश आहे.

३६ " आपण लवकर मरून जाऊं "— अशाविषयीं माणसें विचार करीत नाहींत; जर कोणी त्याविषयीं मनन अगर चिंतन करीत असेल तर त्यांचे तंटेबखेडे तत्काळ बंद पडतील ?

३७ कामक्रोधादि षड्रिपूंना जो दाबांत ठेवूं शकत नाहीं आणि ऐहिक सुखोपभोगाच्या ऐन रंगांत दंग असतो, व

जो अनियमीत आहार करून सुस्त व आळशी राहतो त्याला, सर्वरीतीनें मारक असा मार ( मदन; सैतान ) स्वतःच्या मोहजालांत ओढून घेतो, आणि जो षड्रिपूंना स्वतःच्या दाबांत ठेवून ऐहिक सुखोपभोगापासून उत्पन्न होणाऱ्या दुष्परिणामासंबंधांत नेहमीं चिंतन करतो आणि सदैव धार्मिक वृत्ति स्वीकारून नियमीत आहार करतो तो माराला सदैव अजिंक्यच राहतो. उदाहरणार्थः-भयंकर झंझावाताच्या तुफानांत खडक स्थानभ्रष्ट न होतां अचल राहतो हें सर्वांना विदित आहेच.

३८ जे वाईटाला चांगले असें मानतात व चांगल्याला वाईट असें समजतात ते सर्वोत्कृष्टपणाला कधींच पात्र होत नाहींत, आणि अशा परिस्थितींत त्यांच्या आयुष्याचे सर्व दिवस पावलों पावलीं चुका करण्यांतच जातात. परंतु जे चांगलें ते चांगलेंच व वाईट तें वाईटच असें समजतात ते उत्कृष्टपणाला प्राप्त होतात व त्यांच्या आयुष्याचे दिवस सर्वरीतीनें सत्यमय असे जातात.

३९ ज्याप्रमाणें निष्काळजीनें शाकारलेल्या छपरामुळें पाऊस संपूर्णरीतीनें घरांत पडून सर्व नासाडी होते; त्याप्रमाणें बऱ्यावाईटांचा जो विचारच करीत नाहीं त्याला षड्रिपू संपूर्ण रीतीनें जिंकतात; परंतु बरें कोणतें व वाईट कोणतें यांचा पूर्ण विचार करून तें ज्याला समजतें त्याचे



षड्रिपू दास होऊन राहतात; याला उदाहरणः-काळजी-पूर्वक शाकारलेल्या छप्परामुळें घरांत पावसाचा थेंब सुद्धां गळत नाहीं हें कोणीही कबूल करील.

४० जो पापी मनुष्य आहे तो इहलोकीं व परलोकीं शोकानें नेहमीं ग्रस्त झालेला असतो; उभयलोकीं तो दुःखीच होतो; स्वतःच्या दुष्कर्माचें सूक्ष्म निरीक्षण करीत असतांना त्याला भयंकर यातना भोगाव्या लागतात. पुण्यवान मनुष्याची मात्र तशी स्थिति नसते. पुण्यवानाला इहलोकीं व परलोकीं सदानंदच प्राप्त होतो. आणि स्वतःच्या सत्कर्माचें योग्य निरिक्षण करीत असतांना तो शाश्वत आनंदाच्या भरांत सदैव निमग्न असतो.

४१ संसारांत गढून गेलेला मनुष्य धर्माचीं विधानें अगर विधी या पैकीं कांहीं एक करीत नाहीं आणि "धर्मासंबंधांत पुष्कळ मी जाणतों" असें लोकांना वाजवीपेक्षां फाजील बोलून दाखवितो त्याला आईबापाची सेवा करून आणि धर्मनिष्ठ राहून इहलोकीं व परलोकीं जी उत्तमोत्तम फल-श्रुति मिळावयाची ती मिळत नाहीं; आणि जो धर्मा-विषयीं थोडें जाणतो व थोडें बोलतो परंतु धर्माचीं विधानें व विधी सूक्ष्म रीतीनें अवलोकन करतो त्याला पाहून षड्रिपू दूर पळतात व त्यालाच दुष्कर्मापासून व संसारिक आसक्ति पासून अगदीं अलिप्त आहे असें

म्हणावे, धर्मनिष्ठही त्यालाच म्हणावें व उत्तमोत्तम फल-श्रुतिहि त्यालाच मिळते.

४२ सत्यभाव ( खरेपणा ) हाच निर्वाणाचा मार्ग होय. आणि अविचारीपणा हा मृत्यूचा मार्ग होय. तात्पर्य-जे सत्य-भावाला अनुसरून चालतात ते अजरामरच समजावे. आणि जे अविचारानें वागतात ते असूनही मेल्या सारखेच समजावे.

४३ जे सत्यभावाच्या ( खरेपणाच्या ) अगदीं वरच्या पायरी पावेतों पोंहोचले आहेत त्यांच्या अंत:करणांत सत्यभावाचा पूर्ण व स्वच्छ प्रकाश पडला असल्यानें ते सदानंदांत निमग्न असतात आणि आर्यांच्या ज्ञानाचें कौतुक कर-ण्यांत रममाण होतात.

४४ अभिमानाच्या नादीं लागून त्याला बळी पडूं नका. तसेंच स्त्रीपुरुषधर्माच्या क्षणिक सुखोपभोगांत दंग होऊं नका. सदैव सत्यभावांत ध्याननिष्ठ राहा म्हणजे तुम्हाला अक्षय्य सुखाची प्राप्ति होईल.

४५ मन हें चंचल आहे. त्याला धरून ठेवून आवरणें मोठें कठीण आहे; तें नेहमीं उडून जाण्याच्या बेतांत असते. म्हणून प्रथम मनाला आवरून आपलेंसें करा; कारणः—

॥ मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ॥



४६ शाहण्या मनुष्यानें स्वतःच्या विचारतरंगावर सख्त देख-रेख ठेविली पाहिजे; कारण ते मोठे कावेबाज असतात, लहर लागेल तिकडे एकदम घुसतात, इंद्रियानें समजण्यास फार कठीण असतात. म्हणून विचारतरंगावर चांगली देखरेख ठेविल्यानें उत्तम प्रकारची सुखप्राप्ति मिळते.

४७ हर ! हर ! कधीं तरी हा जड देह भूमीवर पडणार ! तो लाकडाच्या ओंड्याप्रमाणें अचेतन असल्यानें लोक त्याचा धि:कार करतात; मग त्यानें आई, बाप, अगर कोणी आप्तविषयीं या नात्यानें आपल्यावर कितीहि ममता केलेली असो. तात्पर्यः—मनाला चांगल्या दिशे-कडे वळविण्याचा प्रयत्न केला तर तें आपल्या अत्यंत उपयोगी पडेल.

४८ मूर्ख मनुष्याला " मी मूर्ख आहे " येवढें समजलें तर तेवढ्या पुरतें त्याला शाहणा म्हणणेंच रास्त दिसेल; परंतु जो मूर्ख स्वत:ला शाहणा समजतो तो मात्र खरोखर मूर्ख समजावा; अशा मूर्ख मनुष्यानें शाहण्या मनुष्याच्या सहवासांत सबंद आयुष्याचे दिवस काढले तर दुधाचा अगर कोणत्याहि पेय्य पदार्थाचा स्वाद चमचाला ज्या प्रमाणानें कळेल तेवढ्याच प्रमाणानें त्याला "सत्य म्हणजे काय ?" यांतील रहस्य कळेल.

४९ मनुष्याची सत्कृत्याकडे प्रवृत्ति झपाट्यानें होऊं लागली असतां दुष्कृत्याच्या कल्पनेचा विटाळसुद्धां होऊं देऊं नये. त्याच्या सत्कृत्याची गति जर मंदावत चालली तर मग दुष्कृत्याकडील प्रवृत्तीस प्रारंभ होतो व त्यांत त्याला आनंद वाटूं लागतो. मनुष्यानें पापकर्म केलें तर पुनः तें न करण्याविषयीं जपलें पाहिजे. पापकर्मांत त्यानें आनंदच मानूं नये. वाइटाचा परिणाम वाईट हा ठरींव सिद्धांतच आहे. मनुष्यानें जर सत्कर्म केलें तर तें त्यानें पुनः पुनः करावें, त्यांतच आनंद मानावा, कारण—चांगल्याचा परिणाम चांगलाच हाही सिद्धांत ठरीव आहे. पापकर्म करणाराला तें पापकर्म परिक्व होई पावेतों त्यांत त्याला मोठा आनंद वाटतो; परंतु तें परिपक्व झालें म्हणजे मग त्याचा तो आनंद विजेच्या लखलखाटाप्रमाणें एकाएकी नष्ट होतो. याचें एक उदाहरणः——

### शिखरिणी

॥ अनंगाच्या जाळीं सहज पडुनी रम्य युवती ॥
॥ कुबुद्धी येवोनी मनिं मग दुराचार करिती ॥
॥ परी जेव्हां त्यांचें जगिं पसरतें पाप सगळें ॥
॥ कशा एकांतीं त्या रडुनि रडुनी फोडिति गळे ॥ १ ॥

सत्कर्म करणाराची स्थिति वर दर्शविल्यासारखी नसते. पुण्यकर्म करणारास तें पुण्यकर्म परिपक्व होईपावेतों



अनेक प्रकारचीं संकटें व आघात सोसावे लागतात. एकदां तें परिपक्व झालें म्हणजे तीं संकटें व ते आघात विजेच्या लखलखाटाप्रमाणें एकाएकीं नाहींसें होऊन त्याला आनंदाचे दिवस स्पष्ट दिसतात. मनुष्यानें वाईट कृत्याचा एक तुषारसुद्धां अंगाला लागूं देऊं नये; कदाचित् त्याला असें वाटेल कीं, वाइटाच्या एका तुषारानें काय होणार ? परंतु पाण्याच्या एक एक थेंबानें जसें पाण्याचें भांडें भरून त्यांतून तें वाहूं लागतें तसेंच वाइटांच्या एक एक तुषारानें पापाचा घडा चट्कन भरून तें वाहूं लागतें; हें लक्षांत धरावें. सत्कर्माचा सुद्धां, वरच्या उलट, पण क्रम असाच आहे. आपल्याला प्रथम असें वाटतें कीं, थोडेंसें सत्कर्म केल्यानें काय होणार ? पण थोड्या थोड्या सत्कर्मानें सत्कर्माचा घडा भरून तें वाहूं लागलें म्हणजे त्यांतून दिव्य प्रकाश बाहेर पडून सर्व सुखमय वाटूं लागतें.

५० आपल्याला शिक्षा होणार असें समजतांच मनुष्याला मोठी भीति वाटते व त्यामुळें सर्वांगाला कंप सुटता म्हणून कोणालाहि ठार मारूं नये. 'आपल्यावरून जग ओळखावें' ही म्हण लक्षांत धरा. कोणालाहि कठोर भाषणानें रागें भरूं नये. कारण तुम्ही तसें केल्यास समोरचा मनुष्यहि तसेंच वर्तन करील. कठोर भाषण

दुःखदायक असतें. धक्काबुक्की कधींहि करूं नये. वाणी ही सरस्वती आहे. ती कशी असावी ?:—॥ अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ॥ स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ ( भगवद्गीता ).

५१ हास्य कशाचें ? सुखविलास कशाचे ? जग हें एकसारखे जळत असतें !! प्रकाशाचा शोध न करतां तुम्ही घोर अंधःकारांत कां बसून राहिलां आहांत ? आधीव्याधींनीं रोगग्रस्त असें हें शरीर कधीं तरी पडणारच. भ्रष्टपणाच्या राशीवर राशी जमून त्या छिन्न भिन्न होणार ! ह्या मृत्यु-लोकाच्या वस्तीचा अंत मरणांतच होणार.

५२ तर मग आपण सर्व सुखांत राहूं या. जरी आपल्याशीं कोणी द्वेषबुद्धीनें वागत असेल तरी आपण त्याच्याशीं द्वेषबुद्धीनें वागतां कामा नये. म्हणून आपण सर्व सुखांतच राहूं या ! कोणत्याहि प्रकारचें दुःख इजा अथवा अस्वास्थ्य, यापासून अलिप्त राहूं या ! ! तसेंच खादाडपणा आणि लोभ यापासून अलिप्त राहूं या ! ! आपलें स्वतःचें कांहींच नाहीं असा बोध आपल्या मनांत ठसला म्हणजे मग आपण दिव्य देवतेच्या रूपानें अक्षय्य सुखांत राहूं !

५३ ज्यापासून संतोष होईल अगर असंतोष होईल अशी कोणतीहि वस्तू मिळविण्याचा प्रयत्न करूं नका. आनंद-



दायक वस्तू पाहिली नाहीं म्हणजे दुःख होतें आणि दुःख देणारी वस्तू पाहिली म्हणजेसुद्धां दुःख होतें. दुःख आणि भीति याचें मूळ ऐषआरामांतच आहे; म्हणून जो ऐषआरामापासून अलिप्त राहतो त्याला दुःख व भीति यांचा विटाळच होत नाहीं. आसक्ति, ऐषआराम, प्रेम व लोभ, यापासून दुःख व भीति हीं उद्भवतात, म्हणून यापासून दूर असावें हेंच उत्तम होय.

५४ प्रेमानें रागाला जिंकावें, सत्कर्मानें दुष्कर्माला जिंकावें, औदार्यानें लोभास जिंकावें, आणि सत्यानें असत्यास जिंकावें. स्वतःचें शरीर, स्वतःची जिव्हा, आणि स्वतःचें मन यापासून रागाची उत्पत्ति असते, म्हणून सावधपणानें शरीर, जिव्हा आणि मन, याना आपल्या ताब्यांत ठेवावें; त्यांच्या ताब्यांत आपण कधींहि राहूं नये. मनाची धार्मिक प्रवृत्ति कायम राहण्यासाठीं **उपास्य** राहावें ( उपास करावें; निराहार राहावें; बौद्धांचा हा साप्ताहिक उत्सव आहे ).

५५ आपला ईश्वर ( स्वामी ) कोण ? याचें उत्तर “ आपला ईश्वर आपणच ” हेंच समर्पक होय. जो जितेन्द्रिय असतो तो ईश्वराला प्रत्यक्ष पाहतो; परंतु असे जितेन्द्रिय फारच थोडे सांपडतील.

५६ जन्म होतांच जन्मणारा दहा बाबती बरोबर घेऊन येतो. त्या येणें प्रमाणें:— १ वर्ण. २ ताप. ३ क्षुधा. ४ तृष्णा. ५ मळ. ६ मुत्र. ७ निद्रा. ८ व्याधी. ९ क्षय. आणि १० मृत्यू.

५७ ब्राह्मणांचें ध्यान, धारणा आणि समाधि आणि बौद्धांची भावना, ध्यान व समाधि यांत फारसा फरक नाहीं.

५८ मिताहार करून मन व आचरण यांच्या शुद्धतेकडे लक्ष द्यावें म्हणजे तृष्णा नाश पावते; दुःख व भय यांचा नाश होतो व मनुष्य सुखी होतो. या उपदेशाला "धर्मचक्र प्रवर्तन म्हणतात."

# प्रकरण २३ वें

## बुद्धानुयायी राजे.

### १ बिम्बिसार.

हा मगध देशाचा बौद्धधर्मानुयायी राजा होता. हा प्रथम ब्राह्मण धर्मानुयायी होता. परंतु भगवानबुद्धानें स्वतःचीं धर्मतत्त्वें त्याला चांगलीं पटवून दिल्यामुळें तो बौद्धमताचा झाला. याच्या अंगाची कांति चंद्रबिंबाप्रमाणें ( सुवर्णकेतकीप्रमाणें ) असल्याकारणानें याचें नांव बिम्बिसार असें ठेविलें होतें, असें म्हणतात. मनुष्याच्या आवाजावरून त्याच्या आयुष्यांतील भविष्य वर्तविण्याची विद्या या राजाला उत्तम अवगत होती. यानें एका गरीब ब्राह्मणाच्या आवाजावरून त्यानें असें भविष्य वर्तविलें होतें कीं, हा ब्राह्मण मोठा धनाढ्य असला पाहिजे; पुढें चौकशीअंतीं त्या ब्राह्मणाजवळ ४० कोटी किंमतीचें धन सांपडलें. अशी त्याची स्थिति पाहून राजानें त्याची राज्यकोषाधिकाऱ्याच्या जागीं नेमणुक केली.

बिम्बिसार राजाची राणी कोसलदेवी ही कोसलदेशाधिपति पसेनदीची बहीण होती. तिला अजातशत्रु नांवाचा मुलगा होता व तो बुद्धाचा द्वेष्टा असल्यामुळें देवदत्ताचा (बुद्धाचा शत्रु)

मित्र होता. " बापाला ठार मारून राज्य घे " अशी सल्ला या देवदत्तानें अजातशत्रुला दिली होती; त्याप्रमाणें तो बापाचा खून करण्यास प्रवृत्त झाला, पण असलें दुष्ट-कृत्य करतांना तो अखेर पकडला गेला. अशा परिस्थितींत अजातशत्रुची राज्य घेण्याची उत्कटेच्छा दिसल्यानें राजानें त्याला राज्याधिपति केलें.

## २ अजातशत्रु.

अजातशत्रु हा बिम्बिसार राजाचा मुलगा बुद्धाचा द्वेष्टा असें वर लिहिलेंच आहे. याची आई कोसलदेवी हिला नवऱ्याचें रक्त प्राशन करण्याचे डोहाळे लागले होते. ते पुढें घडणाऱ्या भविष्याचें सूचक होतें. पितापुत्रांची प्रीति भक्ष्यभक्षका ( अहिनकुल ) प्रमाणें होती. पुत्रानें पित्याचा वध केला, त्यामुळें त्याची आई कोसलदेवी अत्यन्त शोकग्रस्त होऊन मरण पावली. कोसलाधिपति पसेनदी याजकडून अजातशत्रूला काशीगांव इनाम ह्मणून चालत होता. पण स्वतःची बहीण दिवंगत झाली याला कारणीभूत अजातशत्रूच असल्यामुळें आणि अशा पितृघातक्याला गांव इनाम चालविणें रास्त न दिसल्यानें त्याकडे चालू असलेला इनाम गांव बंद करण्यांत आला होता. या कारणानें मामाभाच्यांत नेहमीं लढाया चालू राहिल्या होत्या, परंतु अखेर अजातशत्रूला धरून आणून मामानें स्वतःच्या भाच्यास आपली मुलगी दिली, व त्याजकडे काशीगांव पुनः पूर्ववत चालू करण्यांत आला. अखेर अखेर तो भगवान बुद्धाला शरण गेला आणि जसा त्यानें स्वतःच्या



बापाचा खून केला तसा शेवटीं अजातशत्रूचा, त्याचा मुलगा उदयबुद्ध यानें खून केला.

## ३ पसेनदी.

हा कोसलदेशाचा अधिपति होता. यानें स्वतःची बहीण बिम्बिसार राजाला दिल्यामुळें कोसल व मगध या दोन देशाचें निकट सख्य जडलें होतें. विशेष निकट सख्य वाढविण्याच्या उद्देशानें या राजानें शाक्यकुलांतील एका वधूशी शरीरसंबंध करण्याचा आपला बेत जाहीर केला. कारण कोसलापेक्षां शाक्यकुलास तो श्रेष्ठ मानीत होता. ही बातमी शाक्यराजाच्या कानावर जातांच त्याला मोठीच काळजी लागली. कारण शाक्यकुल हें सर्वांत श्रेष्ठ अशी सर्वत्र ख्याति पसरली असल्यानें त्याला मोठा विचार पडला. उघड उघड नकारार्थी उत्तर देणें रास्त नाहीं म्हणून अचाट बुद्धि चालवून त्यानें एक युक्ति योजिली. त्यावेळीं कपिलवस्तु येथें शुद्धोदनानंतरचा महानामा, या शाक्यराजाची कारकीर्द चालू होती. त्याला वासभक्षात्रिया या नांवाची एक दासीकन्या होती. ती त्यानें कोसलराजाला देण्याचें ठरविलें; मात्र ती दासीपासून झालेली आहे ही गोष्ट त्यानें कोसलराजाला न कळूं देण्याबद्दल मोठी खबरदारी घेतली. ठरल्याप्रमाणें उभयतांचा शरीरसंबंध होऊन त्या प्रीत्यर्थ भोजनाच्या पंक्तिसुद्धां झाल्या. कांहीं दिवसानंतर वासभक्षत्रियेला मुलगा झाला. त्याचें नांव विडूडुभा असें

ठेविलें. हा मुलगा उत्तरोत्तर वयानें वाढत जाऊन सज्ञान झाला; तेव्हां त्याला चौकशी अंतीं आपण दासीपुत्र आहोंत असें कळलें. पुढें एकदां कांहीं कार्याप्रित्यर्थ मोठ्या थाटाचें पंक्तिभोजन झालें, भोजनोत्तर हा दासीपुत्र म्हणून त्याचा पाट धुतला गेला नाहीं. हें त्याला कळतांच त्याच्या आंगाचा तिळपापड झाला; व हें प्रकरण इतकें विकोपास गेलें कीं, अखेर विड्डुभा यानें प्रतिज्ञा केली कीं:—“ शाक्यांच्या रक्ताचे पाट वाहावयास लावून त्यांच्या रक्तानेंच पाट धुवून काढीन. ” ही प्रतिज्ञा त्यानें सिद्धीस नेली. त्याचा परिणाम असा झाला कीं, शाक्यकुलाचा विध्वंस होऊन अखेर तो स्वत: नदीच्या पुरांत वाहून गेला.

## प्रकरण २४ वें.

### बौद्धधर्माचीं मूळतत्त्वें.

भगवान् बुद्धाच्या कारकीर्दींत प्रथम वैदिकधर्म सर्वत्र प्रचलित होता; त्यावेळीं समाजाची अशी समजूत होती कीं, प्रपंच साधून परमार्थ करावा, ऐहिक सुखोपभोग भोगावेत, धर्माचरण करावें, कर्तव्यपराङमुख होऊ नये, यज्ञयागादि कर्में करावींत, म्हणजे मोक्षप्राप्ति होते. तसेंच पंचाग्निसाधन, निराहार, उपासतापास, व्रताचरण, नेमधर्म, खडतर तपश्चर्या, वगैरे. अशानें सुद्धां मोक्षाची प्राप्ति होते. ह्या दोन मार्गाविषयीं पूर्ण विचार करून भगवान्‌-बुद्धानें त्यांतून मधला मार्ग शोधून काढला; व त्यानेंच मोक्षप्राप्ति मिळते असें सर्वत्र प्रतिपादन केलें.

बौद्धधर्माच्या सुवर्णमध्यास मध्यमाप्रतिपदा असें नांव आहे; ह्यालाच बुद्धाचे अष्टांगिकमार्ग असेंहि म्हणतात. ह्या मार्गाचे पाहिलें अंग ( १ ) सम्यग्दृष्टि. ( २ ) सम्यक्संकल्प. ( ३ ) ( ४ ) सम्यग्वाचा आणि सम्यक् मार्ग. ( ५ ) सम्यक्—आजीव ( वाईट मार्गानें न मिळवितां चांगल्या व शुद्ध मार्गानें मिळविणें) (६) सम्यक्—व्यायाम ( वाईट सवयींचा त्याग करून चांगल्या संवयी लावून घेणें. ) (७). सम्यक—स्मृति. ( स्वकर्तव्यपराङमुख

न होतां तें उत्तम रीतीनें बजावणें.) (८) सम्यक्-समाधि (चित्तशुद्धि=कामक्रोधादि षड्रिपूंचा त्याग करून, १ मैत्री, २ करुणा, ३ मुदिता, ४ उपेक्षा, ह्या चार सद्भावांचा विकास करावा लागतो).

ह्या धर्माचीं पांच शीलें फार संभाळलीं पाहिजेत तीं:— (१) अहिंसा परमो धर्मः=हिंसा न करणें, (२) चोरी न करणें; (३) असत्य भाषण न करणें; (४) ब्रह्मचर्यव्रतस्थ राहणें; आणि (५) मद्यप्राशन न करणें. हें सर्व जग नश्वर व दुःखमूलक आहे; याचें कारण अज्ञान व लोभ; ह्यांतून जर सुटणें असेल तर "मध्यमाप्रतिपदा" आचरावी, असा बुद्धाचा सर्वत्र उपदेश होता. बौद्धधर्माला मगध व कोसल या दोन देशांनीं चांगलाच आश्रय दिला, म्हणून तो येवढ्या मोठ्या प्रसाराला पावला. उदाहरणार्थ:—तिबेट, तार्तरी, चीन, जपान, नेपाळ, सिलोन, सिआम, ब्रह्मदेश वगैरे या सर्व ठिकाणीं बौद्धधर्माचा प्रसार झाला होता.

बौद्धधर्माचा समाजावर परिणाम असा झाला कीं, "अहिंसा परमोधर्मः" हें तत्त्व सर्वमान्य झालें. त्याचप्रमाणें कलांवरहि असा परिणाम झाला कीं—चीन, जपान, सायबीरिआ, अफ्गाणिस्तान, येथील स्थळें शिल्पकलेचीं प्रत्यक्ष उदाहरणें आहेत. चातुर्वर्ण्य-व्यवस्था व जातीभेद मोडण्याचा प्रयत्न झाला, पण तो यशस्वी झाला नाहीं.



# संस्कार-विधियुक्त बौद्धधर्म

मठवासी जोग्यांना बुद्धानें संस्कारविधि असे कांहीं एक नियम सांगितले नाहींत. त्यांना त्यानें वैदिक-संस्कार-विधि आणि यज्ञयागादि कर्में यावर पाणी सोडण्यास सांगितलें होतें. फक्त आत्मशुद्धि, सदाचार व ध्यान, याचेंच उत्तम रीतीनें पालन करण्याविषयीं उपदेश केला होता; तसेंच कोणत्याही प्रकारची पूजा अर्चा न करतां फक्त स्वतःवरच अवलंबून व दृढ विश्वास ठेवून निर्वाण मार्ग शोधण्यास निक्षून सांगितलें होतें.

परंतु भिक्षू होण्यापूर्वीं उमेदवाराला या खालीं दिलेल्या तीन विधानांचा उच्चार करावा लागत असे:—(१) बुद्धं सरणं गच्छामिः (२) धम्मं सरणं गच्छामि आणि (३) संघं सरणं गच्छामि; म्हणजे (१) आश्रयार्थ मी बुद्धाला शरण जातो; (२) आश्रयार्थ मी धर्माला शरण जातो; आणि (३) आश्रयार्थ मी संघाला शरण जातो. यांतील तात्पर्य असें कीं, मठवासी बौद्ध जोग्यास, बुद्ध हा एक प्रकाशलेला ज्ञानसूर्यच आहे, असें हृदयांत ठसवून त्यावर दृढ विश्वास व पूर्ण श्रद्धा ठेवावी लागत असे. तसेंच सद्गुण, सदाचार व नीति या संबंधांत जीं जीं धर्मबंधनें ठरवून दिलेलीं असतील, तीं तीं सर्व एक निष्ठेनें पाळावीं लागत असत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मठवासी बौद्ध जोग्यानें कायावाचामनें करून आपलें सर्वस्व संघास अर्पण केलें पाहिजे.

वर दिलेल्या सर्व बाबती बुद्धाच्या अस्तित्वांत उत्तम रीतीनें पाळल्या गेल्या, परंतु त्याच्या निधनानंतर धार्मिकबुद्धीनें त्याच्या संबंधांत कायदे रचण्यांत येऊन त्याला देव म्हणून लोक मानूं लागले. त्याच्या प्रेताचे अवशेष दहा निरनिराळ्या स्तूपांत पुरण्यांत आले आणि हीं स्तूपें बौद्ध अनुयायी वर्गासाठीं यात्रेचीं प्रसिद्ध स्थळेंच होऊन बसलीं. इतकेंच नव्हें, तर सर्व सामान्य लोक पूजा-अर्चा करण्यासाठीं तें एक पवित्र स्थानच आहे असें मानीत असत. "बुद्ध हा कार्यकर्ता आहे; त्याच्यावरच अढळश्रद्धा ठेवा." असें तो आपल्या अनुयायास सांगत असे, म्हणून फलदृष्टीनें ते त्याला ईश्वर समजत असत; परंतु त्याच्या मरणानंतर ते बुद्धाला खरा ईश्वर मानूं लागले.

वर जीं दहा स्तूपें दर्शविलीं आहेत, त्यांची संख्या अशोकाच्या कारकीर्दींत लाखापावेतों जाऊन पोंहोंचली होती; यामुळें बौद्ध यात्रेकरूंसाठीं यात्रेचीं पवित्र स्थळेंसुद्धां अगणित निर्माण झालीं, उत्तर प्रांतांतील बौद्धअनुयायी, हिंदूंचे देव आणि देवता यांची पूजा करूं लागले, तरी बुद्धानें स्वतःच्या हयातींत त्यांना प्रतिबंध केला नव्हता. तात्पर्य, बुद्धाच्या, दगडी, लाकडी आणि मातीच्या हजारो प्रतिमा तयार करण्यांत येऊन सर्व हिंदुस्थानांतील, किंबहुना आशिया खंडांतील, बौद्ध अनुयायी, त्यांची पुजाअर्चा करूं लागले होते.

गौतमबुद्धानंतर जे बुद्ध झाले, त्यापैकीं मुख्यत्वेंकरून काश्यप, कण्हमुनि, कारकछंद, वगैरे. यांच्याहि प्रतिमा करून लोक



त्यांचीं पूजाअर्चा करूं लागले. त्यानंतर ध्यानीबुद्ध व मैत्राबुद्ध यांच्याहि प्रतिमा तयार होऊन त्या सर्वत्र पूज्य झाल्या. फा-हिएन यानें अशी एक नोंध करून ठेविली आहे कीं, " उत्तर हिंदुस्थानांत त्यानें बोद्धिसत्वाची एक लाकडी प्रतिमा पाहिली, त्या प्रतिमेंतून उपोषणाच्या दिवसांत एक प्रकारचें दिव्य तेज बाहेर पडत होतें. दोन्ही हात उंच केलेले, बोटें कमलाकार मुद्रे प्रमाणें, अंगाची कांति सुवर्णकेतकीप्रमाणें आणि जिचा कुरुळ केशपाश, अशा प्रकारची ती प्रतिमा दिव्य दिसत होती. "

कांहीं काळ लोटल्यावर बुद्धाच्या व्यक्तित्रयात्मक ( तीन व्यक्ति मिळून एकदेव ) देवतांच्या प्रतिमा तयार होऊं लागल्या. त्या येणें प्रमाणें:—( १ ) मंजुश्री, ( २ ) अवलोकितेश्वर आणि ( ३ ) वज्रपाणी. ( १ ) मंजुश्रीदेवता बसलेली, डाव्या हातांत कमल व उजव्या हातांत बुद्धिदर्शक तरवार, अशा प्रकारची होती; आणि त्या तरवारीच्या पात्याच्या दिव्य प्रकाशानें अज्ञांधःकाराचा नाश होत असे. ( २ ) अवलोकितेश्वर देवतेला ११ मस्तकें, एक हजार हात व एक हजार डोळे असत. ह्या प्रतिमेच्या जोडीला दुसरी एक स्त्री-प्रतिमा, एक हजार हात व डोळे असलेली असे. ह्या देवतेला चिनी लोक " कान्-इन् " आणि जपानी लोक " क्वोन्-नॉन " असें म्हणत असत. आणि ( ३ ) वज्रपाणी देवतेची प्रतिमा, जिच्या हातांत विद्युत् (वीज) चमकत आहे, अशा प्रकारची होती.

---

समाप्त.

# विषय सूची.

अ

अभिधमपीटक ४२–१३८ १४२
अमृतोदन ६
अरहत् ७–३५–३७–४९–५२
अनोमा २७
अनुपिय ३२
अशोक ३२–१२९–१३०–१३६ १५४–१५५
अश्वत्थ ३६
अनर्ज्यांपुर ४३
अष्टांगिक मार्ग ४९–१९७
अस्साजी ४९
अनत्तलखन ४९
अश्वजित ५२
अनुरूद्ध ५८–७३–७९–९२
अनाथ पिन्डिक ५८–७८
आजित ६५
अवीकि ६८–७१–७६–१०६
अङ्गलोक ७७–७८–७९
अङ्गुलीमाल ७८
अजात शत्रु ८०–८२–८५–८६ १३१–१९५
अल्लाकप्प ९२
अजष्टा ९७
अनागामिन् १०१
अनुस्मृति १०३
अप्पना समाधि १०१
अवितक्क १०४
अपरगोदान १०५
अप्पमाणाभ १०६
अप्प माणसुभ १०६
असञ्ज सत्व १०६
आविह १०६
अतप्प १०६
अकनिठ्ठ १०६
अरूप १०६
अष्टविद्या १०८
अवेणिक धर्म १०९
अभिनीहार १११
आधिठ्ठान ११२
आनियताधम्म १२२
आधिकरण समथाधम्म १२२
अवरूद १२५
अवंति १२८
अहोगंग १२८

अभिधम्म कथावथ्थु १२९
अनुराधपुर १३६–१३७
अभिधम्मथ्थ संग्रह १४३
अवलोकिता सूत्र १४४
अवलोकितेश्वर १४७–२०३
अभिनिष्क्रमण १४४
अमितयुसूत्र १४७
अठ्ठकथा १४९–१५०
अठ्ठवथ्थु १५०
अनागतवंश १५०
अश्वघोष १५१
अवदान कल्पलता १५१
अवदान शतक १५१
असत्य १६२
असंबद्ध भाषण १६३

आ

आलार कालाम ३४–४७
आजीवक ४७
आर्यसत्यानी ४९–५१–९५
आदित्तपरियाय ५०
आनंद ५८–६२–६३–७१–७५
७८–९०
आम्रताली ६०–८७
आळवी ७७
आळारा ८९
आभस्सर १०६
आराध्य दैवत १२३
आगम १४१
आर्यसूर १५१
आळस १६६
आईबाप १६७

इ

इन्द्र २०–६९–७०
इन्द्रनील मणी ४५

उ

उदयन ६–५४–१३०
उदक ३४–४७
उरुवेळा ३४–३६–४३–५०–५१
उत्कल ४५
उपक ४७
उपसंपदा ७५
उत्तरी मानुस्स ९९
उपादिशेस १०१
उपेक्षा १०३
उत्तरकुरु १०५
उत्तरासंग १२०
उद्देसीक १२३
उपोसथ १२४
उपचार समाधि १०४

ए

एँडमशिखर १२३
एकनाळी ७४



ओ

ओरिसा ४५
ओल्डेनबर्ग १४०

अं

अंबलठ्ठिका १८६
अंतर्वासक १२०
अंगुत्तर निकाय १४२

क

कपिलवस्तु ४–२५–२७–६१–७५
८५–९२
कनिंगहाम ३२
कस्सप ५०
कनौज ७५
कट्टमोरकतिरस्क ८४
कक्कुथ नदी ८९
करुणा १०३
कम्मठ्ठाण १०३
कसिण भावना १०३
कत्तर १२०
कलिंग १२३
कणिष्क १३७–१३८–१४७–१५४
१५५
कथावथ्थु १४१–१४२
कणसीपुरा १४९
करमणुकी १६६
कण्हमुनी २०१
कालुदायीन १०६
काश्यप ५१–५६–९२–१२७–२०१
कालिका ७५
कामलोक १०५
कालसूत्र १०६
काकण्डक पुत्र १२७
कारकछंद २०१
किसा गौतमी २०–२१
किम्बल ५८–७३
कीवर गोपक १२०
कीवर भाजक १२१
कुरागार ८८
कुसिनारा ७९–९०–९२
कुसावती ९०
कुशीनगर ९१
कुलाकुल १०५
कुभांड १०७
कुण्हाल ११२–१३५
कुमारील भट्ट १३९–१५५–१५७
कुसंगती १६६
कूळामणी १२८
कुटागार ६२–७५
कैफ १६५
कोण्डण्ण ८–३४–४९
कोळीय ६३
कोकनग ७१
कोसलाधिपति ७२

कोकालीक ८४
कोरीग्राम ८७
कौशांबी ७२–७४–१२८
कंथक ६–२३–२५–२७–२८
कंदकिन्नर ५७
कुंद ८८
कृष्ण २
कानईन् २०३
कोननॉन् २०३

ख

खुद्दनिकाय १४२
खुनशीपणा १६४
खेमा ६३–६४
खंडदेवीपुत्त ८४
खंती ११२
ख्राइस्ट १

ग

गयाकस्सप ५०
गयाशीर्ष ५०–८४
गरुधम्म ६३
गजराज ७३
गांधार १२३
गिरिमेखला ३९–४१
गुरू १५७
गुरुशिष्य १६८
गोथर्ड ४३–४६
गोत्रभूमी १०१
गौतम ३५–४८–१०९
गौतमी १०–६२
गंगानदी ६१–८७
गंधवंश १५१
गृह्याग्नी १५५
गृहस्थ व मठवासी १७१
गृध्रकूट ८२–८६

घ

घटीकार २८–३७
घोसिताराम ७२

च

चकेश धातुवंश १५१
चहाडी १६३
चापाल ८८
चारदृश्यें ९
चालिका पर्वत ७७
चिनीविनय १४३
चिञ्चामाणविका ७०–७१
चीन ४३
चुल्लवग्ग १४१
चैतक ३२
चोरी १६०
चंद १४
चंद्रगुप्त १३२
चंपा १३३



छ

छन्न ६–१४–१७–१९–२३–२५
२७–२८

ज

जनपदकल्याणी ५७
जपान ४३
जयदेव ३
जातक १४२
जातक माला १५१
जालंधर १३८
जीवक ६०–६१
जुगार १६५
जेतराजा ५८
जेतवन ५८–६९–७०–७५–७७·७८
जंबुद्वीप ४–१०५–१३०
जंबुवृक्ष १०

त

तथागत ४४–५२–५५–६०–६३
तपन १०६
तपुस्स ४५
तक्षशीला ६०–७५
तिबेटीविनय १४३
तिस्सा १२९
तुशित ३–१०५
त्रिपिटक ९९–१४०
त्रिवेणी संगम ४४

थ

थॉमस १३२
थेरवाद १२९
थेरागाथा १४९

द

दशबल १०९
दशविध पातकें १५९
दशशील ११५
दक्खिणागिरि ७४
दाथावंश १५१
दिघनिकाय १४१
दिधीति ७२
दिव्यवदन १५१
दीघावु ७२
दीपवंश १३६–१४९–१५०
दीपंकर ५६
देवदह ५
देवल ६–७
देवदत्त १२–५८–८०–८५
देवलोक १०५
देवानांपिय १३०–१३६
द्रोण ९२

ध

धनी व नोकर १७०
धर्मपाल ५६–१४३
धर्मगुप्त १४४
धर्मोत्सव १२४

धम्मापिटक १२७
धम्मसंगणी १४२
धातुकथा १४२
धारणी धर्म पुस्तक १४८
धारणी पिटक १४८
धूतांग ११९
ध्यानीबुद्ध २०३

न

नदीकस्सप ५०
नवरा बायको १६९
नग्न साधु ७९
नन्द ५७
नंदबला ३६–३७
नन्दीय ७३
नागार्जुन १४७
नागसेन १३८–१५०
नागराजाकाल ३७–४४
नालक ७
नालागिरि ८३
नाळंद ८६
नादिका ८७
निकाय १४१
निर्माणरति १०५
निरय १०६
निस्सग्गिआधम्म १२२
नेपाळ ९१
नैरज्जना ३७
नृत्यांगना २१–२२
न्यग्रोधवन ७५
न्यूटन ३०

प

पज्जमधु १५१
पथ्थान १४२
परमार्थ दीपनि १४९
परिस्सावन १२०
पराचित्त प्रवेश १०८
परित्तसुभ १०६
परित्ताभ १०६
परिनिर्मित्त वशवर्तिन् १०५
परिघातक ५२
पसेनदी १९६
पारमित ३–३९
पांडवरॉक् ३३
पांच भिक्षू ४७–४८
पारिलेय्यक ७३
पावारिक ८६
पाटलिग्राम ८७
पावा ८८–९२
पाराजिकधम्म १२२
पाकित्तियाधम्म १२२
पाटिदेसनिआधम्म १२२
पारिभोगिक १२३
पाटलिपुत्र १२८–१४१
पार्थसारथी १५७



पिंडोल ६७
पुक्कुस ८९
पुग्गल १००
पूर्णा ३६
पूर्णवर्धन ५९
पूरणकाश्यप ६८
पूर्व विदेह १०५
पुष्यमित्र १२७
पुग्गलपण्णाति १४२
पंचवग्गीय ८–३४
पंचबली ११३
प्रसेनजित ६–६७–६८–८५–१३०
प्रद्योत ६–६०–१३०
प्रयाग ७५
प्रतीत्य समुत्पाद ९५–९६–९८
प्रतपन १०६
प्रत्येकबुद्ध १०७
प्रतिभान १०८
प्रतिसंविद १०८
प्रव्रज्जा ११९
प्रवारणा १२४
प्रभाकर १५७
प्रातिमोक्ख ११८-१२१-१२४-१४१

फ

फलभाजक १२१
फाहिअन् ३२–१४८–२०१

ब

बनारस ४७–५५
बालक लोणकार ७३
बिम्बिसार ६–६३–६७–१९४
बिम्बिसार खेमा ६३-८०-८१-१३०-१३१
बिंदुसार १३३
बुद्ध १–९४ ( चरित्र )
बुद्धाची नामावली ११०
बुद्धघोष १३७–१४९
बुद्धवंश १४२
बुद्धसाधु १५०
बुद्धाचे उद्गार १८०
बुद्धानुयायी राजे १९४
बुद्धिसरिता १५१
बेलुवा ८८
बैरट १२९
बोधीवृक्ष ६–३९–४३–९५–१२३
बोधिसत्व ३–६–२५–२८–३२–३७–१११–११२–१४७
बोधिराज पुत्र ७१
बोधिसत्वावदान १५१
ब्रह्म ६९
ब्रह्मसज्ज १०६
ब्रह्मपुरोहित १०६
ब्रह्मलोक १०६
ब्रह्मदेश १३७

ब्रह्मचर्य व तपश्चर्या १७४
ब्रह्मासहंपति ४६

भ

भगवतो–ओकंटी ४
भर्तृहरि २९
भल्लुक ४५
भद्दीय ४९
भद्दवग्गीयस ५०
भगु ५८–७३
भद्रसाल ७३
भद्रकल्पवादन १५१
भारहट ४–१२३–१४२
भारद्वाज ७४
भावना चतुष्टय १०३
भांडगोपक १२१
भांड भाजक १२१
भिक्षु व भिक्षुणी १७२

म

महंमद पैगंबर १
मन्मथनाथ शास्त्री २–१९
महामाया ४–६९
महाब्रह्म २८–१०६
मगधदेश ३२–४३–९३
महापधान ३४
मज्झिमनिकाय १४१
महानामन ४९–८५–१३७
महानारद ५१
महावना ८८
मल्ल ९०–९२
महारौरव १०६
महेन्द्र १३०–१३६–१४९
महावंश १३६
महायान १३८–१४३–१४७–१४८
महावग्ग १४१
महानिदेश १४२
महिशासक १४३–१४४–१४८
महासर्वास्तिवादी १४३–१४४
महावस्तु १४४–१४५
महासंधिक १४४–१४८
महाबोधिवंश १५१
मध्यमा प्रतिपदा १९७–१९८
मार २५ ते २७–३८–४० ते ४३–५०–८८
मानव लोक १०५
माध्यमिक १३८
मातृका १४३
मिगार ५९
मिगार माता ५९
मिलिंद १३८–१५०
मिलिंद पान्हा १५०
मित्रमंडळी १६९
मुकलिंद ४४
मुकुट बंधन ९१



मुदिता १०३
मुरारि मित्र १५७
मेत्ता ११२
मैत्रि १०३
मैत्राबुद्ध २०३
मोग्गलि पुत्र १२९
मौद्गल्यायन ५२-५७-६७-८४-८८
मौर्य ९२–१३७
मंजुश्री १४७–२०३
मंडन मिश्र १५७
मृगवन ४८–४९–१२३

य

यमक १४२
यशस् ४९
यशोधरा ६–११–१२–२०–२४–२५–५७
यागुभाजक १२१
योगाचार १३८

र

रतनसुत्त ६१
रख्खित ७३
रसवाहिनी १५१
राम २
राहुळ ६–२०–२४–२५–५५–५७–७५
राजगृह ३२–५४–६३–६६–७४–७७–१४१
रामपुत्र ३४
राजायतन ४४–४५
रामग्राम ९२
रिथिगिरि ३२
रूपलोक १०५
रूपब्रह्मलोक १०५
रूपनाथ १२९
रेवत १२८
रोहिणी ६१
रौरव १०६
ऋषीपतन मृगोपवन ३६

ल

ललित विस्तर १७–९७–१४४–१४६–१४७
लठ्ठीवन ५०
लुंबिनीवृक्ष ५
लोभ १६३
लोकांतरिक १०५

व

वरब ३२
वज्जिच्या (वृज) १२७–१२८
वसुंधरा ४०–४१–७१
वटवृक्ष ४३
वप्प ४९
वर्षाकार ८६
वज्रपाणी १–२०३

वासभखत्तिया ८५
विश्वामित्र ११–१२
विश्वकर्मा २०
विश्वंतरजातक ५५
विशाखा ५९
विदर्शना १०८
विनयपिटक १२७–१२८–१४०–१४१
विभज्यवादी १२९–१४०
विशुद्धिमार्ग १३७
विभंग १४१–१४२
विडयूडभ ८५
विसुद्धिमग्ग १५०
विद्यारण्य १५७
वेणुवन ५१ ते ५३–६०–६३–५७–८१
वेण्णुकुंज ७३
वेरञ्जा ७५
वेठ्ठादीप ९२
वेहफ्फल १०६
वैहर ३२
वैशाली ६० ते ६३–७५–८७–९२–१२८
वैशारद्य ११०
वैशाखपूजा १२५
वैभाविक १३८
वैपुल्य सूत्र १४५ ते १४७
व्रिशव ३२
व्रजिअतलोक ८६
व्यभिचार १६१


श


शक्र ५१
शक्ति १०९
शाक्य ६१–८५
शाक्यवंशीय ४–५२–८०
शालवृक्ष ५
शाक्यमुनि १४७
शांतिदेव १५१
शिवाजी महाराज २
शिष्यश्रेष्ठ ५२
शुद्धोदन ४–६–७–१६–२०–३–५७–५८–६१–८५
शंकराचार्य १३९–१५४–१५७
श्रमण ४८–५२
श्रावस्ती ५८–६३–६७–७२–७४–७५–७७–७९
श्रीपाद १०९
श्रेण्य, श्रेणिक ३२
श्रोतापन्न १०१


ष


षडायतन ९६–९७


स


समुद्ददत्त ८४
सकृदागामिन १०१





सवितक्क १०४
सञ्जीव १०६
समथ १०८
सम्माप्पधान १०८
समुद्र १३५
सम्युत्त निकाय १४२
सद्धम्म संग्रह १५१
सद्धम्मोपायन १५१
सारिपुत्र ५२–५७–५८–८१–८४–८८
सामणेर पव्वज्जा ५८
सालवती ६०
सालवृक्ष ८९
साची १४२
सामंत प्रासादिका १४९
सारसंग्रह १५०
सिद्धथ्थ ७
सिद्धार्थ २२–४१–५४
सिलोन ४३
सीतवन ५८
सुप्रबुद्ध ११–७५–७६
सुजाता ३६
सुवर्णमध्य ४८
सुपत्तिठ्ठ ५०
सुंदरी ७७–७८
सुभद्द ९०–१२६
सुमेरु १०५
सुभकिण्ण १०६
सुदस्स १०६
सुदस्सिन १०६
सुभद्रांगी १३३
सुत्तान्त १४१–१४२
सुत्त पिटक १४१–१४२
सुख्खत्तिव्युह १४७
सुबोध वचनें १८२
सूत्र १३८–१४०
सेनार्ट फ्रेंच २
सेनीय ३३
सोखियाधम्म १२२
सोथ्थीय ३८
सोरेय्य ७५
सौत्रांतिक १३८
संघ ४६–५१–५२
संजय ५२–६५ ते ६८
संकाश्य नगरी ६९–७५
संघात १०६
संघाटी १२०
संघा दिसेस १२२
संभूत साणवासी १२८
संघ मित्रा १३६–१३७
स्टीवन्स ३०
स्थवीर १३८–१४०

स्तूपें २००
स्वस्तिक ३८

ह

हर्षशीलादित्य १२५
हार्डी ३
हिरण्यवती ८९
हिनायना १४७
हिंसा १६०
हु एन संग १४८
हॅमिल्टन् गॅझेटियर ३९

क्ष

क्षेमेन्द्र १५१

श्रीसयाजी साहित्यमालेंतून प्रसिद्ध झालेले

# धर्म, नीतितत्त्व व तत्त्वज्ञान

## या विषयांवरील ग्रंथ.

१. (६)—**हिंदुस्थानना देवोः**-कै. रा. बा. कमळाशंकर प्राणशंकर त्रिवेदी, बी. ए. E.E.O. Martin कृत "Gods of India" नो अनुवाद. (१९१७) किं. ४-० ०

२. (७)—**नीतिशास्त्रः**— प्रो. अतिसुखशंकर कमळाशंकर त्रिवेदी, एम्. ए., एलएल. बी. Reshdall's "Ethics" नामक ग्रंथनुं गुजराती भाषांतर. (१९१८) किं. ०-१४-०

३. (२३)—**दीघनिकाय भाग १ लाः**—कै. प्रो. चिंतामण वैजनाथ राजवाडे, एम्. ए., बी. एससी. पालीभाषेंतील भाषांतर. मराठी (१९१८) .... ... किं. १-८-०

४. (२७)—**नीतिविवेचनः**-मेसर्स ए. जी. विजरी, अतिसुखशंकर क. त्रिवेदी, अने मणिलाल मो. झाला. (१९१८-१९२६) किं. १-२-०

५. (३२)—**तुलनात्मक धर्मविचारः**—मूळशंकर माणेकलाल याज्ञिक बी. ए. Jevons कृत "Comparative Religion" नो गुजराती अनुवाद. (१९१९) ... किं. ०-१३-०

६. (३६)—**धर्मनां मूळतत्त्वोः**—रामप्रसाद काशीप्रसाद देसाई बी. ए., Stanley Cooks कृत "Foundations of Religion" नो गुजराती अनुवाद (१९१९) ०-१०-०

७. (३७):–नैतिक जीवन तथा नैतिक उत्कर्षः–कांतिलाल केशवराय नाणावटी एम्. ए., सार्लीकृत " The Moral life and Moral worth" नो गुजराती अनुवाद. (१८१९) किं. ०–१५–०

८. (४२)–विविध धर्मोनुं रेखादर्शनः–रामप्रसाद काशीप्रसाद देसाई. बी ए., मेक्युलेक कृत 'Religion" नों गुजराती अनुवाद. ( १९२० ) ... ... किं. १–१२–०

९. (४४)–उत्तर युरोपनी पुराणकथाः–गोरधनदास नौतमराम काजी, बी. ए. होफमेन कृत " Northern Mythology" नो गुजराती अनुवाद. ( १९२० ) किं. ०–१४–०

१०. (७१)–उदासीपंथनां नीतिवचनोः–प्रो. अल्बन जी. विरी, एम. ए ( १९२३ ) ... किं. १–१०–०

११. (७६)–नीतिविवेचनः–कांतिलाल केशवराय नाणावटी, एम्. ए. नीतिविवेचननुं हिन्दी भाषांतर ( १९२३ ) किं. ०–५–०

१२. (८०)–तुलनात्मक धर्मविचारः–राजरत्न पंडित आत्माराम राधाकृष्ण. हिन्दी ( १९३१ )... ... किं. १–०–०

१३. (८१)–सत्यमीमांसाः–कै. हीरालाल व्रजभूखणदास श्रोफ, बी. ए. विद्याभूषण Wildon Carr कृत "The problem of Truth" ( सत्यना अर्थविषयक वाद ) नो गुजराती अनुवाद. ( १९२३ )... ... ...किं. १–१–०

१४. (८६)–अवतार रहस्यः–शांतिप्रिय आत्माराम पंडित हिन्दी ( १९२३ ) ... ... ... किं. ०–१४–०

१५. (९७)–मनोधर्मविद्यानां मूळतत्त्वोः–हिंमतलाल कल्याणराय बक्षी. बी. ए., W. Mcdougall कृत 'Psychlogy" नो गुजराती अनुवाद (१९२५) ०–११–०



१६. (११२)–तत्त्वज्ञानांतील कूट प्रश्नः–दाजी नागेश आपटे. बी. ए., एलएल. बी. Bertrand Russell कृत 'Problems of Philosophy'' चा मराठी अनुवाद. ( १९२६ ) ... ... ... ... किं. १–०–०

१७. (११८)–सिद्धान्तदर्शनः–वे. शा. सं. छोटालाल नरभेराम भट्ट कलादीप. ( १९२७ ) ... ... किं. १–११–०

१८. (१२२)–परिवर्तनवादः–दयाशंकर जेशंकर घोळकिया, बी. ए. Henry Bergson कृत " Philoshopy of Change " नो गुजराती अनुवाद. (१९२८) ०–१०–०

१९. (१३२)–श्रीमद् भगवद्गीताः–( श्री शंकरानंदी टीका सहित ) भाग पेहेलो, मोतिलाल रविशंकर घोडा, बी. ए., एलएल. बी. ( १९२८ ) ... ... ... किं. २–४–०

२०. (१३५)–रुद्री अष्टाध्यायीः–पुरुषोत्तम जोगीभाई भट्ट बी. ए., एलएल. बी. ( १९२८ ) ... ... किं. १–८–०

२१. (१५९)–श्रीमद् भगवद्गीता भाग २ः–मोतीलाल रविशंकर घोडा, बी. ए., एलएल. बी, (१९२८) किं. ०–१०–०

२२. (१६६)–वैयासिक न्यायमालाः–वे. शा. सं. छोटालाल नरभेराम भट्ट, कलादीप ( १९२८ ) ... ...किं. १–८–०

२३. (१७७)–श्रीमद् भगवद्गीताः–भाग ३. मोतीलाल रविशंकर घोडा, बी. ए., एलएल. बी. ... ... किं. २–२–०

२४. (१७९)–स्वयंप्रेरणाः–रविशंकर अंबाशंकर छाया बी. ए., एलएल. बी. ' Auto-suggestion' नो अनुवाद ( १९३० ) ... ... ... ... ... किं. १–१–०

२५. (१८२)–ऋग्वेद संहिताः–अष्टक पहेलुं–पूर्वार्धः–मोतिलाल रविशंकर घोडा, बी. ए., एलएल. बी. (१९३०) किं. २–०–०

२६. (१८६)–जातकातील निवडक गोष्टीः–प्रथमार्धः–प्रो. चिंतामण विनायक जोशी, एम्. ए. (१९३०) मराठी किं. १–१२–०

२७ (१९२)–**पाश्चात्य तत्त्वज्ञानः**–प्रो. दत्तात्रय गो. केतकर, एम्, ए. **मराठी** (१९३१) किं. १–१२–०

२८. (१९५)–**ऋग्वेद संहिताः–अष्टक पहेलुं:–उत्तरार्धः**–मोतिलाल रविशंकर घोडा, बी.ए., एलएल. बी. (१९३१) किं. २–९–०

२९. (१९६)–**दीघनिकाय भाग २ रा** क.प्रो. चिंतामण वैजनाथ राजवाडे **मराठी** ( १९३२ ) किं. २–८–०

३०. (२००)–**धर्मोनी बाल्यावस्थाः**–चुनीलाल म. देसाई. बी. ए. ' Childhcod of Religions ' नो अनुपाद (१९३२) किं. १–२–०

३१. (२०२)–**बौद्धधर्म अर्थात् धर्मचिकित्साः**– रामचंद्र नारायण पाटकर, बी.ए. Mrs. Rhys Davis कृत Buddhism चा अनुवाद **मराठी** (१९३२) किं. १–०–८

३२. (२०५)–**वीरशैव संस्कृतिः**–रा. शंकर गोविंद साखरपेकर, स्वामी रामलिंग करमाळेकरना मराठी पुस्तकनो अनुवाद (१९३२) किं. ०-१३-०

३३. (२११)–**सुलभनीतिशास्त्रः**–दाजी नागेश आपटे, बी. ए., एलएल. बी. **मराठी** (१९३३) किं. ०–११–०

३४. (२१३)–**नीतिशास्त्रप्रबोधः**–दाजी नागेश आपटे, बी. ए. एलएल. बी. **मराठी** (१९३३) किं २–०–०

३५. (२१९)–**कबीर साहेबनुं बीजकः**–प्राभाशंकर प्रणलाल बक्षी, बी. एससी. (१९३३) किं. १–१२–०

३६. (२२५) **कुन्गमुनि ज्ञानामृतः**–डॉ. हरिप्रसाद शास्त्री पी. एच. डी. (चिनीभाषामां थी अनुवाद) **हिन्दी** (१९३३) किं. १-०-०

३७. (२३३)–**भगवान् बुद्ध (चरित्र व धर्मसारसंग्रह)**:–कवि रामराव मा. भांबुरकर ( **मराठी** ) ( १९३४ ) किं. २–०–०

---

This book may be kept a fortnight.

SHML-BK
BK3547

BL 1470 .B4
भांबुरकर, श. मा.
भगवान बुद्ध,
(चरित्र व धर्मसारसंग्रह)

| Signature | Issue Dat |
|---|---|

BL
1470
.B4
BK-3547